# कृष्ण परमात्मा


४



श्रीपरमानंदस्वामी

“ज्याप्रमाणे सर्व अंगांना शुद्ध रक्ताचा पुरवठा करणाऱ्या खुद्द हृदयालाही कार्यरत रहाण्यासाठी त्या शुद्ध रक्ताची आवश्यकता असतेच आणि त्यासाठी त्या हृदयातीलच शुद्ध रक्त हृदयाला पुरविण्याची व्यवस्था जशी परमेश्वराच्या नियतीत निसर्गानेच करुन ठेवलेली आहे, त्याचप्रमाणे सर्वांना खऱ्या व शुद्ध प्रेमाचा अनुभव देणाऱ्या कृष्णालाही त्या प्रेमाची आवश्यकता होतीच. अशा खऱ्या प्रेमाचा अनुभव त्याला कोणी आणून दिला की नाही? कृष्णाचेच शुद्ध प्रेम घेऊन कोणीतरी तेच प्रेम भक्तिभावाने कृष्णाला अर्पण केले की नाही ?”

कोमल प्रकाशन



नारद व लक्ष्मी यांच्या संवादातून

उलगडलेले कृष्णाच्या अंतरंगातील गुज

# कृष्ण परमात्मा

## भाग ४


श्री.अविनाश मोरेश्वर लिमये

एम.एस्सी.

उर्फ

श्रीपरमानंदस्वामी


**सर्व हक्क स्वाधीन :**
सौ.अनुपमा अविनाश लिमये
१ ३, नवलकर बिल्डिंग, न.चिं.केळकर रोड,
दादर (पश्चिम), मुंबई ४०० ०२८
दूरध्वनी : ०२२ - २४३६ १५१४
मोबाईल : ९९६९८ ७६८५०

ई प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane (w) 400604.
7710980841
https://play. google. com/store/apps/details? id=com. esahity. www. esahitybooks
प्रकाशन : १९ डिसेंबर २०१७
©esahity Pratishthan®2017

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे,



**।।श्री।।**

साहित्यसिन्धोः बहुनि सन्ति

रत्नानि दिव्यानि सुभाषितानि ।

कृष्णस्य हृद्यं गुणगानवाक्यं

सुभाषितं मंगलमेव पुण्यम् ।।

श्रीअवधूतस्वामी

**अर्थ**

साहित्यरूपी सिंधुमध्ये

सुभाषितरूपी असंख्य दिव्य रत्ने आहेत.

परंतु

कृष्णाच्या हृदयाचे गुणगान करणारे वाक्य

हेच मंगलदायी आणि

पुण्यकारी सुभाषित आहे.

# अनुक्रमणिका


१८. स्वयंवर स्थगिती

१९. कृष्ण-रुक्मिणी विवाह

२०. अर्जुन-सुभद्रा मनोमिलन

२१. कृष्णाची युक्ती

२२. रुक्मिणीने केली पूर्ती



# स्वयंवर स्थगिती

रूक्मिणीचे बोलणे एवढ्या उत्स्फूर्तपणे आणि तिच्या अंतःकरणापासून घडत होते की ते ऐकताना सर्वजण अगदी मंत्रमुग्ध होऊन राहिले होते. सर्व मंडपात एकीएक शांतताच पसरून राहिलेली होती. कोणालाही काही बोलण्याचे व काही करण्याचे भानच उरलेले नव्हते. पण सभेतील काही जाणकारांच्या लक्षात आले, की रूक्मिणीच्या बोलण्याने केवळ एकाच व्यक्तिकडे निर्देश होत होता आणि ती व्यक्ति म्हणजे 'कृष्णच' याविषयी त्यांच्या ठिकाणी मुळीच संदेह नव्हता. त्यांची ती खात्री खरीच ठरली. कारण पुढच्याच क्षणाला सर्वांच्या समक्ष रूक्मिणी आपल्या हातात वरमाला घेऊन कृष्णाच्या दिशेने वेगाने पावले टाकीत निघाली सुद्धा होती.

रूक्मिणीचा भाव कृष्णाच्या अंतःकरणात आधीच पोहोचलेला होता. त्यामुळे रूक्मिणीच्या बोलण्यातील संकेतही कृष्णाने आधीच ओळखला होता. त्याचीच परिणती म्हणून कृष्णही रूक्मिणीचे स्वागत करण्यासाठी प्रसन्न मुखकमलाने आपल्या आसनावरून उठून उभा राहिला. आता रूक्मिणी व कृष्ण यांच्यात केवळ काही पावलांचेच अंतर राहिले होते. तेवढ्यातच रूक्मिचा भयंकर आवाज सभामंडपात गरजला. त्वेषाने व मोठ्या आवाजात रूक्मी जवळ जवळ ओरडलाच, "थांब. रूक्मिणी, थांब. एक पाऊलही पुढे टाकू नकोस नाहीतर येथे मोठा अनर्थ ओढवेल" असे म्हणत आणि रागाने दणादण पावले टाकीत रूक्मी रूक्मिणीच्या जवळ येऊन उभा राहिला. त्याने रूक्मिणीचा हात धरून तिला केवळ थांबविलेच नाही, तर थोडेसे मागेही खेचले आणि रागारागाने जवळजवळ किंचाळूनच बोलू लागला,


"रूक्मिणी, मी तुला निक्षून सांगतो की कोठल्याही परिस्थितीत मी तुझे लग्न या कृष्णाशी होऊ देणार नाही. जाणून बुजून मी तुला दुःखाच्या खाईत कधीच लोटणार नाही. कृष्णाच्या या मायावी व्यक्तिमत्त्वाला भुलून तुझे मन दुर्बल झालेले आहे आणि तुझी बुद्धीही चालेनाशी झालेली आहे. मुळात तुम्हा स्त्रियांची बुद्धी ही कोतीच असते आणि त्यातून तुझ्या बुद्धीलाही कृष्णाचा मोहच पडलेला दिसतो. त्यामुळेच तुझ्या दृष्टीला अंधत्व आलेले आहे आणि खरे व खोटे यातील फरक ओळखण्याची तुझ्या बुद्धीची कुवतच राहिलेली नाही. म्हणूनच या कृष्णाच्या मायाजालात तू फसून राहिली आहेस. परंतु या तुझ्या अधोगतीपासून तुला वाचवणे हे माझे कर्तव्यकर्म आहे आणि कोणत्याही परिस्थितीत ते मी पूर्ण करणारच.

हे रूक्मिणी, एक गोष्ट लक्षात ठेव की या राज्याची राजकन्या म्हणून तुझेही जे कर्तव्यकर्म आहे ते तुला सर्वात आधी पार पाडावयाचे आहे. त्याचप्रमाणे तुझ्याकडून कुटुंबाचाही विचार घडणे जरूरीचे आहे. म्हणूनच कोणताही निर्णय घेताना तो राज्याच्या हिताचा व कुटुंबाच्या स्वास्थ्याचा आहे ना, याच विचाराला तू प्राधान्य द्यावयास हवे हे लक्षात ठेव. तुला निर्णय घ्यायला स्वातंत्र्य दिले याचा अर्थ असा नव्हे, की तू वाटेल तशी मनमानी करावीस आणि स्वतःच्या स्वार्थासाठी राज्याच्या व कुटुंबाच्या हिताकडे दुर्लक्ष करावेस. पण तरीही हट्टाने जर तू असा काही आततायी निर्णय घेतलास तर तो मला कधीही मान्य तर होणार नाहीच आणि मी त्याला कडाडून विरोधच करेन, हे पूर्णपणे लक्षात ठेव.

हे रूक्मिणी, राज्याच्या, आपल्या कुटुंबाच्या आणि तुझ्याही हिताच्या दृष्टीने आम्ही तुझ्यासाठी ‘वर’ म्हणून शिशुपालाचीच निवड केलेली आहे आणि ते सर्वथैव योग्यच आहे. रूप, गुण, ऐश्वर्य, पराक्रम इत्यादी अंगाने पाहिले असता शिशुपालासारखा कोणीही पुरुष या मंडपात नाही. त्याची बरोबरी कोणाशीच होऊ शकत नाही. कृष्णासारख्या यःकश्चित मनुष्याची शिशुपालाशी तुलना करणे, म्हणजे तर एखाद्या माकडाची तुलना सिंहाशी करण्यासारखे आहे. खरे तर या कृष्णाचे नाव घेऊन माझी जीभ विटाळायची नाही असेच मी ठरवले होते. परंतु तुझ्या या हट्टामुळे मला आता त्याच्याविषयी बोलणे नाइलाजाने भाग पडत आहे.

अगं, कृष्ण, कृष्ण म्हणून ज्याच्या नावाचा तू एवढा डांगोरा पिटत आहेस त्याची या मंडपात बसण्याची काय, उभे राहण्याची सुद्धा लायकी नाही. या मंडपात केवळ कुलीन व शीलवान राजांनाच स्थान आहे आणि या कृष्णाच्या तर कुळाचाच पत्ता नाही. त्याचे निश्चित आईबाप कोण हेही कोणालाच काय, खुद्द त्यालाही ठाऊक नाही. अशा परिस्थितीत खरे तर कृष्णासारख्याला येथे बोलवायचेच कारण नव्हते. त्यातूनही केवळ औपचारिकता म्हणून बाबांनी त्याला बोलावणे पाठवले असेल, तर कृष्णाने स्वतःच थोडेसे तरी शहाणपण दाखवून येथे न येण्याचे करायला हवे होते. पण एवढीही अक्कल स्वतःला ज्ञानी समजणाऱ्या तुमच्या या कृष्णाला नाही. म्हणूनच एखाद्या आगंतुकासारखा तो या स्वयंवरमंडपात घुसलाच. एवढेच नव्हे तर तो रूक्मिणीशी विवाह करण्याचे स्वप्नही पाहत आहे. परंतु ते तसे कधीही होणे शक्य नाही. कारण मी तसे होऊ देणार नाही. त्याचा प्रत्यक्ष सोक्षमोक्ष याच क्षणी व याच ठिकाणी मी आता लावून दाखवतो.”

रूक्मिच्या ठिकाणी कृष्णाविषयीचा द्वेष, मत्सर एवढा खोलवर होता, की त्याच्या तोंडातून शब्दन् शब्द जणू फुटूनच बाहेर येत होते की काय असेच वाटत होते. परंतु तरीही रूक्मिचा राग काही शमत नव्हता तो नव्हताच. रागाची पराकोटीच रूक्मिच्या ठायी झाली आणि त्या भरातच त्याने आपल्या कमरेची



तलवार उपसून बाहेर काढली आणि तिरीमिरीने तो कृष्णावर चालून गेला. सावध असलेल्या कृष्णानेही क्षणार्धात आपले खड्ग बाहेर काढले आणि पुढे होऊन रूक्मिच्या तलवारीला भिडवले. सभामंडपात एकच गोंधळ उडाला. पण तेवढ्यातही शिशुपाल, जरासंध व त्यांचे साथीदार रूक्मिच्या मागे येऊन उभे राहिले. त्याचबरोबर कृष्णाच्या बरोबर असलेले त्याचे जोडीदार यदुवीरही कृष्णाच्या पाठीशी उभे राहिले. भीष्मकही स्वतः धावतच पुढे आला आणि रूक्मी व कृष्ण यांच्याजवळ येऊन त्यांना आवरण्याचा प्रयत्न करू लागला. परंतु कृष्ण व रूक्मी यांची परस्परांना भिडलेली शस्त्रे काही मागे हटलीच नाहीत. कारण कृष्ण व रूक्मी स्वतःची पूर्ण ताकद पणाला लावून व पाय ठामपणे रोवून जागच्या जागीच उभे राहिले होते. त्या दोघांच्या ताकदीचीच किंवा बळाचीच जणू कसोटी लागत होती. अर्थात कृष्णापुढे जास्त वेळ टिकून राहणे रूक्मिला शक्य झालेच नसते.

तेवढ्यात एवढा वेळ स्तब्धपणे व थोडीशी दिङ्मूढ होऊन उभी राहिलेली रूक्मिणी पुढे सरसावली आणि रूक्मिला उद्देशून मोठ्याने म्हणाली, “अरे रूक्मी, आधी आपली तलवार मागे घे. नाहीतर मी याच ठिकाणी व आत्ताच माझ्या जीवाचे बरेवाईट करून घेण्यास कमी करणार नाही. ही माझी केवळ पोकळ धमकी नसून तो माझा निश्चयच आहे हे लक्षात ठेव.” एवढे बोलून रूक्मिणी लगेचच कृष्णाकडे वळली आणि हळुवार व मृदु स्वरात म्हणाली, “नाथ, आपण आपले शस्त्र मागे घेण्याची कृपा करावी. माझी तुम्हाला तशी नम्र प्रार्थना आहे.”

रूक्मिणीचे रूक्मिशी झालेले उच्च रवातील बोलणे व कृष्णाशी झालेले मार्दवाचे बोलणे, याचा अपेक्षित परिणाम त्या उभयतांवर झाला आणि ते दोघे पुन्हा आपापल्या आसनावर जाऊन बसले. रूक्मिचा चेहरा अजूनही लालबुंदच होता, तर कृष्णाच्या मुखावरील स्मितहास्य मात्र कायम होते. भीष्मकाने रूक्मिणीचा हात धरला आणि तिला घेऊन पुन्हा मंचावर जाऊन बसला. आता पुढे काय करावे व काय बोलावे हे भीष्मकाला सुचतच नव्हते आणि म्हणून तो आपले मस्तक दोन्ही हातांनी धरून तसाच सुन्न होऊन बसून राहिला.

हे लक्ष्मी, त्यावेळेस सभामंडपातील नीरव शांतता ही सर्वांच्या मनातील तणाव अधिक वाढवण्यासच कारणीभूत व साहाय्यभूत होत होती. ती शांतता वादळ संपल्याची खूण होती, की पुढे येणाऱ्या प्रचंड वादळाचा तो इशारा होता, याचा अंदाज कोणाच्याच मनाला घेता येईना. बहुतेकांच्या मनाला तर भीतीनेच व्यापले होते आणि ते सर्वजण असहाय्य होऊन स्वस्थ बसून राहिले होते. सभामंडपातील ती थोड्या काळची स्तब्धताही दीर्घ काळाची जाणवत होती आणि

वातावरणातील ताण वाढवत होती. तेवढयात रूक्मिणीच आपल्या आसनावरून उठून मंचाच्या मध्यभागी आली. सर्वांच्याच नजरा चकित होऊन, पण अपेक्षेने रूक्मिणीकडे लागून राहिल्या असतानाच रूक्मिणीने शांत स्वरात व स्पष्ट शब्दात बोलावयास सुरूवात केली.

“मंडपात उपस्थित असलेल्या सर्व वंदनीय गुरूजन व आदरणीय प्रजाजन यांची सर्वप्रथम मी मनःपूर्वक क्षमा मागते. घडलेला प्रसंग हा अनुचित तर होताच, परंतु त्याहीपेक्षा उपस्थित असलेल्या थोरामोठ्यांचा अवमानच करणारा तो प्रसंग ठरला याचे मला अत्यंत वाईट वाटत आहे. हे सर्व माझ्या स्वयंवराच्या निमित्ताने घडले म्हणून मीच या प्रसंगाला जबाबदार आहे अशी माझी भावना आहे आणि म्हणून त्याचीच मला जास्त खंत वाटत आहे. माझ्या स्वयंवरामुळे जर कोणाच्या मनातील राग व द्वेषमत्सरादी विकार उफाळून येत असतील आणि त्याची परिणती जर एकमेकांमध्ये युद्ध होण्यात होत असेल, तर त्यासाठी मी माझाच धिक्कार करते. माझ्या निमित्ताने जर येथे कोणाचेही रक्त सांडणार असेल तर माझे अस्तित्वही मला नकोसेच होईल. माझे जगणेही मग माझ्यासाठी निरर्थकच आहे. परंतु ईश्वराच्या कृपेने मला लाभलेले हे मानवी जीवन मला व्यर्थ घालवायचे नसून मला त्याचे सार्थक करावयाचे आहे.

हे सुजनहो, माझा विवाह हा माझ्या जीवनातील अत्यंत महत्त्वाचा क्षण आहे हे मी जाणून आहे आणि म्हणूनच त्यासंबंधीचा निर्णय मी कोणत्याही तणावपूर्ण मनःस्थितीत व घाईगडबडीने घेणार नाही. अत्यंत शांत व स्थिर मनानेच तो निर्णय मला घ्यायचा आहे. परंतु त्यासाठी लागणारे अनुकूल वातावरण आता या क्षणाला येथे नाही, ही गोष्टही खरीच आहे. किंबहुना ते वातावरण जाणून बुजून बिघडवण्याचा प्रयत्न काही संबंधित व्यक्तींकडून घडत आहे, हे आपणा सर्वांनाच आता अगदी स्पष्टपणे दिसले आहे. एकीकडे मला स्वयंवराचे स्वातंत्र्य दिल्यासारखे दाखवून आपण उदारमतवादी आहोत असे दाखवायचे, परंतु दुसरीकडे मात्र स्वतःच्या मनासारखे झाले नाही तर रागाने आक्रस्ताळेपणा करायचा आणि स्वतःची मते दुसऱ्यावर लादण्याचा प्रयत्न करायचा. ‘तुझी मनमानी अजिबात चालू देणार नाही’ असे मला सांगायचे आणि स्वतःची मनमानी चालवायची, असा मनाचा अहंमन्यपणा व दुटप्पीपणा आपण सर्वांनीच पाहिलेला आहे. परंतु मीही मनाची तेवढीच खंबीर आहे. मी काही युद्ध करून मिळवावी अशी वस्तू किंवा मालमत्ता नव्हे. माझा स्वयंवराचा निश्चय कायम आहे. काहीजणांच्या मनाचा तोल सुटून ते बेताल झाले असतील, पण माझ्या ठिकाणचा विवेक व संयम जागृत आहे.

सभामंडपातील सर्व मान्यवरांना व विवाहेच्छुक वरांना मी एवढेच सांगते, की सध्याच्या परिस्थितीत योग्य वराची निवड करणे मला शक्य नाही. गढूळ झालेले वातावरण निवळल्यावरतीच मी शांत मनाने व सर्वांगाने विचार करूनच निर्णय घेऊ शकेन. त्यासाठी काही काळ जाऊ देणे हे केवळ माझ्यासाठीच नव्हे, तर सर्वांसाठीच आवश्यक आहे. त्यामुळेच आज, आता या क्षणाला माझे स्वयंवर कोणताही निर्णय न होता स्थगित करण्यात येत आहे. स्वयंवराचा पुढील दिवस व वेळ ही गुरूजनांच्या मार्गदर्शनानुसार व सर्व मान्यवरांशी विचारविनिमय करून ठरवण्यात येईल आणि त्यावेळेस त्याचे आमंत्रण पुन्हा सर्वांना पाठवण्यात येईल. त्याचा आदर व मान राखून सर्वांनी अगत्य येण्याचे करावे अशी नम्र विनंती मी सर्वांनाच करते. आजच्या या दुर्दैवी प्रसंगामुळे अनेकांच्या मनाला क्लेश झाले असतील याची मला जाणीव आहे. त्या सर्वांची मी पुन्हा क्षमा मागते आणि मनामध्ये कोणतीही कटुता न बाळगता, पुन्हा परत येण्यासाठी शांत मनाने आपण सर्वांनी आपापल्या राज्यांकडे प्रस्थान करावे अशी पुन्हा विनंती करते.”


रूक्मिणीचे निश्चयात्मक बोलणे आणि तिने समजूतदारपणा दाखवून घेतलेला निर्णय ऐकून मंडपातील सूज्ञ व मान्यवर जनांना रूक्मिणीचे अगदी मनापासून कौतुक वाटले. त्या सर्वांनी कौतुकाने मान डोलवली आणि ‘योग्य, योग्य’ असे सहजोद्गार त्यांच्या मुखातून बाहेर पडले. एवढा वेळ असहाय्य व अगतिक होऊन आपल्या आसनावरती बसून राहिलेल्या भीष्मकाच्या मनालाही धीर आला आणि त्याला एकदम हलके वाटू लागले. त्यांने स्वतःला सावरले आणि धिम्या गतीने एकेक पाऊल टाकीत तो रूक्मिणीच्या जवळ येऊन उभा राहिला. त्याने रूक्मिणीच्या पाठीवर आपला हात ठेवून कौतुकाने हलकेच थोपटले आणि तिचे मस्तकही अत्यंत प्रेमाने कुरवाळले. पित्याच्या नेत्रातील अश्रू पाहून रूक्मिणीचे मनही भरूनच आले. मंचावरील ते भावपूर्ण दृश्य पाहून मंडपातील सत्प्रवृत्तीच्या सज्जनांचे नेत्रही पाणावले. परंतु दुष्ट प्रवृत्तीचे शिशुपाल व जरासंधासारखे दुर्जन मात्र कोरडेपणाने तटस्थच राहिले. एकीकडे त्यांचा अहंकार तर दुखावला गेला होताच. तरीही त्यांच्या दृष्टीने दुःखातील एकमेव सुख एवढेच होते, की रूक्मिणीने दुसऱ्या कोणालाही म्हणजे अगदी कृष्णालाही प्रत्यक्ष वरले असे नव्हतेच. त्यांच्या मनातील हा आसुरी आनंद शेवटी न राहवून रूक्मिच्या मुखातून प्रगट झालाच. तो मोठ्या आवाजात जवळ जवळ ओरडलाच, “रूक्मिणीचे स्वयंवर मोडले. आमचाच विजय झाला.” असे बोलून शिशुपाल, जरासंध व त्यांचे पाठीराखे राजे यांच्यासह रूक्मी चरफडतच त्या मंडपाच्या बाहेर चालता झाला.

अशा तऱ्हेने सर्व सभेच्या समक्ष रूक्मिने आपल्या रागाचा व द्वेषमत्सराचा केलेला देखावा पाहून सर्वच जण चकित तर झालेच, पण अनेकांना त्याचे अत्यंत वाईट वाटले. तशी हळहळ काही जणांच्या मुखाद्वारे सहजपणे प्रगटही झाली. पण थोड्याच वेळात सभामंडपात पुन्हा शांतता पसरली. झाल्या प्रकाराने भीष्मकही खिन्नच झाला. त्याच्या मनालाही अत्यंत खेद झालाच. पण त्याने त्या प्रकाराकडे प्रयत्नपूर्वक दुर्लक्ष केले आणि तो शांतपणाने सभेला उद्देशून बोलू लागला.

"मंडपातील सर्व सज्जनहो, झाल्या प्रकाराबद्दल प्रथम मी सर्वांचीच क्षमायाचना करतो. राज्याचा राजा म्हणून या सर्व समारंभाचा मी मुख्य असूनही, मला घडलेल्या प्रसंगावर नियंत्रण ठेवता आले नाही. हा माझ्या मनाचा कमकुवतपणा आहे हे निश्चितच. परंतु अनपेक्षितपणे आणि तेही कुटुंबातील अगदी जवळच्या व भरवशाच्या व्यक्तींकडूनच असे अविचाराचे वागणे अचानक घडल्यामुळे मी दिङमूढ झालो आणि माझे मन बावरलेही. प्रसंगात मी कमी पडलो हे तर खरेच आहे. त्याचे मला काहीही समर्थन करता येणारच नाही. परंतु त्या प्रसंगात माझी लाडकी कन्या रूक्मिणी न घाबरता खंबीरपणे उभी राहिली याचा मात्र मला निश्चितच अभिमान वाटत आहे. आपल्या निमित्ताने आपल्या कुळाला कोणतेही दूषण लागले जाऊ नये आणि आपल्या मातापित्यांवर लज्जेने मान खाली घालण्याची वेळ येऊ नये, एवढा खोलवर विचार करून विवेकाने योग्य तो निर्णय घेणारी आमची सुकन्या रूक्मिणी, ही खरे तर आमच्या कुळाचे व या राज्याचे भूषणच आहे. अशी सुकन्याच सुगृहिणी होऊ शकते हे सत्यच आहे.

कन्या हे परक्याचे धन आहे असे म्हणतात आणि माझा दृढ विश्वास आहे, की हे आमचे धन सुयोग्य अशा व्यक्तीच्याच स्वाधीन होणार आहे. ईश्वरी इच्छेनुसार जेव्हा ती योग्य वेळ येईल तेव्हाच सर्व काही व्यवस्थित घडेलच याची मला खात्री आहे. पण तशी वेळ या क्षणाला आलेली नाही हे आपण सर्वांनीच पाहिले व जाणले आहे. तेव्हा रूक्मिणीने घेतलेला निर्णय योग्यच आहे हे जाणून आणि त्यालाच प्रमाण मानून आपण त्या योग्य वेळेची वाट पाहूया. सर्वांनी प्रेमाने आमचा निरोप घ्यावा व आपापल्या राज्याकडे प्रस्थान करावे अशी नम्र विनंती मी सर्वांनाच करीत आहे. रूक्मिणीच्या स्वयंवराचा पुढील दिवस व वेळ पुन्हा सर्वांना कळविण्यात येईल. त्यासाठी आत्ताच सर्वांना प्रत्यक्ष आमंत्रण करतो. त्याचा सर्वांनी प्रेमाने स्वीकार करावा आणि त्यावेळी सर्वांनी स्वयंवरासाठी उपस्थित रहावे एवढीच सर्वांना पुन्हा प्रेमाची विनंती आहे."

भीष्मकाचे बोलणे हे स्वयंवर संपल्याचीच सूचना आहे हे ओळखून सर्व उपस्थित राजे, महाराजे आपापल्या आसनावरून उठून उभे राहिले आणि सभामंडपाबाहेर जाऊ लागले. घडल्या प्रसंगाबाबतची चर्चा व विश्लेषण करीत



त्यांची आपापसात कुजबुज एवढ्या मोठ्याने होत होती, की त्याचा गलबलाट वाढतच राहिला. काहीजण तर एवढ्या तावातावाने एकमेकांशी बोलत होते, की चर्चेचे रूपांतर वादात आणि मुद्याचे रूपांतर गुद्यांत होऊ लागले होते. कोणी रूक्मिणीच्या समंजसपणाचे कौतुक करीत होते, तर काहीजणांना ते रूक्मिणीचे ‘शहाणपण’ वाटून ते तिच्यावर प्रखर टीकाच करीत होते. काहीजणांना भीष्मकाची दुर्बलता व असहाय्यता पाहून त्याची दया वाटत होती, तर अनेकजणांना रूक्मिचे वागणे व बोलणे हे अत्यंत निंदनीय आहे असे जाणवून ते त्याला अनेक दूषणे देत होते. परंतु अशा अनेक तऱ्हेच्या प्रतिक्रिया केवळ बोलूनच प्रगट करण्यापलिकडे कोणीच काही करू शकत नव्हते. हळूहळू सर्वचजण मंडपाबाहेर गेले आणि मंडप जवळ जवळ रिकामाच झाला. अशा वेळी सावकाश पावले टाकीत, जेथे भीष्मक व रूक्मिणी उभे होते तेथे कृष्ण आला आणि त्याने भीष्मकाला आदराने वाकून अभिवादन केले. भीष्मकाने पुढे होऊन कृष्णाचे हात आपल्या हातात घेतले आणि त्याच्याशी जड अंतःकरणाने बोलू लागला.

“हे कृष्णा, कोणत्या शब्दात तुझी क्षमा मागावी हेच मला सुचत नाही. मी तुझा शतशः अपराधी आहे. तुझ्या रूपाने माझ्या दारी आपणहून चालत आलेले माझे व माझ्या रूक्मिणीचे भाग्य, केवळ माझ्या नाकर्तेपणामुळे मी आपणहूनच दूर लोटले आहे. एवढेच नव्हे, तर भर सभेत तुझा अवमान होत असतानाही मी केवळ स्वस्थ बसण्यापलिकडे काहीच करू शकलो नाही, यासाठी तर माझी मलाच लाज वाटत आहे. परंतु या माझ्या प्रिय रूक्मिणीने मात्र माझी लाज राखली आणि माझी सुकन्या हे नामाभिधान तिने सार्थ केले. तिने विवेकाने व चातुर्याने जो निर्णय घेतला त्यामुळे जरी आजच्या प्रसंगातून मी निभावून गेलो आहे, तरी ते तात्पुरतेच आहे. कारण आजचे मरण पुढे ढकलल्यासारखे झाले एवढेच. पुन्हा केव्हातरी स्वयंवराचा प्रसंग येणारच आहे आणि मला त्याला तोंड हे द्यावे लागणारच आहे. त्यातून माझी सुटका नाहीच. पण त्यावेळेस तरी मला योग्य ते धैर्यबळ घेता यावे अशी प्रार्थना मी त्या ईश्वराकडे करतो. कृष्णा, तुझ्या क्षमेला मी पात्र नाही हे मला ठाऊक आहे. तरीही कृपावंत होऊन तू मला क्षमा करावीस एवढीच विनंती मी तुला करतो.”


भीष्मकाच्या बोलण्यावरती कृष्णाने त्याला दोन्ही हात जोडून नमस्कार केला आणि सांत्वनपर शब्दांनी तो त्याच्याशी बोलू लागला,

“अहो महाराज, आपण या कुंडीनपूर नगरीचे राजाधिराज तर आहातच, पण माझ्यासाठी माझ्या पित्यासमान आदरणीय व वंदनीय आहात. तेव्हा माझी क्षमा मागून आपण मला लाजवू नये. खरे तर, घडल्या प्रसंगात कोणीच कोणाची क्षमा

मागण्याचे कारण नाही. कारण जाणूनबुजून कोणीच चुकीचे वागलेले नाही. परमेश्वराच्या नियतीत प्रत्येकजण त्याच्या त्याच्या स्वभावानुसार वागला आहे. त्यामुळेच कोणाही एका व्यक्तीला दोष देता येणार नाही. मनाच्या दुर्बलतेमुळे प्रत्येकजण केव्हा ना केव्हा तरी आणि कुठे ना कुठे तरी कमी पडतच असतो. अशा वेळी भावनेच्या भरात वाहून न जाता आणि मनाठायी निर्माण झालेल्या नैराश्यात अडकून न राहता शांत व स्वस्थ राहणे हेच उचित असते. थोडा वेळ निर्माण झालेले प्रतिकूलतेचे वातावरण परमेश्वराच्या नियतीतील कालचक्रानुसार पुन्हा बदलेल आणि परिस्थितीची अनुकूलता निश्चितपणे प्राप्त होईल. पण त्यावेळेस जर मनाची स्थिती अनुकूल नसेल तर योग्य कृती आपल्याकडून घडणार नाही आणि मग सुदैवाने प्राप्त झालेली संधीही वाया जाईल. त्यासाठी मनाचा दुबळेपणा प्रयत्नपूर्वक झटकूनच टाकला पाहिजे आणि मनाचे बळ प्रयत्नपूर्वक राखले पाहिजे.

अहो महाराज, परंतु घडलेल्या प्रसंगातील एक महत्त्वाचा भाग लक्षात घ्या. त्याच्याकडे मुळीच दुर्लक्ष होऊ देऊ नका. त्या कठीण प्रसंगात व विरोधी वातावरणातही रुक्मिणी ज्या धैर्यबळाने राहिली आणि ज्या विवेकाने वागली त्याला तर तोडच नाही. आपण तिच्यावर केलेल्या सुसंस्कारांचेच हे फळ आहे हे निश्चित. रुक्मिणीकडून प्रगटलेली तेजस्विता व निर्भयता हे तर तिच्या शुध्द व पवित्र अंतःकरणाचेच द्योतक आहे. स्वतःची भूमिका व निर्णय यांचा मनात पूर्ण निश्चय असूनही त्याचा हट्ट न धरता, रूक्मिणीने राजकुळाचा व सर्व राज्याच्याच हिताचा विचार करून त्याला प्राधान्य दिले. म्हणूनच स्वतःसाठी दोष पत्करूनही रूक्मिणीने तिच्या जीवनातील स्वयंवरासारखा अत्यंत महत्त्वाचा प्रसंगही विवेकाने थोपवून धरला आणि योग्य वेळ येताच पुन्हा स्वयंवराची घोषणा करण्याचा निर्णयही रूक्मिणी घेऊ शकली. एवढेच नव्हे, तर घडलेल्या सर्व गोष्टीचा दोष स्वतःकडे घेऊन सर्वांची जाहीर क्षमा मागण्याचे धैर्यबळही रूक्मिणीकडून अगदी सहजपणे प्रगट झाले. खरोखरीच रूक्मिणीचे जेवढे म्हणून कौतुक करावे तेवढे ते कमीच आहे.”

असे म्हणून कृष्ण रूक्मिणीच्या जवळ गेला आणि तिचे दोन्ही हात आपल्या हातात घेऊन कृष्णाने अत्यंत प्रेमाने रूक्मिणीचे अभिनंदन केले. कृष्णाच्या या प्रेमाच्या उत्स्फूर्त कृतीने रूक्मिणी लाजेने अगदी चूर झाली आणि अधोवदन करून उभी राहिली. रूक्मिणी कृष्णप्रेमात स्वतःला एवढी विसरली, की तिथे तिचे मातापिता आहेत याचे भानही रूक्मिणीला तेवढा वेळ राहिले नाही. पण थोड्या वेळाने लक्षात आल्यावरती रूक्मिणी आपले हात कृष्णाच्या हातातून सोडवून घेण्याचा प्रयत्न करू लागली. पण कृष्णाने काही तिचा तो प्रयत्न यशस्वी होऊ दिला नाही. रूक्मिणीला काय करावे हे कळेचना. शेवटी तिने जेव्हा लटक्या रागाचा एक



नेत्रकटाक्ष कृष्णाकडे टाकला, तेव्हाच कृष्णाने अत्यंत मनमोकळेपणाने हसून रूक्मिणीचे धरलेले हात अलगदपणे सोडून दिले. नंतरही कृष्ण कितीतरी वेळ रूक्मिणीकडे मिश्किलपणे पाहत तसाच उभा राहिला. पण रूक्मिणीने मात्र स्वतःला प्रयत्नपूर्वक सावरले आणि ती कृष्णापासून किंचितशी दूर झाली. थोडावेळ तसेच थांबून मग रूक्मिणीने कृष्णाकडे पाहून आपले दोन्ही हात जोडले आणि त्याला विनम्रपणे नमस्कार केला. रूक्मिणीने मंद व मंजूळ स्वरात कृष्णाशी बोलण्यास सुरूवात केली,

“अहो नाथ, माझ्या वागण्याचा व बोलण्याचा आपणाला संतोष झाला यातच मला सर्व काही लाभले. माझे मनोगत आपण पूर्णपणे जाणून आहात. पण त्याचबरोबर माझ्यासाठी असलेल्या बाह्य परिस्थितीच्या मर्यादाही आपण समजून आहात. माझ्या मातापित्यांची अगतिकताही आपल्या लक्षात आलेली आहे. त्यांचाही नाईलाजच होत आहे. एकीकडे माझ्या निर्णयाची सत्यताही त्यांना जाणवत आहे, पण दुसरीकडे माझ्या पाठीशी उभे राहणेही त्यांना शक्य होत नाही. अशी त्यांची द्विधा मनःस्थिती पाहून मला त्यांची दयाच येते. त्यांच्या मनस्तापाला मीच कारणीभूत होत आहे या विचाराने माझेही मन थोडावेळ भावनाविवश झाले होतेच. परंतु मातापिता व मुख्य म्हणजे गर्ग मुनी यांनी माझ्यावर केले संस्कारच माझे मनोबळ राखून ते वाढवीत असतात आणि माझे धैर्यबळ टिकवून ठेवतात. तेव्हा आपल्याला जरी माझे कौतुक वाटत असले तरी खरी थोरवी माझ्यावर हे संस्कार करणाऱ्यांचीच आहे.

अहो नाथ, आपण जाणूनच आहात की मघाशी मी मंडपात जाहीर केलेला माझा निर्णय म्हणजे आमचे संकट हे थोडाकाळ पुढे ढकलल्यासारखेच आहे. कारण मूळ संघर्ष हा अजूनही कायमच आहे आणि तो अटळच आहे. पुढे केव्हाही निर्णय घेताना हीच परिस्थिती पुन्हा अशीच निर्माण होणार आहे आणि संघर्षही तसाच असणार आहे. कारण माझा निर्णय व निश्चयही तोच राहणार आहे. तेव्हा या संकटाला तोंड हे द्यावे लागणारच आहे. त्यासाठी मी आपलाच पूर्ण भरवसा धरलेला आहे. आपल्यावरील माझी निष्ठा व श्रद्धा अढळ आहे आणि त्याचे फळ आपण मला नक्की द्यालच, असा माझा दृढ विश्वास आहे.

खरे तर, मी निर्भयपणाने मघाशी भर सभामंडपातच आपल्या कंठात वरमाला घालून आपल्याला वरायला हवे होते. किंवा अजूनही मी आपल्याबरोबर येथून निघून जाणे करावयास हवे आहे. परंतु भावनेच्या भरात म्हणा किंवा कन्या म्हणून असलेल्या माझ्या कर्तव्यकर्माच्या कल्पनेने म्हणा, मी त्या प्रसंगात थोडीशी कमीच पडले असे मला तरी वाटते. आता आपल्या बरोबर येण्याची परिणती, आपलीच निंदा नालस्ती होण्यामध्ये होणार आहे आणि तेच मला नको आहे.


म्हणूनच मी आता आपल्या बरोबर येऊ शकत नाही आणि आपणही मला तशी नेणार नाही याची मला खात्री आहे. तेव्हा योग्य वेळेची व योग्य संधीची मी आतुरतेने वाट पाहत राहणार आहे. तेच व तेवढेच माझ्या हातात आहे. माझी मनोव्यथा व माझी अडचण आपण समजून घ्यालच असा माझा पूर्ण विश्वास आहे. तोपर्यंत आपण मला सांभाळून घ्यावे हीच एक प्रार्थना आहे.”

असे बोलत बोलतच रूक्मिणीने पुन्हा आपले दोन्ही हात जोडून कृष्णाला नमस्कार केला असता, कृष्णाने पुढे होऊन रूक्मिणीचे दोन्ही हात आपल्या हातात घेतले आणि ते प्रेमाने हलकेच दाबून रूक्मिणीला आश्वासित केले. कृष्णाने मग भीष्मक व शुद्धमती या उभयतांनाही आदरपूर्वक नमस्कार केला आणि त्याच्या स्वाभाविक वेगाने त्या मंडपाबाहेर निघून गेला. रूक्मिणीही तिच्या मातापित्यांच्या जवळ पुन्हा येऊन उभी राहिली. त्यावेळी भीष्मकाने रूक्मिणीच्या मस्तकावर हळुवार थोपटून तिला धीर दिला, तर शुद्धमतीने रूक्मिणीला कौतुकाने आपल्या कुशीतच घेतले. थोड्या वेळाने भीष्मकही शुद्धमती व रूक्मिणी यांच्यासह सभामंडपाच्या बाहेर पडून त्याच्या महालाकडे निघाला.”

***

रूक्मिणी स्वयंवराचा कथाप्रसंग वर्णन करून सांगत असताना नारद त्यामध्ये एवढा तन्मय व भावपूर्ण झाला होता, की त्याच्या बोलण्याचा वेग केव्हा वाढला हे त्याच्या लक्षातच आले नाही. अर्थात श्रवणभक्तीच्या आनंदात पूर्णपणे रममाण झालेली लक्ष्मीही तिचे देहभान केव्हाच हरवून बसलेली होती. परंतु प्रसंगातील शिगेला पोहोचलेला संघर्ष जसा अचानक थोडा वेळ थांबल्यासारखा झाला, तसा नारदाच्या बोलण्याचा वेगही सहजपणे मंदावल्यासारखा झाला आणि तशी लक्ष्मीही आधी मनाने व मग देहाने भानावर येऊ लागली. श्रवण करीत असताना त्याच वेळी लक्ष्मीचे मननही अत्यंत सहजतेने घडत होतेच. तेच तर श्रवणभक्तीचे लक्षण आहे. त्यामुळे त्या मननातून लक्ष्मीच्या मनात निर्माण झालेला भाव तिच्याकडून प्रगट होण्यासाठी मुळीच वेळ लागला नाही. लक्ष्मीने जेव्हा नारदाच्या मुखाकडे पाहिले तेव्हा त्या मुखावरील भाव पाहून लक्ष्मीने लगेचच जाणले, की लक्ष्मीने बोलावे यासाठीची आतुरताच नारदाच्या ठिकाणी आहे. ही नारदाची आतुरता लक्षात आल्यावर मात्र क्षणाचाही विलंब न लावता लक्ष्मीने बोलण्यास सुरूवात केलीच,

“हे नारदा, रूक्मिणीच्या जीवनातील खरे तर हा अत्यंत कठीण अशा कसोटीचाच प्रसंग होता. त्यामध्ये रूक्मिणीच्या भक्तिभावाचाच कस लागला आणि रूक्मिणी पूर्णपणे व यशस्वीपणे त्या कसोटीला उतरली, हाच माझ्या दृष्टीने केवळ



अत्यंत कौतुकाचा नव्हे, तर अभ्यासाचाही विषय आहे. कृष्णावरील भक्तिभावामुळे रूक्मिणीच्या ठायी तेजस्विता तर होतीच, पण सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिच्या ठिकाणी असलेला विवेक. कृष्णप्राप्तीचा ठाम निश्चय व कायम ध्यास तर रूक्मिणीच्या ठायी अविरतपणे होताच. पण त्या मार्गात अचानकपणे उद्भवलेल्या अनेक अडचणींना रूक्मिणीने अत्यंत कौशल्याने व समर्थपणे तोंड दिले हेच तिचे विशेष होय. मनाची शांती मुळीच ढळू न देता रूक्मिणी निश्चल तर राहिलीच, पण आपली भूमिका व विचार अत्यंत स्पष्टपणे प्रगट करण्यासही ती संकोचली वा कचरली नाही. शेवटी तर रूक्मी व कृष्ण यांच्यातील समरप्रसंग रूक्मिणीने ज्या धैर्याने थोपवून धरला, त्या तिच्या धैर्याला आणि त्यावेळी तिने दाखवलेल्या प्रसंगावधानाला तर तोडच नाही. त्यानंतरही स्वयंवर स्थगित करण्याचा निर्णय घेऊन रूक्मिणीने तो ज्या पद्धतीने जाहीर केला आणि त्यावेळी तिच्याकडून तिचे मातापिता, तिचे कुटुंब व तिचे राजकुळ यांच्याविषयीची जी काळजी व जो कळवळा प्रगट झाला, तो तर माझ्यासाठी अत्यंत हृदयस्पर्शी असाच आहे.

हे नारदा, एवढे असूनही रूक्मिणी जेव्हा कृष्णाला 'ती प्रसंगात कमीच पडली' असे म्हणते, तेव्हा मात्र मला तिचे नवलच वाटते. तिचे म्हणणे कितपत खरे आहे? का ती रूक्मिणीच्या ठायीची नम्रता होती? कारण मला तरी असेच वाटते, की रूक्मिणीने जे व जेवढे केले ते व तेवढे कोणत्याही स्त्रीलाच काय पुरूषालाही जमणे शक्य नाही. होय ना, नारदा?"

लक्ष्मीचे बोलणे ऐकत असताना तिच्या बोलण्यातून जो रूक्मिणीविषयीचा कौतुकभाव अगदी सहजपणे प्रगटत होता, तो पाहून नारदाला तर लक्ष्मीचेच कौतुक अधिक जाणवत होते. बोलण्याच्या शेवटी लक्ष्मीने जो प्रश्न विचारला तो ऐकून नारदाने मंद हास्य केले आणि लक्ष्मीच्या मनाचे पूर्ण समाधान करण्यासाठी नारदाने बोलण्यास सुरूवात केली,


"हे लक्ष्मी, भक्तिभावाची पूर्ती ही ईश्वराच्या प्राप्तीमध्ये होते हे सत्यच आहे. त्यामुळे ईश्वराची प्राप्ती होईपर्यंत त्या भक्तिभावामध्ये अपूर्णता ही राहतेच. त्या अवस्थेलाच विभक्ती असे म्हणतात. भक्तिभाव पूर्ण झाला असताच ही विभक्तता लयाला जाते हेही खरेच आहे. हा अपुरेपणा ज्याला जाणवतो त्याला स्वतःतील कमतरताही लक्षात येतेच. ही जाणीवच त्याला सावध करते व तत्पर ठेवते. भक्तिभावाची पूर्ती करताना विवेक हा हवाच, परंतु तो विवेक हा भक्तिभावाची पूर्तता करण्यासाठीच आहे, हेही लक्षात ठेवावयास हवेच ना! कारण विवेकाने प्राप्त झालेली दृष्टी ही नेहमी होकारात्मकच असते. त्यामध्ये नकारात्मकता ही केव्हाही

असूच शकत नाही. त्यामुळे विवेक हा अडचणीतून मार्ग काढून पुढे साध्यापर्यंत कसे जायचे याचे मार्गदर्शन करतो आणि त्यासाठी लागणारे धैर्यबळही मनाला देतो. एखादी गोष्ट करता येणार नाही एवढाच नकारात्मक निष्कर्ष जर निघत असेल, तर तो विवेक नाही असेच म्हणावे लागेल. खरे तर, ईश्वरी प्रेमाची व बोधाची जागृती म्हणजेच विवेक होय. या विवेकामुळेच भक्तिमार्गात एकेक पाऊल निश्चयाने व ठामपणे पुढे पुढे टाकले जाते आणि त्याची परिणती ईश्वराच्या भेटीत होतेच होते.

हे लक्ष्मी, खरे तर भक्तिमार्गामध्ये भक्ताला ईश्वराच्या चरणी आणेपर्यंतच विवेक साहाय्यभूत होत असतो. पण एकदा का भक्त ईश्वराच्या चरणी आला, की विवेकाचे काम संपले आहे हे त्या भक्ताच्या लक्षात येणे अत्यंत आवश्यक व महत्त्वाचे आहे. कारण मग तेथे फक्त भक्तिभावच शिल्लक राहतो, जेथे माझेपण पूर्णपणे संपलेले असते आणि सर्व समर्पण भावाने 'मी'पण संपवायचे असते. पण हा एकरूपतेचा अनुभव येण्यासाठी भक्ताला ऐक्यरूप असलेल्या ईश्वराकडेच स्वतःला संपूर्णपणे सोपवावे लागते. मग एकरूप करून घेण्याची जबाबदारी केवळ ईश्वरावरच राहते. एकरूप पावण्याचा भक्ताचा वेगळा ध्यासही उरतच नाही, तर तो त्याचा ध्यास ईश्वराठायीच्या ऐक्यरूप संकल्पामध्ये पूर्णपणे विलय पावतो.

हे लक्ष्मी, या दृष्टीने पाहिले तर रूक्मिणीला तिच्या भक्तिभावामध्ये जी कमतरता म्हणण्यापेक्षा जी कमसरसता जाणवली, ती योग्यच होती असेच म्हणावे लागेल आणि ते लक्षण रूक्मिणीठायी असलेल्या प्रामाणिकपणाचेच आहे. पण हा स्वतःचा प्रामाणिकपणा जेव्हा ईश्वराविषयीच्या एकनिष्ठ भावाशी जोडला जातो, तेव्हाच भक्तिभाव हा परिपूर्ण अवस्थेप्रत येतो. त्याठिकाणी 'ईश्वराशी एकनिष्ठ' हा भाव प्रमुख असतो आणि स्वतःचा प्रामाणिकपणा हा त्याला पूरक म्हणून असतो. रूक्मिणीच्या भक्तिभावासाठी कृष्ण हाच तिचा ईश्वर म्हणून होता. त्याची भेटी होण्यासाठी रूक्मिणीने केवढातरी पराक्रम तर केलाच होता. अत्यंत विवेकाने व हरतऱ्हेचे प्रयत्न करून रूक्मिणी कृष्णापर्यंत येऊन पोहोचली होती. त्यानंतर तिच्या भक्तिभावाचे फळ देण्याची जबाबदारी आता कृष्णाची होती आणि कुठल्याही व कशाही परिस्थितीत ती पार पाडण्याचे सामर्थ्य कृष्णाच्याठायीच निश्चितच होते. वेळप्रसंगी युद्ध करूनही आणि विरोधकांचा सर्व विरोध व प्रतिकार पूर्णपणे मोडून काढून, कृष्ण रूक्मिणीला भर सभामंडपातून घेऊन गेलाही असता.

हे कृष्णाचे सामर्थ्य रुक्मिणीही जाणून होतीच. पण रूक्मिणीच्याच मनाची तयारी त्या वेळी झाली नाही हेही खरेच आहे. त्यामुळे मग कृष्णाचाही नाईलाजच झाला. कारण रूक्मिणीच्या संमतीशिवाय कृष्ण काहीच करु शकत नव्हता. स्वयंवर स्थगित करण्याचा निर्णय फक्त रूक्मिणीचाच होता. कृष्णाने तसे रूक्मिणीला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे काहीच सूचित केले नव्हते. रूक्मिणीने तो निर्णय जर



सर्वस्वी कृष्णावरतीच सोपवला असता आणि सर्व जबाबदारी एकीएक कृष्णावरच ठेवली असती, तर तिला कृष्णाची प्राप्ती ताबडतोबच झाली असती. कारण सर्वकाही निभावून नेण्यास कृष्ण समर्थ होताच. कृष्ण रूक्मिणीला तिच्या भक्तिभावाचे फळ देण्यासाठी तत्पर असूनही, ते फळ स्वीकारण्याची तयारी त्यावेळी तरी रूक्मिणीच्या मनाची झाली नाही, ही गोष्ट नाकबूल करता येतच नाही.

हे लक्ष्मी, भक्ताच्या भक्तिभावाचे फळ देण्यासाठी ईश्वराला कधीच व काहीच वेळ लागत नाही. परंतु ते फळ स्वीकारण्यासाठी मात्र काही वेळा व कधी कधी त्या भक्तालाच वेळ लागतो. कारण तेवढा वेऴ तरी का होईना त्याचा ध्यास कमीच पडतो हे खरेच आहे. आता ध्यास कमी पडतो याचाच अर्थ, त्यावेळेस मनातील इतर सुप्त व्यवधाने जागृत होतात. म्हणजेच मन पूर्णपणे ईश्वराठायी जडलेले नसते. रूक्मिणीच्या बाबतीतही नेमके तसेच घडले. खरे तर, तिचे मन कृष्णाठायी पूर्णपणे होते. पण तिचे मन कृष्णप्रेमाने पूर्णपणे व्यापलेले नव्हते हेही खरेच आहे. ईश्वरी प्रेमाने मन तृप्त तर असतेच, पण त्या प्रेमाने मन सदासर्वकाळ व्याप्त असणे हे महत्त्वाचे आहे. कारण तेच तर भक्तिभावाचे लक्षण आहे. रूक्मिणीच्या ठिकाणचे तिच्या मातापित्यांविषयीचे, त्यांच्या कौटुंबिक स्वास्थ्याचे व राजकुळाचाराचे सुप्त व्यवधान जागे झाले. त्या सर्वांचा जेव्हा रूक्मिणी सम्यक विचार करू लागली, तेव्हाच तिच्याठायी असलेला कृष्णाविषयीचा एकीएक भाव अगदी सहजपणे बाधीत झाला. त्यामुळे रूक्मिणीचे मनही थोडेसे विचलितच झाले आणि प्रत्यक्ष कृती करण्याचा निश्चय जरी ढळला नाही, तरी थोडासा हललाच हे तर कबूल करावयासच हवे.


अर्थात रूक्मिणीने विवेकाने स्वतःला सावरले आणि मनाच्या ठायीचा भाव पुन्हा एकीएक होण्यासाठी मनाला संधी मिळावी म्हणून थोडा कालावधी तिने मागून घेतला. या गोष्टीकरिता मात्र रूक्मिणी अत्यंत कौतुकालाच पात्र आहे. कारण किंचितशी व थोड्या वेळेसाठी का होईना, पण तिच्या मनाची झालेली थोडीशी चलबिचलही, रूक्मिणीच्या स्वतःच्याच लक्षात आली होती. स्वतःच्या मनाची ही सूक्ष्म दुर्बलता रूक्मिणीने जाणली होती आणि ती दूर करून मनाला पुन्हा पूर्णपणे सबळ करण्याचा तिने चंगच बांधला होता. त्यासाठीच तिला काही अवधी हवा होता. त्या तिच्या निश्चयातच रूक्मिणीचे वेगळेपण व विशेषत्व होते.”

रूक्मिणीच्या भक्तिभावाचे यथार्थ समालोचन व विवेचन नारदाच्या मुखातून श्रवण करताना लक्ष्मी चकित तर झाली होतीच, पण त्याहीपेक्षा ती भारितच अधिक झाली होती. तिची ती अवस्था तिच्या शब्दांतून अगदी सहजपणे प्रगट होऊ लागली.

“अरे नारदा, तुला भक्तीचे आचार्य असे जे संबोधले जाते ते अगदी यथार्थ आहे. भक्तिभावातील तरलता व सूक्ष्मता ही तुझ्या आचरणाने तू स्वतः पूर्णपणे अनुभवत असतोस. म्हणूनच तुझ्याकडून त्या भावाची सर्व सूक्ष्म अंगे अत्यंत सहजतेने प्रगट होत असतात. रुक्मिणीच्या भक्तिभावातील सरसता व कमसरसता या दोन्हींचे तू केलेले विवरण हे सरळ, सुलभ व एवढे स्पष्ट आहे की तिथे कुठल्याही कल्पनेला वा शंकेला थाराच राहत नाही. पण तरीही माझ्या मनात एक प्रश्न निर्माण होतच आहे. रुक्मिणी तिच्या भक्तिभावात थोडावेळ का होईना, पण थोडीशी कमी पडलीच हे मलाही मान्य आहे. परंतु तिच्या भावाची खात्री कृष्णाला तरी निश्चितच होती ना? मग कृष्णाने स्वतःच पुढाकार घेऊन रुक्मिणीला सावरून घेतले असते आणि तिच्या भावाची पूर्ती केली असती तर चांगले नसते का झाले? त्यात काय बरे गैर ठरले असते? ‘माझ्याबरोबर आत्ताच चल’ असे म्हणून जर कृष्ण रुक्मिणीला त्याच्याबरोबर घेऊन गेला असता, तर रुक्मिणी त्याच्यासंगे नक्की गेली असती याची मला अगदी पक्की खात्री आहे. मग त्यामध्ये कृष्णाला काय अडचण होती हे माझ्यातरी लक्षात येत नाही. त्यावेळी कृष्णाने फक्त स्वस्थ व शांत राहण्याचीच भूमिका का बरे घेतली? अरे नारदा, हे सर्व सर्व मला नीटपणे समजावून सांग बरे. कारण माझे मन अस्वस्थ होण्यास सुरुवात झालेली आहे. तेव्हा तू वेळीच माझ्या मनाला शांत कर बघू.”

लक्ष्मी बोलता बोलता एवढी अधीर व उत्तेजित झाली की नारदाने प्रथम तिला हाताने खूण करून शांत होण्यास सांगितले. नंतर किंचितसे हसून नारदाने शांत सुरात बोलावयास सुरूवात केली.

“अगं लक्ष्मी, तुझी अधीरता मी समजू शकतो. परंतु अशी उत्तेजित होऊ नकोस. प्रथम मनाने शांत हो. तरच आणि मगच माझ्या सांगण्याचा तुझ्या मनाकडून स्वीकार केला जाईल. एक महत्त्वाची गोष्ट नीटपणे लक्षात घे की भक्तिमार्गात भक्ताकडूनच पराक्रम व्हावा अशीच ईश्वराची इच्छा असते. ईश्वर भक्ताला फक्त साहाय्यभूतच होत असतो, कारण भक्तिभावातून घडलेल्या पराक्रमाने झालेली ईश्वरप्राप्ती हीच त्या भक्ताला खऱ्या आनंदाचा अनुभव आणून देत असते. भक्ताकडून घडणारा पराक्रम हा त्याच्याठायी असलेल्या भक्तिभावाच्या बळातून घडत असतो. काही वेळेला भक्ताचे भावबळ काही कारणाने कमी पडते हे खरे आहे. अशा वेळी ईश्वराला दया येऊन तो त्या भक्ताच्या भावाची बाह्यांगाने पूर्ती स्वतःहून करून देईल, तर त्या भक्ताच्याठायीची आंतरिक दुर्बलता तशीच कायम राहील. बाह्य पूर्तीच्या समाधानात भक्ताच्या मनातील दुर्बलता तेवढा वेळ



लपली जाईल, पण ती नाहीशी मात्र होऊ शकणार नाही. एवढेच काय, पण ती दुर्बलता झाकोळली गेल्यामुळे कळणारही नाही.

हे लक्ष्मी, पण जेव्हा ईश्वर भक्तावर दया न दाखवता त्याच्यावर कृपा करतो, तेव्हा तो भक्ताच्या भावाची पूर्ती स्वतः न करता, भक्तालाच त्याच्या भावाची पूर्ती करण्यासाठी उद्युक्त व प्रेरित करतो. त्यासाठी ईश्वर भक्ताचा भाव सबळ होण्याची आतुरतेने वाट पहात रहातो. ईश्वराच्या या कृपेमुळेच भक्त अंतर्मुख होतो आणि स्वतःच्या अवस्थेचे स्वतःच निरीक्षण करू लागतो. पण हे निरीक्षण त्या भक्ताकडून परीक्षक या भूमिकेतून न घडता अभ्यासकाच्या भूमिकेने घडते आणि ती दृष्टी त्या भक्ताला ईश्वराच्या कृपेनेच प्राप्त झालेली असते. त्यामुळे त्या अभ्यासात नकारात्मक दृष्टी नसते, तर होकारात्मक दृष्टी असते. मनाठायी आर्तता जरूर असते पण नैराश्य मुळीच नसते. स्वतःच्या ठिकाणचे गुणदोष त्या भक्ताच्या सहज लक्षात येतात आणि त्यांना वेगवेगळे करून पहाण्याचे कौशल्यही त्या भक्ताला अवगत असते.

ईश्वराच्या जो जवळ नेतो तो गुण आणि जो दूर नेतो तो दोष, ही गुणदोषांची यथार्थ जाण त्या भक्ताच्या ठायी नित्य जागृत असते. त्यामुळेच स्वतःच्या गुणांची गुणवत्ता जाणून ती वाढवण्यासाठी आणि स्वतःच्या दोषांची दोषास्पदता ओळखून ती पूर्ण नाहीशी करण्यासाठी त्या भक्ताकडून लागलीच प्रयत्नांना सुरुवात होते. हे प्रयत्न प्रामुख्याने आंतरिकच असल्यामुळे मनाच्या अशा नाजूक अवस्थेत तो भक्त अधिकाधिक अंतर्मुख होत असतो. त्यासाठी वेळप्रसंगी काही बाह्यसाधनांची जोडही त्या भक्ताकडून घेतली जाते. अशावेळी विशेषतः सत्संगती, सत्पुरुषांचे मार्गदर्शन आणि त्याहूनही त्यांच्याशी घडलेला मनमोकळेपणाचा संवाद या गोष्टी पुष्कळच साहाय्यभूत होतात हे निश्चित. परंतु मुळात व मुख्यतः हे प्रयत्न आंतरिकच असतात. अंतःकरणात पुन्हा ईश्वराला व त्याच्याविषयीच्या भक्तिभावाला एकमेव स्थान प्राप्त करून देण्याचा पराक्रम घडला, की मग त्या भक्तांकडून बाह्य अंगाने पराक्रम घडावयास जराही वेळ लागत नाही. असे अनेक बाह्य पराक्रम अशा भक्तांकडून अगदी सहज व लीलया घडतात.

हे लक्ष्मी, या दृष्टीने पाहिले असता कृष्णाने स्वतःहून रुक्मिणीला त्याच्याबरोबर नेले नाही, ही त्याची रुक्मिणीवरील खरी कृपाच म्हणावयास हवी. कारण त्युमळेच रुक्मिणीला तिच्या मनाचे निरीक्षण करण्याची संधी मिळाली. प्रसंग घडून गेल्यानंतर रुक्मिणी अत्यंत अंतर्मुख होऊन राहिली होती. ती कारणाशिवाय जास्त कोणाशी बोलत नसे. कोणाशी तेवढी मिळून मिसळूनही वागत नसे. जास्तीत जास्त वेळ स्वतःच्या महालात एकांतात बसून राही आणि नेहमी खोल विचारात गढलेली असे. रुक्मिणी बाह्यांगाने जरी त्या प्रसंगातून बाहेर


आलेली होती, तरी त्या प्रसंगाच्या परिणामातून मात्र तिचे मन अजूनही बाहेर आलेले नव्हते. रुक्मिणीकडून जसे जसे अधिकाधिक मनन घडू लागले, तशी तशी तिला तिच्या ठिकाणच्या कमतरतेची जाणीव होऊ लागली.

'मी सर्व सोडून कृष्णाची होण्यासाठी निघाले होते खरी, परंतु माझ्या ठिकाणच्या सर्व गोष्टी काही अजून सुटलेल्या नाहीत हेच खरे. मातापित्यांविषयीचे माझे कर्तव्यकर्म, त्यांना कोणताही दोष लागून त्यांची बदनामी होऊ नये यासाठी उगाचच मानलेली माझी जबाबदारी, राजकुळाचे शिष्टाचार पाळण्याचे माझ्या मनावर वृथा बाळगत असलेले ओझे, या सर्व गोष्टींची परिणती माझे मन मोहाने आतून कच्चे व दुर्बल राहण्यात झाली आणि म्हणूनच त्या मनाने ऐनवेळी कच खाल्ली हे खरेच आहे' हे रुक्मिणीच्या लक्षात आले आणि स्वतःच्या मनाची ही आंतरिक कमजोरी व त्या कमजोरीचे कारण कळल्यावर रुक्मिणी मनातून अधिक सावध झाली. पण निराश मात्र मुळीच झाली नाही.

'माझ्या मनाच्या सर्व अडचणींतून मुक्त करण्याचे सामर्थ्य कृष्णाठायी असताना, मी प्रत्यक्ष कृष्णाची मदत न मागता स्वतःवरतीच अवलंबून राहिले, म्हणून कृष्णाच्या प्राप्तीला दुरावले. कृष्ण त्याचवेळी मला वरायला तत्पर होताच, पण माझ्या मनाची तयारी नसल्यामुळे मीच वेळ मागून घेतला आणि कृष्णप्राप्तीची संधी विनाकारण पुढेच ढकलली. माझ्यामुळे कृष्णाला विनाकारण दोष लागू नये या कृष्णाविषयीच्या काळजीने मी कृष्णालाही, मला त्याच्याबरोबर घेऊन जाण्याची विनंतीसुद्धा केली नाही. पण कृष्णाचे सामर्थ्य व माहात्म्य जाणून असताना मी कृष्णाची अशी काळजी घेणे अयोग्य व वृथाच होते. परंतु हरकत नाही, अजूनही संधी चुकलेली नाही आणि आता हर प्रयत्नाने ती संधी मी साधणारच साधणार. आता कोणताही काल्पनिक कर्तव्यरूपी मोह माझ्या ध्यासाच्या आड मी येऊ देणार नाही. एकीएक कृष्णप्रेमाने युक्त होऊन मी त्याच्याच प्राप्तीचा ध्यास धरीन आणि प्रत्यक्ष प्रयत्नाने कृष्णाची प्राप्ती करून घेईनच घेईन.'

अशा तऱ्हेचे मनन रुक्मिणीच्याठायी सतत घडत होते आणि एक दिवस तिचे मन निर्णायक व निश्चयात्मक अवस्थेत आले. रुक्मिणीने आपल्या मातापित्यांची भेट घेतली आणि ती तिच्या मनातील विचार त्यांच्यासमोर प्रगट करू लागली,

"हे तात, हे माते, सर्व प्रथम मी आपली मनःपूर्वक क्षमा मागते. माझ्यामुळे तुमच्या मनाला अतिशय क्लेश सहन करावे लागले हे मी जाणून आहे. पण माझ्या मनाला झालेले क्लेशही तुम्ही जाणून आहात याची मला खात्री आहे. परिस्थितीत अचानक निर्माण झालेल्या प्रतिकूलतेमुळे जरी मी घाबरले नाही, तरी त्या वेळेस मी



थोडीशी बावरले हे मात्र खरे आहे. पण तरीही परिस्थिती अधिक चिघळू न देण्याची जास्तीत जास्त खबरदारी मी घेतली आणि त्यातल्या त्यात सर्वांना संमत होणारा निर्णय मी माझ्या समजुतीनुसार घेतला. त्यामुळे आलेले संकट जरी तात्पुरते टळले, तरी ते संकट अजूनही कायम आहे हे मी जाणून आहे. त्या संकटाला प्रत्यक्ष सामोरे जाऊनच त्या संकटातून मुक्त होता येईल हे निश्चित. त्यासाठी माझ्या मनाची आता पूर्ण तयारी झाली आहे.


हे तात, मागच्यावेळी माझे स्वयंवर स्थगित करतानाच 'ते स्वयंवर पुन्हा होईल' अशी घोषणा आपण जाहीरपणे केली होती. मला वाटते की ती वेळ आता आलेली आहे. माझ्या स्वयंवराचा निर्णय अनिश्चितपणे लांबणीवर टाकून तुमच्या मनावरील ताण अधिक वाढवणे उचित नाही. कारण तुमच्या दृष्टीने तुमचे माझ्याविषयीचे कर्तव्यकर्म जोपर्यंत पूर्ण होत नाही, तोपर्यंत तुमच्या मनाला स्वस्थता लाभणे शक्यच नाही हे मी जाणून आहे. पण मध्ये थोडा काळ जाऊ देणे हे सर्वांच्याच दृष्टीने अत्यंत आवश्यकच होते. त्यामुळे मलाही घडून गेलेल्या प्रसंगाचे पुन्हा अवलोकन करता येणे शक्य झाले. मी त्यावेळेस निश्चितपणे कुठे व का कमी पडले हे मलाही आता कळले आहे आणि त्यावर दीर्घकाळ मनन व चिंतन करून मी मार्ग शोधून काढलेला आहे. मागच्या प्रसंगाची पुनरावृत्ती होणार नाही याचे आश्वासन मी तुम्हाला देते. तुम्ही अगदी निःशंक मनाने माझे स्वयंवर पुन्हा जाहीर करावे. त्यासाठी योग्य तो दिवस व वेळ यासंबंधीचा निर्णयही तुम्हीच ठरवा आणि त्याच्या तयारीला सुरुवात करा."

हे लक्ष्मी, रुक्मिणीचे बोलणे ऐकून भीष्मक व शुद्धमती यांना बरे वाटले खरे, पण त्यांच्या मनातील काळजी मात्र अजूनही कायम होती. पूर्वीच्या अनुभवाने धास्तावलेले त्यांचे मन अजूनही थोडेसे साशंक होतेच आणि तेही साहजिकच होते. त्यात त्यांचा काहीही दोष नव्हताच. फार काळ स्वस्थ बसणे हे त्यांनाही चालण्यासारखे नव्हतेच. रुक्मिणीच्या स्वयंवराविषयीचा निर्णय लवकरात लवकर घेणे आवश्यकच होते. परंतु रुक्मिणीच्या मनाची तयारी होण्याची वाट पाहत बसण्यापलीकडे तिचे मातापिता दुसरे काही करू शकत नव्हते. त्यामुळे जेव्हा रुक्मिणीने स्वतःहूनच तिच्या विवाहाचा विषय काढला आणि तिचा झालेला निश्चयही सांगितला, तेव्हा भीष्मक व शुद्धमती यांच्या मनावरील ओझे बरेचसे कमी झाल्यासारखेच त्यांना वाटले. कारण हा विषय आपणहून रुक्मिणीकडे काढणे त्यांना शक्यच झाले नसते. पण तरीही प्रत्यक्ष प्रसंग अजूनही पुढेच आहे हे जाणून असल्यामुळे रुक्मिणीचे मातापिता मनामध्ये सावध व सतर्क होतेच.

हे लक्ष्मी, भीष्मकाच्या मनाचा निश्चय झाल्यावरती त्यानेही ताबडतोब पुढाकार घेऊन हालचाली सुरू केल्या. राजपुरोहितांशी विचारविनिमय करून आधी

स्वयंवराचा दिवस व वेळ निश्चित केली आणि त्यानंतरच मग रुक्मिशी तो विषय काढला. रुक्मिची सुरुवातीची प्रतिक्रिया साहजिकच अत्यंत टोकाच्या विरोधाची होती. परंतु 'ही रुक्मिणीचा इच्छा आहे' आणि पुन्हा स्वयंवर घडवून आणण्याचे आश्वासन आपण मागच्या वेळेसच सर्व उपस्थित राजे महाराजांना दिले होते. त्याची पूर्ती करण्यची जबाबदारी सर्वस्वी माझीच आहे असे रुक्मिला बजावून सांगून भीष्मक स्वतःच्या भूमिकेशी अगदी ठाम राहिला. रुक्मिचाही मग नाईलाजच झाला. 'हरकत नाही. कृष्णाला पुन्हा सर्वांसमक्षच त्याची योग्य ती जागा दाखवून देऊ आणि मागच्या वेळी अपुरी राहिलेली कृष्णाविरुद्धची कारवाई आता निश्चितपणे पूर्ण करू' असा मनातल्या मनात विचार करून रुक्मिही मग त्याच्या तयारीला लागला. 'कृष्णाला पूर्णपणे संपवण्यामध्ये या वेळेस जराही कसूर करायची नाही' असा निश्चय रुक्मिने त्याच्या मनात अगदी पक्केपणाने केला.

भीष्मकानेही मग जराही वेळ फुकट न घालवता देशोदेशीच्या महाराजांना रुक्मिणीच्या स्वयंवराचे निमंत्रण पुन्हा पाठवले. प्रत्येक निमंत्रणाबरोबरच भीष्मकाने एक व्यक्तिगत पत्र जोडले होते. त्यामध्ये त्याने मागच्यावेळी घडलेल्या दुर्दैवी प्रसंगाविषयी दिलगिरी व्यक्त करून क्षमा याचना केली होती आणि 'झाले गेले सर्व विसरून पुन्हा सर्वांनी अगत्याने येण्याचे करावे' अशी मनःपूर्वक विनंतीही केली होती. आपल्या निमंत्रणाला कितीजण प्रतिसाद देतील याची शंकाही भीष्मकाच्या मनात होतीच. निमंत्रण मिळाल्यावरती अनेक राजा-महाराजांच्या मनातही अनेक तऱ्हेचे विचार आलेच. कोणी विचार केला की 'रुक्मिणीने तर पती म्हणून कृष्णालाच वरण्याचे ठरविले असल्याचा सूचक इशारा अगदी स्पष्टपणे दिलेला आहे. अशा परिस्थितीत आपल्याला काहीच संधी नसताना तेथे एवढे कष्ट करून जाण्यात काहीच हशील नाही.' पण काहींनी असा विचार केला की 'रुक्मिणी आपल्याला वरणे शक्य नाही हे तर निश्चित झालेलेच आहे. पण कृष्ण व शिशुपाल यापैकी निश्चित कोणाला रुक्मिणी वरणार, हे प्रत्यक्ष पाहणे निश्चितच मौजेचे ठरणार आहे. तेव्हा त्यासाठी तरी रुक्मिणीच्या स्वयंवराला हजर राहणे आवश्यक आहे.' तर अनेकांनी असाही विचार केला की 'स्वयंवराच्या वेळी निश्चितच काहीतरी समर प्रसंग घडणार आहे. तेव्हा तेथे आपली उपस्थिती ही अत्यंत आवश्यकच आहे.' त्या राजांमध्येही काहीजण कृष्णाचे पाठीराखे होते, तर काहीजण शिशुपालाचे. त्यांनी तर प्रत्यक्ष प्रसंगात आपली मदत व्हावी या हेतूने रुक्मिणीच्या स्वयंवराला हजर राहण्याचे निश्चितच केले होते. अनेकांच्या ठायी भीष्मकाविषयी आदर असल्यामुळे त्या स्वयंवराला उपस्थित राहणे हे त्यांचे कर्तव्यच आहे अशीच



त्यांची धारणा होती. त्यामुळे एकंदरीत विचार केला असता स्वयंवराला बहुतेक जण पुन्हा येणारच होते हे निश्चित झाले होते. तसे सर्वांनी भीष्मकाला कळवलेही होते.

***

हे लक्ष्मी, रुक्मिणीच्या स्वयंवराची जय्यत तयारी पुन्हा जोमाने सुरू झाली होती. तर रुक्मिणीच्या मनाची तयारी आधीच झालेली होती. पण अतिशय सावधपणे तिच्या मनातील विचार सुरूच होते. मागच्या प्रसंगाची पुनरावृत्ती होणार नाही याची काळजी आधीपासूनच घेणे अत्यंत आवश्यक होते. रुक्मिणी जाणून होते की मागच्या वेळच्या योजनेप्रमाणेच जर सर्व काही यावेळेसही केले, तर पुन्हा सर्व गोष्टी मागच्या सारख्याच घडणार. तेव्हा या वेळेस काहीतरी वेगळीच योजना आखावयास हवी हे रुक्मिणीच्याही लक्षात आलेले होतेच. त्याचाच विचार रुक्मिणी मनात सतत करत होती. तोच एक ध्यास रुक्मिणीच्याठायी लागलेला होता. शेवटी बऱ्याच विचाराअंती रुक्मिणीच्या मनाचा निश्चय झाला आणि तिने कृष्णाला पुन्हा पत्र पाठवण्याचे ठरवले. लिखाणाचे सर्व साहित्य जवळ घेऊन रुक्मिणी पत्र लिहिण्यास बसली मात्र, कृष्णाच्या प्रेमस्मरणाने तिचे मन भरून आले आणि कंठ दाटून आला. नेत्रांतून वाहणाऱ्या अश्रूंना रुक्मिणीने प्रयत्नपूर्वक आवरले आणि पत्र लिहिण्यास सुरूवात केली.


“प्राणप्रिय कृष्णास रुक्मिणीचा अत्यंत प्रेमपूर्वक व अंतःकरणपूर्वक साष्टांग नमस्कार. माझ्या पित्याने पाठवलेले माझ्या स्वयंवराचे निमंत्रण आपल्याला मिळाले असेलच. ते पाहून आपली प्रतिक्रिया काय झाली असेल हे मला ठाऊक नाही. कदाचित आपण माझ्यावर नाराजही झाला असाल किंवा आपल्याला गंमतही वाटली असेल. मागच्या प्रसंगाच्या स्मरणाने ‘आता या वेळेस आणखीन वेगळे ते काय घडणार आहे’ असाही विचार आपल्या मनात आला असेल आणि आपण त्या आमंत्रणाकडे एखादेवेळेस दुर्लक्षही केले असेल. पण मला आपल्याकडे एकच विनंती करावयाची आहे की आपण माझ्याकडे व माझ्याठायी असलेल्या आपणाविषयीच्या भावाकडे दुर्लक्ष करू नये. माझा आपल्याविषयीचा प्रेमभाव दृढ आहे आणि आपलीच अर्धांगिनी होऊन आपलीच भक्ती जन्मभर करीत राहण्याचा माझा निश्चय कायम आहे.

हे नाथ, स्वयंवराच्या मागील प्रसंगी मी आपल्याविषयीचा माझा भाव, पण आपले नाव न घेता, अत्यंत स्पष्टपणे प्रगट केला होता. परंतु ऐनवेळेस कर्तव्यकर्माच्या भावनेच्या जरा जास्त भरात, मी व्यक्तिशः कमी पडले हे खरेच आहे. तेव्हापासूनच माझ्या मनाला खंत लागून राहिली आहे आणि मनही अगदी

बेचैन आहे. परंतु तरीही निराश न होता मी माझ्या मनाला प्रयत्नपूर्वक सावरले आहे. त्यानंतरही मी सतत आपलाच विचार करीत असते. अनेक विचारांती आता माझ्या पूर्णपणे लक्षात आलेले आहे की मी केवळ माझ्याच प्रयत्नावर अवलंबून राहणे योग्यच नाही. जेथे व जेव्हा माझ्या प्रयत्नाला मर्यादा येतात आणि मी कमी पडते, तेथे व तेव्हा मला आपलीच मदत घेणे आवश्यक आहे. कारण तरच मला आपली प्राप्ती होणे शक्य आहे. तोच माझा निरंतरचा ध्यास आहे आणि तेच माझे ध्येय आहे. मी केवळ माझ्याच भावबळावर अवलंबून राहीन, तर माझे साध्य मला कधीच साधता येणार नाही हे मला आता पूर्णपणे कळले आहे. त्यासाठी मला केवळ आपलीच मदत हवी आहे आणि प्रेमाच्या हक्काने ती मदत मी आपल्याकडे मागत आहे. आपणच मला साहाय्यभूत होऊ शकता याची मला पूर्ण खात्री आहे.

अहो नाथ, माझ्याप्रमाणे आपणही हे जाणून आहातच, की स्वयंवराची योजना जरी पुन्हा केली असली तरी प्रत्यक्ष परिस्थितीत काहीच बदल झालेला नाही. त्यामुळे प्रत्यक्ष स्वयंवराच्यावेळी मंडपात पुन्हा मागच्या वेळेसारखाच प्रसंग निर्माण होणार आहे. एवढेच नव्हे तर संबंधित मंडळी आता अधिक सावध झाल्यामुळे जास्तच दक्ष झालेली आहेत आणि त्यांचे ईप्सित साध्य होण्यासाठी कोणत्याही टोकाला जाण्याएवढी त्यांच्या मनाची तयारी झालेली आहे. त्यासाठी यावेळेस आपल्याला काहीतरी युक्तीनेच, पण वेगळा मार्ग काढावा लागेल. येथील परिस्थिती मी पूर्णपणे जाणून असल्यामुळे तो मार्ग काढण्याची जबाबदारी माझीच आहे हेही मी जाणून आहे. त्या दृष्टीनेच विचार केला असता मी एक योजना ठरवली असून तीच आपल्याला विदित करीत आहे.

सर्व मंडळी स्वयंवराच्या निमित्ताने आधीपासूनच जमणार आहेत. परंतु आपण मात्र केवळ आदल्या दिवशीच आणि तेही संध्याकाळीच येण्याचे करावे. कुंडीनपूर नगरीच्या बाहेर आमच्या कुलदेवतेचे मंदिर आहे. स्वयंवराच्या आदल्या दिवशी मी कुलदेवतेची पूजा करून आशीर्वाद घेण्याच्या निमित्ताने त्या मंदिरात येण्याचे करीन. आपणही प्रत्यक्ष नगरीत प्रवेश न करता, त्या मंदिराच्या जवळच माझ्यासाठी थांबून रहावे. कुलदेवतेची पूजा झाल्यावर मी देवळाच्या बाहेरील सभामंडपात एका मागील खांबाच्या मागे उभी राहीन. आपणही त्याच वेळी कुलदेवतेचे दर्शन घेण्याचे निमित्त करून त्या मंदिरात सहजतेने प्रवेश करावा. आपल्याला पाहताच मी त्वरेने पुढे येईन आणि कुलदेवतेच्या साक्षीने आपल्या कंठात पुष्पमाळा अर्पण करून आपल्याला वरीन. पत्नी म्हणून आपण माझा स्वीकार केल्यानंतर पुढे काय व कसे करायचे हे आपणच ठरवणार आहात आणि आपण ते यशस्वीपणे करणारही आहात याची मला पूर्ण खात्री आहे. आपल्या पराक्रमाची व माहात्म्याची मला पूर्ण जाणीव आहे. एकमेव आपलाच भरवसा मी धरला आहे.



आपल्याशिवाय माझे दुसरे कोणीही नाही आणि मीही केवळ आपल्यासाठीच आहे. हाच माझा विश्वास आहे आणि तोच माझा आत्मविश्वासही आहे.”

आपले मनोगत व आपली योजना थोडक्यात लिहून कळवावी या हेतूने खरे तर रूक्मिणीने कृष्णाला पत्र लिहिण्यास सुरूवात केली होती. परंतु लिहिता लिहिता रूक्मिणीचे भावपूर्ण मन जे मोकळे व्हायला लागले ते लागलेच. त्यामुळे तिचे लिखाण काही थांबेच ना! शेवटी रूक्मिणीने लिखाण प्रयत्नपूर्वक थांबवले. रूक्मिणीने त्या प्रदीर्घ पत्राकडे पाहिले आणि तिचे तिलाच हसू आले. रूक्मिणीच्या मनात विचार आला की, ‘अरे, एवढे दीर्घ पत्र पाहून कृष्णाला काय बरे वाटेल? मला नक्की खात्री आहे की हे पत्र वाचून तो मला हसेलच. मी तरी एवढी वेडी कशी? मी काहीच कसा विचार केला नाही. एवढे लांबलचक पत्र वाचायला कृष्णाला वेळ तरी मिळेल का? पण जाऊ दे ना, मी तरी याचा जास्त विचार का करावा बरे? माझे मन तर मोकळे झाले. आता हे पत्र कृष्णाला अर्पण केल्यानंतर त्याचे पुढे काय करायचे हे कृष्णच पाहील. त्याचा विचार मी करीत बसणार नाही. भले बुरे जाणणारा व ठरवणारा एक कृष्णच असताना त्याची काळजी मी तरी कशाला करावी?’


अशा विचाराने रूक्मिणी स्वतःशीच खुदकन हसली. तिच्या मनावरील सर्व ताण आता पूर्णपणे नाहीसा झालेला आहे, हे तिच्या प्रसन्न मुखावरून अगदी स्पष्टपणे दिसत होते. रूक्मिणीने ते पत्र व्यवस्थित व नीटपणे बंद केले आणि सुदेव पुरोहिताला त्वरित बोलावून घेऊन ते पत्र त्याच्या स्वाधीन केले. हातातील पत्र पाहताच सुदेव सर्वकाही समजला. त्याला काहीही सांगण्याची आवश्यकताच राहिली नव्हती. रूक्मिणीकडे पाहत त्याने हसून मान डोलविली आणि रूक्मिणीकडे आश्वासक नजरेचा एकच दृष्टिक्षेप टाकून सुदेव तेथून त्वरित बाहेर पडलाही.”

बोलता बोलता नारद नकळतपणे थोडासा थांबला आणि लक्ष्मीने लगेचच बोलण्याची संधी साधलीच. खरे तर, तिलाही न बोलता जास्त वेळ स्वस्थ बसणे कठीणच होऊ लागले होते. कारण रूक्मिणीच्या भावाचे व स्वभावाचे वेगळेपण व विशेषपण जसे जसे नारदाकडून प्रगट होत होते, तशी तशी लक्ष्मी अधिकाधिक प्रभावित होत होती. त्यामुळे जराशी संधी मिळताच लक्ष्मीने बोलावयास सुरूवात केली म्हणजे काय, केलीच!

“अरे नारदा, तुझ्याकडून प्रगट होत असलेले हे रूक्मिणीचे व्यक्तिमत्त्व माझ्या मनाला मोहित तर करीत आहेच, पण त्याचबरोबर तिच्याविषयीचा कौतुकभावही माझ्याठायी अत्यंत शिगेला पोहोचलेला आहे. मुळात कृष्णाशी एकनिष्ठ, दुसरे म्हणजे स्वतःशी अत्यंत प्रामाणिक आणि या सर्वाला विचारपूर्वक केलेल्या प्रयत्नांची असलेली जोड ही रूक्मिणीच्या स्वभावाची त्रिसूत्री माझ्या मनाचा अत्यंत खोल ठाव घेऊन राहिलेली आहे. म्हणूनच रूक्मिणीचे व्यक्तिमत्त्व मला अत्यंत लोभसवाणे असेच जाणवत आहे. तिच्या व्यक्तिमत्त्वात हळुवारपणा पण निश्चयात्मकता आणि मृदुपणा पण करारीपणा या सकृतदर्शनी विरूद्ध वाटणाऱ्या गुणांचा सुरेख संगम झालेला मला अगदी स्पष्टपणे दिसत आहे. रूक्मिणीची बुद्धीमत्ता व चातुर्य तर मला विशेषत्वानेच जाणवत आहे.

कृष्णानेच येऊन तिला घेऊन जायचे हे तर आता रुक्मिणीच्या दृष्टीने नक्की झालेलेच होते. परंतु कृष्णाचे तसे एकट्यानेच येणे हे शक्य झाले नसते हेही रुक्मिणी जाणून होती. जणू त्यासाठीच तिने पुन्हा स्वयंवराची योजना आखली आणि त्यामुळे साहजिकच इतर सर्व जणांबरोबर कृष्णालाही आमंत्रण आपसूकच मिळाले. बरे, स्वयंवरासाठी सर्वजण आधीपासूनच जमणार असल्यामुळे कृष्णाचे आदल्या दिवशीचे येणेही सर्वांना स्वाभाविकच वाटले असणार. कोणालाही कुठेही संशयाला जराही जागाच नव्हती. खरे तर, रुक्मी जाणून होता की स्वयंवराच्यावेळी समर प्रसंग होणारच होता. परंतु तसा प्रसंग प्रत्यक्ष स्वयंवराच्या दिवशीच येणार असे गृहीत धरून असल्यामुळे रुक्मिही बेसावधच असणार. हे सर्व ओळखूनच रुक्मिणीने प्रत्यक्ष कृष्णाबरोबर जाण्याचा दिवस व वेळ आदल्या दिवशीची व संध्याकाळचीच ठरवली. खरेच नारदा, या रुक्मिणीच्या धैर्याचे व कुशाग्र बुद्धीचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. आता तू मला एवढेच सांग की रुक्मिणीने आखलेली ही योजना कशी पूर्तीस गेली? कारण ती योजना यशस्वी झाली असणार याची मला पूर्ण खात्री आहे. फक्त ते सर्व कसे घडले ते मला लवकरात लवकर सांग बघू.”

लक्ष्मीचे बोलणे ऐकून संतुष्ट झालेल्या नारदाने हसून मान डोलवली आणि म्हणाला, “हे लक्ष्मी, रुक्मिणीची जी प्रतिमा तुझ्याठायी निर्माण झालेली आहे ती अगदी यथायोग्य आहे. रुक्मिणी म्हणजे खऱ्या भक्तिभावाचे जणू मूर्तिमंत प्रतीकच होती. भगवंताच्या प्राप्तीसाठी मनाठायी केवळ प्रेमाची भावनात्मकता असून चालत नाही, तर बुद्धीच्या चातुर्याची व युक्तीच्या प्रयत्नांचीही त्याला जोड असणे अत्यंत आवश्यक असते. त्यांच्या युतीनेच भक्त हा भावबळाने युक्त होतो आणि भगवंताच्या चरणी प्रत्यक्ष येऊन सादर होतो. मगच त्या भक्ताला अत्यंत प्रेमाने उचलून आपल्या हृद्याशी घेणे हे भगवंताकडून त्याच्या सहजधर्माने उत्स्फूर्तपणे घडते आणि



भगवंताशी ऐक्य पावल्याचा आनंद स्वतः भगवंत व भक्त हे दोघेही अनुभवतात. म्हणूनच भगवंतालाही भक्तिभावाने त्याच्याशी ऐक्य पावणारा भक्तच अत्यंत प्रिय असतो हे अगदी खरे आहे. भगवंत अशा भक्तांची सदैव वाट पाहत असतो. सगुण प्रेमभक्तिमार्गाचे हे गुजच रुक्मिणीच्या भावाच्या रूपाने साकार होत होते.


हे लक्ष्मी, सुदेव पुरोहिताबरोबर कृष्णाला पत्र पाठवल्यानंतर रुक्मिणीच्या मनावरील सर्व ताण नाहीसा झाला आणि तिचे मन एकदम मोकळे झाले. तिच्या पत्राला कृष्णाचे उत्तर काय असेल याची रुक्मिणीला अजिबात काळजी नव्हती. कृष्णाचे उत्तर तिला ठाऊकच होते. कारण रुक्मिणीच्या ठायी स्वतःच्या भक्तिभावाची खात्री आणि कृष्णाविषयीचा विश्वास पूर्णपणे होता. त्यामुळेच कृष्ण ठरलेल्या वेळी, ठरलेल्या ठिकाणी निश्चितपणे येणार याची निश्चिंती रुक्मिणीठायी होती. फक्त त्यावेळी रुक्मिणीने मात्र त्याठिकाणी हजर राहणे करायचे होते. तेव्हा आता सर्व जबाबदारी केवळ कृष्णावरतीच सोपवून रुक्मिणी काही स्वस्थ बसून राहू शकत नव्हती आणि तशी ती स्वस्थ राहिलीही नाही. कोणाच्याही नकळत रुक्मिणीने गुप्तपणे हालचाली सुरू केल्या खऱ्या, पण मुख्य म्हणजे तिने तिच्या योजनेची कोठेही वाच्यता केली नाही. अगदी मातापित्यांनाही रुक्मिणीने अजिबात विश्वासात घेतले नाही. कारण स्वानुभवाने रुक्मिणी जाणून होती की जेथे स्वतःच्या मनाचा सुद्धा भरवसा धरता येत नाही, तेथे दुसऱ्या कोणाचा कसा भरवसा धरावा? स्वतःच्या मनाला कृष्णप्रेमात स्थिर ठेवून आणि बुद्धीच्या ठायी कृष्णप्राप्तीचा दृढ निश्चय कायम ठेवून रुक्मिणी एकीएक त्याच ध्यासात सदैव राहिली. त्यामुळेच मनावर काहीच ताण न घेता तिच्याकडून योग्य ते प्रयत्न सहजपणे घडत राहिले.

हे लक्ष्मी, सुदेव पुरोहितालाही प्रसंगाचे महत्त्व व त्यातील तातडीची जाणीव झाली होती. रुक्मिणीच्या भावानेच युक्त झाल्यासारखा, वाटेत कोठेही मुक्कामाला न थांबता तो सुदेव त्वरेने मथुरेस पोहोचला आणि थेट कृष्णाला जाऊन भेटला. थकल्या भागल्या सुदेवाला पाहताच कृष्णाला सर्व काही कळले. सुदेवाने त्याच्याबरोबर आणलेला रुक्मिणीचा भाव तर कृष्णाला लगेचच पावला आणि त्याने सर्वप्रथम सुदेवालाच प्रेमालिंगन देऊन त्याचे यथार्थ कौतुक केले. सुदेवाने दिलेले रुक्मिणीचे दिर्घ पत्र कृष्णाने थोडक्यातच वाचल्यावर स्वतःकडे ठेवून घेतले आणि त्याच्याकडे पाहून फक्त मंदस्मित केले. सुदेवाला रुक्मिणीच्या पत्राचे उत्तर मिळाले आणि कळलेही, जे रुक्मिणीला आधीपासूनच कळले व मिळाले होते. सुदेवाच्या विश्रांतीची व्यवस्था कृष्णाने स्वतः जातीने केली आणि तो स्वतःच्या महालात निघून गेला.

स्वतःच्या महालात गेल्यानंतर कृष्ण मंचकावर शांतपणे पहुडला आणि रुक्मिणीचे पत्र आपल्या हातात धरून पुन्हा पुन्हा वाचत राहिला. ते पत्र कितीही वेळा वाचले तरी कृष्णाच्या मनाचे समाधान काही होत नव्हते. रुक्मिणीच्या सुरेख व सुस्पष्ट हस्ताक्षरातील लिखाणातून प्रगटलेली तिच्या मनाची प्रांजळता, निर्मळता व प्रेमळता जाणवून कृष्णाचे मनही वारंवार भरून येत होते. रुक्मिणीचे पत्र स्वतःच्या हृदयाशी धरून कृष्णाने आपले नेत्र मिटून घेतले मात्र, त्याच्या मनःचक्षूंसमोर रुक्मिणीची मूर्ती उभी राहिली. रुक्मिणीच्या सौंदर्यातील सोज्वळता स्मरतानाच कृष्णाला रुक्मिणीच्या स्वभावातील मार्दवता व तेजस्विता यांच्या अनोख्या मिश्रणाचीही आठवण झाली. रुक्मिणीच्या मुखावरील प्रसन्न हास्य आणि गंभीरता यांचा संगम आठवून कृष्णाचे मन सुखावले. परंतु त्याचबरोबर स्वयंवर मंडपात प्रगटलेली रुक्मिणीची निश्चयात्मकता व निर्भयता आणि परिस्थितीने अगतिक झाल्यावर रुक्मिणीने विवेकाने घेतलेला निर्णय, त्याहीपेक्षा तिने कृष्णाशी केलेले आर्जवी बोलणे, हे सर्व चित्र कृष्णाच्या मनःपटलावर पुन्हा अगदी जसेच्या तसेच उभे राहिले आणि कृष्णाचे हृदय रुक्मिणीच्या प्रेमाने भरून वाहू लागले.

हे लक्ष्मी, रुक्मिणीच्या मनीचे भाव कृष्ण केवळ यथार्थपणे जाणतच नव्हता, तर तिच्या प्रेमभक्तिभावाचा आनंदही कृष्ण अनुभवत होता. रुक्मिणीच्या ठायी असलेली कृष्णप्राप्तीची तळमळ जाणवून जेवढे कृष्णाचे मन व्याकूळ होत होते, तेवढेच कौतुक कृष्णाला तिचे बुद्धीचातुर्य पाहून वाटत होते. मागील अनुभवानंतर निराश न होता पण सावध झालेल्या रुक्मिणीने पुन्हा ठरविलेले स्वयंवर आणि त्यातूनही कृष्णाशीच विवाह करण्याची आखलेली बिनचूक योजना वाचून तर कृष्णाच्याठायी रुक्मिणीविषयी एक प्रकारचा आदरच निर्माण झाला. रुक्मिणीच्या व्यक्तिमत्त्वातील अनेक अंग व रंग आठवून कृष्णाला अतिशय आनंद झाला आणि तो स्वतःशीच अत्यंत मोकळेपणाने हसला.

मथुरेत उगाचच जास्त वेळ थांबून जराही वेळ वाया न दवडता, सुदेव पुरोहित कृष्णाची परवानगी घेऊन त्वरित कुंडिनपुरास परतला. त्याच्याबरोबर कृष्णाने रुक्मिणीसाठी काहीही निरोप पाठवला नव्हता. जशी ती आवश्यकता कृष्णाला वाटली नाही तशीच ती जरुरी रुक्मिणीलाही जाणवली नाही. त्यामुळे सुदेवाने रुक्मिणीची केवळ भेट घेऊन तो मथुरेहून परत आल्याचेच फक्त रुक्मिणीला कळवले आणि त्याने बाकी आणखीन काहीही न सांगताच रुक्मिणीला सर्व काही कळले. रुक्मिणीचे कृष्णाशी मनोमनी प्रेमसूर जुळल्याचेच ते लक्षण होते. परंतु तरीही अजून भक्तिगायन घडायचे राहिलेले होतेच आणि त्यामुळेच प्रेमाची पूर्ती होऊन आनंदाचा प्रत्यक्ष अनुभव घेणे शक्य झाले असते हेही खरेच होते. रुक्मिणी हे जाणून होतीच. म्हणूनच ती सावधपणे, पण मनात कोणताही ताण न घेता निश्चिंतपणे पुढील तयारीला लागली.



हे लक्ष्मी, म्हणता म्हणता रुक्मिणीच्या स्वयंवराचा दिवस जवळ येऊन ठेपलासुद्धा! कुंडीनपुर नगरीमध्ये व विशेषतः राडवाड्यामध्ये एकच धांदल व गडबड सुरू झाली होती. मागच्या स्वयंवराच्या वेळच्या सर्व स्मृती मनातून पुसून टाकून सर्वच जण अत्यंत उत्साहात वावरताना दिसत होते. एकेक करून येऊ लागलेल्या सर्व राजे व महाराजे यांचे यथोचित स्वागत करून त्यांची व्यवस्था लावण्यात भीष्मक व रुक्मी त्यांच्या अनेक सहकाऱ्यांसह मग्न होते. स्वतः राणी शुद्धमती इतर अनेक स्त्रियांच्या सहकार्याने मुदपाकखान्याकडे लक्ष देत होती. दागदागिने, भरजरी वस्त्रे यांची निवड तर शुद्धमती स्वतः जातीने करीत होती. परंतु तिला मुख्य काळजी होती ती रुक्मिणीच्या मनःस्थितीची. त्यामुळे रुक्मिणीचे मन उल्हसित ठेवण्यासाठी शुद्धमती सर्व तऱ्हेचे आटोकाट प्रयत्न करीत होती. रुक्मिणीसुद्धा आपल्या मातेचे मन जाणून बाह्यांगाचा उत्साह राखून तसा दाखवीतही होती. त्यामुळे शुद्धमतीलाही रुक्मिणीच्या मनातील विचारांचा मुळीच थांगपत्ता लागला नाही आणि तीही अत्यंत खुशीने सर्वत्र वावरत होती. नगरीत व राजवाड्यात घडणाऱ्या सर्व गोष्टींची बित्तंबातमी रुक्मिणीला तिच्या दासींकडून कळत असे. कोण कोण राजे आले आहेत आणि त्यांची राहण्याची वगैरे सर्व व्यवस्था कोठे करण्यात आली आहे, याची सर्व माहिती रुक्मिणीला अगदी तंतोतंत व वेळच्यावेळी मिळत असे. त्यामुळे रुक्मिणी अत्यंत सावध व दक्ष होती आणि योग्य वेळेची वाट पाहत शांत व स्वस्थ राहिली होती.

हे लक्ष्मी, स्वयंवराच्या बरोबर आदल्या दिवशी रुक्मिणी स्वतःचे सर्व आन्हिक उरकून सुस्नात झाली आणि तिच्या मातेच्या भेटीसाठी मातेच्या महालात आली. मातेला नमस्कार करून रुक्मिणी म्हणाली,

“हे माते, स्वयंवराची तर सर्व जय्यत तयारी होतच आहे. सर्वकाही व्यवस्थित व निर्विघ्नपणे पार पडेल असा माझा विश्वास आहे. त्यासाठी आपल्या राजवाड्यातील मंदिरात जाऊन मी देवीची पूजा करणारच आहे आणि देवीची करुणा भाकणार आहे. परंतु आज संध्याकाळी आपल्या नगराच्या बाहेर असलेल्या कुलदेवतेच्या मंदिरात स्वतः एकटीने जाऊन तिची महापूजा करावी आणि प्रार्थना करून देवतेचे आशीर्वाद मागून घ्यावेत असा माझा मानस आहे. मागच्या वेळेस आल्या तशा अडचणी या वेळेस येऊ नयेत हीच माझी तीव्र इच्छा आहे आणि तोच माझा यामागील हेतू आहे. त्यासाठी तुझी अनुमती मागण्यासाठीच मी आता तुझ्याकडे आलेली आहे.”

रुक्मिणीचे बोलणे ऐकून शुध्दमतीने आधी थोडावेळ विचार केला आणि मग ती म्हणाली, “अगं रुक्मिणी, तुझा विचार मलाही योग्यच वाटत आहे. मागच्या

वेळेचा प्रसंग आठवला की माझ्या मनाचा अजूनही थरकापच होतो. आपण कितीही गोष्टी ठरवल्या तरी त्यामध्ये किती संकटे आणि तीही अगदी अचानकपणे केव्हा उद्भवतील याचा काहीच भरवसा नाही. आपण कितीही काळजी घेतली तरी एकदम काहीतरी अडचणी निर्माण होतात आणि आपल्याला अगतिक करुन ठेवतात. मागच्या वेळेस आपण या सर्वाचा पुरेपूर अनुभव घेतलेला आहेच. म्हणून यावेळेस आपण अधिक सावध राहिले पाहिजे. सर्व धार्मिक विधी तर आपण करतोच, तरीही दैवी सामर्थ्य म्हणून जे काही आहे, त्याचेही रक्षण घेणे आपल्यालाही अत्यंत आवश्यकच आहे असे मलाही वाटत आहे. त्या दृष्टीने आपल्या कुलदेवतेची पूजा करून तिचे रक्षण प्राप्त करुन घेण्याचा तुझा विचार माझ्या मनाला निश्चितच पटतो. परंतु हे सर्व मी आधी तुझ्या पित्याच्याही कानावर घालते आणि त्यांचीही संमती मिळवते.”

रुक्मिणी व तिच्या मातेचे असे बोलणे होत असतानाच त्याठिकाणी भीष्मकाचे आगमन झाले. शुद्धमतीने रुक्मिणीचे सर्व बोलणे भीष्मकाला सांगितले तेव्हा त्यालाही ते सयुक्तिकच वाटले. पण त्याला काळजी रुक्मिणीच्या सुरक्षिततेची वाटली आणि त्यासाठी त्याने ‘रुक्मिणीने बरोबर काही सैन्यदल घेऊन जावे’ असा आग्रह धरला. रुक्मिणीने त्यावर विचार केला असता तिच्या लगेचच लक्षात आले की बरोबर थोडेसे जरी सैन्य घेतले तरी पुढील प्रसंगातील गुंतागुंत वाढेल आणि तिने आखलेल्या योजनेला बाधाच येईल. मनातून सावध असलेली रुक्मिणी तिच्या पित्याला म्हणाली,

“अहो तात, मी कुलदेवतेच्या दर्शनाला जात असताना माझ्या संगे कोणताही बाह्यांगाचा बडेजाव घेणे मला आवश्यक वाटत नाही. खरे तर, ते अयोग्यच आहे. केवळ देवतेवरच्या श्रद्धाभावाने आपण सर्व भरवसा तिच्यावरतीच ठेवला असता माझ्या सुरक्षिततेचा प्रश्न येतच नाही. त्यासाठी कोणताही बाह्य सरंजाम व देखावा मुळात हवाच कशाला? अर्थात तुम्हाला माझी काळजी वाटत आहे ते योग्यच आहे. म्हणून मी एक गोष्ट करीन. माझ्याबरोबर सैनिकांना न नेता, मी साध्या पोशाखातील माझ्या वैयक्तिक अंगरक्षकांना माझ्यासंगे घेऊन जाईन. म्हणजेच ते दुसऱ्या कोणाच्याही लक्षात येणार नाही आणि माझ्यापासून योग्य अंतर राखून, माझ्या सूचनेप्रमाणे जेव्हा मला आवश्यक असेल तेव्हा ते मला साहाय्यभूत होतील.”

रुक्मिणीचा बिनतोड युक्तिवाद ऐकून भीष्मकाला संतोष झाला. त्याला रुक्मिणीचे कौतुकही वाटले आणि त्याने शुद्धमतीकडे सहेतुक पाहून संमतीदर्शक मान डोलवली. शुद्धमतीनेही रुक्मिणीच्या मस्तकावर आपल्या हाताने हलकेच


थोपटले. रुक्मिणीविषयी असलेला सर्व कौतुकभाव शुद्धमतीच्या नेत्रांतून ओसंडून वाहत होता. रुक्मिणीही मनातून सुखावली होती. तिने मोठ्या कौशल्याने परिस्थिती हाताळली होती. रुक्मिणी जाणून होती, की देवीदर्शनाला जाताना तेथे उगाचच अनावश्यक लोकांची गर्दी जमवणे जोखमीचे होते. त्यातूनही रुक्मिणीच्या संरक्षणासाठी जर सैनिक तिच्याबरोबर गेले असते, तर तिच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यांनी आधीपासूनच देवळाच्या सर्व परिसरालाच गराडा घातला असता. त्यामुळे तेथील सर्व वातावरणातीलच ताण वाढला असता आणि तेथे कोणालाच मोकळेपणाने वावरणे शक्य झाले नसते. रुक्मिणीची तर पंचाईत झाली असतीच, पण कृष्णासाठीही अडचणच निर्माण झाली असती. कृष्णाला तेथे पाहिल्यावर सैनिक लगेचच सावध झाले असते आणि ते सैनिक रुक्मिशी एकनिष्ठ असल्यामुळे त्यांनी ‘कृष्ण आल्याचे’ रुक्मिला लगेचच कळीत केले असते. एवढेच नव्हे, तर रुक्मिणीला संरक्षण देण्याच्या निमित्ताने त्या सैनिकांनी कृष्णाशी संघर्ष केला असता आणि तेथेच युद्धालाही तोंड फुटले असते. त्यामुळे पुढील सर्व योजनाही बारगळली असती. पण रुक्मिणीने सावधानता राखून व समयसूचकता दाखवून पुढील संभाव्य धोका आधीच टाळला.

हे लक्ष्मी, अशा तऱ्हेने रुक्मिणीने स्वतः सावध राहून आपल्या योजनेविषयी जवळच्यांना बेसावध ठेवले आणि बाकी इतरांना तर दूरच ठेवले. रुक्मिणीने प्रत्यक्ष रुक्मिलाही तिच्या देवीदर्शनाच्या योजनेविषयी जाणूनबुजूनच अंधारात ठेवले. त्यासाठी तिने तिच्या मातेलाच विश्वासात घेतले. ‘रुक्मी हा मुळातच नास्तिक आहे आणि देवाधर्मावर तर त्याचा मुळीच विश्वास नाही. तेव्हा त्याचा अकारण विरोध ओढवून घेण्यापेक्षा त्याला हे काही न सांगितलेलेच बरे’ हा रुक्मिणीचा मुद्दा शुद्धमतीलाही पटला आणि तीही मग स्वस्थच राहिली. रुक्मिसुद्धा प्रत्यक्ष स्वयंवराच्यावेळी काय डावपेच आखायचे हे ठरवण्यात मग्न असल्यामुळे बेसावधच राहिला आणि त्यामुळे रुक्मिणीला तिची योजना पूर्णत्वास नेण्यासाठी परिस्थितीची अधिकच अनुकूलता प्राप्त झाली.

हे लक्ष्मी, अशा तऱ्हेने रुक्मिणीने अत्यंत प्रयत्नपूर्वक परिस्थितीची जास्तीत जास्त अनुकूलता प्राप्त करून घेतली. हे सर्व तिच्या ठिकाणी असलेल्या कृष्णप्राप्तीच्या ध्यासातून अगदी सहजपणे घडले होते. आता रुक्मिणीच्या ठिकाणी एकीएक व्यवधान लागून राहिले होते आणि ते म्हणजे संध्याकाळी देवीच्या मंदिरात होणाऱ्या कृष्णभेटीचे. त्या ध्यासात व त्या नादातच तिच्याकडून सर्व आवश्यक ती कर्मे तिच्या नकळत, पण अगदी सहजतेने घडत होती. संध्याकाळची वेळ जशी जशी जवळ येऊ लागली तशी तशी रुक्मिणीच्या ठिकाणची अधीरता अधिकाधिक

वाढतच राहिली. परंतु बाह्यांगाने मात्र रुक्मिणी सर्वांनाच शांत दिसत होती. तिच्या अंतरातील गोष्टींचा कोणालाही थांगपत्ता लागणे शक्यच नव्हते.

*****



# कृष्ण-रुक्मिणी विवाह

रुक्मिणीने प्रथम लगबगीने स्नान करून घेतले आणि स्वतःच्या हाताने एका चांदीच्या तबकात पूजेचे सर्व साहित्य ठेवले. सुंदर व सुवासिक फुलांच्या माळा तिने आठवणीने बरोबर घेतल्या आणि आपल्या विश्वासातील निवडक दासींना बरोबर घेऊन नगरी बाहेरील देवीच्या मंदिराकडे निघण्यासाठी रुक्मिणी सज्ज झाली. निघण्यापूर्वी रुक्मिणीने आपल्या मातापित्यांना वाकून नमस्कर केला आणि अचानकपणे रुक्मिणीचे अंतःकरण भरूनच आले आणि ती आईच्या कुशीतच शिरली. रुक्मिणीची अवस्था पाहून शुद्धमतीलाही भरून आले आणि भीष्मकाचे नेत्रही पाणावलेच. परंतु रुक्मिणीने स्वतःला क्षणार्धात सावरले आणि मग मागेही वळून न पाहता ती त्यांच्या महालाच्या बाहेर आली. थोडेसे चकित झालेले भीष्मक व शुद्धमती मात्र रुक्मिणीकडे पाहत बराच वेळ तेथेच थांबून राहिले.

हे लक्ष्मी, रुक्मिणीच्याठायी क्षणिक निर्माण झालेली भावनाप्रधानता म्हणजे काही तिच्या मनाची दुर्बलता नव्हती, तर ते तिच्या मनाच्या संवेदनाक्षमतेचे लक्षण होते. रुक्मिणीच्या ठायी असलेल्या सात्त्विक भावाचाच तो परिपाक होता. रुक्मिणी जाणून होती की जरी ती तिच्या मातापित्यांचा निरोप देवळात जाण्याच्या निमित्ताने घेत होती, तरी रुक्मिणीसाठी तो मातापित्यांचा निरोप कन्या या नात्याने शेवटचाच होता. खरे तर, रुक्मिणी तिचे माहेर सोडून तिच्या पतीच्या घरी कायमचीच निघालेली होती. फक्त त्याची जाणीव रुक्मिणीलाच होती आणि तिच्या मातापित्यांना नव्हती. साहजिकच मातापित्यांविषयीच्या कृतज्ञभावाने रुक्मिणीला भरून आले. परंतु भावविवश न होता रुक्मिणी मनाने निश्चयी व खंबीरच राहिली आणि तिच्या ध्येयाच्या दिशेने एकेक पाऊल पुढे टाकीत निघाली. भावना व ध्येयपूर्तीचा ध्यास यांचा रुक्मिणीच्या ठायी असलेला हा अनोखा संगम हेच तिच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेषत्व होते.


हे लक्ष्मी, आपल्या सखीसारख्या असलेल्या दासींसह रुक्मिणी देवळाकडे रथातून निघाली. विश्वासातील निवडक अंगरक्षक तिच्या आजूबाजूने योग्य अंतर ठेवून चालत होते. नगरीतील नागरिकांना अचानकपणे रुक्मिणीचे सुखद दर्शन झाले आणि त्यांचे नेत्र तृप्त झाले. त्या सर्वांना हात जोडून अभिवादन करून रुक्मिणी जणू त्यांचाही अखेरचा निरोपच घेत होती. कुलस्वामिनीच्या देवळाच्या जवळ आल्यावर रुक्मिणी रथातून खाली उतरली. तिने अंगरक्षकांना तेथेच थांबावयास सांगितले. ‘जेव्हा जरूर लागेल तेव्हा सांगेन’ अशा सूचनाही तिने त्यांना दिल्या आणि आपल्या दासींसमवेत ती मंदिराच्या पायऱ्या चढू लागली. एकेक

पायरी चढून आधी सभामंडपात आणि त्यानंतर मंदिराच्या गाभाऱ्यात रुक्मिणीने प्रवेश केला.

रुक्मिणीने बरोबर आणलेले पूजेचे सर्व साहित्य देवीच्या मूर्तीसमोर ठेवले आणि तेथील पुजाऱ्याच्या सांगण्याप्रमाणे त्या मूर्तीची यथासांग षोडषोपचारे पूजा अत्यंत मनःपूर्वक केली. देवीच्या मूर्तीच्या कंठात स्वहस्ते पुष्पमाळ अर्पण करून रुक्मिणीने आपले दोन्ही हात जोडले व नेत्र मिटून घेतले. थोड्या वेळाने रुक्मिणीने नेत्र उघडले आणि आपली दृष्टी मूर्तीच्या दृष्टीला मिळवली. त्यावेळी त्या मूर्तीच्या नजरेत केवढे तरी विशेष तेज भरलेले आहे असे रुक्मिणीला जाणवले. तिने अत्यंत नम्रतापूर्वक तिचे मस्तक मूर्तीच्या चरणांवर ठेवले मात्र, क्षणार्धात आणि अगदी अकल्पितपणे रुक्मिणीने अर्पण केलेली देवीच्या मूर्तीच्या कंठातील पुष्पमाळ रुक्मिणीच्या मस्तकावर अगदी अलगदपणे पडली. त्या माळेच्या स्पर्शाने रुक्मिणी एकदम भानावर आली. कुलस्वामिनीने जणू शुभसंकेत व शुभशकुनच दिला आहे असाच रुक्मिणीचा भाव झाला. अत्यंत हर्षभराने तिने ती पुष्पमाळ आपल्या हातात घेऊन आधी कपाळाला व नेत्रांना लावली आणि नंतर ती माळ अत्यंत प्रेमाने आपल्या हृदयाशी धरून ठेवली. तशाच भावपूर्ण अवस्थेत रुक्मिणी थोडावेळ राहिली खरी, परंतु रुक्मिणी मनामध्ये अत्यंत सावध होती. वेळेचे भानही तिच्याठिकाणी जागृत होते. त्यामुळे त्या पुष्पमाळेला हृदयाशी धरलेल्या अवस्थेतच रुक्मिणी गाभाऱ्याबाहेरील सभामंडपात आली.

हे लक्ष्मी, जशी जशी संध्याकाळ वाढत होती आणि सूर्यास्ताची वेळ जवळ येत होती, तशी तशी रुक्मिणीच्या मनातील हुरहुर वाढत होती. कृष्णाच्या आगमनाची पूर्णपणे खात्री असूनही, प्रत्यक्ष कृष्णाचे येणे होईपर्यंतचा प्रतिक्षेचा काळ रुक्मिणीला अतिशय प्रदीर्घ जाणवत होता. ठरवलेल्या योजनेप्रमाणे रुक्मिणीने आणखीन एक गोष्ट केली. ती म्हणजे तिने आपल्या सर्व दासींना थोडावेळ आजूबाजूला मोकळेपणाने फिरण्यासाठी पाठवले आणि स्वतः सभामंडपातील आधीपासूनच ठरवलेल्या एका खांबाच्यापाठी जाऊन उभी राहिली. कृष्णाच्या वाटेकडे रुक्मिणीची नजर लागून राहिली होती. तिच्या योजनेप्रमाणे कृष्णाचे आगमन मंदिराच्या पाठच्या बाजूच्या प्रवेशद्वारातून होणार होते आणि म्हणून रुक्मिणीची दृष्टीही त्याच दिशेला खिळून राहिली होती.

हे लक्ष्मी, रुक्मिणीच्या योजनेचा ध्यास कृष्णाच्याही ठिकाणी अगदी तेवढाच होता, जेवढा रुक्मिणीच्या ठायी होता. खरे तर, कृष्णाच्या दृष्टीने हा अनुभव आगळा वेगळा आणि पहिल्यांदाच होता. कारण आत्तापर्यंत कृष्ण स्वतः योजना आखत असे आणि मग त्याप्रमाणे वागून ती पूर्तीस नेत असे, किंवा कृष्णाने आखलेल्या योजनेप्रमाणे इतरांना वागायला भाग पाडून कृष्ण त्याची योजना




सिद्धीस नेत असे. दुसऱ्या कोणी योजना योजावी आणि त्याप्रमाणे कृष्णाने वागावे असे आत्तापर्यंत कधी घडलेच नव्हते. तसे म्हटले तर कृष्णाला तशी कधी सवयच नव्हती. परंतु यावेळेस मात्र सर्व योजना रुक्मिणीने आखलेली होती. त्याची पूर्ती करण्याची जबाबदारी कृष्णावर होती आणि त्यसाठी कृष्ण तत्पर झालेला होता. त्यानेही काहीही वाच्यता न करता बलरामाला एवढेच सांगितले होते की ‘मी रुक्मिणीच्या स्वयंवराला जात आहे.’ कृष्णाने जाणून बुजूनच स्वतःच्या बरोबर जास्त लवाजमा किंवा सैन्य घेतले नाही आणि स्वयंवराच्या आदल्या दिवशी संध्याकाळच्या सुमारास रुक्मिणीने ठरवलेल्या वेळेच्या आधीच कृष्ण कुंडीनपुर नगरीच्या बाहेर येऊन हजर झाला. ‘नगरीत प्रवेश करण्यापूर्वी मी आधी देवीचे दर्शन घेऊन येतो’ असे बरोबरच्या मंडळींना सांगून कृष्णाने त्या सर्वांना तेथेच थांबवले आणि स्वतः मंदिराच्या मागील बाजूच्या द्वारातून प्रवेश करून सभामंडपात दाखल झाला.

हे लक्ष्मी, कृष्णाच्या वाटेकडे टक लावून पाहत खांबाच्या मागे उभ्या असलेल्या रुक्मिणीने कृष्णाला पाहिले मात्र, तिचा चेहरा एकदमच फुलला आणि कृष्णप्रेमाने तिचे अंतःकरण एकदम भरून आले. कृष्णानेही रुक्मिणीने त्याला आधीच कळवलेल्या खांबाकडे दृष्टीक्षेप टाकला आणि तेथे रुक्मिणीला उभी असलेली पाहताच कृष्णाच्या मुखावरतीही प्रसन्न हास्य झळकले. त्यावेळेस देवळात जास्त गर्दी नव्हतीच. कारण सर्वजण रुक्मिणीच्या स्वयंवराच्या धामधुमीतच गुंतलेले होते. जे काही थोडेसे तुरळक लोक देवळाच्या आवारात इकडे तिकडे फिरत होते, त्यांचे कुठेच लक्ष नसल्यामुळे रुक्मिणीचे देवळातील येणे किंवा कृष्णाचे तेथे झालेले आगमन कोणाच्याही लक्षातच आले नाही. रुक्मिणीने नेत्रपल्लवीने कृष्णाला खूण केली असता कृष्ण हळूच पुढे आला आणि देवीचे दर्शन घेण्यासाठी गाभाऱ्यात मूर्तीच्यासमोर जाऊन उभा राहिला. कृष्णाने मग दोन्ही कर जोडून व नेत्र मिटून देवीच्या मूर्तीचे मनोभावे दर्शन घेतले. थोड्या वेळाने कृष्णाने आपले नेत्र उघडले, तर रुक्मिणी त्याच्या शेजारी येऊन उभी राहिलेली होती. कृष्णाने वळून रुक्मिणीकडे पाहून स्मितहास्य केले. क्षणार्धात रुक्मिणीने एवढा वेळ स्वतःच्या जवळ बाळगलेली देवीच्या प्रसादाची पुष्पमाळ कृष्णाच्या कंठात अर्पण केली आणि कृष्णाच्या चरणांवर मस्तक ठेवून त्याला नमस्कार केला. कृष्णाने लागलीच रुक्मिणीला आपल्या दोन्ही हातांनी उचलून उठवले आणि आपल्या कंठातील पुष्पमाळ रुक्मिणीच्या गळयात घातली. कृष्णाकडे अनिमिष नेत्रांनी पाहणाऱ्या रुक्मिणीला कृष्णाने आपल्या जवळ घेऊन हृदयाशी धरले. कृष्णाच्या हृदयाशी रुक्मिणीचे हृदय मिळाले आणि पुष्पमाळेच्या सुगंधालाही लाजविणारा असा एकीएक भक्तिभावाचा सुगंधच सर्वत्र दरवळून राहिला. देवीच्या मूर्तीच्या साक्षीने

कृष्ण व रुक्मिणी यांचे केवळ लग्नच लागले नव्हते, तर ते एकमेकांशी संलग्नही होऊन ऐक्यच पावले होते. देव व भक्त यांचे ते अपूर्व मीलन पाहून त्या देवीची जडमूर्तीही चैतन्यमय झाल्यासारखी दिसत होती. त्या मूर्तीचे नेत्र अधिकच तेजस्वी व प्रेमळ आणि तिचे मुखही अधिकच प्रसन्न झाल्यासारखे जाणवत होते.”

कृष्ण व रुक्मिणी यांच्या संलग्न सोहळयाचे वर्णन करीत असताना नारदाची अवस्था पराकोटीच्या भावपूर्णतेची झाली होती यात नवल ते काय? मग लक्ष्मीचीही अवस्था वेगळी राहणे शक्यच नव्हते. तिच्याठायीच्या भावपूर्ण अवस्थेमधूनच तिच्या मुखातून सहजोद्गार निघाले, “धन्य! धन्य!! खरेच धन्य आहे त्या रुक्मिणीची! कृष्णाचे माहात्म्य तर स्वयंसिद्धच आहे. परंतु ते माहात्म्य प्रसिद्ध मात्र रुक्मिणीच्या उत्कट भक्तिभावामुळेच झाले हेही खरेच आहे. कृष्णाविषयी मनात अतिशय प्रेम, कृष्णाच्या माहात्म्याविषयीचा बुद्धीच्या ठायीचा दृढ निश्चय आणि चित्ताच्याठायी एकीएक कृष्णप्राप्तीचा ध्यास! म्हणूनच रुक्मिणीच्या कृष्णभक्तीने उंची गाठली आणि ती भक्ती कृष्णप्राप्तीने आनंदाच्या कळसावर जाऊन पोहोचली. कृष्णाच्या माहात्म्याच्या जाणिवेनेच त्याच्यावर ज्याचे एवढे प्रेम जडले, की प्रयत्नांची पराकाष्ठा करून आणि मार्गातील सर्व अडचणींना दूर करून त्याने पराक्रमाने कृष्णाची प्राप्ती करून घेतली, असा रुक्मिणीसारखा भक्तच या सगुण प्रेमभक्तिमार्गाचे सत्यत्व खऱ्या अर्थाने प्रगट करतो. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे नारदा, तुझ्यासारखा नारायणाशी ऐक्य पावलेला सद्भक्त जेव्हा त्या भक्तांच्या भक्तिभावाचे मंगल व गोड गायन करतो, तेव्हाच सगुण प्रेम भक्तीचा आनंददायी मार्ग सर्वार्थाने व सर्वांगाने प्रगट होऊन प्रसिद्ध होतो. त्यामुळेच अनेक भाविकांना मार्गदर्शन तर मिळतेच, पण स्वतः त्या भक्तिमार्गाने प्रत्यक्ष जाण्याची प्रेरणा मिळते.

हे नारदा, परंतु माझ्याठिकाणी आता एकच उत्सुकता व आतुरता लागून राहिलेली आहे आणि ती म्हणजे पुढे काय झाले? कारण पुढील सर्व जबाबदारी आता कृष्णाची होती. पुढे केवढ्यातरी अडचणी अगदी ‘आ’ वासून उभ्या होत्या. त्यातून कृष्ण रुक्मिणीसह कसा निभावून गेला हे तर निश्चितच अत्यंत रोमांचकारी असणार आहे, याची मला पूर्ण खात्री आहे. कारण आता संकटांची मालिकाच सुरू होणार अशी स्पष्ट चिन्हे मला तरी दिसत आहेत. कृष्ण व रुक्मिणी त्यातून निश्चितच सुखरूपपणे पार पडले असणार. परंतु ते सर्व कसे घडले हे जाणून घेण्याची तीव्र इच्छा साहजिकच माझ्या मनात निर्माण झालेली आहे. तुझ्या मुखातून सर्वकाही श्रवण केल्याशिवाय माझ्या मनाची हुरहुर शमणे शक्यच नाही. तेव्हा तू पुढील कथाभाग त्वरित सांगण्याचे कर बघू.”



लक्ष्मीच्या बोलण्याने नारदाच्या मनाला तोष झाला. कारण कृष्णचरित्राचे गायन करण्यासाठी नारदाचीही आर्तता वाढलीच होती. त्यामुळे लक्ष्मीच्या भावाची पूर्तता करण्याच्या निमित्ताने खरे तर नारदाच्याही भावाची पूर्तता होणार होती. त्यामुळे जराही वेळ न दवडता नारदाने पुढील कथाभागाचे सूत्र उलगडण्यास सुरुवात केली,


“हे लक्ष्मी, कृष्ण व रुक्मिणी त्यांच्या मीलनाचा आनंद अनुभवीत असताना साहजिकच त्यांची अवस्था अत्यंत भावपूर्ण झालेली होती. परंतु त्याचबरोबर भावनेच्या भरात प्रसंगामध्ये वाहूनही न जाता, ते दोघेही अत्यंत सावध होते आणि कृष्ण तर अधिकच सावध होता. कारण आता पुढील सर्व जबाबदारी फक्त त्याच्यावरच होती. स्वतःच्या सामर्थ्यावरती पूर्ण विश्वास असलेला कृष्ण हेही जाणून होता, की त्या प्रसंगात कौशल्याची जरुरीच जास्त होती. त्यामुळे कृष्णाने प्रथम कोणती गोष्ट त्वरित केली असेल, तर ती म्हणजे त्याने रुक्मिणीचा हात धरून तिला लगबगीने देवळाच्या मागील बाजूच्या प्रवेशद्वारातून, देवळाच्या आवाराच्या बाहेर नेले. त्याठिकाणी आधीपासूनच थांबवून ठेवलेल्या रथामध्ये कृष्णाने रुक्मिणीला आपल्या शेजारी, अगदी जवळ बसवून घेतले आणि सारथ्याला रथ वेगाने हाकण्याचा हातानेच इशारा केला. सारथ्याला कृष्णाची खूण समजली. प्रसंगातील गांभीर्य व तातडी त्या सारथ्याच्याही लक्षात आली आणि त्याने त्वरेने रथ चालवण्यास सुरुवात केली. अत्यंत कुशल व चतुर असलेल्या अशा त्या सारथ्याने हमरस्त्याने न जाता, रथ आडमार्गाने नेऊन नगरीच्या बाहेर काढला आणि तो मथुरेच्या दिशेने वेगाने रथ नेऊ लागला. रथ नगरीच्या बाहेर आल्यावरती कृष्णाने त्याला प्रेमाने बिलगून बसलेल्या रुक्मिणीकडे पाहून प्रेमाचा कटाक्ष टाकला आणि रुक्मिणीनेही तेवढ्याच प्रेमाने कृष्णाकडे पाहून स्मितहास्य केले. कृष्णाच्या सन्निध असल्यामुळे रुक्मिणीच्या ठिकाणी काहीच ताणतणाव किंवा कोणत्याही प्रकारच्या भीतीचा लवलेशही नव्हता. परंतु कृष्ण मात्र जाणून होता की अजूनही संकट काही पुरेपूर टळलेले नाही. त्यामुळे कृष्ण अत्यंत सावध होता आणि वारंवार मागे वळून बघून कानोसा घेत होता.

हे लक्ष्मी, कृष्णाला वाटणारी काळजी अत्यंत साहजिक व योग्यच होती आणि त्याचा अंदाजही खराच ठरला. कारण थोड्याच वेळात रथाच्या मागच्या बाजूने दूर अंतरावरून धुळीचे लोट हवेत उडताना दिसू लागले. कृष्णाच्या पाठलागावर रुक्मी व शिशुपाल त्यांच्या सैन्यासह येत होते आणि ते अगदी साहजिकच होते. कृष्णालाही ते अपेक्षितच होते. कारण कृष्ण व रुक्मिणी यांच्या पलायनाची बातमी जास्त वेळ गुप्त राहणे शक्यच नव्हते. रुक्मिच्या कानावर ती गोष्ट लवकरात लवकर जाणारच होती आणि मग रुक्मी स्वस्थ बसून राहणे शक्यच नव्हते. तो त्वरित कृष्णाच्या मागोमाग धावून येणार हे कृष्णही जाणूनच होता. म्हणूनच कृष्णाचे लक्ष

सतत रथाच्या मागच्या दिशेला होते. थोड्याच वेळात रुक्मी त्याच्या सैन्यासह कृष्णाच्या रथाच्या पाठीमागे अगदी जवळ येऊन ठेपला. तेवढ्यात, कृष्णाने येताना जी काही थोडी बहुत यादव सेना त्याच्याबरोबर आणली होती आणि जी त्याने मागे कुंडीनपूर नगरीच्या बाहेर ठेवली होती, ती सेनाही कृष्णाने आधीच दिलेल्या सूचनेनुसार त्याला येऊन मिळाली होती. सर्व परिस्थिती पाहून आता युद्ध अटळ आहे हे कृष्णाने ओळखले आणि सारथ्याला रथ थांबविण्यास सांगितले. उभयतांचे सैन्य शेवटी एकमेकांना भिडलेच.

हे लक्ष्मी, कृष्ण जेव्हा कुंडीनपुराला जाण्यासाठी मथुरेहून निघाला होता तेव्हा त्याने निघण्याआधी बलरामाची भेट घेतली होती. भेटीत त्याने बलरामाला एवढेच सांगितले होते की, “दादा, मी रुक्मिणीच्या स्वयंवरासाठी कुंडीनपुराला जात आहे. यावेळेस मात्र परत येताना रुक्मिणीला माझ्याबरोबर घेऊन येणार आहे.” कृष्णाचे बोलणे ऐकून बलराम मनातल्या मनात काय समजायचे ते समजला. कृष्ण जरी काही स्पष्टपणे बोलला नव्हता, तरी कृष्णाचा स्वभाव जाणून असल्यामुळे बलरामाने लगेचच ओळखले, की काहीतरी गुप्त बेत कृष्णाच्या मनात निश्चितपणे आहे. परंतु त्यानेही कृष्णाला मुद्दामहून काहीच विचारले नाही. कृष्ण कुंडीनपुराला गेल्यावर जेव्हा बलरामाने विचार केला, तेव्हा त्याच्या लक्षात आले की कृष्णाने जास्त सैन्यही बरोबर घेतलेले नव्हते. अर्थात कृष्णाने हे सर्व जाणूनबुजूनच केलेले होते हे निश्चित. कृष्णाच्या योजनेमध्ये निश्चितच काहीतरी गंभीर जोखीम असणार हे बलरामाच्या लक्षात आले. कृष्णावरील आत्यंतिक प्रेमापोटी त्याची नित्य काळजी वाहणाऱ्या बलरामाला मग काही स्वस्थ बसवले नाही. ‘वेळप्रसंग आल्यास आपण कृष्णाच्या मदतीसाठी उपस्थित असावयासच हवे’ अशा एकाच निश्चयाने युक्त होऊन मग बलरामानेही आपली सर्व यादवसेना आपल्याबरोबर घेतली आणि कृष्णाच्या पाठोपाठच कुंडीनपुराकडे कूच केले.

हे लक्ष्मी, युद्धाला तोंड फुटल्यावरती रुक्मिचा साहजिकच प्रयत्न कृष्णावरती प्राणघातक हल्ला करून रुक्मिणीला ताब्यात घेण्याचा होता. त्याच्या दृष्टीने त्याच्यासाठी तो त्याच्या प्रतिष्ठेचा प्रश्न झालेला होता. त्याला जाणूनबुजून गाफील ठेवून रुक्मिणीने स्वखुषीने कृष्णाबरोबर जाणे, हे रुक्मिसाठी तर अत्यंत अवमानकारकच होते. त्या अपमानाचा सूड घेण्याच्या एकीएक ईर्षेनेच रुक्मी अगदी पेटून उठला होता आणि म्हणूनच कृष्णाच्या जवळ जाण्याचा त्याचा सतत आटापिटा चालू होता, पण यादव सैन्य मर्यादित असले तरी रुक्मिचा बेत ते पुन्हा पुन्हा हाणून पाडत होते. तेवढ्यातच बलराम त्याच्या सर्व सैन्यासह येऊन तेथे दाखल झाला आणि सर्व यादव सेनेला अधिकच जोर व उत्साह आला. बलरामाने सर्वप्रथम आपला रथ कृष्णाच्या रथाजवळ आणला आणि कृष्णाला त्याच्या



आगमनाची जाणीव करून दिली. बलरामाला पाहताच, त्याचे कृष्णप्रेम पाहून कृष्णाचेच अंतःकरण भरून आले. कृष्णाने काही बोलण्याच्या आतच बलरामाने कृष्णाशी बोलण्यास सुरूवात केली,

"अरे कृष्णा, मी आलो आहे. तू काहीही काळजी करू नकोस. आता मी सर्व काही बघून घेतो. तू निश्चिंत रहा. पण तू येथे थांबून उगाचच युद्ध करीत आपला वेळ फुकट दवडू नकोस. कारण आता रुक्मिणीच्या सुरक्षिततेचा प्रश्न हा सर्वात महत्त्वाचा आहे. तेव्हा तू रुक्मिणीला घेऊन त्वरित मथुरेला जाण्याचे कर. हे युद्ध निभावून नेण्यास मी समर्थ आहे. त्याची तू अजिबात काळजी करू नकोस. तुझी आणि मुख्यतः रुक्मिणीची काळजी घे. कृष्णा, तुझा ज्येष्ठ बंधू म्हणून म्हण किंवा तुला आवश्यकता वाटत असल्यास मथुरेचा अधिपती म्हणून समज, परंतु माझे सांगणे ही माझी तुला आज्ञाच आहे. तेव्हा आता तुम्ही दोघे येथे क्षणभरही थांबू नका, तर ताबडतोब निघण्याचे करा."


बलरामाच्या बोलण्यातून कृष्णाची प्रेमाची काळजी आणि त्याच्या निर्णयातील निश्चयात्मकता एवढी सहजपणे प्रगट होत होती, की कृष्णापुढे दुसरा पर्यायच उरला नाही. बलरामाचे कृष्णावरती किती गाढ प्रेम आहे हे कृष्ण स्वतः जाणून होता आणि शिवाय रुक्मिणीची काळजी घेणे अत्यंत आवश्यकच होते. त्यामुळे कृष्णाने फक्त एकदाच बलरामाकडे प्रेमाचा कटाक्ष टाकला आणि तो पुढे मथुरेच्या दिशेने अत्यंत त्वरेने व वेगाने निघाला. बलरामाने युद्धाची सर्व सूत्रे त्याच्या हातात घेतली आणि त्याने रुक्मिच्या सेनेशी लढण्यास सुरूवात केली. बलरामाचा मुख्य हेतू हाच होता की रुक्मिला व त्याच्या सैन्याला कृष्णाच्या पाठीमागे जाण्यापासून रोखणे. त्यामुळे बलरामाचा प्रयत्न एवढाच होता की प्रतिपक्षाची प्रत्यक्ष हानी न करता, केवळ त्यांना थोपवून धरणे. परंतु रुक्मिने जेव्हा कृष्णाला रुक्मिणीसह पुढे निसटून जाताना पाहिले, तेव्हा त्याला अधिकच त्वेष आला आणि त्याने निकराचे युद्ध सुरू केले. रुक्मिच्या या आक्रमकतेला कसे तोंड द्यावे अशा विचारात पडलेल्या बलरामाच्या मनाची द्विधा स्थिती होऊ लागली. नेमका या ढिलाईचाच फायदा रुक्मिने घेतला. बलरामाला गुंगारा देऊन रुक्मिने त्याचा रथ पुढे काढला आणि सुसाट वेगाने त्याने कृष्णाचा पाठलाग सुरू केला. अचंबित झालेल्या बलरामालाही थोडा वेळ काय झाले हे कळलेच नाही. त्याच्या लक्षात येईपर्यंत रुक्मी कितीतरी पुढे निघून सुद्धा गेला होता. परंतु बलरामाने लगेचच स्वतःला सावरले आणि रुक्मिच्या पाठोपाठ त्वरेने आपला रथ नेण्याची आज्ञा त्याने त्याच्या सारथ्याला केली.

हे लक्ष्मी, रुक्मिच्या ठिकाणी एवढा त्वेष होता आणि त्याला एवढा चेव आला होता, की थोड्याच वेळात त्याने कृष्णाच्या रथाला गाठले सुद्धा. कृष्णाचा रथ

दृष्टीक्षेपात आल्यावरती रुक्मी कृष्णाला जोर जोरात हाका मारून ओरडून बोलू लागला.

“अरे कृष्णा, ए पळपुट्या, हिंमत असेल तर आधी माझ्याशी युद्ध कर. मी तुझ्यासारख्या चोराला अशी चोरी करून पळून जाण्याची संधी अजिबात देणार नाही हे लक्षात ठेव. अरे, आमच्या पोरीबाळी म्हणजे काय तुला बाजारचा माल वाटतो काय? की तो बळजबरीने उचलून घेऊन जावा. पण याद राख, गाठ माझ्याशी आहे. मी काही हातात बांगड्या भरलेल्या नाहीत. माझ्या बहिणीच्या अब्रूचे असे धिंडवडे मी जोपर्यंत जिवंत आहे तोपर्यंत कधीच होऊ देणार नाही. माझ्या दुर्बल भगिनीला तुझ्यासारख्या लांडग्याच्या हातून वाचविण्यासाठी मी माझ्या प्राणांची शर्थ करीन. अरे नामर्दा, तुझ्यामध्ये जर काही थोडासा जरी मर्दपणा चुकूनमाकून शिल्लक राहिला असेल, तर माझ्यासारख्या जातिवंत मर्दाशी आधी युद्ध कर. त्यातून तुझ्या सुदैवाने तू जर जगला वाचलास तरच मग पुढची भाषा कर. खरे तर, आता तुझा अंतकाळच जवळ आलेला आहे हे तूही जाणून आहेस. तेव्हा आता उसन्या अवसानाचा आव न आणता स्वतःच्या मृत्यूला मुकाट्याने सामोरा जा.”

अशा तऱ्हेने रुक्मी कृष्णाला मुद्दाम लागट वचने बोलून त्याला चेतविण्याचा प्रयत्न करीत होता. परंतु कृष्ण मात्र रुक्मिचे बोलणे मनाला मुळीच लावून न घेता शांतपणाने पण वेगाने पुढे पुढे जातच होता. आपल्या बोलण्याला कृष्ण अजिबात दाद देत नाही हे पाहिल्यावर रुक्मिचा राग अधिकच खवळला आणि त्याने कृष्णाच्या दिशेने बाणांचा वर्षाव करण्यास सुरुवात केली. कृष्णाच्या रथाच्या घोड्यांना तर रुक्मिने त्याच्या बाणांनी विद्ध केलेच, परंतु त्याने रुक्मिणीवरतीही बाण सोडण्यास कमी केले नाही. कृष्णाचा नाइलाजच करण्याचा त्याचा हेतू होता. कृष्णाच्या वर्मावरच रुक्मी जाणूनबुजून आघात करीत होता. त्यामागे कृष्णाला प्रक्षुब्ध करण्याचाच रुक्मिचा डाव होता आणि तसा तो साधला गेलाही. कृष्णानेही रुक्मिणीच्या सुरक्षिततेलाच अधिक प्राधान्य दिले आणि आपला रथ थांबवून कृष्ण त्यातून उडी मारूनच खाली उतरला. क्षणाचाही वेळ वाया न घालवता कृष्ण मागच्या बाजूच्या दिशेने धावतच गेला आणि मागून प्रचंड वेगाने येणाऱ्या रुक्मिच्या रथासमोर जाऊन उभा राहिला. कृष्णाला आपल्या रथाखालीच तुडवून ठार मारण्याच्या ईर्ष्येने रुक्मी रथ भरधाव पुढे आणीत होता. कृष्णाने अत्यंत चपळाईने रथाच्या घोड्यांचे लगाम पुढील बाजूने आपल्या हातात धरले आणि एक जोरदार हिसका देऊन त्या घोड्यांना भूमीवरती आडवे पाडले. क्षणार्धात सर्व रथच कोलमडून खाली पडला आणि सारथ्यासह रुक्मिही जमिनीवरती कोसळला.




परंतु रुक्मिही काही असा सहजासहजी हार मानणाऱ्यातला नव्हताच. घडल्या प्रकाराने रुक्मी उलट अधिकच चवताळला. त्वरित उभे राहून रुक्मिने त्याच्या कमरेची तलवार बाहेर काढली आणि तो त्वेषाने व वेगाने कृष्णावर चालून गेला. कृष्ण आधीपासूनच सावध होता. त्यानेही त्याची तलवार बाहेर उपसून काढली आणि त्याने रुक्मिवर जोरदार प्रतिहल्ला चढवला. तलवारीला तलवार भिडली आणि तलवारींचा एकच खणखणाट सुरू झाला. कृष्ण जाणून होता की जास्त वेळ युद्ध चालू राहणे योग्य ठरले नसते. कारण दुरून येणाऱ्या सैन्याची हवेत उडणारी धूळही एकीकडे कृष्णाला स्पष्टपणे दिसत होती. रुक्मिचे सैन्य त्याच्या मदतीला येण्याच्या आधीच युद्ध संपवणे आवश्यक होते. मग क्षणभरही फुकट जाऊ न देता कृष्णाने मोठ्या कौशल्याने आपल्या खड्गाने रुक्मिच्या हातातील खड्ग उडवून लावले. रुक्मिने आणखी काही हालचाल करण्याच्या आतच कृष्णाने त्याला जमिनीवर खाली आडवे पाडले आणि आपली तलवार रुक्मिच्या गळयावर टेकवून धरली. रुक्मी पूर्णपणे हतबल व निष्प्रभ झाला होता खरा, परंतु त्याच्या ठायीची रग मात्र अजूनही कायम होती. त्याही अवस्थेत रुक्मिने कृष्णाची निंदानालस्ती करणे चालूच ठेवले होते. एवढेच नव्हे, तर रुक्मिने रुक्मिणीलाही दुरुत्तरे करण्यास सुरुवात केली. तेव्हा मात्र कृष्णाचाही राग अनावर झाला आणि आपले खड्ग उगारून तो रुक्मिचा शिरच्छेद करण्यासाठी सज्ज झाला.

हे लक्ष्मी, रुक्मिणीच्या दृष्टीने प्रसंग खरेच कठीण होता. युद्ध तिचे पती व तिचा बंधू यांच्यामध्ये घडत होते आणि तिचे पती तिच्या बंधूचा वध करण्यासाठी सज्ज झाले होते. परंतु तरीही भावनेच्या आहारी जाऊन रुक्मिणीच्या मनाची जराही चलबिचल झाली नाही. तिचे मन शांत व स्थिरच होते. कृष्णाने फक्त एकच कटाक्ष रुक्मिणीकडे टाकला असता त्याच्या लक्षात आले की रुक्मिणी जराही घाबरलेली वा बावरलेली तर नाहीच, पण तिच्या निश्चल नजरेत केवळ कृष्णाविषयीचाच प्रेमभाव दाटलेला होता. रुक्मिविषयी तिच्या ठिकाणी मुळीच मोह नव्हता. अर्थात तिच्याठायी त्याच्याविषयी दया जरूर होती, पण कृष्ण जो काही निर्णय घेईल तोच रुक्मिणीला प्रमाण होता आणि मान्यही होता. त्याही परिस्थितीत कृष्णाला रुक्मिणीचे मनोमनी अत्यंत कौतुक वाटले. रुक्मिणीच्या पूर्ण पाठिंब्याचे बळ घेऊन कृष्ण रुक्मिचा वध करणार एवढ्यातच मागून शब्द आले "थांब कृष्णा, थांब." बलरामाचा आवाज कृष्णाने लगेच ओळखला आणि त्याने मागे वळून पाहिले, तर बलराम त्याच्या रथातून उतरून कृष्णाच्या जवळ धावतच येत होता. बलरामाने पुढे येऊन कृष्णाचा खड्ग धरलेला हात रुक्मिच्या गळयापासून दूर केला आणि कृष्णाला आवर घातला. त्यानंतर कृष्णाला उद्देशून बलराम बोलू लागला.

“अरे कृष्णा, रागाच्या भरात असा अविचार करू नकोस. तुझ्याकडून तसे निश्चितच अपेक्षित नाही. रुक्मिची दुष्ट वृत्ती व त्याच्याठिकाणी तुझ्याविषयीचा असलेला राग व द्वेष मला पूर्णपणे ठाऊक आहे. तुझा व रुक्मिणीचा विवाह होऊ नये यासाठी तर रुक्मिने जंग जंग पछाडले. एवढेच नव्हे, तर त्याने प्रत्यक्ष स्वतःच्या भगिनीचा, रुक्मिणीचा अत्यंत मानसिक छळ करून तिला केवढे तरी मानसिक क्लेश दिलेले आहेत. त्यासाठी त्याला शिक्षा होणेही अत्यंत आवश्यकच आहे यात जराही शंका नाही. परंतु आता परिस्थितीत जो बदल झालेला आहे तोही आपण लक्षात घ्यायलाच हवा ना? कारण तुझा व रुक्मिणीचा विवाह जरी अजून प्रत्यक्ष विधियुक्त झालेला नसला, तरी तुम्ही उभयतांनी एकमेकांना वरलेले आहे हे निश्चित आहे. तेव्हा रुक्मिणी जरी तुझ्या व तिच्यामध्ये तिच्या बंधूच्या नात्याला व मोहाला आड येऊ देत नसली, तरी रुक्मी हा रुक्मिणीचा बंधू आणि आता तुझा सोयरा आहे हे तू लक्षात ठेवावयास हवे. त्याचबरोबर रुक्मी हा राजा भीष्मकाचा, म्हणजे आता तुझ्या श्वशुरांचा पुत्र आहे हेही विसरू नकोस. रुक्मिच्या वधाने भीष्मकाला व त्याच्या पत्नीला जे काही दुःख होईल आणि त्यांना जो शोक होईल त्याचाही विचार आपणच करावयास हवा. आपण त्यांना कसे सामोरे जाऊ आणि त्यांचे सांत्वन कसे बरे करू शकू? तेव्हा कृष्णा, विवेकाने विचार कर. रुक्मिवर दया करून तू त्याला जीवदान द्यावेस असे मला अगदी मनापासून वाटते.”

बलरामाच्या शांत सुरातील पण खंबीर बोलण्याने कृष्णही शांत झाला आणि त्याने स्वतःला सावरले. बलरामाच्या सांगण्यातील तथ्य कृष्णाच्या लक्षात आले आणि ते त्याला भावलेही. तेवढ्यात रथातून उतरून रुक्मिणीही तेथे येऊन नम्रतेने उभी राहिली होती. तिनेही बलरामाचे सर्व बोलणे ऐकले होते. कृष्णाने रुक्मिणीकडे पाहिले आणि त्याने तिच्या मनाचा अंदाज घेण्याचा प्रयत्न केला. परंतु रुक्मिणी अत्यंत शांत व स्तब्ध उभी राहिली होती. तिने कृष्णाकडे फक्त एकदाच नजर वर करून पाहिले आणि कृष्णाला सूचित केले, की ‘ती तिच्या भावाने पूर्णपणे कृष्णाच्या बरोबरच आहे. कृष्ण जो काही निर्णय घेईल त्याच्याशीच ती पूर्ण सहमत आहे.’ रुक्मिणीच्या या भावाचे कृष्णाला मनातून अत्यंत कौतुक वाटले. त्याने एकवार पुन्हा रुक्मिकडे पाहिले असता कृष्णाचे मनही आता थोडेसे द्रवले आणि त्याच्याही मनात रुक्मिविषयी दया निर्माण झाली. परंतु तरीही रुक्मिविषयीचा मनातील राग मात्र कृष्णाच्या ठायी अजूनही कायम होता. म्हणून थोड्याशा वरच्या आवाजातच कृष्ण रुक्मिला उद्देशून बोलू लागला,

“रुक्मी, अरे नीचा, तुझे दुष्टत्व एवढे पराकोटीचे आहे आणि तुझा अपराधही एवढा टोकाचा आहे, की खरे तर तू कोणाच्याही दयेला पात्र होणे कधीही शक्यच



नाही. पण तुझी मागील जन्मीची काहीतरी पुण्याई म्हणूनच तू भीष्मकमहाराजांच्या पोटी जन्माला आलास. पण त्यांनी तुझ्यावर केलेले सुसंस्कार तू वाईट संगतीने वाया घालवलेस आणि दुष्कर्माला प्रवृत्त होऊन दुराचारी झालास. आता केवळ तुझ्या मातापित्यांच्या भावनेचा विचार करूनच तुझ्यावर दया करणे आम्हाला भाग पडत आहे. तुझ्या सुशील व सुस्वभावी भगिनीच्या चांगुलपणाचाही तू गैरफायदा घेतलास आणि तू तिचा अतोनात मानसिक छळही केलास. सख्खा बंधू असूनही रुक्मिणीचा वैरी झालास आणि आता तर तिच्या जिवावरच उठायलाही कमी केले नाहीस. या तुझ्या अपराधाला मी केव्हाच क्षमा करू शकणार नाही. पण तुझे नशीब समज की तुझ्यासाठी आमच्या बलरामदादांचे मन कळवळले आणि त्यांच्या स्वभावानुसार त्यांनी तुझे सर्व अपराध विसरून तुला जीवदान देण्याचा निर्णय घेतला. माझ्यासाठी दादांचा शब्द हा अखेरचा आहे. माझ्यासाठी जणू काही ती आज्ञाच आहे. म्हणूनच केवळ तुझे प्राण वाचले आहेत हे लक्षात ठेव. परंतु तुला तसा मी शिक्षेविना सोडणार नाही. अपराध्याला दंड हा झालाच पाहिजे आणि तसा तो मी तुला करणारच आहे. ज्या स्वतःच्या पराक्रमाचा व पुरुषत्वाचा तुला अहंकार आहे ते तुझे पुरुषत्व मी आता निस्तेज करून ठेवणार आहे. ज्यामुळे तुलाही स्वतःला पुरुष म्हणवून घेण्याची लाज वाटेल.”

असे म्हणून कृष्णाने आपल्या तलवारीने रुक्मिच्या डोक्यावरचे सर्व केस, त्याच्या दाढीमिशा एवढेच नव्हे तर त्याच्या डोळ्याच्या भुवयांवरीलही सर्व केस काढून टाकले आणि त्याला सोडून दिले. विद्रुप व तेजोहीन झालेल्या रुक्मिला तर वर मान करून कोणाकडे बघण्याचीही हिंमत होत नव्हती. तशाच अवस्थेत तो तेथून निघाला. परंतु आपल्या राज्यात परत जाण्याचे किंवा मातापित्यांना तशा स्थितीत तोंड दाखविण्याचे अवसानही रुक्मिच्या ठायी आता शिल्लक राहिलेले नव्हते. त्यामुळे रुक्मी तेथूनच परस्पर कोणालाही न सांगता कुठेतरी अज्ञात स्थळी परागंदा झाला. तेवढ्यात रुक्मी व शिशुपाल यांच्या सैन्याचा पराभव करून यादवसेना तेथे येऊन पोहोचली. शिशुपाल तर जिवानिशी पळून जाऊन कसाबसा त्याच्या राज्यात पोहोचला होता. यादव सैन्याकडून घडलेल्या अपेक्षित पराक्रमाने बलरामाला समाधान वाटले आणि त्याने त्या सैन्याचे भरभरून कौतुकही केले. परंतु बलराम वेळेच्या दृष्टीने मात्र मनातून अत्यंत सावध होता. म्हणूनच तो अत्यंत तत्परतेने कृष्णाला म्हणाला,


“अरे कृष्णा, आता सर्वकाही व्यवस्थित झालेले आहे. तरीही काही महत्त्वाच्या गोष्टी शिल्लक राहिलेल्या आहेत. त्या त्वरित करणे अत्यंत आवश्यक आहे. सर्वात प्रथम म्हणजे तू आता रूक्मिणीला घेऊन कुंडीनपूराला जा आणि राजा भीष्मक व त्याची पत्नी शुद्धमतीदेवी यांची भेट घे. म्हणजे त्यांच्या मनातील चिंता व काळजी

दूर होईल. त्यांच्या मनाला केवढातरी घोर नक्कीच लागून राहिलेला असणार. तेव्हा आधी त्यांच्या मनाला स्वस्थता लाभणे अत्यंत जरूरीचे आहे. तुम्ही उभयतांनी एकमेकांना वरलेले आहे हे ठीकच आहे. परंतु भीष्मक व शुद्धमती यांनाही त्यांच्या कन्येचा विवाह विधियुक्त व्हावा आणि त्याचा सोहळाही साजरा करावा असे निश्चितच वाटत असणार. मातापिता या नात्याने त्यांच्या कन्येविषयीची ही त्यांची भावना योग्यच आहे आणि त्या भावनेचा आदर करणे हे आपलेही कर्तव्यच आहे. कृष्णा, म्हणूनच तू रूक्मिणीसह कुंडीनपूरला त्वरित जाण्याचे करावेस. मी मथुरेला जाऊन येथील सर्व वर्तमान वसुदेव महाराजांना व देवकी मातेला कळवतो आणि त्या सर्वांना घेऊन पुन्हा कुंडीनपुरास परत येतो. त्यानंतर मग रूक्मिणीच्या मातापित्यांच्या इच्छेनुसार तुमच्या विवाहाचा विधियुक्त सोहळा आपण साजरा करू या."

बलरामाचे बोलणे व त्याचा निर्णय अत्यंत संयुक्तिक होता. त्यामध्ये सर्वांच्या भावना व वस्तुनिष्ठता यांची योग्य सांगड सहजपणे होती. त्यावर मग कृष्णाचेही वेगळे मत असणे शक्य नव्हते. बलरामाच्या बोलण्याशी आपली सहमती व्यक्त करून कृष्णाने रूक्मिणीकडे वळून पाहिले असता तिनेही केवळ नजरेनेच तिची संमती दर्शवली. बलरामाची अनुज्ञा घेऊन कृष्ण रूक्मिणीसह कुंडीनपुराकडे निघाला आणि बलरामाने मथुरेच्या दिशेने प्रयाण केले.

***

कृष्ण व रूक्मिणी यांच्या भेटीने भीष्मक व राणी शुद्धमती यांना अतिशय आनंद झाला आणि त्यांची अंतःकरणे अत्यंत प्रेमाने भरून नेत्रांद्वारे वाहूच लागली. रूक्मीची हकीकत ऐकून त्या उभयतांना वाईट निश्चितच वाटले. परंतु हा रूक्मिचा कर्मभोग व दैवयोग आहे असे जाणून त्यांनी विवेकाने आपले दुःख बाजूला सारले आणि ते दोघे रूक्मिणीच्या विवाहाच्या तयारीला मोठ्या उत्साहाने लागले. यथायोग्य वेळी वसुदेव, देवकी व बलराम यांच्यासह यादव कुळातील अनेकांचे आगमन कुंडीनपूर नगरीस झाले. त्यानंतर कृष्ण व रूक्मिणी यांचा अत्यंत शुभदायी व मंगलदायी विवाह सोहळा अतिशय आनंदाच्या व जल्लोषाच्या वातावरणात साजरा झाला. कुंडीनपुरास काही काळ राहिल्यानंतर कृष्ण व रूक्मिणी या नवपरिणीत वधूवरांसह सर्वजण मथुरेला परत आले. सर्व मथुरावासीयांनीही कृष्ण व रूक्मिणी यांचे मोठ्या उत्साहाने स्वागत केले. वसुदेवानेही मथुरावासी जनांसाठी मोठा समारंभ आयोजित करून त्यांना सुग्रास भोजनाची मेजवानी दिली. अशा तऱ्हेने कृष्ण व रूक्मिणी यांच्या विवाहाचा आनंद कित्येक दिवस सर्वत्र एखाद्या दिव्य सुगंधाप्रमाणे पसरून दरवळत राहिला होता."



नारदाच्या वाणीतूनही तोच सुगंध दरवळत होता, ज्याचे वर्णन करण्यात त्याची वाणी पूर्णपणे रंगलेली होती. एवढेच नव्हे, तर लक्ष्मीही त्या दिव्य सुगंधाचा अनुभव घेत होती. नारद व लक्ष्मी किती तरी वेळ त्या दिव्य सुगंधाच्या धुंदीतच होते. त्यांचे सर्व भानच हरपल्यासारखे दिसत होते. नारदाच्या वाणीचा ओघ जरी थांबल्यासारखा दिसत होता, तरी त्याच्या बोलण्याने निर्माण झालेली भावपूर्णता सर्व वातावरणातच भरून राहिलेली असल्याचेच जाणवत होते. परंतु आनंदाच्या अनुभवाची अवस्था ही चैतन्यमय असल्यामुळे तेथे निःशब्द अवस्था जास्त काळ टिकू शकत नाही हेच खरे. त्या आनंदाच्या परिपूर्ण अवस्थेच्या ठायी पुन्हा अत्यंत सहजपणे शब्द स्फुरू लागले आणि लक्ष्मीच्या ठायीचा भाव प्रवाही होऊन मोकळा होऊ लागला,

“हे नारदा, ‘धन्य, धन्य त्या रुक्मिणीची!’ एवढेच मी तिच्याविषयी म्हणू शकते आणि ते अगदी यथार्थही आहे. कारण सर्व अडचणींवर मात करून आणि सर्व संकटांना पार करून रुक्मिणीने तिचे ध्येय गाठलेच. प्रयत्नांची पराकाष्ठा करून रुक्मिणीने शेवटी कृष्णाची प्राप्ती करून घेतलीच घेतली. अर्थात कृष्णाच्या कृपेनेच ते शक्य झाले हे खरेच आहे. पण ती कृष्णाची कृपाही रुक्मिणीला तिच्या कृष्णभक्तीचे फळ म्हणूनच लाभली हेही लक्षात ठेवावयास हवे. रुक्मिणीच्या सर्व सद्‌गुणांचे चीज झाले आणि तिच्या सद्भावाचा विजय झाला. रुक्मिणीच्या जीवनातील तर तो आनंदाचा कळसच होता असेच म्हणणे अत्यंत उचित ठरेल. अर्थात रुक्मिणीचे पुढील सर्व जीवन कृष्णाची प्रत्यक्ष भक्ती करण्यामध्येच गेले असणार याची मला पूर्ण खात्री आहे. फक्त ते सर्व तुझ्या मुखातून ऐकण्याचा आनंद घ्यावा, एवढीच एकमेव आस आता माझ्या मनामध्ये उरलेली आहे. तेवढी ती पुरवण्याची तू कृपा करावीस अशीच विनंती मी तुला करते.”


लक्ष्मीच्या बोलण्यातील भावपूर्णता व त्याचबरोबर असलेली श्रवणाची आर्तता हे दोन्ही पाहून नारदाला समाधान वाटले. त्याची मानही लक्ष्मीच्या कौतुकाने सहजपणे हलली. लक्ष्मीच्या मनीची आस पूर्ण करण्यासाठी नारद जरा सरसावून बसला आणि त्याने शांत व संथ सुरात बोलावयास सुरूवात केली,

“हे लक्ष्मी, तुझे म्हणणे अगदी बरोबर आहे. पती म्हणून कृष्णाची प्राप्ती झाल्यामुळे रुक्मिणीला कृष्णाची प्रत्यक्ष भक्ती करण्याची संधी मिळाली. पण प्रत्यक्ष म्हणजे काय? हाच महत्त्वाचा मुद्दा आहे आणि तोच जाणून घेणे अत्यंत आवश्यक आहे. ‘प्रत्यक्ष कृष्ण’ म्हणजे त्याचे शरीराचे अस्तित्व असाच जर अर्थ काढला तर तो अत्यंत चुकीचाच ठरेल. कारण कृष्णाचा बाह्यांगाचा प्रत्यक्ष सहवास सतत मिळणे तर रुक्मिणीलाही कठीणच होते. राज्यकारभारामध्ये नित्य गर्क असलेला आणि

अनेकांची व्यक्तिगत व्यवधाने घेऊन राहिलेला कृष्ण, तसे बघायला गेले तर रुक्मिणीच्याही वाट्याला अत्यंत कमीच येत असे. उलट पत्नी या नात्याने कृष्ण रुक्मिणीला जास्तच गृहीत धरीत असे. त्यामुळे कृष्णाच्या ठायी रुक्मिणीला भेटण्यासाठी प्राधान्य असेच, असे नाही. अशावेळी रुक्मिणीला कृष्णाची प्रत्यक्ष भेटही कमीच मिळे. पण त्याचवेळी तिच्या कृष्णावरील प्रेमाची कसोटीच लागत असे. रुक्मिणीसुद्धा जराही नाराज न होता मिळालेल्या संधीचा जास्तीत जास्त लाभ उठवीत असे. रुक्मिणी कृष्णाचे शारीरिक स्वास्थ्य सेवेने व कृष्णाचे मानसिक स्वास्थ्य प्रेमाने सांभाळून राखीत असे आणि कृष्णाला सदैव प्रसन्न ठेवीत असे. हेच त्या भक्तिभावाचे लक्षण आहे आणि त्याच भक्तिभावाने आनंदित होऊन कृष्ण रुक्मिणीवर संतुष्ट होत असे.

हे लक्ष्मी, तेव्हा ‘कृष्णाचे प्रत्यक्ष अस्तित्व म्हणजे त्याचे मनच आणि त्याच्या मनाशी आपले मन जुळणे म्हणजेच कृष्णाची प्रत्यक्ष भेट घेणे होय’ असे म्हणावे, तर ते म्हणणेही तेवढेसे सयुक्तिक नाही. कारण कृष्णाच्या मनात येणारे विचार व तेथे असणारी व्यवधाने ही सापेक्षच असणार आणि सापेक्षता ही तर ईश्वराच्या खऱ्या अस्तित्वाची अवस्था नाहीच. ईश्वरी अस्तित्वाचा अनुभव हा तर पूर्णपणे निरपेक्षच आहे. म्हणजे कृष्णाचा तो ईश्वरी अनुभव हेच त्याचे खरे अस्तित्व होते. तो अनुभव तर कृष्णाच्या हृदयातच नित्य स्फुरणारा होता आणि त्याच्या सर्व अंतःकरणालाच व्यापून राहणारा होता. कृष्णाच्या त्या अंतःकरणात पोहोचल्यावरतीच त्या कृष्णाची खऱ्या अर्थाने प्रत्यक्ष भेट होणार हेच सत्य होते आणि हे सत्य रुक्मिणी पूर्णपणे जाणून होती, हीच सर्वात मुख्य व महत्त्वाची गोष्ट होती. रुक्मिणीकडून तिच्या भक्तिभावापोटी तसाच प्रयत्न नित्य घडत असे.

हे लक्ष्मी, कृष्णाचे प्रत्यक्ष अस्तित्व हे त्याच्या अंतःकरणाच्या निरपेक्ष अवस्थेमध्येच होते हे जरी सत्य असले, तरी त्याची ती अवस्था त्याच्या तन व मन याद्वारेच प्रगट होत होती हेही खरेच आहे. फक्त ते प्रगटीकरण सापेक्ष व तेवढ्यापुरतेच असे एवढेच. पण म्हणून काही कृष्णाचे ते अस्तित्व डावलून कृष्णाच्या अंतःकरणापर्यंत पोहोचता येणे कधीच शक्य झाले नसते आणि सर्वात विशेषत्वाची गोष्ट म्हणजे रुक्मिणी हे पूर्णपणे जाणून होती. रुक्मिणीच्या भक्तिभावाचेच ते लक्षण होते. त्यामुळेच कृष्णाची प्रत्यक्ष सेवा करून त्याचे स्वास्थ्य सांभाळणे आणि त्याचबरोबर कृष्णाची अनेक व्यवधाने समजून घेऊन त्याचे मन राखणे हे रुक्मिणीकडून अगदी सहजपणे घडत होते. एवढेच नव्हे, तर कित्येक वेळा कृष्ण रुक्मिणीला स्वतःहूनच त्याची व्यवधाने मोकळेपणाने सांगत असे आणि त्यासंबंधी तिच्याशी विचारविनिमय व सल्लामसलत करीत असे. काहीवेळेस कृष्ण त्याच्या काही व्यवधानांची पूर्तीही रुक्मिणीला सांगून तिच्याकडून करून घेत असे.



रुक्मिणीसुद्धा कृष्णाची व्यवधाने यशस्वी करून दाखवीत असे. परंतु मुख्य म्हणजे रुक्मिणी त्यामध्ये कधी मनाने गुंतली वा अडकली नाही. या गोष्टींवरती तिने तिचा भाव किंवा तिच्या भावाची पूर्ती अवलंबून ठेवली नाही. रुक्मिणी कृष्णाला सहसा स्वतःहून त्याच्या व्यवधानांसंबंधी विचारीत नसे आणि त्यातूनही कधी तिच्याकडून सहजपणे विचारणे घडलेच, तर त्यावरील कृष्णाच्या उत्स्फूर्त प्रतिक्रियांचा ती मोकळेपणाने स्वीकार करी. कारण कृष्णाच्या प्रतिक्रियांचा काही नेम वा नियम नसे. कधी तो त्याची व्यवधाने रुक्मिणीला सांगत असे, तर क्वचित प्रसंगी कृष्णाकडून त्याविषयी बोलण्याचे घडतही नसे. परंतु त्यावरून कोणताही निश्चित निष्कर्ष न काढता रुक्मिणी कृष्णाच्या प्रेमभावाने युक्त होऊन नेहमी मोकळी सोकळी राहत असे आणि तिच्या भक्तिभावाने कृष्णाच्या अंतःकरणाला नित्य प्रसन्न करण्याचा ध्यास रुक्मिणीच्या ठायी सतत असे.

हे लक्ष्मी, एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेव की रुक्मिणीला पती या नात्याने कृष्णाची प्राप्ती बाह्यांगानेही झाली आणि तिला कृष्णाच्या जीवनात सहभागही मिळाला, हे तिचे परमभाग्यच होते. परंतु ही अत्यंत अपवादाने घडणारी गोष्ट होती. तसा काही नियम नाही आणि भक्तिभावासाठीही तसे घडणे आवश्यकच असते असेही नाही. त्यावरती भक्तिभाव हा अजिबात अवलंबून नाही. कारण नाहीतर मग सर्वांनाच त्या भक्तिभावाचा अनुभव घेणे शक्य होणार नाही. मुळामध्ये भक्तिभाव हा सगुण रूपातील ईश्वराचे अंतःकरण व भक्ताचे अंतःकरण यांना जोडणारा आणि त्यांना एकरूप करणारा असाच भाव आहे. त्या भावात सगुण प्रेमाची पराकोटी झालेली असते. परस्परांची अंतःकरणे जाणून ती राखणे हाच उत्कट भाव परस्परांच्या ठिकाणी अत्यंत सखोलपणे असतो. त्यासाठी परस्परांच्या बाह्य जीवनाची जोड मिळाली तर त्याचा जरूर उपयोग करून घेतला जातो, परंतु त्यावाचून अडत नाही. कारण भक्तिभावाच्या संबंधांमध्ये अंतःकरणाची जवळीकता व एकरूपता हीच मुख्य असते. तेच एकमेव साध्य असते आणि भक्त त्याच्या भक्तिभावाने ते साधीत असतो. परंतु हेही खरे आहे की ती एकरूपता प्रत्यक्ष बाह्य जीवनातही प्रगट होतच असते. एकमेकांच्या सहवासाची आतुरता व भेटीची ओढ नेहमीच असते आणि बाह्यांगाने तसे प्रयत्नही जरूर घडतातच. प्रतिकूल परिस्थितीत अडकून न राहता प्रयत्नपूर्वक अनुकूलता निर्माण केली जाते आणि अडचणींतूनही सुटण्याचा मार्ग काढला जातोच जातो. तरीही भेट घडू शकली नाही तर मनाच्या ठिकाणी आर्तता ही कायम असते. परंतु जेव्हा केव्हा भेट घडते तेव्हा मात्र ती भेट अंतःकरणापासून अंतःकरणापर्यंतची असते आणि म्हणूनच ती भेट पूर्ण मीलनाचा आनंददायी अनुभव ठरते.”

नारदाचे बोलणे लक्षपूर्वक श्रवण करणारी लक्ष्मी न राहवून मध्येच म्हणाली,

"अरे नारदा, परंतु प्रत्यक्ष नात्यामुळे काहीतरी फरक पडत असणारच ना? एक तर सहवासाची संधी मिळण्याची शक्यता अधिक वाढणार आणि दुसरे म्हणजे नात्यामुळे एकमेकांमध्ये व्यवधानेही अधिक निर्माण होणार, तेव्हा नात्याचा काहीतरी फायदा निश्चितच मिळणार. नाही का?"

लक्ष्मीच्या बोलण्यावर नारदाने क्षणभर विचार केला आणि लक्ष्मीला उद्देशून तो बोलू लागला.

"हे लक्ष्मी, तुझे म्हणणे खरे आहे, पण पूर्णपणे खरे नाही. कारण परिस्थितीची अनुकूलता काही प्रमाणात उपयोगाला येत असली, तरी मुळात मनाच्या ठिकाणी भक्तिभाव असेल तरच त्या अनुकूल परिस्थितीचा उपयोग होणार ना? जसे भूमीमध्ये बीज पेरलेले असेल तरच अनुकूल हवामान व पावसाचे पडणारे पाणी उपयोगाला येईल आणि त्या बीजामधून फलफुलधारी असा केवढातरी प्रचंड वृक्षही निर्माण होऊ शकेल. अगदी तसेच येथेही आहे. एखादा पूर्वपुण्याईने महापुरूषांच्या कुटुंबात किंवा कुळात जन्माला आला तर त्याला त्या महापुरूषांचा सहवास सहजतेने लाभेलही, एवढेच काय, प्रेमळ व दयाळू अंतःकरणाच्या त्या महात्म्यांकडून त्या भाग्यवंताचे व्यवधानही घेतले जाईल. ते महात्मे त्यांच्या सहज स्वभावानुसार त्याला रक्षण व आधार देतील, त्याला जीवनात मार्गदर्शन व प्रत्यक्ष मदतही देतील. अगदी त्याला ईश्वराचे माहात्म्य सांगून ईश्वरावर श्रद्धा ठेवण्यासही ते महात्मे सांगतील. परंतु त्या महात्म्यांचे माहात्म्य जर ती व्यक्ती जाणत नसेल, तर त्याच्या ठिकाणी मात्र त्या महात्म्यांविषयी कधीच भक्तिभाव निर्माण होणार नाही. त्या व्यक्तिसाठी ते महात्मे केवळ आदरणीय किंवा फारतर वंदनीय राहतील, पण भजनीय मात्र केव्हाच होणार नाहीत. कारण त्यासाठी त्या महात्म्यांच्या ईश्वरी अनुभवाची जाणीव निर्माण होऊन त्यांच्यावरतीच नितांत श्रद्धा व प्रेम निर्माण होणे अत्यावश्यक आहे. त्यांची थोरवी यथार्थपणे जाणून त्यांना पूर्ण शरणागती देणे घडावयास हवे आणि त्यांच्याच मार्गदर्शनानुसार स्वतःचे जीवन जगण्याचा व घडवण्याचा दृढ निश्चय हवा. त्यातूनच त्या महात्म्यांविषयीचा कृतज्ञता भाव व सर्व समर्पणाचा भक्तिभाव निर्माण होईल आणि भाग्याने मिळालेली बाह्यांगाची अनुकूलता खऱ्या अर्थाने फळाला येईल.

हे लक्ष्मी, पण एखादे वेळेस अती परिचयाने व सहवासाने महात्म्यांचा अनादर किंवा अवमूल्यन होण्याचीही शक्यता असते. त्यांच्याकडून भाग्याने व विनासायास मिळत असलेला लाभ हा आपला हक्कच आहे, असा चुकीचा समजही होऊ शकतो. एवढेच नव्हे, तर तो लाभ जर तसा मिळाला नाही तर त्या महात्म्यांविषयी नाराजी अथवा क्वचितप्रसंगी रागही निर्माण होऊ शकतो. काही

वेळेला तर त्यांच्या उपकाराचे विस्मरण होऊन कृतघ्नताच निर्माण झाल्याच्या घटनाही इतिहासात अनेकदा घडलेल्या आहेत. अर्थात ते महात्मे मात्र सर्वच प्रसंगात त्यांच्या सहज स्थितप्रज्ञ वृत्तीने, शांत व स्थिर राहून त्यांच्या स्वधर्माने युक्तच राहतात आणि त्यांच्या स्वभावानुसार सर्वांच्याच कल्याणासाठी तत्पर असतात. त्यांच्या ठायीचे दया, क्षमा व शांती हे गुण सर्वांसाठी नेहमीच प्रगट होत असतात.”

***

नारदाच्या बोलण्याने लक्ष्मीच्या मनाला समाधान झाले खरे, पण ते पूर्णपणे झाले नाही हेही खरेच होते. तिची ती अवस्था तिच्या शब्दांतून व तिच्या सुरातूनही व्यक्त होऊ लागली,


“हे नारदा, तुझे म्हणणे बरोबरच आहे. एखाद्या विषयाचा सर्व बाजूंनी विचार घडून मग त्यावरती सम्यक बोलणे हेच तर तुझे वैशिष्ट्य आहे आणि ते मला नेहमीच जाणवत असते. पण श्रवण करताना एक गोष्ट मला निश्चितपणे जाणवत आहे की जरी तुझे हे सर्व बोलणे सकृतदर्शनी निरपेक्ष दिसत असले, तरी त्यामागे कुठेतरी तुझ्या मनात काहीतरी सापेक्ष घटना प्रसंगही असलेच पाहिजेत. तसे ते अगदी सहजपणे असणारच. कारण निरपेक्ष बोलणे जेव्हा सापेक्षतेने प्रगट होते तेव्हाच त्या निरपेक्ष बोलण्यातील सत्यत्व साकार होते आणि ते अंतःकरणात पूर्णपणे व कायमचे ठसून राहते. ‘स्वयंसिद्ध असलेले सत्यही जेव्हा सोदाहरण प्रगट होते तेव्हाच ते सिद्ध होते’ असे मी तुझ्या बोलण्यातून नेहमीच अनुभवत आलेले आहे आणि माझ्यासारख्या मर्यादित बुद्धी असलेल्यांसाठी तसे होणे हे अत्यंत आवश्यकच असते.

तेव्हा नारदा, तू तुझ्या मनातील या सर्व गोष्टी अगदी मोकळेपणाने व स्पष्टपणे मला सांग बघू. त्या कृष्णाच्या प्रेमळ स्वभावाचा लाभ त्यांच्या कुटुंबातील व कुळातील अनेकजणांना निश्चितच झाला असणार. कृष्णाकडून रक्षण, आधार व मार्गदर्शनही त्यांना आगदी सहजपणे मिळाले असणारच. मग कृष्णाच्या नातलगांपैकी कोणाला कृष्णाचे वेगळेपण लक्षात आले का? त्यांच्यापैकी कोणीतरी कृष्णाचे माहात्म्य जाणून त्याच्यावर विशेषत्वाने प्रेम केले का? कोणाच्या ठिकाणी तरी कृष्णाविषयीचा भक्तिभाव निर्माण झाला का? एखाद्याने तरी कृष्णाच्या भक्तीचा आनंद अनुभवून त्या कृष्णाला आनंदित केले का रे?”

लक्ष्मीच्या प्रश्न विचारण्यातून उत्सुकतेपेक्षा आर्तताच जास्त प्रगट होत होती आणि नारदाला ती लगेचच जाणवली. लक्ष्मीच्या त्या भावाचे नारदाला कौतुक तर वाटलेच पण त्याला समाधानही झाले. कारण लक्ष्मीच्या ठिकाणी निर्माण झालेल्या ईश्वराच्या सगुण प्रेमाचे ते लक्षण होते. ज्याच्याठायी या ईश्वरी सगुण प्रेमाची गोडी निर्माण झाली, त्याला ते प्रेम सर्वांनाच अनुभवावयास मिळावे असे अगदी मनापासून वाटत असते. त्यामुळे असे सगुण प्रेम कोणाला मिळाले आणि त्याला त्या प्रेमाचे माहात्म्यही कळाले असे कानावर जरी आले, तरी त्या ऐकणाऱ्यालाच त्याचा अत्यानंद होतो, एवढी त्या ईश्वराच्या सगुण प्रेमाची थोरवी आहे. ही थोरवी नारद स्वानुभवाने जाणून असल्यामुळे त्याला झालेला आनंदही विशेषच होता. त्यामुळे साहजिकच कृष्णकथा सांगण्याचा नारदाच्या ठिकाणचा उत्साहही शतगुणित झाला आणि त्याच्याकडून अत्यंत मधुर व मंगल अशा कृष्णचरित्राचे गायन घडू लागले,

“हे लक्ष्मी, तुझ्या मनातली ही आर्तता मी स्वानुभवाने समजू शकतो. सगुण रूपाने प्रगट असलेले व उपलब्ध झालेले ईश्वरी प्रेम सर्वांनाच अनुभवण्यास मिळावे असे आपल्याला वाटणे अगदी साहजिकच आहे. कारण त्या प्रेमाचे माहात्म्य व त्या प्रेमाची सर्वांनाच असणारी नितांत आवश्यकता, या दोन्ही गोष्टींची आपल्याला निश्चित जाणीव आहे. परंतु सर्वसामान्यांना मात्र या दोन्ही गोष्टींची जाणीव असतेच असे नाही. बहुधा नसतेच आणि असलीच तर ती अत्यंत मर्यादित असते. त्यामुळे ज्याच्या त्याच्या भावानुसार या ईश्वरी प्रेमाचा, ज्याला त्याला तसा तसा लाभ निश्चितच होतो. परंतु त्या प्रेमाच्या अनुभवातून सगुण रूपधारी ईश्वराविषयी प्रेम निर्माण होणे घडत नाही. मग प्रेमातून संभवणारा भक्तिभाव तर त्याठिकाणी अशक्यच असतो. परंतु या भाग्यवान व्यक्तींच्या निमित्ताने व रूपाने महात्म्यांच्या अंतःकरणातील प्रेमस्वरूप अवस्था मात्र प्रगट होते आणि त्या महात्म्यांना स्वतःठायीच्या ईश्वरी प्रेमाचा बाह्यांगाने अनुभव घेण्यासाठी, त्या व्यक्ती कारणीभूत व साहाय्यकारी ठरतात.

हे लक्ष्मी, कृष्णचरित्रातही त्याच्या जवळच्या नातलगांना कृष्णाच्या प्रेमस्वरूप अंतःकरणाचा लाभ मिळालाच. अंतरातील प्रेमस्वरूप अवस्थेला कृष्णाच्या मनमोकळया स्वभावाची जोड मिळाली. त्यामुळे कृष्णाला त्याच्या परिवारातील अनेकांशी जवळीकता साधता आली. कोणालाही काही अडचणी आल्यास त्या मोकळेपणाने आधी कृष्णालाच विचाराव्यात अशी अनेकांची भावना असे. संकटकाळीही त्यांना कृष्णाचीच खात्री वाटत असल्यामुळे सर्वजण प्रथम कृष्णालाच हाक मारीत. कृष्णही स्वतः पुढाकार घेऊन त्यांना सर्व अडचणी व संकटे यातून मोकळे करीत असे आणि त्यांना वेळोवेळी मार्गदर्शनही आपणहूनच करीत असे. कृष्ण अनेकांचे लाड व कोडकौतुकही करीत असे आणि त्यातून त्यांना त्याच्या प्रेमसुखाचा लाभही करून देत असे. त्यामुळे कित्येकांच्या ठिकाणी कृष्णाविषयी



आपुलकी निर्माण झाली आणि त्यांच्यात व कृष्णामध्ये एक मित्रत्वाचे नाते तयार झाले. त्या मैत्रीच्या नात्यातील प्रेमामुळे काहीजणांच्या मनात व जीवनात कृष्णाने विशेष स्थान घेतले होते.

हे लक्ष्मी, कृष्णाचे अशा तऱ्हेचे विशेष प्रेमाचे संबंध त्याची आत्या, म्हणजे वसुदेवाची भगिनी असलेली जी कुंती, तिच्याशी व तिच्या पुत्रांशी निर्माण झालेले होते. कुंतीचा विवाह हा कुरू कुळातील पंडूशी झालेला होता आणि पंडूचा जन्म हा महर्षी व्यासांपासून झालेला होता. कुंतीला युधिष्ठिर म्हणजेच धर्मराज, भीम व अर्जुन असे पुत्र होते. पंडूची व्दितीय पत्नी माद्री हिला नकुल व सहदेव असे पुत्र होते. पंडूचे हे पाचही पुत्र ‘पांडव’ म्हणून संबोधले जात. ते पाचही जण सत्त्वशील वृत्तीचे व सात्त्विक संस्कारांचे होते. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांच्यामध्ये अभेद्य युती होती. वडील बंधू धर्मराज हा त्याच्या धर्माचरणाने सर्व लोकातच आदरणीय झालेला होता. त्याचे इतर चार बंधूही त्याचा योग्य मान ठेवीत आणि त्याचाच शब्द प्रमाण व अंतिम मानून त्यालाच नित्य अनुसरत असत. या पंडूचा ज्येष्ठ बंधू, ज्याचे नाव धृतराष्ट्र होते हाही व्यासांपासूनच जन्माला आलेला होता. परंतु दैववशात तो जन्मांध होता. या धृतराष्ट्राचे पुत्र ‘कौरव’ म्हणून ओळखले जात. या कुरू कुळाचे राज्य हस्तिनापूरला होते आणि तेथेच त्या सर्वांचे वास्तव्य होते.


हे लक्ष्मी, धृतराष्ट्र व पंडू यांचा नात्याने असलेला पिता विचित्रवीर्य याच्या अकाली मृत्यूनंतर, त्याचे ज्येष्ठ बंधू भीष्म यांनी प्रत्यक्ष राज्यासन न स्वीकारता सर्व राज्यकारभार समर्थपणे सांभाळला. भीष्म हे नारायणाचा जो सहावा अवतार त्या साक्षात् परशुरामाचे शिष्य होते. भीष्म हे आत्मज्ञानी होते आणि आजन्म ब्रम्हचर्यव्रताचे पालन करण्याची प्रतिज्ञा त्यांनी केली होती. केवळ हस्तिनापूरच्या राज्याचीच अखंड सेवा करण्याचे व्रत भीष्मांनी स्वेच्छेने व स्वखुशीने अंगीकारले होते. म्हणूनच जेव्हा धृतराष्ट्र व पंडू हे योग्य वयात आले, तेव्हा त्यांच्या हवाली सर्व राज्यकारभार करून स्वतः केवळ राज्याचे सेवक म्हणून राहण्याचे भीष्मांनी ठरवले. परंतु ‘मी अंध असल्यामुळे राजा म्हणून राज्यकारभार करणे मला शक्य नाही आणि ते योग्यही नाही’ अशी रास्त भूमिका धृतराष्ट्राने घेतली. त्यामुळे भीष्मांनी सर्व संमतीने पंडूला राजा म्हणून सिंहासनावर बसवले. पंडूही भीष्मांच्या मार्गदर्शनानुसार आणि धृतराष्ट्राचा योग्य तो मान ठेवून सर्व राज्यकारभार करीत असे.

हे लक्ष्मी, पुढे काही कारणांमुळे पंडूने राज्याचा त्याग केला आणि तो कुंती व माद्री या त्याच्या पत्नींसह वनवासात जाऊन राहिला. खरे तर, कुंती व माद्री यांना अपत्य प्राप्तीही वनवासात असतानाच झाली. पंडू हा अपत्यप्राप्ती करून देण्यासाठी

असमर्थ आहे हे लक्षात आल्यावर, पंडूच्याच अनुमतीनुसार कुंतीने तिला मिळालेल्या वरानुसार मंत्राच्याद्वारे देवतांना प्रसन्न करून घेतले आणि त्यांच्यापासून धर्म, भीम व अर्जुन या तीन पुत्रांची प्राप्ती करून घेतली. एवढेच नव्हे, तर कुंतीने माद्रीच्या ठिकाणी असलेली पुत्रप्राप्तीची स्त्रीसुलभ भावना व इच्छा जाणून, तिलाही मंत्राचा उपयोग करून देवतांच्याद्वारे नकुल व सहदेव या पुत्रांची प्राप्ती करून दिली. पुढे काही कारणाने वनवासात असतानाच पंडूचा मृत्यू ओढवला. त्यावेळच्या प्रचलित प्रथेनुसार माद्रीने तिचे दोन्ही पुत्र अत्यंत विश्वासाने कुंतीच्या स्वाधीन केले आणि पंडूच्या पार्थिवाच्या दहनाबरोबरच स्वतःच्याही देहाचा त्याग केला. कुंतीने स्वतःच्या व माद्रीच्या मिळून पाचही पुत्रांसह हस्तिनापूरला परत येण्याचे केले. कुंतीने घडलेला सर्व इतिहास घटनाक्रमानुसार भीष्मांना विदित केला. पंडूच्या मृत्यूची बातमी ऐकून भीष्मांना अतिशय दुःख झाले. त्यांनी कुंतीसह पाचही पांडवांना हस्तिनापूरातच ठेवून घेतले.

पंडू वनवासात गेल्यावर भीष्मांनी नाइलाजाने मग धृतराष्ट्रालाच राजा म्हणून सिंहासनावर बसवले होते आणि प्रत्यक्ष राज्यकारभाराची सर्व सूत्रे स्वतःच्या हाती घेतली होती. धृतराष्ट्राच्या पुत्रांमध्ये दुर्योधन हा ज्येष्ठ होता. त्यामुळे तो वयात आल्यावरती त्यालाच ज्येष्ठ युवराजपद मिळणार आणि धृतराष्ट्राच्या नंतर त्यालाच राज्य मिळणार हे गृहीतच होते. परंतु पांडवांचे आगमन झाल्यावर सर्वच चित्र पालटल्यासारखे दिसू लागले. ज्येष्ठताक्रमानुसार पंडूपुत्र धर्मराजालाच युवराजपद मिळणार हे नक्की झाले. मुळातच दुष्प्रवृत्तीचा असणाऱ्या दुर्योधनाच्या ठिकाणी पांडवांविषयीच्या द्वेषाचे व मत्सराचे बीज त्याचवेळी पेरले गेले. पुढे इतर बंधूंच्या संगतीमुळे व काही विघ्नसंतोषी लोकांच्या दुष्ट व स्वार्थी स्वभावामुळे त्या बीजाला जाणूनबुजून खतपाणी घातले गेले. त्याचीच परिणती म्हणजे दुर्योधनाच्या ठिकाणचा तो विषवृक्ष झपाट्याने वाढून केवढातरी मोठा झाला. 'हे पांडव म्हणजे आपल्या यशाच्या वाटेवरील काटेच आहेत' याच कल्पनेने दुर्योधन पछाडला गेला आणि त्या काट्यांचा वेळीच नायनाट करणे अत्यावश्यक आहे असा दुर्योधनाचा निश्चयच झाला. एकमेव तोच ध्यास दुर्योधनाठायी असे आणि त्यासाठी त्याने जोरदार प्रयत्नही सुरू केले."

नारदाचे बोलणे सुरू असतानाच लक्ष्मीने आपले दोन्ही हात जोडले आणि नारदाला क्षणभर थांबण्याची खूण केली. नारदाला थोडासा विस्मय वाटला खरा, परंतु आपले बोलणे थांबवून तो लक्ष्मीकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहत राहिला. लक्ष्मीने मग स्वतःला सावरले आणि किंचित हसून ती नारदाशी बोलू लागली,



“अरे नारदा, तू तर अनेक गोष्टी एकाच वेळी आणि त्याही इतक्या वेगाने सांगत आहेस की मला तर काही कळेनासेच झाले आहे. त्यातूनही कौरव व पांडव यांच्या नातेसंबंधांविषयी तू जे काही सांगितलेस ते ऐकून तर माझ्या मनाचा अगदी गोंधळच उडून गेलेला आहे. कोणाचे नाते कोणाशी निश्चित काय व कसे हे तर माझ्या काहीच लक्षात आलेले नाही. भीष्म, धृतराष्ट्र, पंडू व कुंती यांचे परस्परांशी असलेले नाते काय, पांडवांचा जन्म काय, त्यांचा पिता पंडू, पण जन्म कोणा देवतांपासून झालेला, म्हणजे काय? खरेच या सर्व गोष्टी माझ्या बुद्धीच्या आकलनशक्तीबाहेरच्या आहेत. या सर्वांची सांगड समजून घेणे आणि ते सर्व लक्षात ठेवणे याचा तर माझ्या मनाला ताणच जाणवत आहे. तेव्हा कृपा करून ते सर्व मला पुन्हा एकदा नीट समजावून सांग पाहू.”

लक्ष्मीचे बोलणे ऐकून व तिची गोंधळलेली मुद्रा पाहून नारदाला लक्ष्मीची गंमतच वाटली आणि तो कितीतरी वेळ अगदी मोकळेपणाने हसतच राहिला. नारदाचे हसणे बघून लक्ष्मी अधिकच गोंधळात पडली. तिला नारदाच्या हसण्याचे काहीच कारण कळेना. ‘माझ्या प्रश्न विचारण्यात काही चूक घडली का?’ असा प्रश्नार्थक भाव लक्ष्मीच्या मुखावर उमटला. लक्ष्मीची ती अवस्था पाहून नारदाने आपले हसू आवरून धरले आणि लक्ष्मीला उद्देशून तो म्हणाला,

“अगं लक्ष्मी, तुझ्या मनाचा उडालेला गोंधळ बघून जरी मला हसणे अनावर झाले असले तरी त्यामध्ये तुझी काहीच चूक नाही. खरोखरीच ते कौरव व पांडव व त्यांची इतर नातेमंडळी म्हणजे एक गोंधळच होता यात जराही शंका नाही. त्यांच्यातील साटेलोटे एवढे विचित्र होते, की त्यांची योग्य समज होणे भल्या भल्या बुद्धिवंतांनाही कठीणच आहे. अगदी मीसुद्धा ते सर्व तुला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला तरी मलाही ते नीटपणे सांगता येणे कठीणच आहे आणि तुलाही ते पूर्णपणे आकलन होणे अशक्यच आहे. पुढे तर कौरवांचा पांडवांविषयीचा व्देषमत्सर एवढ्या पराकोटीला गेला की त्यांनी पांडवांचा अतोनात छळ करून त्यांना वनवासात जाण्यास भाग पाडले. त्यातूनच कौरव व पांडव यांच्यात केवढे तरी मोठे धर्मयुद्धच झाले. अर्थात् कृष्णामुळे त्यात शेवटी पांडवांचाच विजय झाला हे जरी खरे असले, तरी तो इतिहास अत्यंत दीर्घ काळाचा व गुंतागुंतीचा आहे. खरे तर, ते एक मोठे महाभारतच घडले.

हे लक्ष्मी तुला एक गंमत सांगतो की माझा सत्शिष्य असलेल्या व्यासाने तो इतिहास लिहूनही ठेवला आहे. परंतु तो ‘जय’ नावाचा इतिहास लिहूनही व्यासाच्या मनाला जराही समाधान लाभले नाही, उलट त्या इतिहासातील अनेक प्रसंगांचे वर्णन करताना व त्यांची योग्य ती तर्कसंगती लावताना व्यासाच्या मनालाही


शीणच झाला. अनेक नातेसंबंधातील कर्तव्यकर्मे व धर्म-अधर्म यांचा निवाडा करताना व्यासाच्याही बुद्धीला एक प्रकारचा थकवाच आला. एवढे करूनही व्यासाला त्यातील अपूर्णताच लक्षात आली. त्यामुळे प्रचंड लिखाण करूनही व्यासाच्या मनाला शांती समाधान मिळाले नाही ते नाहीच. मनाच्या अशा विषण्ण व उदास अवस्थेत व्यास असतानाच माझे त्याच्याकडे जाणे घडले. त्यावेळेस व्यासाने त्याची सर्व मनःस्थिती माझ्याकडे मोकळी केली आणि ‘त्यावरील उपाय काय?’ असा प्रश्न अत्यंत नम्रतेने मला विचारला.

हे लक्ष्मी, माझा प्रिय शिष्य व्यास याची ती भ्रांत स्थिती पाहून मला त्याची अत्यंत दयाच आली आणि त्याचे सांत्वन करण्याच्या हेतूने मी त्याला हितोपदेशाच्या गोष्टी सांगितल्या. मी व्यासाला म्हणालो,

“अरे व्यासा, तुझी मनःस्थिती माझ्या पूर्णपणे लक्षात आलेली आहे. या जगात व्यावहारिक नातेसंबंधांमध्ये प्रत्यक्ष कोणालाही कधीही समाधान मिळालेले नाही, तर त्याच्या वर्णनाने ते कसे काय लाभू शकेल? ते शक्यच नाही. कारण त्याठिकाणी एकतर व्यक्तिगत प्रेमाचा अभाव असल्यामुळे केवळ कोरडी कर्तव्यकर्मे असतात किंवा स्वार्थापोटी निर्माण झालेला व्देषमत्सर व वेळप्रसंगी वैरभावच असतो. काही नात्यांमध्ये भावनात्मक प्रेम असतेही, पण ते प्रेम मनाला दुर्बल करीत असल्यामुळे ती नाती अधिकच गुंतागुंतीची होऊन त्याचा मानसिक त्रास उभयपक्षी होत राहतो. तेव्हा अशा प्रापंचिक नीरस गोष्टी कितीही चघळून सेवन केल्या तरी त्यातून रसनिष्पत्ती होणे कधीही शक्य नाहीच, पण फक्त चघळण्याचे कष्ट तेवढे शिल्लक राहतील.

हे व्यासा, तू आणखीन एक महत्त्वाची गोष्ट नीटपणे व कायमची लक्षात ठेव, की आत्मधर्माच्या अधिष्ठानावर घडणारे स्वधर्माचरण हेच योग्य व यथार्थ असते. कारण त्याठिकाणी कोणतेही हितसंबंध गुंतलेले नसल्यामुळे निःस्वार्थीपणा असतो. अंतःकरणाच्या विशुद्ध अवस्थेमुळे मन निर्मोही असते व बुद्धी विवेकी असते. एवढेच नव्हे तर आत्मदृष्टीमुळे सर्वांविषयी दया व आपलेपणा असतो. पण अशी आत्मधर्माची जागृती जेथे नाही त्या ठिकाणी कर्तव्यकर्माचा घोळच होतो आणि मनाची केवळ तळमळ होत राहते. मनाला शांती व समाधान केव्हाच लाभू शकत नाही. ज्याठिकाणी केवळ शब्दज्ञान आहे पण भावना नाही, त्याठिकाणी कर्तव्य कठोरताही निर्माण होऊ शकते आणि त्याचे क्लेश सर्वच संबंधितांना होऊन राहतात.

हे व्यासा, पण तुझ्या एक गोष्ट लक्षात आली आहे का? नसल्यास मी तुला त्याची आठवण करून देतो, की तू लिहिलेल्या महाभारतात ज्या ज्या वेळेस



कृष्णचरित्राचा उल्लेख व संबंध आलेला आहे, त्या त्या वेळेस मात्र तुझ्या मनावरील सर्व ताण थोडावेळ का होईना, पण नाहीसे झालेले आहेत आणि तुझ्या मनाने एका वेगळयाच स्तरावरची शांती व समाधान यांची अनुभूती घेतलेली आहे. ती किमया कृष्णाच्या सगुण अवतारचरित्रामुळेच घडलेली आहे. कारण कृष्णाच्या रूपाने ईश्वराचे दया, प्रेम व आनंद हे दैवी गुणच साकार झालेले होते. त्यांचा लाभ ज्या त्याच्या प्रेमीजनांना मिळाला ते खरेच भाग्यवान ठरले. त्यामध्ये पांडव हे अग्रेसर होते आणि कृष्णाच्या ते अगदी जवळ होते. म्हणूनच जेव्हा जेव्हा कृष्ण व पांडव यांच्या परस्पर प्रेमाच्या व मैत्रीच्या संबंधातील प्रसंगांचे वर्णन तुझ्याकडून त्या महाभारतात घडले, त्यावेळेस तुझेही अंतःकरण अत्यंत भावपूर्ण झालेले होते आणि विशेष आनंदाचा अनुभव घेत होते हे निश्चित! त्याच तुझ्या भावपूर्ण अवस्थेचे नित्य स्मरण ठेव, म्हणजे तुझ्या मनाला शीण होणार नाही आणि कधीच विषण्णता येणार नाही.

अरे व्यासा, त्या नारायणाने कृष्णावतारासारखे अनेक अवतार घेऊन त्याचे सगुण चरित्र प्रगट केलेले आहे. त्या अवतारातील कार्याचा लाभही अनेकांना मिळालेला आहे आणि त्यातूनच ज्यांच्या ठिकाणी त्या सगुण अवतारांविषयी प्रेम निर्माण झाले असे अनेक भक्तही निर्माण झालेले आहेत. सगुण प्रेमभक्तिने त्या भक्तांचे सर्व जीवनच आनंददायी झाले, कारण त्यांच्या जीवनात प्रेमरस नित्य भरभरून वाहत राहिला. हे भक्त व त्यांचा तो सगुण भगवंत यांची मने एकमेकांशी प्रेमाने समरस झाली आणि त्यांची अंतःकरणे एकरूप झाली. अशा भगवंताची व त्याच्या भक्तांची जीवने व चरित्रे यांचे केवळ स्मरणही मनाला नित्य उल्हसित करून उत्साहितही करते. त्यांचीच वर्णने ही मनाला आनंदित करतात आणि सगुण प्रेमभक्तीचा आनंददायी मार्गही दाखवतात. एवढेच नव्हे, तर त्या सत्य व शाश्वत मार्गाने जाण्यासाठी मनाला प्रेरणा देऊन उद्युक्त करतात. तेव्हा व्यासा, तू अशाच भगवद्भक्तांच्या जीवन चरित्रांचे वर्णन करून गायन कर, म्हणजेच तुझे मनही ईश्वराच्या सगुणप्रेमाने भरून मोकळे होत राहील आणि तुला नित्य व अविनाशी परमानंदाचा अनुभव येत राहील.”


हे लक्ष्मी, माझ्या बोलण्याने व्यासाचे मन मोकळे होऊन त्याला एकदम हलके वाटू लागले. एवढेच नव्हे, तर आनंदाचा नित्य अनुभव देणारा असा अखंड भक्तिगायनाचा मार्गही त्याला त्याच्याच ठिकाणी गवसला आणि त्या मार्गाचे अवलंबन केल्यानंतर त्याचीच परिणती म्हणजे व्यासाकडून ‘भागवत’ नावाचा एक अद्‌भूत ग्रंथच प्रगट झाला. त्या ग्रंथामध्ये भगवंत व त्याचे भक्त यांच्या प्रेमसंबंधातून घडलेले अनेक प्रसंग व्यासाने कथेच्या रूपात गुंफले. त्यातून निर्माण झालेली सुंदर व भक्तिगंधाने युक्त अशी सुमनमाळ व्यासाने त्याच्या हृदयस्थ नारायणाला अर्पण

केली, तेव्हा तो नारायण सर्वार्थाने प्रसन्न झाला आणि व्यासालाही खऱ्या अर्थाने शांती समाधान लाभले.

हे लक्ष्मी, मी व्यासाला केलेले मार्गदर्शन हे माझ्या स्वानुभवातूनच घडलेले होते. माझ्या अंतःकरणातही सगुण भक्तिचेच गायन नित्य घडत असते. कारण त्या ठिकाणी नारायणाचे प्रेमस्वरूप सतत व सहज स्फुरत असते. म्हणूनच आत्ताही माझ्याकडून कृष्णचरित्र साकार होताना कृष्ण व त्याच्याशी प्रेमसंबंधाने निगडीत असलेल्या व्यक्ती, यांच्यामधील घडलेले प्रसंग यांचेच वर्णन घडणार. मग त्या व्यक्तींमधून कोणकोण कृष्णाचे भक्त होऊन राहिले हा भाग त्या त्या वेळी येईलच. मुळात कृष्णाचे सर्वांवर जरी सारखे प्रेम असले, तरी सर्वांनाच त्याचा सारखा लाभ झाला नाही हे खरेच आहे. पण ज्यांना जसा व जेवढा लाभ मिळाला ते निश्चितच भाग्यवान ठरले. पण त्याचबरोबर त्यांच्या जीवनाद्वारे त्यांच्या मनात शिरण्याची संधी कृष्णाला मिळाली. त्यांच्या मनात कृष्णप्रेमाचा प्रवेश झाला आणि त्याठिकाणी कृष्णप्रेमाने प्रथम स्थान घेतले. त्या प्रेमाने सुखावता सुखावता ते मन कृष्णप्रेमाला लाचावले आणि कृष्णप्रेम अनुभवण्यासाठी नित्य आर्त होऊन राहिले. त्यासाठी त्यांना मग कृष्णाचा सहवास आणि कृष्णाची प्रत्यक्ष जीवनातील साथ आवश्यक वाटू लागली. प्रत्यक्ष कृष्णाशिवाय सर्व जीवन व्यर्थच आहे आणि कृष्णामुळेच जीवनाला खरा अर्थ आहे असा त्यांचा दृढ निश्चय स्वानुभवाने झाला. त्यांची मने कृष्णावर पूर्णपणे जडली आणि जुळलीही. मग त्यांच्याशीच कृष्णाचे सूत जुळले आणि त्या प्रेमसूत्राने ते व कृष्ण एकमेकांशी बांधले गेले. ही प्रेमाची बांधीलकी उभयपक्षी होती आणि ती उभयतांनाही सारखीच प्रिय होती.

हे लक्ष्मी, या दृष्टीने कृष्णाची पांडवांशी विशेष जवळीकता होती आणि माझ्या दृष्टीने हीच गोष्ट विस्तार करण्यास योग्य आहे. बाकी त्यांच्या जन्माचे कारण व त्यामागील रहस्य, त्यांचे कौरवांशी असलेले नाते व संबंध, त्यामागील इतिहास वा घटनाक्रम इत्यादी गोष्टी नगण्यच आहेत. केवळ संदर्भ म्हणूनच त्यांचा उल्लेख माझ्याकडून झाला. पण जर आपण त्यांच्या तपशिलात जास्त शिरलो, तर आपल्या मनाचा तोच गोंधळ होईल जो व्यासाच्याही मनाचा झाला होता आणि आपल्याही मनाला वृथा कष्ट व ताणच होईल. तेव्हा घडलेल्या 'महाभारताचा' भाग आपण गाळून घेऊ आणि त्यातून उरलेला फक्त प्रेमरसच आपण सेवन करू. तो प्रेमरस अत्यंत स्वादिष्ट व पौष्टिक आहे. त्यानेच आपली सगुणप्रेमाची भूक वाढेल आणि आपण भक्तिभावाने चांगले धष्टपुष्ट होऊन आपले भावबळही वाढेल."

नारदाच्या बोलण्यातील मुख्य मुद्दा लक्ष्मीच्या लक्षात आला आणि तिच्या मनातील गोंधळाचा पूर्ण निरास झाला. लक्ष्मीच्या मनावर आलेला सुप्त ताणही हलकेच सुटला आणि तिच्या मनाला एकदम मोकळे मोकळेसे वाटू लागले.



कृष्णचरित्रातील कृष्णप्रेमाच्या कथा श्रवण करण्यासाठी लक्ष्मी आता पूर्णपणे सज्ज झालेली आहे, हे तिच्या मुखावरील भाव पाहून नारदाने लगेचच ओळखले आणि जराही वेळ न दवडता नारदाने कृष्णचरित्राचे गायन करण्यास सुरूवात केली,

“हे लक्ष्मी, पांडवांची सत्प्रवृत्ती व कौरवांची दुष्प्रवृत्ती कृष्ण प्रथम पासूनच पूर्णपणे जाणून होता. त्यामुळेच सज्जनांचा कैवारी असलेल्या कृष्णाचा कल व ओढा साहजिकच पांडवांकडेच होता आणि तो पांडवांशी स्वतःहूनच जवळीक साधून होता. कारणा कारणाने जाणे येणे घडता घडता, कृष्णाचे पांडवांशी असलेले संबंध अधिकाधिक वाढून निकट होऊ लागले आणि मग हळूहळू त्यांच्या संबंधातील औपचारिकता गळून पडून ते संबंध केवळ निखालस प्रेमाचेच होऊन राहिले. पांडवांच्या अडचणींच्या वा संकटांच्या प्रसंगी कृष्णाला मुद्दामहून सांगावे लागतच नसे. तो आपणहूनच धावून जात असे आणि आपल्या बुद्धी कौशल्याने व वेळप्रसंगी प्रत्यक्ष मदत करूनही पांडवांना संकटमुक्त करीत असे. अशा तऱ्हेने कृष्णाचा पांडवांशी घरोबा एवढा वाढला की त्यांचे अत्यंत घनिष्ठ असे प्रेमाचे संबंध निर्माण झाले. कृष्ण हा पांडवांसाठी एक अत्यंत प्रेमाची व्यक्ती, मार्गदर्शक व त्यांच्या जीवनाचा एक अविभाज्य घटक होऊन राहिला.

हे लक्ष्मी, सर्व पांडवांतही कृष्णाचे अर्जुनाशी अत्यंत मैत्रीचे संबंध जुळले. एक तर ते दोघे समवयस्क होते आणि दुसरे म्हणजे ते परस्परांचे अत्यंत चाहते होते. कृष्णाला अर्जुनाच्या पराक्रमाचे अत्यंत कौतुक होते, तर अर्जुनाला कृष्णाचे सर्व व्यक्तिमत्त्वच अत्यंत प्रिय होते. धर्मराज हा वयाने मोठा असल्यामुळे, त्याच्यावरील आदरापोटी त्याच्याशी जवळीकता साधणे कृष्णाला तेवढे शक्य होत नसे आणि कृष्णही धर्मराजाचा योग्य मान राखूनच त्याच्याशी वागत असे. धर्मराजालाही कृष्णाच्या वेगळेपणाची व विशेषत्वाची जाणीव होती आणि म्हणून तोही कृष्णाशी अत्यंत आदरानेच वागत असे. भीम हा अत्यंत बलवान असल्यामुळे त्याला सर्व कुटुंबाच्या रक्षणाची काळजी व जबाबदारी वाटत असे. त्यासाठी तो सदैव सावध व दक्ष असे. त्यामुळे कोणातही जास्त मिसळण्याचा भीमाचा स्वभाव नव्हता. परंतु कृष्णाला मात्र तो अत्यंत मानत असे आणि कृष्णाचाही भीमावर अत्यंत लोभ असे. नकुल व सहदेव वयाने लहान असल्यामुळे ते सर्वांचाच मान ठेवून वागत असत. कृष्णाचे विशेषत्व त्यांच्याही लक्षात आलेले होते. त्यामुळे कृष्णाकडे ते विशेष दृष्टीने बघत असत. कृष्णही त्यांच्याशी अत्यंत मोकळेपणाने वागत असे आणि त्यांचे नेहमीच लाड व कोड पुरवीत असे.

हे लक्ष्मी, या सर्वात कुंतीला मात्र कृष्णाचा नेहमीच आधार व खात्री वाटत असे. जीवनात अनुभवलेल्या अनेक दुःखद प्रसंगांमुळे व कष्टकर जीवनामुळे कुंती ही अत्यंत भावनाशील झालेली होती. तिची ही व्यथा व अवस्था केवळ कृष्णच जाणून

होता आणि तीही फक्त कृष्णाकडेच आपले मन मोकळे करू शकत असे. माता म्हणून ती तिच्या पाचही पुत्रांची नीट काळजी घेत असे. त्यांच्या लहानपणापासून त्यांना वाढवण्याची व त्यांच्यावर योग्य ते संस्कार करण्याची सर्व जबाबदारी कुंतीवरच आलेली होती आणि तिने ती योग्य प्रकारे पारही पाडलेली होती. अकाली आलेल्या या जबाबदारीमुळे कुंतीच्या सर्व भावना मात्र कोमेजलेल्या व दबलेल्याच राहिल्या आणि तिच्या मनाचा एक प्रकारे कोंडमाराच झालेला होता. त्यामुळे कुंतीचा सर्व भरवसा व भार कृष्णावरतीच होता. कृष्णावर तर तिचे जिवापाड प्रेम होते. कृष्ण तिच्यासाठी केवळ जीवनाधार नव्हता, तर सर्वस्व होता. सर्व पांडवांची एकजूट रहावी याचीच एकमेव काळजी कुंतीला होती आणि ते केवळ कृष्णामुळेच शक्य होत आहे हे कुंती जाणून होती. म्हणूनच कृष्ण कुंतीच्या व सर्व पांडवांच्याच जीवनाचा सूत्रधार होऊन राहिलेला होता.

हे लक्ष्मी, आधी सांगितल्याप्रमाणे कृष्ण व अर्जुन यांच्यात अधिक सख्यत्व होते आणि त्यासाठी पुढाकार अर्थातच कृष्णाचाच होता. त्यांच्यात सतत भेटीगाठी होत राहत. कारण त्या दोघांनाही एकमेकांचा सहवास अत्यंत प्रिय होता. कुठलेही कारण काढून त्यांच्या अकारण प्रेमाचा अनुभव ते घेत असत. कृष्ण मथुरेच्या राज्यकारभारात व्यस्त असतानाही वेळात वेळ काढून आणि वेळप्रसंगी काहीतरी राजकीय कामाचे निमित्त करून हस्तिनापूरला जात असे. त्यावेळेस त्याचा मुक्काम पांडवांच्या राजवाड्यातच असे. सर्व पांडवांची व विशेषतः कुंतीची ख्यालीखुशाली जाणून घेतल्यावर मग कृष्ण व अर्जुन यांच्यातील गुफ्तगू सुरू होई. संध्याकाळी किंवा रात्रीचे जेवण झाल्यावरती कृष्ण व अर्जुन रथातून नगराबाहेर दूरवर कुठेतरी फिरावयास जात असत. त्यावेळेस कोणीही तिसरी व्यक्ती त्यांच्या बरोबर नको, म्हणून कृष्ण व अर्जुन स्वतःच सारथ्य करून रथ चालवीत असत आणि कृष्ण अर्जुनाच्या व अर्जुन कृष्णाच्या सारथ्य कौशल्याचे कौतुक करीत राहत. त्यानंतर चांदण्या रात्रीत कुठेतरी एखाद्या उपवनात वा पुष्पवाटिकेत बसून कृष्ण व अर्जुन हे प्रहर न् प्रहर बोलतच राहत. त्यावेळेस बहुतेक करून अर्जुनच कृष्णापुढे त्याचे सगळे मन मोकळे करीत असे. त्याच्या मनात दबून राहिलेली अनेक दुःखे किंवा त्याने सहन केलेल्या अनेक व्यथा या सारख्या अनेक भल्याबुऱ्या गोष्टी अर्जुन प्रांजळपणे कृष्णाला सांगत असे. मग त्यावर कृष्ण अर्जुनाचे प्रेमाने सांत्वन करून त्याला दिलासा व मानसिक आधार देत असे. कृष्णही अनेकदा त्याच्या जीवनातील अनेक प्रसंगांचे उदाहरण देऊन त्याचा अनुभव अर्जुनाला सांगत असे आणि अर्जुनाच्या मनाचा उत्साह राखून त्याची उमेद वाढवीत असे.

हे लक्ष्मी, कृष्ण व अर्जुन यांचे हे सख्य व प्रेम हे पुढे पुढे एवढे वाढत गेले, की त्यांना एकमेकांवाचून चैनच पडत नसे. त्यावर त्यांनी एक नामी युक्ती शोधून काढली. कृष्ण हस्तिनापूराहून मथुरेला परत जाण्यास निघाला, की त्याला

पोचवण्याचे कारण सांगून अर्जुन कृष्णाच्या सोबत मथुरेपर्यंत जात असे. तेथे गेल्यावर मग कृष्ण अर्जुनाला आग्रहाने ठेवून घेत असे. कृष्णाचा प्रेमाचा आग्रह व अर्जुनाचा मथुरेतील मुक्काम वाढतच राही. शेवटी जेव्हा हस्तिनापुराहून अर्जुनासाठी निरोपांवर निरोप येऊ लागत, तेव्हा मग कृष्ण अर्जुनाला अत्यंत नाईलाजाने निघण्याची परवानगी देत असे. त्यावेळी अर्जुन कृष्णाला त्याच्याबरोबर चलण्याचा आग्रह करी. कृष्णालाही मनातून तेच हवे असे. त्यामुळे त्यालाही बाह्य निमित्त मिळे आणि कृष्णही अर्जुनाबरोबर जाण्याचे करीत असे. कृष्ण हस्तिनापूरला गेल्यावर सर्व पांडवांनाच अत्यंत आनंद होई आणि ते आग्रहाने कृष्णाला राहण्यासाठी ठेवून घेत असत.


कृष्ण व अर्जुन यांचे हे विशेष मैत्रीचे संबंध हा एक सर्वांच्याच चर्चेचा व कौतुकाचा विषय होऊन राहिला होता आणि ते अगदी साहजिकही होते. कारण निर्मळ व निखळ मैत्रीचे संबंध हे अत्यंत दुर्मीळ असतात. त्या ठिकाणी ना कोणतीही उपकाराची भाषा असते, ना कसली औपचारिक कृती असते. परस्परांची मने नेहमी एकाच दिशेने विचार करीत असतात आणि ती जुळून एकाच निष्कर्षावरही आलेली असतात. त्यामुळेच परस्परांनी घेतलेले निर्णय एकमेकांशी पूर्णपणे मिळतेजुळते असतात. त्याचे मुख्य कारण म्हणजे निर्णय घेताना उभयतांच्या मनात परस्परांचेच विचार प्रामुख्याने असतात. मने जुळल्यामुळेच त्यांची मतेही जुळतात आणि त्यांचे निर्णयही उभयतांना संमत असतात. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे या मैत्रीत कोणी मोठा वा कोणी छोटा असत नाही. उभयतांचे सारखेच कौतुक व महत्त्व असते. कृष्णासारखा सखा मिळणे हे जसे अर्जुनाचे भाग्य होते, तसेच अर्जुनासारखा सखा मिळाल्यामुळे कृष्णाच्या अंतरात असलेली खऱ्या सख्यत्वाची भूक पूर्ण भागत होती हेही तितकेच खरे आहे.

*****

# अर्जुन-सुभद्रा मनोमीलन

हे लक्ष्मी, कृष्ण व बलराम यांना ‘सुभद्रा’ नावाची एक बहीण होती. ती वयाने लहान असल्यामुळे साहजिकच सर्वांच्या अत्यंत प्रेमाची होती आणि लहानपणापासूनच अत्यंत कौतुकात वाढलेली होती. बलराम हा स्वभावाने शिस्तप्रिय होता आणि म्हणूनच सर्वांना त्याच्याविषयी एक प्रकारचा आदरयुक्त दरारा वाटत असे. सुभद्राही बलरामासमोर थोडीशी दबूनच असे. परंतु कृष्णाशी वागताना मात्र सुभद्रा अत्यंत मोकळेपणाने वागण्याचे स्वातंत्र्य घेऊ शकत असे आणि तसे ती अत्यंत प्रेमाने घेतही असे. कृष्णाचीसुद्धा सुभद्रा अत्यंत आवडती होती आणि तो तिचे सर्व लाडकोड नित्य पुरवीत असे. सुभद्रेची थट्टा मस्करी करणे हा तर कृष्णाचा एक आवडता छंदच होता. कृष्णाने केलेली गंमत न कळल्यामुळे रुसणाऱ्या सुभद्रेची, कृष्णाला मग अधिकच मौज वाटत असे आणि त्यानंतर सुभद्रेचा रुसवा व फुगवा दूर करण्यासाठी कृष्णाला कितीतरी प्रकार करावे लागत. सुभद्रेला त्याची मौज वाटे आणि तिचा राग कुठच्या कुठे पळून जात असे. पण कृष्ण सुभद्रेची अत्यंत काळजीही घेत असे. सुभद्रेच्या तब्येतीविषयी व तिच्या स्वास्थ्याविषयी कृष्ण अत्यंत दक्ष असे. सुभद्रेचे स्वास्थ्य जर काही कारणाने बिघडले तर कृष्ण अत्यंत बेचैन होत असे. त्वरित उपाय योजना करून सुभद्रेला स्वास्थ्य प्राप्त करून दिल्यावरच कृष्णाला स्वस्थता लाभत असे, एवढा कृष्णाचा सुभद्रेवरती जीव जडलेला होता.

हे लक्ष्मी, अशी ही सुभद्रा जेव्हा वयात आली तेव्हा साहजिकच तिच्या ठिकाणच्या स्त्रीसुलभ भावना हळूहळू विकसित होऊ लागल्या आणि तिच्यामध्ये निसर्गनियमांनुसार शारीरिक व मानसिक असे बदल होऊ लागले. अशा नाजूक अवस्थेमध्ये असतानाच सुभद्रेची ओळख नित्य कृष्णाबरोबर असलेल्या अर्जुनाबरोबर सहजपणे झाली. पहिल्याच नजरभेटीत त्या दोघांच्या मनातील तार त्यांच्याही नकळतपणे छेडली गेली आणि त्यातून प्रेमाचा एकच झंकार त्यांच्या मनात निनादला. त्या प्रेमाच्या सुरातूनच त्यांचे एकमेकांकडे पाहणे व हळूहळू बोलणेही घडू लागले. उभयतांच्या मनात प्रेमाचा एकच सूर घुमू लागला. प्रेमाची एकच नजर त्यांच्या दृष्टीतून दिसू लागली आणि उभयतांची मने परस्परांकडे पूर्णपणे आकर्षून राहिली. हे प्रेमाचे आकर्षण लपून राहणे वा लपवून ठेवणे त्यांनाही शक्य होईनासे झाले. अर्जुन व सुभद्रा यांच्या मनाची ही अवस्था कृष्णाच्या लक्षात आल्याशिवाय राहिली नाही. त्याच्या नजरेतून ती गोष्ट सुटणे तर शक्यच नव्हते. अर्जुन व सुभद्रा हे एकमेकांना पूर्णपणे अनुरूप आहेत याची कृष्णाला पूर्ण खात्री



होती. एकीकडे त्याचा आवडता मित्र अर्जुन आणि दुसरीकडे त्याची आवडती भगिनी सुभद्रा हे दोघेही जर एकमेकांशी विवाहाच्या नात्याने बांधले गेले असते, तर कृष्णासाठी त्याहून आनंदाची अशी दुसरी कोणतीही गोष्ट नव्हती.

हे लक्ष्मी, पण कृष्ण अत्यंत सावध होता. म्हणून त्याने स्वतःहून काहीच हालचाली त्वरित सुरू केल्या नाहीत. योग्य वेळेची वाट पाहत कृष्ण स्वस्थ बसून राहिला, तरी रूक्मिणीच्या दृष्टीस मात्र ती गोष्ट लक्षात आल्याशिवाय राहिली नाही. तिने एकदा एकांतात असताना कृष्णाशी हा विषय काढला. कृष्णाने प्रथम त्याच्या स्वभावानुसार आश्चर्य वाटल्यासारखे दाखवून जणू काही तो ही गोष्ट पहिल्यांदाच ऐकत आहे असे भासवण्याचा प्रयत्न केला. पण रूक्मिणी ही कृष्णाला पूर्णपणे ओळखून होती आणि अर्थात कृष्णही हे जाणून होता. त्यामुळे अर्जुन व सुभद्रा यांच्या मनात प्रेमाची भावना निर्माण झाल्याचे कृष्णाच्याही लक्षात आलेले आहे हे कृष्णाला कबूल करावेच लागले. अर्थात कृष्णाने तसे बोलून न दाखवता फक्त स्मितहास्य करूनच सूचित केले. रूक्मिणीसाठी तेवढा धागाही पुरेसा होता. तेच सूत्र पकडून तिने कृष्णाला त्यासंबंधी काहीतरी कृती करण्याचा आग्रह सुरू केला. रूक्मिणीचा हा प्रेमळ आग्रह हा तिच्या सुभद्रेवरच्या प्रेमापोटीच होता. कारण सुभद्रा ही कृष्णाप्रमाणेच रूक्मिणीचीही अत्यंत लाडाची होती आणि कृष्णाला ते माहीत होते. शेवटी 'नाईलाज होतो आहे' असा आविर्भाव दाखवून कृष्णाने त्यासंबंधी जमतील तसे काही प्रयत्न करण्याचे आश्वासन रूक्मिणीला दिले. त्यासाठी आधी 'रूक्मिणीने सुभद्रेशी बोलणे करून तिचे मन जाणून घ्यावे आणि कृष्णाने अर्जुनाशी बोलून त्याच्या मनातील विचारून घ्यावे' असे कृष्ण व रूक्मिणी यांनी आपापसांत ठरवले आणि त्याप्रमाणे ती दोघेही कामाला लागली.

हे लक्ष्मी, सुभद्रेचे मन जाणून घेण्यासाठी रूक्मिणीला काहीच प्रयत्न करावे लागले नाहीत. रूक्मिणीने सुभद्रेशी एकांतात अर्जुनाचा विषय काढला मात्र, सुभद्रा लाजून लाजून अगदी चूर झाली आणि एकदम रूक्मिणीच्या कुशीतच शिरली. रूक्मिणीने सुभद्रेचे मुख प्रयत्नपूर्वक वर उचलून तिच्याशी बोलण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण सुभद्रा लाजेने मान वर करेनाच आणि काहीही बोलायला तयारही होईनाच. खरे तर, सुभद्रेच्या मनात काय आहे हे रूक्मिणीच्या लगेचच लक्षात आले होते. पण ती थोड्याशा चेष्टेने सुभद्रेला म्हणाली, "ठीक आहे. तुझ्या मनात तसे काही नसेल तर मग नकोच, आमचा काहीच आग्रह नाही. तसे मी कृष्णाला कळीत करते म्हणजे मग त्याच्याही मनातील शंका दूर होऊन तोही स्वस्थ राहील." रूक्मिणीच्या बोलण्यातील चेष्टा सुभद्रेला कळली पण ती मानवली नाही. तिने आपला हात पटकन रूक्मिणीच्या मुखावर ठेवला आणि म्हणाली, "वहिनी, असे

काही बोलू नकोस. तुला माझी शपथ आहे.” एवढेच जेमतेम बोलून सुभद्रा पुन्हा रूक्मिणीच्या कुशीत शिरली आणि मुसमुसून रडू लागली. रूक्मिणीने हसत हसत सुभद्रेच्या मस्तकावर थोपटले आणि आश्वासनपूर्वक हात फिरवला.

कृष्णाने जेव्हा अर्जुनाशी बोलणे केले तेव्हा अर्जुनाने त्याच्या ठिकाणी सुभद्रेविषयी जी प्रेमाची भावना होती, ती अगदी मोकळेपणाने कृष्णाला सांगितली. कृष्णापासून कोणतीही गोष्ट लपवून ठेवणे हे अर्जुनाला कधीच मानवले नसते आणि तसे करणे त्याला जमलेही नसते. कृष्णाला सर्वकाही सांगितल्यानंतर ‘पुढे काय व कसे करावे’ याची सर्व जबाबदारी अर्जुनाने कृष्णावरच सोपवली. कृष्ण आपल्या मित्राचे नेहमीच हित व कल्याण केवळ चिंतिणाराच नव्हता, तर त्याला प्रत्यक्ष मदत करण्यासाठीही तो सदैव तत्पर असे. म्हणून कृष्ण अर्जुनाला आश्वासन देत म्हणाला,

“अर्जुना, तू केलेली सुभद्रेची निवड अत्यंत योग्यच आहे. सुभद्रा केवळ माझी भगिनी आहे म्हणून मी हे म्हणत नाही, तर तुम्ही दोघे एकमेकांनाही खरेच अगदी अनुरूप आहात. सुभद्रेचे मन जरी मी अजून विचारून घेतले नसले, तरी तिच्या मनातही तुझ्याविषयी प्रेमाची भावना आहे याची मला खात्री आहे. रूक्मिणीचे मतही अगदी माझ्यासारखेच आहे. तेव्हा तू आता काहीही काळजी करू नकोस. सर्वकाही माझ्यावर सोपवून तू निश्चिंत रहा. आता योग्य वेळ व संधी साधून मी हा विषय बलराम दादांकडे काढतो आणि त्यांची संमती मिळवतो. एकदा का त्यांची संमती मिळाली की मग पुढील सर्व गोष्टी पटापट घडतील आणि पूर्तीला जातील.”

कृष्णाच्या बोलण्याने अर्जुनाचे मन शांत व एकदम हलके झाले. कुठल्याही परिस्थितीत कृष्ण त्याने दिलेला शब्द खरा करणार, याची खात्री अर्जुनाला असल्यामुळे तो निश्चिंत झाला. त्यानंतर जेव्हा कृष्ण व रूक्मिणी यांची भेट झाली तेव्हा त्यांचे एकमेकांशी पुन्हा बोलणे झाले. सुभद्रा व अर्जुन या उभयतांच्या ठिकाणी परस्परांविषयी असलेल्या प्रेमभावनेची खात्री कृष्ण व रूक्मिणी यांना झाली. आता बलरामदादांपाशी हा विषय काढणे एवढीच एक, पण सर्वांत महत्त्वाची गोष्ट शिल्लक राहिलेली होती. बलरामाच्या स्वभावाचा विचार केला असता, म्हटले तर ती गोष्ट सोपी होती आणि म्हटले तर ती गोष्ट कठीणही होती. पण एक गोष्ट निश्चित होती की बलरामापाशी हा विषय काढणे कृष्णाशिवाय दुसऱ्या कोणालाही शक्यच झाले नसते. अर्थात कृष्णही हे जाणून होता. पण तोही योग्य संधीची वाटच पाहत राहिला.

हे लक्ष्मी, पण त्याच वेळी योगायोगाने एक विचित्र गोष्ट घडत होती. दुर्योधन हा बलरामाकडे गदायुद्धाचे शिक्षण घेत होता. बलरामाच्या दिलदार स्वभावानुसार

तो हे गदायुद्धाचे शिक्षण सर्वांनाच मुक्तपणे देत असे. त्यात तो कोणताही भेदभाव करीतच नसे. त्यामुळे एकाच वेळी तो पांडवांपैकी जसे भीमाला शिकवीत होता, तसेच कौरवांपैकी दुर्योधनालाही तो शिकवीत होता. मुख्य म्हणजे बलरामाला त्यात काहीच गैर वा अयोग्य वाटत नव्हते. त्याच्या दृष्टीने कौरव व पांडव हे दोघेही त्याचे आप्त होते आणि भीम व दुर्योधन हे दोघेही त्याचे विद्यार्थी होते. ‘सर्व विद्यार्थ्यांकडे समदृष्टीने पाहणे आणि त्यांना समभावाने वागवून सारखेच शिक्षण देणे’ हे शिक्षकाचे आद्य कर्तव्य आहे, अशी बलरामाची रास्त धारणा होती. पण तरीही दुर्योधनाचे गदाकौशल्य बलरामाला अधिक भावत असे आणि त्यामुळे त्याचा कलही दुर्योधनाकडेच जास्त होता. सुभद्रा उपवर झालेली आहे असे बलरामाच्याही दृष्टोत्पत्तीस जेव्हा आले, तेव्हा तिच्यासाठी वर म्हणून बलरामाच्या मनात प्रथम कोणाचा विचार आला असेल तर तो नेमका दुर्योधनाचाच होता. सर्व दृष्टीने विचार केला असता सुभद्रेसाठी दुर्योधन हाच योग्य वर आहे याची पूर्ण खात्री बलरामाला पटली होती आणि सुभद्रेचा विवाह दुर्योधनाशीच करण्याचा त्याचा पक्का निश्चयही झालेला होता. हा विषय कृष्णापाशी कसा काढावा या विचारात बलरामही पडलेला होता.

हे लक्ष्मी, अशा परिस्थितीत एकदा अचानक कृष्ण व बलराम यांची एकांतात भेट झाली. दोघेही एकमेकांशी सुभद्रेच्या विवाहाचा विषय काढण्यासाठी अत्यंत आतुर होते. पण कोणीच बोलायला सुरूवात करीत नव्हते. शेवटी कृष्णानेच संधी साधली आणि त्याने बलरामाशी बोलावयास सुरूवात केली.


“अहो दादा, एक गोष्ट माझ्याप्रमाणेच तुमच्याही लक्षात आलीच असेल, की आपली लहान भगिनी सुभद्रा ही आता वयात आली असून उपवर झालेली आहे. तेव्हा आपल्यालाही तिच्या विवाहाचा विचार आता करायला हवा. सुभद्रेसाठी योग्य वर शोधून काढण्याच्या प्रयत्नाला आपल्याला वेळीच सुरुवात करावयास हवा. आपली सुभद्रा ही अत्यंत सुंदर तर आहेच, पण सुशीलही आहे आणि तरीही स्वभावाने अजून अल्लडच आहे. तेव्हा तिची योग्य ती काळजी प्रेमाने घेणारा असाच पती सुभद्रेसाठी हवा. त्याच्याकडे पराक्रम व ऐश्वर्य तर हवेच, परंतु मुख्य म्हणजे सुभद्रेचा भावी पती हा प्रेमळ स्वभावाचा व चारित्र्यवान हवा. या दृष्टाने विचार केला असता मला कुंतीपुत्र पांडवांपैकी अर्जुन हा सुभद्रेसाठी सर्वार्थाने योग्य वाटतो. केवळ तो माझा मित्र आहे म्हणून मी असे म्हणतो आहे असे नव्हे, तर अर्जुनाला मी नेहमीच अत्यंत जवळून पाहत आलेलो आहे. म्हणून माझ्या ठिकाणी अर्जुनाच्या पराक्रमाची व सुस्वभावाची पूर्ण खात्री आहे. आपल्या सुभद्रेला अर्जुन सर्व सुखे तर देईलच, पण अत्यंत प्रेमाने तिचे मनही तो राखील असा माझा दृढ विश्वास आहे.”

एवढा वेळ कृष्णाचे बोलणे ऐकणाऱ्या बलरामाने हाताच्या खुणेने कृष्णाचे बोलणे मध्येच थांबवले आणि तो कृष्णाकडे एकटक नजरेने बराच वेळ पाहत राहिला. थोड्या वेळाने बलरामाने अत्यंत गंभीर सुरात कृष्णाशी बोलण्यास सुरुवात केली.

“अरे कृष्णा, सुभद्रेच्या विवाहाचा विषय तू काढलास हे बरे केलेस. सुभद्रा विवाहाला योग्य झाली आहे हे खरेच आहे. माझ्या ठिकाणीसुद्धा तोच विचार चालू आहे. परंतु विवाह म्हणजे काही लहान मुलांचा पोरखेळ नाही. त्यासाठी अनेक गोष्टींचा सर्वांगाने विचार करणे आवश्यक असते. केवढा तरी विचारविनिमय करावा लागतो. केवढीतरी चर्चा करावी लागते. कोणताही निर्णय आततायीपणाने किंवा घिसाडघाईने घेणे तर अत्यंत अयोग्यच आहे. कारण हा सुभद्रेच्या संपूर्ण जीवनाचा प्रश्न आहे. उगाच कोणीतरी आपल्यासमोर आहे, म्हणून लगेच तो सुभद्रेसाठी योग्य वर आहे असे होत नाही. असे काही वाटणे हा तर केवळ मनाचा उथळपणा झाला. असे विवाहासारखे महत्त्वाचे निर्णय केवळ मनाने घ्यायचे नसतात तर त्यासाठी बुद्धीचाही वापर करणे अत्यंत आवश्यक असते हे लक्षात ठेव.

हे कृष्णा, या दृष्टीने मी सर्व विचार केव्हापासूनच करून ठेवला आहे आणि माझ्या दृष्टीसमोर तरी फक्त दुर्योधन हाच येतो. एकतर तो माझा गदायुद्ध विद्येतील विद्यार्थी आहे. पण केवळ म्हणूनच मी त्याला पसंत करतो असे नव्हे, तर त्या निमित्ताने मला त्याला अत्यंत जवळून पाहता आले म्हणून मी असे म्हणत आहे. विद्यार्थी म्हणून तो अत्यंत निपुण व खरा अभ्यासकही आहे. अत्यंत एकाग्रतेने व प्रयत्नपूर्वक तो माझ्यापासून गदाविद्या शिकत असतो. एवढेच नव्हे, तर त्याने केलेली प्रगती सुद्धा अत्यंत कौतुकास्पद आहे. त्यामुळे दुर्योधन हा माझा अत्यंत आवडता विद्यार्थी आहे हे अगदी खरे आहे. त्याचप्रमाणे दुर्योधनाच्या ठिकाणी माझ्याविषयी अत्यंत आदर आणि बोलण्यात नम्रताही आहे. तेव्हा दुर्योधनासारखा असा गुणवान व पराक्रमी तरुणच सुभद्रेसाठी पती म्हणून योग्य आहे असा माझा ठाम विश्वास आहे. तसा निर्णयही मी जवळ जवळ घेतलेलाच आहे. त्यासंबंधी मी तुझ्याशी बोलणारच होतो. आता सुभद्रेला माझा निर्णय सांगतो. म्हणजे मग त्यानंतर आपल्याला पुढील प्रयत्नांना सुरुवात करता येईल.”

हे लक्ष्मी, बलरामाचे बोलणे ऐकून कृष्ण अत्यंत चकितच झाला. खरे तर. बलरामाचे बोलणे एवढे निश्चयात्मक होते, की त्याचा तसा निर्णय झालेला आहे हे अगदी स्पष्टपणे जाणवत होते. त्यामुळे काहीही बोलण्याला व चर्चा करण्याला मुळी वावच नव्हता. त्यामुळे कृष्णही थोडावेळ स्वस्थच बसून राहिला. परंतु बोलणे तर आवश्यकच आहे हे कृष्ण जाणून होता. त्यातूनही कृष्ण हा सुभद्रा व अर्जुन यांच्या मनातील भावना जाणून असल्यामुळे जास्त वेळ स्वस्थ बसणे कृष्णालाही शक्य



झालेच नसते. त्यामुळे कृष्णाची संमती बलरामाने गृहीत धरण्याच्या आधीच कृष्णाने बोलावयास सुरुवात केलीच.

“अहो दादा, तुमचे म्हणणे अगदी खरेच आहे. विवाह हा काही लहान मुलांचा खेळ तर नाहीच. परंतु तो ज्याच्या त्याच्या जीवनातील एक अत्यंत महत्त्वाचा क्षण आहे. त्या क्षणी जीवनाला मिळालेले वळण हे पुढील जीवनाच्या सर्व सुखाच्या व स्वास्थ्याच्या अनुभवाला पायाभूत ठरते. त्यामुळे ज्यांचा विवाह आहे त्यांचे मनही जाणून घेणे अत्यंत आवश्यक असते. कारण विवाह म्हणजे काही फक्त शरीर संबंधच नसतो, तर तेथे उभयतांचे मन जुळणेही तेवढेच महत्त्वाचे आहे. या दृष्टीने मी सुभद्रेशी तिच्या विवाहाचा विषय रुक्मिणीच्या मार्फत काढला होता. त्यावेळेस तिच्या मनात अर्जुनच भरलेला आहे असे तिने रुक्मिणीला अत्यंत मोकळेपणाने व स्पष्टपणे सांगितले. मग मी सुद्धा अर्जुनाशीही बोललो असता त्यानेही त्याच्याठिकाणी असलेली सुभद्रेविषयीची भावना मला मोकळेपणाने सांगितली. तेव्हा अशा तऱ्हेने सुभद्रा व अर्जुन यांची मने परस्परांशी प्रेमाने आधीच जुळलेली असताना आपण त्यांचाच विवाह जुळवणे हे अधिक योग्य होईल. त्यामुळे आपली सुभद्रा व अर्जुन यांचे पुढील सर्व जीवन सुखाचे, समाधानाचे व आनंदाचे होईल याची मला पक्की खात्री आहे.”

कृष्णाचे बोलणे ऐकत असतानाच बलरामाची मुद्रा गंभीर झालेली दिसत होती. त्याच्या मनातील नाराजी त्याच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे प्रगट झालेली होती. पण तरीही चेहऱ्यावरती थोडेसे हास्य बळे बळे आणून बलराम कृष्णाला म्हणाला,

“अरे कृष्णा, या मनाचे काही खरे नसते. एकतर ते मन स्वतःच्या लहरीनुसार चालते किंवा जर त्याची लहर फिरली, तर एखादे वेळेस दुसऱ्याच्या लहरीप्रमाणेसुद्धा चालू लागते. त्याचा काहीच भरवसा धरता येत नाही हेच एक खरे. त्यातून सुभद्रेसारख्या किशोरवयातून तारूण्यात पदार्पण करीत असलेल्या बालिकांचे मन तर अत्यंत चंचलच असते. एवढेच नव्हे, तर त्यांचे मन कुठल्याही बाह्य आकर्षणाला लगेचच बळी पडण्याची शक्यता जास्तच असते. स्वतःचे हित व अहित जाणण्याएवढी दूरदृष्टीही त्यांना नसते आणि ते समजण्याची तर त्यांच्या बुद्धीची कुवतही नसते. अशा वेळी आपल्यासारख्या अनुभवी व्यक्तींनी त्यांची योग्य समजूत घालणे आवश्यक आहे. ती जबाबदारी सर्वस्वी आपली आहे. तेव्हा सुभद्रेचे मन भावनेच्या भरात थोडेसे भरकटणे शक्य आहे. पण आपण तिच्या भावनेबरोबर वाहून न जाता, संयम राखून तिला सावरले पाहिजे.

कृष्णा, येथे तर मला असे दिसत आहे की तूही सुभद्रेच्या भावनेबरोबर वाहत जात आहेस. या गोष्टीचे मला नवल तर वाटतेच पण त्याहीपेक्षा वाईट जास्त वाटत

आहे. मला वाटते अर्जुनाची व तुझी मैत्री असल्यामुळे तूही अर्जुनाच्या बाजूने थोडासा झुकलेला आहेसच. अशा पक्षपातीपणाची तुझ्याकडून अपेक्षा नाही आणि सुभद्रेच्या विवाहासारख्या महत्त्वपूर्ण निर्णयामध्ये तर असे घडणे अत्यंत चुकीचेच आहे. पांडवांविषयी माझ्याही मनात आपलेपणा आहे. त्यांच्याविषयी माझ्या मनात सहानुभूतीही आहे. कारण त्या बिचाऱ्यांना अगदी जन्मापासूनच अत्यंत कष्टाचे जीवन जगावे लागले आहे हे मी जाणून आहे. आता ते पुन्हा भीष्म व धृतराष्ट्र यांच्याकडे परत आले आहेत आणि त्यांनीही उदार मनाने पांडवांना आश्रय दिला आहे. परंतु सध्या कुरू कुळाचा अधिपती धृतराष्ट्र आहे हे खरे आहे आणि दुर्योधन हा युवराजपदावर आहे हेही खरे आहे. त्यामुळे पुढे परंपरेने सर्व राजसत्ता व राजवैभव दुर्योधनाकडेच येणार आहे हेही सरळ व स्पष्ट आहे. तेव्हा सुभद्रेचा विवाह दुर्योधनाशी झाल्यावरती तिलाही ते वैभव सहज मिळणार आहे आणि सर्व सुखे तिच्यासमोर नुसती हात जोडून उभी राहणार आहेत. शिवाय कुरूकुळासारख्या पराक्रमी व वैभवशाली कुळाशी यदुकुळाचा संबंध जुळणार आहे आणि त्याचा केवढा तरी लाभ आपल्या यदुकुळालाच मिळणार आहे. तेव्हा सर्व दृष्टीने विचार केला असता सुभद्रा व दुर्योधन यांचाच विवाह होणे योग्य आहे. तेव्हा तूही आता इतर कोणत्याही बाजूने विचार न करता मी सांगितलेल्या दृष्टीनेच विचार कर, म्हणजे तूही माझ्याच निर्णयाप्रत येशील याची मला पूर्ण खात्री आहे."

बलरामाच्या बोलण्यावर कृष्ण थोडा वेळ स्वस्थ बसून राहिला. बलरामाशी पुढे काही बोलावे की न बोलावे अशा विचारातच कृष्ण पडला होता. परंतु बलरामाशी बोलणे आवश्यकच आहे असा निश्चय करून, कृष्णाने बलरामाशी बोलण्यास सुरूवात केली,

"अहो दादा, तुमच्या बोलण्यामागे एकीएक सुभद्रेच्या हिताचाच विचार आहे याची मला पूर्ण खात्री आहे. परंतु त्यामध्ये सुभद्रेच्या भावनेपेक्षा यदुकुळाच्या हिताच्या विचाराला जास्त प्राधान्य आहे असे मला तरी जाणवते. आपल्या राजकारणासाठी सुभद्रेच्या भावनांना डावलणे हे मला तरी योग्य वाटत नाही. अशी दोन्हींची गल्लत करणे खचितच उचित नाही. कारण व्यक्तिगत भावना या भावना आहेत आणि राजकारण हे राजकारण आहे. राजकारणात जसे भावनेला स्थान नाही, तसेच भावनेमध्येही राजकारण आणू नये असे मला अगदी मनापासून वाटते. सुभद्रा तिच्या भावना बाजूला करून आपल्या निर्णयाला मान्यता देईलही. आपल्या शब्दासाठी ती तिच्या प्रेमाचाही त्याग करायला तयार होईल. पण म्हणूनच आपली जबाबदारी अधिकच वाढत आहे, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. कारण तसे करण्यामागे सुभद्रेला केवढातरी मानसिक त्रास सहन करावा लागणार आहे आणि त्याची काळजी आपण नाही घेणार तर दुसरे कोण घेणार?

आपल्याशिवाय तिला एवढे प्रेमाचे व हक्काचे दुसरे कोण आहेत बरे? तेव्हा आपले विचार तिच्यावर लादून तिला दुःखी करणे हे बरोबरच नाही. बाह्यांगाने सर्व वैभव व सुखाची साधने मिळूनही जर सुभद्रा मनातून कायमची दुःखीच राहणार असेल, तर मग त्यामध्ये आपल्याला तरी कोणते सुख लाभणार आहे? आपल्या तिच्यावरील प्रेमाचे हे लक्षणच नाही. आपण जर सुभद्रेच्या मनाचा कौल घेतला तर तीही राज्य वैभवाच्या सर्व सुखात लोळत राहण्यापेक्षा, तिच्या आवडत्या व्यक्तिच्या प्रेमात खेळत राहणेच अधिक पसंत करेल याची मला पूर्ण खात्री आहे आणि तिची ही भूमिका योग्यच आहे. कारण धन, दौलत व मानमरातब हे सर्व एखाद्याला त्याच्या दैवात लिहिले असेल त्याप्रमाणे व तेवढे मिळणारच आहे. त्यात जराही जास्त वा कमी होऊच शकणार नाही. ईश्वराची तशी नियतीच आहे. परंतु जीवनात खरे प्रेम मात्र भाग्यानेच मिळते हेही सत्यच आहे.

अहो दादा, सुभद्रेच्या यौवनावस्थेमुळे तिचे मन अशा प्रेमाकडे आकर्षित होणे हे निसर्गसुलभच आहे. परंतु सुदैवाची गोष्ट ही आहे, की तिचे मन कुठेतरी न भरकटता ते अर्जुनासारख्या योग्य व्यक्तीकडे आकर्षिले गेले आहे. अर्जुन हा अत्यंत पराक्रमी तर आहेच. म्हणूनच तर तो गुरू द्रोणाचार्यांचा अत्यंत आवडता शिष्य आहे. द्रोणाचार्यांनाही अर्जुनासारखा शिष्य मिळाल्याची धन्यता वाटली. त्यामुळेच त्यांनी त्यांची सर्व धनुर्विद्या अर्जुनाला देऊ केली आणि अर्जुनानेही ती सर्व विद्या पूर्णपणे आत्मसात केली, हेही तेवढेच महत्त्वाचे आहे. आजच्या घडीला या भूतलावरील सर्वश्रेष्ठ धनुर्धर अर्जुनच आहे, याविषयी अगदी त्याच्या शत्रूंच्या ठिकाणीही दुमत असणे शक्य नाही. म्हणूनच तर त्याचे शत्रूही जरी मनातून त्याचा द्वेष मत्सर करीत असले, तरी बाह्यांगाने ते अर्जुनाचा आदर करून त्याचा मान राखतात.


दादा, अर्जुनाच्या बाबतीतील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्याचे चारित्र्य, त्याची सत्प्रवृत्ती व त्याची नीतिमत्ता. त्याचे मोल या जगामध्ये केवढेतरी मोठे आहे. तो एक अमूल्य धनाचा ठेवा आहे. त्याच्यापुढे बाकी सर्व धन व वैभव तुच्छ आहे. त्यामुळे आज पांडवांकडे कौरवांसारखे राज्यवैभव कदाचित नसेलही. परंतु स्वतःच्या सत्प्रवृत्तीच्या बळावर व पराक्रमाच्या जोरावर ते वैभव पांडव प्राप्त करून घेतील याची मला पूर्ण खात्री आहे. खरे तर, पंडूचे पुत्र म्हणून पांडवांचाच हक्क हस्तिनापूरच्या सिंहासनावर आहे. परंतु जरी काही अटळ परिस्थितीमुळे पांडवांना त्यांच्या या हक्कापासून वंचित व्हावे लागले असले, तरी एक ना एक दिवस पांडवांना त्यांचा हा न्याय्य हक्क मिळेलच मिळेल असा माझा पूर्ण विश्वास आहे.

अहो दादा, या सर्वांपेक्षा एक अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे आणि तो म्हणजे स्वच्छ व निर्मळ चारित्र्याचा, नीतिमत्तेचा व सत्प्रवृत्तीचा. या जीवनमूल्यांमुळेच

जीवनातील खरी प्राधान्ये ठरत असतात. पांडव हे त्यांच्या सदाचरणामुळे सर्वांनाच प्रिय आहेत. पण दुर्योधनाविषयी मात्र आपण तसे म्हणू शकत नाही. पांडवांविषयीच्या व्देषमत्सराने तो पूर्णपणे व कायमचा पछाडलेला आहे आणि पांडवांना जास्तीत जास्त त्रास देऊन त्यांचा मानसिक छळ करण्याचाच दुर्योधनाचा सततचा प्रयत्न असतो. त्याशिवाय त्याला जणू चैनच पडत नाही. पांडवांचा दुःस्वास करण्यापलिकडे दुर्योधनाने आजवर दुसरी कोणतीही गोष्ट केलेली नाही. एवढेच नव्हे, तर त्यासाठी दुर्योधन नेहमी धृतराष्ट्राच्याही मागे लागत असतो. धृतराष्ट्रावर कायमच दडपण आणून, दुर्योधन धृतराष्ट्राला पांडवांविरुद्धचे निर्णय घ्यायला भाग पाडत असतो. धृतराष्ट्राने जर दुर्योधनाच्या मनाप्रमाणे केले नाही तर दुर्योधनाचा अधिकच जळफळाट होतो आणि त्याचा राग तो पांडवांवरती काढतो. त्यांना सतत घालून पाडून बोलणे आणि त्यांचा सर्वांसमक्ष नेहमी अवमान करणे यात दुर्योधनाला मोठा पुरुषार्थ वाटत असतो. त्याला एक प्रकारचा आसुरी आनंदच त्यामधून मिळत असतो. दुर्योधनाचा हा स्वभाव आता सर्वांच्याच माहितीचा झालेला आहे. दुर्योधनही हे सर्व मुळीच लपवून ठेवत नाही. उलट त्याला त्या गोष्टींचा अभिमानच वाटत असतो. यामध्ये आणखीन एक वाईट गोष्ट म्हणजे, दुर्योधनाला त्याच्या सर्व बंधूंची सक्रिय साथ व साहाय्य आहे आणि धृतराष्ट्रही पुत्रमोहामुळे अंध होऊन अगतिकपणे या सर्व गोष्टींना मूक संमती देत आहे.

अहो दादा, ही सर्व परिस्थिती तुम्हालाही निश्चितच ठाऊक आहे. असे असताना आपण जाणूनबुजून सुभद्रेला अशा क्षुद्र व विकृत मनाच्या लोकांमध्ये पाठवणे, म्हणजे तिला जणू जळत्या घरामध्येच लोटण्यासारखे आहे. कारण त्यातून उद्भवणाऱ्या सर्व परिणामांची झळ सुभद्रेला अगदी सहजपणे लागणार आणि ती बिचारी नाहक त्यामध्ये होरपळून निघणार. तिला बाह्यांगाने सर्व सुखे मिळतीलही. पण तिला जीवनात जर खरे प्रेम मिळाले नाही, तर तिच्या मनाला समाधान व शांती कधीच मिळणार नाही. उलट तिचे मन नेहमीच अस्वस्थ व ताणतणावाखाली राहील. मग आपणही तिला काहीच मदत करू शकणार नाही. आपल्याला केवळ बघ्याची भूमिका घेत स्वस्थच बसून राहावे लागेल आणि शेवटी पश्चात्तापाची पाळी आपल्यावरतीच येईल."

कृष्णाच्या बोलण्यातून सुभद्रेविषयीची काळजी प्रगट होत असल्यामुळे त्याचे बोलणे अत्यंत तळमळीने घडत होते. सुभद्रेविषयीच्या प्रेमामुळे कृष्ण त्याचे म्हणणे बलरामाला पटवून देण्याचा अगदी आटोकाट प्रयत्न करीत होता. पण शांतपणे ऐकणाऱ्या बलरामावरती त्याचा काही होकारात्मक परिणाम होत आहे असे त्याच्या मुखावरून तरी मुळीच जाणवत नव्हते. उलटपक्षी थोड्यावेळाने बलरामाच्या मुखावरती हळूहळू नाराजीचा भावच पसरत राहिला आणि तो भाव



शेवटी शब्दातून प्रगट झाल्याशिवाय राहूच शकला नाही. काहीशा उद्वेगानेच बलराम बोलू लागला.

“अरे कृष्णा, तुझ्या बोलण्याचे मला नवल वाटत नाही. पण वाईट मात्र निश्चितच वाटते. खरे तर, तुझ्याठायी पहिल्यापासूनच पांडवांबद्दलचा आपलेपणा आहे हे मला ठाऊक आहे. परंतु यावेळेला तुझा तो आपलेपणा एवढा वाढलेला आहे की तू तर उघड उघड पक्षपातीच बनला आहेस. अर्जुनावरील तुझ्या लोभामुळे तुझे सर्व बोलणेच मुळी अगदी सहजगत्या एकतर्फीच होत आहे. तुझ्या ठिकाणी पांडवांचे व विशेषतः अर्जुनाचे एवढे कौतुक आहे हे मी समजू शकतो. परंतु म्हणून काही कौरवांविषयी व त्यातूनही दुर्योधनाविषयी तुझे एवढे अगदी टोकाचे विरोधी मत असणे हे योग्य नाही. आपले मन कोणाविषयीही पूर्वग्रह दूषित नसावे आणि कोणाविषयी आपले मतही अर्धवट माहितीवर आधारीत नसावे. आपल्यासाठी कौरव व पांडव हे सर्वचजण सारखेच आहे हे लक्षात ठेव. कारण आपल्या यदुकुळाचे व कुरूकुळाचे आधीपासूनचे घनिष्ठ संबंध आहेत. त्यामुळे कौरव व पांडव यांच्याकडे आपण सारख्याच निःपक्षपाती दृष्टीने पाहिले पाहिजे. त्यांच्यामध्ये कोणताही भेदभाव करण्याचे आपणाला काही कारणच नाही.


कृष्णा, दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे कुरूकुळात युवराजपद दुर्योधन व धर्मराज यांच्यापैकी कोणाला मिळावे, ही त्यांची त्यांच्यातील खाजगी बाब आहे. त्यामध्ये काही दखल घेण्याची किंवा कोणाची बाजू घेण्याचे आपल्याला मुळी कारणच नाही. त्यांच्यामध्ये उगाचच लुडबुड करण्याचा आपल्याला अधिकारच नाही. म्हणूनच त्यांच्यापैकी चूक कोण किंवा बरोबर कोण या विषयीचे आपले काहीही मत करून न घेता आपण त्या सर्वांविषयी आपले मन मोकळेच ठेवले पाहिजे. आधी ज्येष्ठ बंधू या नात्याने धृतराष्ट्राचाच राज्यावर हक्क होता. परंतु त्याच्या अंधत्वामुळे तो स्वतःहून बाजूला झाला आणि त्याने त्याचा कनिष्ठ बंधू पंडू याच्याकडे राज्यकारभार सोपवला. पंडूच्या राज्यत्यागानंतर धृतराष्ट्र पुन्हा राज्यावर बसला आणि भीष्मांच्या मार्गदर्शनानुसार तो राज्यकारभार करीत होता. दुर्योधन त्याचा ज्येष्ठ पुत्र असल्यामुळे साहजिकच तो त्याच्या पित्याला साहाय्यभूत होत होता. त्यानंतर पंडूचा वनात अकाली मृत्यू झाला आणि पांडव पुन्हा हस्तिनापुरला परत आले. हा सर्व इतिहास आपल्याला माहीत आहेच.

त्यानंतर आता पुढे काय करायचे याचे मार्गदर्शन कौरव व पांडव या उभयतांना करायला भीष्म स्वतः समर्थ असताना आपल्याला काळजी करायचे कारण नाही आणि त्यासंबंधीच्या वादातही आपल्याला पडायची आवश्यकता नाही. योग्य-अयोग्य, धर्म-अधर्म या सर्वांचे यथार्थ ज्ञान भीष्मांना निश्चितच आहे आणि त्याचा निर्णय ते करतीलच. परंतु कृष्णा, तू मात्र हा निर्णय आधीच करून ठेवलेला

आहेस असे दिसत आहे. पांडव म्हणजेच धर्मी व कौरव हेच अधर्मी असे तर तू ठरवलेलेच आहेस. दुर्योधनाचा स्वभाव हा जरा वेगळा असेलही. त्यातूनही त्याच्याठिकाणी युवराजपद मिळवण्याची ईर्षा व चुरस असली तर तीही साहजिकच आहे. त्याच्यात चूक वा गैर असे काहीच नाही. अनुभव नसल्यामुळे दुर्योधनाचे वागणे काहीवेळा आततायीपणाचेही होत असेल. पण म्हणून त्याचा जास्त बाऊ करणे हे बरोबर नाही. त्यासाठी लगेचच दुर्योधनाला व्देषी, मत्सरी वा कपटी, कारस्थानी म्हणून संबोधणे आणि तेही अपुऱ्या माहितीच्या आधारावर, हे तर अत्यंत चुकीचेच आहे. एवढेच नव्हे, तर ते दुर्योधनावर सरळ सरळ अन्याय करणारेच आहे.

कृष्णा, तेव्हा तू असे दुर्योधनाकडे कलुषित मनाने न पाहता खुल्या व मोकळ्या मनाने पाहा. सुभद्रेच्या भावी आयुष्याचा व तिच्या सुखाचा व्यापक दृष्टीने विचार कर. म्हणजे माझे म्हणणे तुझ्या लक्षात येईल. मी तो सर्व विचार आधीच केलेला आहे आणि सुभद्रेसाठी दुर्योधन हाच पती म्हणून सर्वस्वी योग्य आहे अशी माझी पक्की खात्री आहे. आता आपण चर्चेमध्ये जास्त वेळ वाया न दवडता पुढील कार्यवाही करण्यास सुरुवात करूया. त्यासाठी मी स्वतः हस्तिनापुरला जाऊन भीष्म व धृतराष्ट्र यांची भेट घेऊन, त्यंना सुभद्रेचा स्नुषा म्हणून स्वीकार करण्याची विनंती करीन. त्याआधी आपण दोघे मिळून सुभद्रेची भेट घेऊ आणि सुभद्रेलाही आपला झालेला निर्णय कळवू. रुक्मिणी व रेवती या दोघींशीही आपण बोलून घेऊ, म्हणजे त्यांचीही योग्य ती नीट समज होईल. पण मी तुला एक सांगतो की सुभद्रेच्या अल्लड व अजाण मनाला तू प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणतेही प्रोत्साहन देऊ नकोस. तू तिच्या भावनेला थोडीशी जरी सहानुभूती दाखवलीस, तरी ती भावना तिच्या मनात खोलवर मूळ धरेल आणि मग सुभद्रेच्या डोक्यातील ते खूळ बाहेर काढणे आपल्याला कठीण होऊन बसेल. तेव्हा आताच आपण दोघे माझ्या महालाकडे जाऊ आणि तेथे रुक्मिणी व सुभद्रा यांना बोलावून घेऊ. चल तर."

बलरामाच्या एकंदर बोलण्याच्या सुरावरूनच कृष्णाने त्याचा नूर ओळखला. त्याच्या लागलीच लक्षात आले की बलरामाच्या मनाचा पूर्ण निश्चयच झालेला आहे. सुभद्रेसाठी दुर्योधनाशिवाय दुसऱ्या कोणाचाही विचारसुद्धा करण्याची बलरामाची आता मनःस्थिती नाही. तेव्हा बलरामाशी सध्या काहीही बोलणे शक्यच नाही. त्याने उगीचच वाद वाढणार आणि बलराम त्याच्या भूमिकेशी आणखीनच चिकटून राहणार. म्हणूनच कृष्णाने काहीही न बोलता स्वस्थ राहण्याचा निर्णय घेतला आणि तो मुकाटपणे बलरामाच्या मागोमाग बलरामाच्या महालात गेला.



बलरामाने पाठवलेल्या निरोपानुसार रुक्मिणी व सुभद्रा या त्याच्या महालात येऊन दाखल झाल्या. बलरामाची पत्नी रेवती तेथे हजर होतीच. बलरामाने कशासाठी बोलावले आहे याची कोणालाच काहीही कल्पना नव्हती. कृष्णाच्या तेथे हजर असण्यामुळेही त्या सर्वांची उत्सुकता अधिकच वाढली होती. परंतु बराच वेळ कोणीच मुद्द्याचे बोलत नव्हते. नुसतेच व्यक्तिगत ख्याली खुशाली व जरा इकडचे तिकडचे बोलणे होत होते. त्यामुळे सर्वांच्याच मनात थोडासा ताण निर्माण झाला होता आणि तो तेथील वातावरणात जाणवतही होता. सर्वजण आपापसात थोडेसे बोलत होते आणि हसतही होते. परंतु त्यामध्ये मनाचा मोकळेपणा नाही हे सर्वांच्याच लक्षात येत होते. शेवटी बलरामानेच मुख्य विषयाला हात घातला आणि बोलावयास सुरुवात केली,

"तुम्हाला सर्वांनाच थोडेसे आश्चर्य वाटत असणारच आणि येथे सर्वांना का व कशासाठी बोलावले आहे, असा विचारही तुमच्या मनात येत असेलच. पण काळजी करण्याचे तसे काहीच कारण नाही. एक सुखद व शुभद गोष्ट सांगण्यासाठीच मी तुम्हा सर्वांना येथे बोलावलेले आहे. आपली सुभद्रा उपवर झालेली आहे हे तुमच्या सर्वांच्याच लक्षात आलेले असेलच. तेव्हा तिच्यासाठी योग्य असा वर शोधणे आता आवश्यक आहे. अर्थात तिचा नियोजित वर हा आपल्या यदुकुळाला साजेसा आणि सुभद्रेला शोभेसा असा कुलवान, गुणवान व धनवान असावा हे तर निश्चितच. सुभद्रेला जन्मभर ऐश्वर्य व सर्व सुखे प्राप्त व्हावीत अशीच आपल्या सर्वांची मनापासूनची इच्छा आहे. सुदैवाने तसा सुयोग्य वर आमच्या नजरेसमोर आहे. मगाशीच मी व कृष्ण या दोघांनी मिळून या गोष्टीवर पुष्कळशी चर्चा अगदी मनमोकळेपणाने केली. कृष्णाने त्याच्या मनातील विचार माझ्यासमोर मांडले आणि मीही माझे विचार त्याला पटवून दिले. सुभद्रेच्याही भावनांचा आम्ही विचार केला. पण तिचे मन अपरिपक्व असल्यामुळे तिचे हित ती जाणू शकत नाही. म्हणूनच ती जबाबदारी आमची आहे. एखादे वेळेस भावनेच्या भरात सुभद्रेच्या मनाचा तोल जाणे शक्य आहे. पण अशाच वेळी तिला वेळीच सावरून तिच्या हिताचा मार्ग दाखवणे अत्यंत आवश्यक आहे. तेव्हा मी व कृष्ण या दोघांनी पूर्ण विचार करून सुभद्रेसाठी पती म्हणून दुर्योधनाची निवड केलेली आहे. कुल, शील व संस्कार या सर्वच दृष्टीने कुरूकुळाशी आपल्या यदुकुळाचे संबंध येणे हे अत्यंत योग्य व उचित आहे या विषयी आम्हा दोघांची पक्की खात्री झालेली आहे. रूप, गुण व पराक्रम इत्यादी सर्वच अंगांनी दुर्योधन हाच सुभद्रेला शोभेसा आहे असे आम्हाला पूर्ण विचारांती पटलेले आहे. तेव्हा आपण सर्वांनी मिळून सुभद्रेच्या जीवनात घडत असलेल्या या शुभ व आनंददायी घटनेचे स्वागत करून तिचे अभिनंदन करू या."

असे म्हणून बलराम सुभद्रेच्या जवळ गेला आणि त्याने तिचा हात हातात घेऊन तिच्या मस्तकावर हलकेच थोपटले. खरे तर, बलरामाच्या अशा अनपेक्षित बोलण्याने सर्वांनाच आश्चयर्य वाटले आणि धक्काही बसला. कृष्णही चकितच झाला. कारण बलराम एकदम असे निर्णायक बोलेल असे कृष्णालाही वाटले नव्हते. बलरामाने तर आता बोलायला काही जागा किंवा काही वावच ठेवला नव्हता. रूक्मिणीही एकदम अवाक् होऊन कृष्णाकडे पाहत राहिली. पण कृष्ण काहीही न बोलता स्वस्थच राहिला होता. त्याच्या मुखावरून त्याच्या मनातील विचारांचा काहीच थांगपत्ता लागत नव्हता. पण सर्वांत केविलवाणी अवस्था झाली होती ती सुभद्रेची. बिचारी खाली मान घालून कावऱ्याबावऱ्या नजरेने इकडे तिकडे पाहत होती आणि डोळ्यात आलेले पाणी लपवण्याचा अयशस्वी प्रयत्न करीत होती. शेवटी न राहवून तिने रूक्मिणीच्या कुशीत शिरून तिचे तोंड लपवले. रेवती मात्र एकदम उत्साहित झाली आणि तिने सुभद्रेच्या जवळ जाऊन कौतुकाने तिची पाठ थोपटली. एकंदर परिस्थितीचा अंदाज घेऊन कृष्णाने सूचक नजरेने रूक्मिणीकडे पाहिले. रूक्मिणीनेही कृष्णाची सूचना ओळखली आणि सुभद्रेला बरोबर घेऊन ती तिच्या महालाकडे निघाली. कृष्ण बलरामाशी बोलण्याचा काही प्रयत्न करणार तेवढ्यात बलरामाने कृष्णाला 'आता नको' असे हाताच्या खुणेने सांगितले. मग कृष्ण काहीही न बोलता हळूहळू त्याच्या महालाच्या दिशेने चालू लागला.

कृष्ण जेव्हा त्याच्या महालात शिरला तेव्हा तेथील दृश्य पाहून त्याचेही मन कळवळलेच. सुभद्रा रूक्मिणीच्या कुशीत स्फुंदून स्फुंदून रडत होती आणि सुभद्रा तिची समजूत घालण्याचा प्रयत्न रूक्मिणी परोपरीने करीत होती. परंतु सुभद्रेचे रडणे काही थांबतच नव्हते. तेवढ्यात कृष्ण आल्याचे लक्षात आल्यावर सुभद्रा धावतच कृष्णाकडे गेली आणि त्याच्या खांद्यावर आपले डोके ठेवून पुन्हा रडू लागली. एका हाताने सुभद्रेचे डोळे पुसत आणि दुसऱ्या हाताने तिच्या मस्तकावर थोपटीत कृष्णही तिचे सांत्वन करण्याचा प्रयत्न करीत राहिला. पण मनातून कृष्ण हे जाणून होता की सुभद्रेची समजूत घालणे केवळ कठीण नाही तर अशक्यच आहे. कारण दुसऱ्या कशानेही सुभद्रेच्या मनाची समजूत पटणे शक्यच नव्हते. पण तरीही सुभद्रेशी बोलणे आवश्यक आहे हे कृष्ण समजून होता. म्हणून मग त्याने हळुवार शब्दाने सुभद्रेशी बोलावयास सुरूवात केली,

"अगं सुभद्रे, आता तुझा शोक आवर बघू. असे किती वेळ तू दुःख करीत बसणार आहेस? रडून रडून तुझे डोळे बघ कसे अगदी लाल लाल झाले आहेत. तुझ्या मनाच्या वेदना मला कळत का नाहीत? परंतु माझाही अगदी नाईलाजच होत आहे. तुझ्या मनातील अर्जुनाविषयीची प्रेमभावना मी दादांपर्यंत निश्चितच पोचवली. परंतु ते त्यासंबंधी काहीही विचार करायला मुळी तयारच नाहीत. कारण

त्यांच्या मनात दुर्योधनाविषयीचा विचार अगदी पक्का झालेला आहे आणि त्यासंबंधी काहीही बदल करण्याची त्यांची मनःस्थिती अजिबात नाही. तुझ्या मनातील प्रेमभावनेला ‘तरूण वयातील एक अल्लडपणा’ असे म्हणून त्यांनी लगेचच झिडकारून लावले. तुझ्या हित-अहिताची काळजी केवळ त्यांनाच आहे आणि तुझे हितही फक्त तेच जाणतात असा त्यांचा ठाम विश्वास आहे. तेव्हा त्यांच्या त्या निश्चयापासून दादांना दूर करता येणे आता कोणालाच शक्य होणार नाही. अगदी मला सुद्धा! दादांच्या मनात अर्जुनाविषयी कोणताही नकारात्मक विचार किंवा राग अगदी जराही नाही. पण दुर्योधनाविषयी त्यांना अधिक आपलेपणा वाटत आहे हे उघडच आहे. म्हणून सुभद्रे, माझे तुला एकच सांगणे आहे की प्राप्त परिस्थितीत आपण सर्वांनीच दादांनी घेतलेल्या निर्णयाला मनापासून स्वीकारलेच पाहिजे. कारण त्याला दुसरा कोणताही पर्यायच उपलब्ध नाही.”

कृष्णाच्या अशा सांत्वनपर बोलण्याने सुभद्रेचे रडणे थांबले तर नाहीच, उलट तिला रडण्याचे अधिकाधिक उमाळे येऊ लागले आणि कृष्णापासून दूर जाऊन ती रुक्मिणीच्या कुशीत शिरून स्वतःचे तोंड लपवून बसली. सुभद्रेची ती अवस्था रुक्मिणीलाही सहन होईना आणि न राहवून ती कृष्णाला म्हणाली,

“अहो, तुम्ही असे कसे करता? तुम्हीच जर असे म्हणायला लागलात तर मग सुभद्रेने आशेने पहायचे तरी कोणाकडे? तिला तुमचा केवढा भरवसा व आधार वाटत होता. आता जर तुम्हीच अशी नाईलाजाची भाषा बोलायला लागलात तर तिने मग जायचे तरी कोणाकडे? तुम्ही तिच्यासाठी काहीतरी निश्चित करालच अशी तुमच्याविषयीची पूर्ण खात्री सुभद्रेने बाळगली होती, यात तिची काय चूक आहे बरे? तुम्ही जर मनात आणलेत तर तुम्ही अजूनही सुभद्रेची कोणत्या ना कोणत्या प्रकारे मदत नक्कीच करू शकता असा विश्वास माझ्याही ठिकाणी आहे. प्रश्न फक्त तुम्ही मनावर घेण्याचा आहे आणि तुम्ही आता मनावर घेतलेच पाहिजे. कारण कोणत्याही परिस्थितीत आपण सुभद्रेला एकटे सोडू शकत नाही. तिला दिलेला शब्द व आश्वासन आपण काही झाले तरी पाळलेच पाहिजे. कारण हा सुभद्रेच्या पुऱ्या आयुष्याचा प्रश्न आहे हे लक्षात ठेवा.”


रूक्मिणी असे बोलून थांबली आणि कृष्णाच्या बोलण्याची वाट पाहत त्याच्याकडे अपेक्षित नजरेने पाहत राहिली. सुभद्राही कृष्णाकडे मोठ्या आशेने बघत होती. परंतु कृष्ण मात्र काहीही न बोलता बराच वेळ स्वस्थच राहिला. जसा जसा वेळ जाऊ लागला तशी तशी सुभद्रा अधिकाधिक मोठ्याने स्फुंदू लागली. सुभद्रेची ती केविलवाणी अवस्था पाहून कृष्णाचेही मन द्रवले आणि सुभद्रेशी बोलणे

त्याला भागच पडले. कृष्णाने सुभद्रेशी समजावणीच्या शब्दात बोलण्यास सुरूवात केली,

“अगं सुभद्रे, अशी निराश व हवालदिल होऊ नकोस. तुझी अशी ही दयनीय अवस्था पाहून मला अत्यंत वाईट तर निश्चितच वाटते. परंतु मीही अगतिक असल्यामुळे तुझी काहीच मदत करू शकत नाही हेही खरेच आहे. काही झाले तरी दादा हे आपले ज्येष्ठ बंधू आहेत. त्यामुळे त्यांचे सांगणे हेच आपल्यासाठी अंतिम आहे. त्यांच्या शब्दाचा मान राखणे हे आपणा सर्वांचेच कर्तव्य आहे. त्यांचा शब्द डावलणे म्हणजे प्रत्यक्ष दादांचाच अवमान करण्यासारखे आहे आणि ते माझ्याकडून कधीही घडणे शक्यच नाही. तेव्हा आता तूच तुझ्या मनाची समजूत घालून त्या मनाला सावर आणि मनाची तयारी कर. आम्ही सर्वजण तुझ्या केवळ पाठीशीच नव्हे, तर तुझ्या सोबतही आहोत याची पूर्ण खात्री बाळग. सुभद्रे, तुला एकच सांगतो की त्या परमेश्वरावर श्रद्धा ठेव आणि त्याचाच भरवसा धर. त्याच्याच कृपेने सर्वकाही अगदी व्यवस्थित व नीट होईल. त्या परमेश्वराच्या सत्तेत जे काही घडेल ते सर्व योग्य व चांगलेच असेल आणि तुझ्या हिताचेही असेल, असा दृढ विश्वास मनात बाळगून रहा. आता मन शांत ठेव आणि तुझ्या पूर्वीच्या उत्साहाने जीवन जगण्यास सुरूवात कर बघू.”

कृष्णाचे बोलणे ऐकून सुभद्रा शांत तर झाली नाहीच, उलट अधिकच व्याकूळ झाली. पण आता मात्र तिच्या अगतिकतेचे रूपांतर रागावण्यातच झाले आणि थोडीशी चिडूनच ती कृष्णाला म्हणाली,

“अरे कृष्णा, तुम्ही माझी समजूत घालण्याचा कितीही प्रयत्न केलात तरी ती तशी कधीही पटायची नाही हे लक्षात ठेवा. आधी तू व रूक्मिणी वहिनीनेच माझे मन जाणून घेतलेत. त्यानंतर माझ्या मनातील भावनाही तुम्हीच जोपासलीत. एवढेच नव्हे, तर माझी भावना योग्यच आहे असे मला सांगून ती तुम्ही वाढवलीतही. माझ्या मनातील भावनेची पूर्ती करण्याचे आश्वासनही तुम्हीच मला दिलेत आणि आता त्या प्रेमभावना मी विसरून जाव्यात असे तुम्हीच मला खुशाल सांगत आहात. कृपा करून असे माझ्या भावनांशी खेळू नका. मला ते अजिबात सहन होत नाही. माझ्या मनाच्या झालेल्या कोंडमाऱ्यामुळे माझा जीव अगदी गुदमरून गेला आहे आणि माझे मस्तकही नुसते भणभणून राहिले आहे. मी तुमचा व विशेषतः कृष्णा, तुझा भरवसा धरला होता ही माझी चूकच होती हे आता माझ्या लक्षात आलेले आहे. तेव्हा तुम्हाला माझी मदत करता येणे शक्य नसेल तर करू नका. परंतु मला ‘ईश्वरावर भरवसा ठेव’ असा उपदेशही करू नका. त्याने माझ्या मनाला अधिकच त्रास होत आहे.



कृष्णा, दुसऱ्याला उपदेश करणे ही अत्यंत सोपी गोष्ट आहे. पण जेव्हा गोष्टी स्वतःवर येतात ना, तेव्हा मात्र या सर्व विषयांचा सोयीस्करपणे विसर पडतो. काय तर म्हणे, ‘सुभद्रे, दादांचा मान व आदर ठेवून त्यांच्या निर्णयाला संमती दे. त्यांच्याही ठिकाणी तुझ्या हिताचाच विचार आहे हे लक्षात ठेव.’ मग कृष्णा, मी तुला विचारते की असाच सल्ला तू रूक्मिणीवहिनीला का बरे दिला नव्हतास? तिच्या ज्येष्ठ बंधूंनी म्हणजे तिच्या दादांनीही तिच्यासाठी त्यांच्या दृष्टीने योग्य असा वर निवडला होताच की! चांगला रूपवान होता, धनवानही होता की! काय कमी होते त्याच्यामध्ये? हां, त्याचे चारित्र्य वगैरे थोडेसे खराब होते एवढेच. पण तेवढे चालायचेच. त्याच्याकडे कानाडोळा करून रूक्मिणी वहिनीनेही तिच्या ज्येष्ठ बंधूचा निर्णय मानायला नको होता का? तसा उपदेश तू वहिनीला केला होतास का? नाही ना? का हा कटू उपदेश फक्त खास माझ्यासाठीच राखून ठेवला होतास?


कृष्णा, लहान तोंडी मी मोठा घास घेत आहे याची मला कल्पना आहे. त्याबद्दल मला क्षमा कर. पण मला मोकळेपणाने बोलू दे. आता स्वस्थ बसणे मला शक्य नाही. तुमच्या विवाहाचा साद्यंत इतिहास मला एकदा रूक्मिणीवहिनीनेच सांगितला होता. तिचे मन कसे तुझ्या ठायी जडले, तिच्या मनातील प्रेमभावना तिने केवढीतरी जोखीम पत्करून पत्ररूपाने तुला कशी कळवली, हे सर्व सर्व मला वहिनीने सांगितले आहे. त्या वेळेस कृष्णा, तू तिला विरोध तर केला नाहीसच. उलट तिच्या प्रेमाचा स्वीकार करून तिलाही पत्ररूपाने तसे कळवलेस. एवढेच नव्हे, तर पुढे वहिनीने आखलेल्या योजनेनुसार तू स्वतः कुंडीनपुराला गेलास आणि तिला तेथून पळवून आणलेस. त्यासाठी तू तिच्या ज्येष्ठ बंधूचा प्रतिकारही मोडून काढून त्याला नामोहरम करायलाही कमी केले नाहीस. हे सर्व खरे आहे ना? मग केवळ माझ्यासाठीच वेगळे नियम का बरे लावले जात आहेत? असे दुटप्पी धोरण व वागणे असलेल्यांकडून मला कुठल्याही न्यायाची वा मदतीची जराही अपेक्षा मुळीच नाही. तुमच्या कोणाच्याही कोरड्या उपदेशाची वा सल्ल्याची मला अजिबात जरूरी नाही. आता काय व कसे करायचे हे माझे मी पाहीन, नाहीतर जर सर्व असह्यच झाले तर मी माझा जीवही द्यायला कमी करणार नाही हे मी तुम्हाला आत्ताच निक्षून सांगून ठेवते.”

असे रागारागाने बोलत व डोळ्यातून ओघळणाऱ्या अश्रूंना आपल्या हाताने पुशीत पुशीत सुभद्रा कृष्णाच्या महालातून निघून गेली. तिच्या मागे धावणाऱ्या रूक्मिणीला कृष्णाने हाताच्या खुणेनेच थांबवले.

मागे परतून रूक्मिणी कृष्णाकडे पाहत उभी राहिली. पण कृष्ण हा स्वस्थच होता. कृष्णाला काही विचारण्याचा प्रयत्नही रूक्मिणीने केला नाही. कृष्णाचे अंतःकरण जाणून असलेली रूक्मिणी ओळखून होती, की कृष्ण जरी बाह्यांगाने स्वस्थ दिसत असला तरी त्याच्या ठिकाणी अंतरात निश्चितच अस्वस्थता आहे. सुभद्रेची आर्तता ही कृष्णाच्या ठायीही असणारच आणि सुभद्रेला व अर्जुनाला दिलेला शब्द कोणत्याही परिस्थितीत तो पूर्ततेला नेणारच, याची खात्री रूक्मिणीच्या ठायी पक्केपणाने होती. त्याच्या स्वभावानुसार, त्याच्या पद्धतीने कृष्ण या सर्वातून नक्कीच मार्ग काढेल याचा पूर्ण विश्वास रूक्मिणीला होता. ‘योग्य वेळी कृष्ण आपल्याला विश्वासात घेऊन सर्वकाही सांगेलच’ हे पूर्वानुभवाने रूक्मिणीला माहित होते. त्यामुळे रूक्मिणीही त्या वेळेची वाट पाहत स्वस्थ राहिली. परंतु तिच्या ठिकाणी सुभद्रेविषयीची अत्यंत काळजी मात्र निश्चितच लागून राहिली होती हेही खरेच होते.”

ओघवत्या वाणीने अखंडपणे बोलत असणारा नारद मुद्दामहूनच थोडा वेळ थांबला. लक्ष्मी एवढा वेळ श्रवण करीत होती खरी, परंतु बराच वेळ झाला तरी तिच्याकडून कोणत्याही प्रकारची काहीच प्रतिक्रिया प्रगट झाली नाही, याचे नारदालाही थोडेसे नवलच वाटले. म्हणूनच नारदाने जाणूनबुजूनच त्याचे बोलणे थांबवले आणि तो लक्ष्मीकडे अपेक्षित नजरेने पाहत राहिला. नारदाच्या पाहण्याचा अर्थ लक्ष्मीच्याही लगेचच लक्षात आला. नारदाकडे पाहून स्मितहास्य करीत मग लक्ष्मीने बोलावयास सुरुवात केली,

“अरे नारदा, तू बोलायचा का थांबलास हे मला माहित आहे. बराच वेळ श्रवण करीत असूनही मी तुला काहीच प्रश्न कसा विचारला नाही, या गोष्टीचेच तुला नवल वाटत असणार, होय ना? अरे, माझ्या मनात प्रश्न येत नाहीत असे नाही. परंतु काही प्रश्नांची उत्तरे माझी मलाच मिळतात तर काही प्रश्नांची उत्तरे तुझ्या बोलण्यातूनच लगेच मिळतात. पण तरीही त्या निमित्ताने माझ्याकडून काहीतरी बोलणे घडावे आणि तुझ्या सांगण्यात माझाही सहभाग व्हावा ही तुझी अपेक्षा अगदी रास्तच आहे. कारण अशा संवादातूनच तुझ्या बोलण्याच्या मुळाशी असलेल्या भावाशी माझे समरस होणे घडेल. त्यामुळेच तुझ्या आनंदाचा अनुभव मला जाणता येईल आणि चाखताही येईल. तुझ्या अनुभवाचा आनंद मला सेवन करावयास मिळत आहे हे माझे परम भाग्यच आहे. परंतु माझ्या अनुभवाचा आनंद प्राप्त करून घेणे माझ्यासाठी शिल्लक राहतेच. ती आर्तता माझ्या ठायी असावी अशी आर्तता तुझ्या ठिकाणी आहे. नाहीतर, श्रवणसुखाच्या नादात माझ्या मनाला सुस्ती येईल अशी काळजी तुझ्याठायी आहे हे मी जाणून आहे. म्हणूनच तू मला



संवादाला उद्युक्त करीत आहेस, होय ना? खरोखरीच हे तुझे माझ्यावर अनंत उपकार आहेत.

नारदा, काय आहे ना, जेव्हा कृष्णप्रेमाच्या कथा व प्रसंग सर्व सुरळीतपणे घडत असतात तेव्हा माझे मन निश्चितच सुखावते हे खरेच आहे. पण जेव्हा जेव्हा प्रसंगात काही अडचणी व अडथळे निर्माण होतात तेव्हा मात्र मी लगेचच सावध होते आणि मग माझ्या मनाला विचार करणे भागच पडते. परंतु एक गोष्ट निश्चित आहे की आता त्या विचारांचा मनात गुंता होत नाही. कारण विचार करण्याची निश्चित दिशा माझ्या मनाला माहित आहे आणि त्यासाठी माझे मन कृष्णाकडेच पाहू लागते. पण ते पाहणे रूक्मिणीच्या दृष्टीने घडते आणि म्हणून मग माझ्या मनातील प्रश्नांचे उत्तरही लगेचच मिळते.

नारदा, एक गोष्ट निश्चितच आहे की ज्या अर्थी कृष्णाने सुभद्रा व अर्जुन यांच्या बाबतीत स्वतःहून पुढाकार घेतला होता, त्या अर्थी तो त्याची पूर्ती हर तऱ्हेने व हर प्रयत्नाने करणारच. कुठल्याही अडचणी येवोत व काहीही अडथळे येवोत, सुभद्रा व अर्जुन यांची पाठराखण कृष्ण शेवटपर्यंत करीत राहणार याची तर मला पूर्ण खात्री आहे. म्हणूनच जेव्हा बलरामच सुभद्रा व अर्जुन यांच्या विवाहाला विरोध करू लागला, तेव्हा कृष्णाने स्वस्थ राहून बलरामाला पाठिंबा दाखवला असे जरी सकृत्दर्शनी दिसले, तरी कृष्णाचा तो निर्णय धोरणात्मक होता हे माझ्या लगेचच लक्षात आले. कारण कृष्ण आपल्या प्रेमीजनांची साथ कधीच सोडत नाही हे मी पूर्णपणे जाणून आहे. कृष्ण प्राप्त परिस्थितीतून निश्चितच काहीतरी मार्ग काढणार याची मला पूर्ण निश्चिती आहे. अशीच निश्चिती रुक्मिणीच्या ठिकाणीही होती. म्हणूनच तिला जरी साहजिकच काळजी वाटत होती, तरी मनातून मात्र रुक्मिणी पूर्णपणे निश्चिंत होती. रुक्मिणीच्या ठायी असलेला हा कृष्णाविषयीचा भरवसा तिच्या स्वानुभवातून निर्माण झालेला होता. परंतु सर्वात महत्त्वाची एक गोष्ट मला जाणवली आणि ती म्हणजे कृष्णाचे मनोगत जाणून घेण्याचा जराही प्रयत्न न करता रुक्मिणी स्वस्थ राहिली. कृष्ण त्याचे मन स्वतःहून मोकळे करण्याची रुक्मिणी वाट पाहत राहिली, हेच रुक्मिणीच्या कृष्णावरील भक्तिभावाचे लक्षण होते आणि त्याचेच महत्त्व मला विशेषत्वाने जाणवते.


हे नारदा, सुभद्रेचाही कृष्णावरती अत्यंत विश्वास होता आणि साहजिकच तिला फक्त कृष्णाचाच आधार वाटत होता. तिचेही कृष्णावर प्रेम होते, पण त्या प्रेमात कृष्णाकडून अपेक्षाही होत्या. त्यामुळे अपेक्षाभंगाचे दुःख तिला एवढे झाले की ते तिच्या कमकुवत मनाच्या सहनशक्तीच्या पलीकडे गेले. सुभद्रेच्या मनाच्या ठिकाणी रागापेक्षा असहाय्यता अधिक निर्माण झाली आणि त्याचेच रूपांतर साहजिकच तिच्या चिडचिडीत झाले. पण त्या भरातही तिने कृष्ण व रुक्मिणी

यांच्या विवाहाचा जो उल्लेख केला तो मात्र योग्यच होता. त्या गंभीर परिस्थितीतही मला तर ते सर्व ऐकताना गंमतच वाटत होती. थोडावेळ कृष्णही निरुत्तरच झाल्यासारखा दिसला ना? मला अगदी खात्री आहे की कृष्ण व रुक्मिणी या दोघांनाही सुभद्रेच्या त्या बिनतोड मुद्द्याची मौजच वाटली असणार. परंतु प्रसंगातील गांभीर्य ओळखून तेही शांत व गंभीर राहिले असतील इतकेच. ते असू दे! नारदा, कृष्णाने पुढे प्रत्यक्ष काय व कसे केले, की जेणेकरून सुभद्रा व अर्जुन यांचा विवाह झाला? कृष्णाने ज्यांना आपले मानले त्यांच्या सुखासाठी कृष्णाने काहीही केले असेल, याची मला पक्की खात्री आहेच. पण त्या सर्वांचा इतिहास तुझ्या मुखातून, प्रेमरसाने भरलेल्या वाणीद्वारे प्रगट व्हावा आणि त्यामध्ये मी मनसोक्त डुंबावे याचीच उत्कंठा माझ्याठायी वाढून राहिली आहे. तेव्हा तू आता त्वरित तुझ्या वाणीचा ओघ प्रगट करावास अशी मी तुला प्रेमपूर्वक प्रार्थना करते.”

लक्ष्मीच्या बोलण्यावर नारदाने संतोषाने मान डोलावली आणि क्षणार्धात् त्याच्या वाणीतून कृष्णकथेमधील पूर्णपणे भरून राहिलेले सगुण प्रेम वाहू लागले,

“हे लक्ष्मी, तुझे म्हणणे अगदी बरोबरच आहे. सुभद्रेने जो कृष्णाचा भरवसा धरला होता तो योग्यच होता. परंतु ती कृष्णाचे माहात्म्य जाणत नसल्यामुळे तिच्याठायी कृष्णाविषयी पूर्ण विश्वास नव्हता. जेव्हा तिने धरलेल्या भरवशालाच धक्का लागला तेव्हा साहजिकच तिचे मन डळमळले आणि तिच्या त्या असहाय्य अवस्थेतून तिच्या मनाचा प्रक्षोभ झाला. परंतु रूक्मिणी कृष्णाचे माहात्म्य जाणून असल्यामुळे तिच्या ठायी कृष्णाविषयीचा विश्वास पूर्णपणे होता. म्हणून ती कृष्णाचा पुढील खेळ व चाल याची आतुरतेने वाट पाहत राहिली. कृष्णाला अपेक्षित अशा योग्य वेळेस त्या खेळात सहभागी होण्यासाठी रूक्मिणी तयार होऊन राहिली ही गोष्ट महत्त्वाची आहे. कारण तेच तर तिच्या ठायीच्या भक्तिभावाचे लक्षण होते. पण तूही त्या प्रसंगात कृष्णाकडे रूक्मिणीच्याच दृष्टीने पाहत आहेस याचे मला अत्यंत अप्रूप वाटते. कारण तुझ्या ठायी निर्माण झालेल्या भक्तिभावाचेच ते लक्षण आहे. महात्म्यांच्या अंतःकरणाच्या अवस्थेलाच एकीएक प्रमाण मानून त्याचाच ध्यास धरणे आणि तेच व्यवधान स्वतःठायी नित्य जागृत ठेवून राहणे हेच तर सगुणभक्तीचे सहज लक्षण आहे.

*****



# कृष्णाची युक्ती

हे लक्ष्मी, कृष्णाविषयी जी खात्री व विश्वास रूक्मिणीला वाटत होता तो योग्यच होता. कारण कृष्णाच्या अंतःकरणात तसे विचार खरोखरीच चालू होते. सुभद्रा व अर्जुन यांचा विवाह कोणत्याही परिस्थितीत लावून तर द्यायचा होताच. फक्त ते के करावे याच खोल विचारात कृष्ण गढून गेला होता. एका बाजूला ज्येष्ठ बंधू म्हणून बलरामदादा यांचा हट्ट, तर दुसऱ्या बाजूला आवडती बहीण सुभद्रा हिला दिलेला शब्द. अशा दुविधा परिस्थितीतून कृष्ण मार्ग शोधून काढण्याचा प्रयत्न करीत होता. नात्यापेक्षाही सुभद्रेची बाजू योग्य व न्याय्य आहे याची खात्री कृष्णाला होती आणि म्हणूनच कृष्ण सुभद्रेच्या बाजूने ठामपणे उभा राहिला होता. पण त्याचबरोबर सुभद्रा व अर्जुन यांना प्रत्यक्ष मदत करणेही अत्यंत आवश्यकच होते. कारण केवळ त्यामुळेच सुभद्रा व अर्जुन यांचा विवाह शक्य झाला असता. हा पेच सोडवण्यासाठी काहीतरी डावपेच लढवणे जरूरीचे होते आणि त्यासंबंधीचे विचार कृष्णाच्या मनात प्रकर्षाने चालू होते.

हे लक्ष्मी, कृष्णासमोरील प्रश्न अत्यंत नाजूक होता हे खरेच आहे. कारण बलराम हा काही शत्रू नव्हता, की त्याला काहीही करून नामोहरम करायचे होते. बलरामाला हरवायचेही नव्हते. पण कार्य साधायचे होते तेही अगदी हळुवार पद्धतीने आणि कोणाच्याही नकळत, हे अत्यंत महत्त्वाचे होते. कार्य साधण्यासाठी साम, दाम, दंड व भेद असे उपचार सांगितले आहेत. पण या ठिकाणी काहीतरी युक्तीच करावयास हवी आहे हे कृष्णाच्या लक्षात आले होते आणि त्याच विचारात कृष्णाचे मन पूर्णपणे बुडून गेले होते.

हे लक्ष्मी, विचार करता करता कृष्णाच्या मनात हळूहळू एक योजना साकार होऊ लागली होती. त्यासाठी त्याने प्रथम अर्जुनालाच विश्वासात घेतले. कृष्णाने आधी अर्जुनाला सर्व परिस्थिती नीट समजावून सांगितली आणि म्हणाला,

"अरे अर्जुना, आताच खरी तुझ्या सुभद्रेवरील प्रेमाची कसोटी आहे. सुभद्रेचे व तुझे मन एकमेकांवर पूर्णपणे जडले आहे. पण प्रयत्नाचा भाग मात्र पूर्णपणे केवळ तुझ्याकडूनच घडावयास हवा. त्याबाबतीत सुभद्रा ही हतबलच आहे. कारण ती कौटुंबिक व सामाजिक बंधनाच्या चौकटीत पूर्णपणे जखडली गेली आहे. त्यातून तिला सोडवून तिच्याशी तुला विवाह करण्यासाठी आता केवळ एकच मार्ग मोकळा आहे आणि तो म्हणजे सुभद्रेला पळवूनच नेऊन तिच्याशी विवाहबद्ध होणे. त्यासाठी माझ्या मनामध्ये मी एक योजनाही निश्चित केली आहे. परंतु त्याची अंमलबजावणी मात्र तुला एकट्यालाच करावी लागेल. त्यामध्ये माझा कोणत्याही प्रकारे प्रत्यक्ष

सहभाग असणार नाही. कारण तुम्हाला उघडपणे पाठिंबा देणे म्हणजे दादांना विरोध करणे आणि ते जाहीरपणे करणे मला शक्य होणार नाही आणि तसे करणे योग्यही ठरणार नाही. परंतु एक आश्वासन मात्र मी तुला नक्की देतो की मी पडद्यामागूनची सर्व सूत्रे हलवीन आणि तुझ्यासाठी सर्व अनुकूल परिस्थिती निर्माण करीन. बोल, तयारी आहे का तुझी?”

कृष्णाच्या या बोलण्याने अर्जुन अगदी अचंबितच झाला. त्याचा त्याच्या कानांवर विश्वासच बसेना. कृष्ण त्याला असे काही करायला सांगेल असे त्याला कधी स्वप्नातही वाटले नव्हते. अर्जुनाची आत्तापर्यंतची जी पराक्रमांविषयीची कल्पना होती ती फक्त युद्धापुरतीच मर्यादित होती. पण कृष्ण त्याला आता जे दिव्य करायला सांगत होता ते जास्त कठीण होते. कारण त्यासाठी सर्वांना फसवावे व दुखवावे लागणार होते आणि त्या सर्वांमध्ये अगदी बलरामापासून ते त्याची माता व बंधू यांच्यापर्यंतचे अत्यंत प्रेमाचे व जवळचे असे सर्व संबंधित होते. अर्जुनाचे मन साहजिकच दोलायमान होऊ लागले. पण त्याच्यासमोर सुभद्रेचा दुःखी व केविलवाणा असा चेहरा येऊ लागला. तिच्या ठिकाणी असलेले अर्जुनावरील नितांत प्रेम आणि तिने अर्जुनाच्या तिच्यावरील प्रेमाचा धरलेला भरवसा याचे स्मरण अर्जुनाला झाले. अर्जुनाची विजिगीषु वृत्ती जागी झाली आणि त्याच्या मनाचा पुन्हा निश्चय झाला. पण त्याहीपेक्षा त्याला आधार व खात्री कृष्णाची वाटत होती. त्याच आधारे तो कृष्णाशी बोलू लागला,

“खरोखरीच हा माझ्या सुभद्रेवरील प्रेमाच्या कसोटीचा क्षण आहे आणि त्यासाठी मी पूर्णपणे तयार आहे. काहीही कारण सांगून मी माझ्या प्रेमाचा त्याग करणे हे चुकीचे व सुभद्रेसाठी अन्यायाचे होईल. तेव्हा आता मी त्याग करीन तो माझ्या प्रेमाचा नव्हे, तर तो त्याग माझ्या प्रेमासाठी असेल आणि तोही सर्वस्वी तू आमच्या पाठीशी उभा आहेस म्हणूनच घडेल हे शतप्रतिशत सत्य आहे. परंतु कृष्णा, प्रश्न असा आहे की, सुभद्रेला मी कसे पळवून नेणार आणि केव्हा? अरे, तू व बलरामदादा यांच्यासह सुभद्रा प्रत्यक्ष येथे तुमच्या राजवाड्यातच राहात असताना, आमची जेथे भेट होण्याचीही सुतराम शक्यता नाही तेथे मी सुभद्रेला पळवून कशी नेणार? मुख्य म्हणजे त्यासाठी मला बलरामदादांना विरोध करावा लागेल आणि यादवसेनेशी युद्धही करावे लागेल. त्यामुळे मला माझे बंधू व मातेसह अनेकांचा रोषही ओढवून घ्यावा लागेल. ही कल्पनाही मला सहन होऊ शकत नाही आणि तसा विचारही माझ्या मनाला स्पर्श करू शकत नाही. तेव्हा कृष्णा, दुसरा काहीतरी सोपा व सरळ मार्ग शोधून काढ. पण काहीही करून माझे व सुभद्रेचे मीलन मात्र निश्चितपणे करून दे आणि आपल्या मैत्रीला जागण्याचे कर.”

अर्जुनाच्या बोलण्यावर कृष्णाने स्मितहास्य केले. त्याने अर्जुनाच्या जवळ जाऊन त्याच्या खांद्यावर हात ठेवून प्रेमाने आश्वासनपूर्वक थोपटले आणि कृष्ण त्याच्याशी बोलू लागला,

“अरे मित्रा, अर्जुना, मी आपल्या मैत्रीला निश्चितपणे जागेन रे! तू तुझ्या सुभद्रेवरील प्रेमाला जागण्याचे कर म्हणजे झाले. कारण सुभद्रा ही पूर्णपणे तुझ्यावरतीच अवलंबून आहे हे लक्षात ठेव. ती बिचारी दुर्बल आहे आणि स्वतः काहीच करू शकत नाही. एवढेच नव्हे, तर मीही तिला प्रत्यक्षपणे काहीच मदत करू शकत नाही हेही सत्यच आहे. तेव्हा प्रत्यक्ष कृती करण्याची सर्व जबाबदारी तुझ्यावरतीच आहे आणि त्यात मात्र तू जराही कमी पडू नकोस. सर्व काही अत्यंत काळजीपूर्वक कर. आता त्यासाठी मी जी काही योजना ठरवली आहे ती तुला सांगतो. तू ती नीट लक्षपूर्वक ऐकून घे.


अर्जुना, त्यासाठी प्रथम तू एक गोष्ट कर. ‘पुण्यकर्म घडावे या हेतूने तीर्थाटनासाठी जात आहे’ असे तुझ्या घरी सांगून तू घराबाहेर पड. त्यानंतर दाढी, मिशा वाढवून आणि संन्याशासारखा बाह्य पोषाख करून यती बनल्याचे सोंग धारण कर. मग काही दिवसांनी मथुरेबाहेरील पर्वतामध्ये असलेल्या एखाद्या गुहेमध्ये वास्तव्यासाठी म्हणून ये. पुढे तुला लोकांमध्ये योग्य ती प्रसिद्धी मिळवून देण्याची व्यवस्था मीच करवून घेईन. एवढेच नव्हे, तर तुला खुद्द आमच्या राजवाड्यामध्येच मी आणून बसवीन. त्यानंतर पुढे गोष्टी काय व कशा घडतील हे तू नुसते बघत रहा. मी तुला कोणाच्यातरी मार्फत अप्रत्यक्षपणे वेळोवेळी सूचना करीत राहीनच. त्याप्रमाणे तू फक्त करीत रहा म्हणजे झाले. मग योग्य वेळ येताच सर्वांच्या नकळत तू सुभद्रेला येथून घेऊन जा. सुभद्रेच्या इच्छेनुसारच सर्व घडत असल्यामुळे तुला कोणताही दोष लागणार नाही. अर्थात दादांचा विरोध आहे हे खरे असले तरी गोष्टी प्रत्यक्ष युद्धाच्या थरापर्यंत जाणार नाहीत याची काळजी मी घेईन. ती पूर्ण जबाबदारी केवळ माझीच राहील. तू अजिबात काळजी करू नकोस. अर्जुना, मी काय सांगतो आहे हे तुझ्या सगळे नीट ध्यानात आले ना? आता जराही वेळ न दवडता पुढील हालचाली त्वरित सुरू कर बघू.”

कृष्णाचे बोलणे एवढ्या वेगाने घडत होते, की अर्जुनाला विचार करायलाही वेळ मिळत नव्हता. पण कृष्णाची योजना ऐकून अर्जुनही थोडासा गांगरलाच. ‘यतीचे सोंग आणून खुद्द राजवाड्यात आणि तेही सर्व परिचयाच्या मंडळींसमोर वावरायचे’ या कल्पनेनेच अर्जुनाच्या मनावर ताण निर्माण झाला. ‘चुकूनमाकून जर बिंग फुटले तर केवळ फजितीच होईल असे नव्हे, तर केवढातरी नामुष्कीचा प्रसंग

गुदरेल' या विचारानेच अर्जुन धास्तावला. असा धोका पत्करायला त्याचे मन तयारच होईना. आपल्या मनातील विचार प्रगट करण्यासाठी म्हणून अर्जुन कृष्णाशी काही बोलणार, त्या आधीच कृष्णाने हाताने खूण करून अर्जुनाला पुढे काहीही न बोलण्यास सांगितले. कृष्णाने स्वतःच्या छातीवर आत्मविश्वासाने हात ठेवला आणि अर्जुनाला एवढेच सुचवले की 'काहीही काळजी करू नकोस. सर्व जबाबदारी माझी आहे. तू आता फक्त तुझ्या प्रयत्नाला लाग.' कृष्णाच्या या सूचक कृतीतील भावार्थ अर्जुनाला जाणवला आणि त्याच्या मनाला थोडसा धीर आला. अर्जुनाने त्याच्या ठायीचे सर्व धैर्य एकवटले आणि कृष्णाचा हात आपल्या हातात घेऊन हलकेच दाबला. त्यातून कृष्णावरील पूर्ण विश्वासच अर्जुनाकडून प्रगट झाला. कृष्णाला त्याचे अत्यंत समाधान वाटले आणि अर्जुनाकडे पाहून कृष्णानेही आश्वासनपूर्वक स्मितहास्य केले. अर्जुनाने कृष्णाचा निरोप घेतला आणि तो त्याच्या मार्गाने निघाला.

हे लक्ष्मी, कृष्णाच्या सांगण्यावर विचार करीत करीतच अर्जुन हस्तिनापूरला परत गेला खरा, परंतु त्याच्या मनाचा ठाम निश्चय काही होत नव्हता. अर्जुनाचे मन पुन्हा पुन्हा कचरत होते आणि ते साहजिकच होते. त्यात अर्जुनाचा काहीच दोष नव्हता. त्याच्या मनाची वारंवार व्दिधा स्थिती होत होती. एकीकडे सुभद्रेच्या प्रेमाला व तिने अर्जुनावर ठेवलेल्या भरवशाला त्याला जागायचे होते, तर दुसरीकडे स्वकीय मंडळींना अंधारात ठेवून कृष्णाच्या गुप्त योजनेत सामील व्हायचे होते. 'दोन्ही बाजूच्या कुटुंबियांना असे फसवणे कितपत योग्य आहे' या विचारानेही अर्जुनाचे मन ग्रस्त होत होते. 'सुभद्रेच्या प्रेमात भावनावश होऊन आपले मन भलतीकडेच वाहत जात नाही ना, की ज्यामुळे आपण आपल्या कुटुंबियांपासूनही दूर जात आहोत' हा विचार अर्जुनाच्या मनाला सारखा सतावीत होता.

हे लक्ष्मी, परंतु जेव्हा त्याच्या मनात कृष्णाची मूर्ती आली आणि कृष्णाच्या प्रेमळ नजरेचे त्याला स्मरण झाले, तेव्हा मात्र अर्जुनाचे मन शांत व स्थिर झाले. ज्या अर्थी ही योजना कृष्णाने ठरवली आहे त्या अर्थी ती योग्यच असणार आणि त्याची परिणती शेवटी सर्वांनाच सुखदायी ठरेल असा पूर्ण विश्वास अर्जुनाच्या ठायी होता. अर्जुनाच्या मनात कृष्णाचे स्थान नेहमीच अग्रेसर होते. एक अत्यंत प्रेमाची व्यक्ती म्हणून, एक मार्गदर्शक म्हणून, एक हितचिंतक म्हणून आणि त्याहीपेक्षा एक परममित्र म्हणून अर्जुनाच्या जीवनात एकीएक कृष्णाचेच स्थान होते. ते स्थान दुसरे कोणीही घेणे कधीच शक्य नव्हते. कृष्ण हा अर्जुनाचे एकमेव प्रेमस्थान होते आणि बलस्थानही होते. कृष्णाच्या या अस्तित्वाचे अर्जुनाला प्रकर्षाने स्मरण झाले मात्र, त्याच्या मनाचा पूर्ण निश्चय झाला. सुभद्रेवरील प्रेमापेक्षाही कुटुंबियांच्या प्रेमाला



थोडावेळ का होईना, अर्जुनाकडून झुकते माप दिले जात होते खरे, परंतु कृष्णप्रेमाचे माप जेव्हा सुभद्रेवरील प्रेमाच्या पारड्यात पडले तेव्हा मात्र अर्जुनाच्या मनातील सुभद्रेच्या प्रेमाचे विचार भारी झाले. हा विजय अर्थातच अर्जुनाच्या ठायी असलेल्या कृष्णप्रेमाचाच होता एवढे मात्र निश्चित!


हे लक्ष्मी, अशा तऱ्हेने स्वकीयांविषयीच्या आपलेपणाच्या भावनेचे रूपांतर मोहामध्ये होत असतानाच, अर्जुन कृष्णप्रेमामुळे वेळीच सावरला आणि पुन्हा कृष्णप्रेमाने युक्त झाला. मग पुढील गोष्टी करायला त्याला मुळीच वेळ लागला नाही. सर्व प्रथम त्याने तीर्थाटनाला जाण्याचा त्याचा मनोदय धर्मराजाकडे व्यक्त केला. तो ऐकून धार्मिक वृत्तीच्या धर्मराजाला संतोषच झाला. त्या निमित्ताने अर्जुनाकडून काहीतरी पुण्यकर्म घडत आहे या विचाराने धर्मराजाने अर्जुनाला खुशीने लागलीच संमती दिली. अर्जुनाने नंतर कुंतीशी बोलून तिचीही समजूत घातली आणि सुरूवातीला तिची असलेली नाराजी कौशल्याने बाजूला केली. अर्जुनाने इतर सर्व बंधूंचीही योग्य ती समज करून दिली आणि सर्वांचा निरोप घेऊन तो हस्तिनापुराच्या बाहेर पडला. त्यानंतर मजल दरमजल करीत आणि एखाद्या यतीसारखा वेष धारण करून अर्जुन मथुरेच्या बाहेर असलेल्या एका पर्वतावरील गुहेमध्ये येऊन राहिला.

हळूहळू यतीवेषातील त्या अर्जुनाचा सर्वत्र बोलबाला होऊ लागला आणि मग त्याची ख्याती मथुरेपर्यंत जाऊन पोहोचायला जराही वेळ लागला नाही. ‘एक तेजस्वी व अधिकारी यती मथुरेच्या बाहेरील पर्वतामधील गुहेमध्ये राहत असून त्याच्या दर्शनाने व आशीर्वादाने सर्व आधी, व्याधी व पीडा नाहीशा होतात आणि सर्व मनोकामनाही पूर्ण होतात’ अशी बातमी सर्वत्र पसरली. साहजिकच अनेक प्रापंचिक व लाभार्थी लोकांची त्या यतीच्या दर्शनासाठी रीघच्या रीघ लागली. कृष्णानेही त्या यतीचा गाजावाजा एवढा करविला की त्या सर्व गोष्टी बलरामाच्याही कानावर सहजपणे आल्या. बलरामाची उत्सुकताही एवढी वाढली की तो स्वतः पत्नी रेवतीसह त्या यतीच्या दर्शनाला गेला. बलरामाला असे अचानकपणे समोर आलेले पाहून अर्जुनही सुरूवातीला एकदम गांगरलाच. परंतु धैर्य धरून अर्जुनाने यतीचे आणलेले सोंग एवढे उत्कृष्ट वठवले, की बलरामही अत्यंत प्रभावित झाला आणि त्याने तर अर्जुनाला साष्टांग प्रणिपातच केला. रेवतीच्याही काहीच लक्षात आले नाही. तिनेही त्याचे मनोभावे दर्शन घेतले. बलराम व रेवती यांना अर्जुनाचा जराही संशय आला नाही खरा, परंतु अर्जुनाला मात्र आतून चांगलाच दरदरून घाम फुटला होता. मनातल्या मनात कृष्णाचे वारंवार स्मरण करीत आणि उसने अवसान आणून, अर्जुन वरकरणी मात्र शांत राहण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होता.

हे लक्ष्मी, त्या ‘यतीचे’ दर्शन घेऊन बलराम जेव्हा मथुरा नगरीला परतत होता तेव्हा त्याच्या मनात काही वेगळाच विचार सुरू झाला होता आणि राजवाड्यात परतेपर्यंत बलरामाच्या ठिकाणी त्या विचाराचा निश्चयही झाला होता. त्याने त्याच्या महालात गेल्याबरोबर कृष्ण, रुक्मिणी व सुभद्रा यांना बोलावून घेतले. रेवती तर तेथे हजर होतीच. बलरामाने त्या सर्वांकडे एकवार पाहिले. त्या सर्वांच्याच मुखावरील उत्सुकतेचा भाव त्याने ओळखला आणि म्हणूनच जराही विलंब न करता त्याने बोलावयास सुरुवात केली.

“मी तुम्हा सर्वांना असे अचानक भेटावयास बोलावले म्हणून तुम्हाला नवल वाटणे अगदी साहजिकच आहे. परंतु त्याला कारणही तसेच महत्त्वाचे घडलेले आहे. आपण सर्वच जण एक गोष्ट पाहत आहोत, की सुभद्रेच्या विवाहाचा निर्णय आपण घेतल्यापासून ती अगदी निरुत्साहीच आहे आणि तेही थोडेसे साहजिकच आहे म्हणा. कारण हा निर्णय पूर्णपणे तिच्या मनासारखा नसल्यामुळे ती जराशी नाराजच आहे. तिचे मनःस्वास्थ्यही हरवल्यासारखे झाले आहे. त्यामुळेच तिचे शरीरस्वास्थ्यही वारंवार बिघडत आहे. तेव्हा आधी सुभद्रेचे मनःस्वास्थ्य परत आणणे महत्त्वाचे व आवश्यक आहे. म्हणजे मग तिचे शरीरस्वास्थ्यही सुधारेल आणि तिचे मनही पुन्हा उत्साहित होईल याची मला खात्री आहे.

खरे सांगायचे तर या दृष्टीने मी बराच काळ विचार करीत होतो. पण मला योग्य तो मार्ग काही सापडत नव्हता. ईश्वराच्या कृपेने आता मला या अडचणीतून सुटण्याची दिशा दिसू लागली आहे. आपल्या मथुरा नगरीच्या बाहेर असलेल्या पर्वतावरील एका गुहेत एक थोर महात्मा गेले कित्येक दिवस वास्तव्य करून राहिलेला आहे. त्याची कीर्ती सर्वत्र पसरलेली असून कित्येक भाविकांनी त्याच्या थोरवीचा अनुभव घेतलेला आहे. फक्त आपल्यालाच त्याची माहिती नव्हती हे नवलच आहे. पण जेव्हा ही बातमी माझ्या कानावर आली तेव्हा मी रेवतीसह प्रत्यक्ष त्या महात्म्याच्या दर्शनाला गेलो आणि माझी तर लगेचच खात्री पटली, की हा महात्मा म्हणजे कोणीतरी एक असामान्य व्यक्तिमत्त्व आहे. त्याच्या केवळ दर्शनानेच मी प्रभावित झालो आणि माझ्या मनाला केवढेतरी शांत वाटले. एक वेगळयाच प्रकारचे समाधानही मला लाभले. त्यामुळे मला अगदी निश्चयपूर्वक वाटत आहे की सुभद्रेलाही त्याच महात्म्याच्या दर्शनाने बरे वाटेल. एवढेच नव्हे, तर सुभद्रेकडून त्या महात्म्याची जर काही प्रत्यक्ष सेवा घडली तर त्याचे शुभफळही सुभद्रेला निश्चितपणे मिळेल. सुभद्रेच्या सध्याच्या मनःस्थितीचा विचार केला तर तिला अशाच प्रकारच्या पुण्यकर्माची नितांत जरुरी आहे, हे आपल्या सर्वांच्याच लक्षात येईल. त्यामुळेच तिचे मन शांत व स्थिर होईल आणि पुन्हा मूळ स्थितीला येईल. त्यासाठी ‘त्या यती महाराजांना सन्मानपूर्वक आपल्या राजवाड्यात आणून



येथे अंतःपुरातच वास्तव्य करण्याविषयी त्यांना विनंती करावी' असे मी ठरवले आहे. तुम्हा सर्वांनाही माझी ही योजना मान्य व पसंत होईल असा मला पूर्ण विश्वास वाटतो."

बलरामाचे बोलणे थांबले तेव्हा सर्वांच्याच चेहऱ्यावर आश्चर्याचे भाव पसरले होते. चकित झाल्यामुळे कोणालाच काय बोलावे हे सुचेनासे झाले होते. सुभद्रेच्या मनाला तर आणखीन एक धक्काच बसल्यासारखे झाले होते. या नव्या संकटाच्या जाणिवेने तिचे मुख अधिकच म्लान झाले आणि ती अगदी रडवेली झाली. तिची ती केविलवाणी अवस्था पाहून रूक्मिणीला तिची दया आली आणि तिने सुभद्रेच्या खांद्यावर अलगद थोपटले. तेव्हा मात्र आपल्या अश्रूंना आवरणे सुभद्रेला कठीण झाले आणि तिने रूक्मिणीच्या कुशीत आश्रय घेतला. रूक्मिणी मात्र मोठ्या आशेने व अपेक्षेने कृष्णाकडे एक टक नजरेने पाहून कृष्णाच्या मनाचा अंदाज घेत काहीही न बोलता स्वस्थ राहिली होती. कृष्णाच्या मुखावरून त्याच्या मनाचा काही अंदाज लागणे कठीणच दिसत होते. त्याच्या योजनेतील पहिली खेळी तर यशस्वी झाली होती हे जाणून त्याच्या मनाला नक्कीच हर्ष झाला असणार. पण तसे काहीही न दर्शविता कृष्णाचे मुख अधिकच गंभीर दिसू लागले आणि त्याने तेवढ्याच गंभीरतेने बोलण्यास सुरुवात केली.

"अहो दादा, तुमच्याठिकाणी सुभद्रेविषयीची असलेली एवढी काळजी पाहून माझे मन तर भरूनच येत आहे. तिच्या स्वास्थ्याचा व हिताचाच विचार तुमच्या मनात सतत असतो याचे मला मुळीच नवल वाटत नाही. कारण तुमचे मन किती संवेदनशील आहे हे मी माझ्या अनुभवाने जाणून आहे. आम्हा सर्वांचीच काळजी तुम्ही नेहमी करीत असता आणि आमच्या स्वास्थ्यासाठीच तुम्ही सतत प्रयत्नशील असता हे आम्ही जाणून आहोत. म्हणूनच सुभद्रेसाठी तुमचे मन तीळ तीळ तुटत आहे. सुभद्रेने तिच्या मनाच्या या अवस्थेतून लवकरात लवकर बाहेर येणे तर अत्यंत आवश्यकच आहे. त्यासाठी तिच्या मनाला काही वेगळ्या वातावरणात नेणे आणि काही वेगळ्या विषयांचा विचार करायला लावणे हेही जरुरीचे आहे. एखाद्या सत्पुरुषाचा सहवास व मार्गदर्शन सुभद्रेला लाभले तर त्याचा लाभ तिला निश्चितच होईल यात जराही शंका नाही. पण दादा, एखाद्या अनोळख्या व्यक्तीला, अगदी जरी ती व्यक्ती यती असली तरी, असे एकदम आपल्या राजवाड्यात आणि तेही अगदी थेट अंतःपुरातच आणून ठेवणे हे मला तरी प्रशस्त वाटत नाही.

दादा, मला क्षमा करा. पण मी थोडेसे स्पष्टच बोलतो. ज्या यती महाराजांची आपल्याला काहीच माहिती नाही त्यांच्यावर एकदम एवढा विश्वास ठेवणे मला तरी रास्त वाटत नाही. ही एक प्रकारची अंधश्रद्धाच होत नाही का? आपल्या

ठिकाणी त्या यतीविषयी अविश्वास असण्याचे जसे कारण नाही, तसे विश्वास ठेवण्यासाठी काहीतरी कारण असावयास हवे ना? की नाही? आपण सुभद्रेच्या दृष्टीकोनातून विचार करावयास हवा. आधीच तिची मनःस्थिती ठीक नाही. अशा वेळी एखाद्या परक्या व्यक्तीचा सहवास तिला करावयास सांगण्याने बिचाऱ्या तिच्या मनावरील ताण उगाचच आणखी वाढवल्यासारखे होणार नाही का? त्यातूनही तो यती तरूण आहे असेही मी ऐकून आहे. तेव्हा त्याचा काय भरवसा सांगावा? माझ्या मनातील हे प्रश्न मी अगदी मोकळया मनाने तुमच्यासमोर मांडत आहे. आता त्यावर तुम्हीच काय तो विचार करा.”

कृष्णाच्या या बोलण्याचा जो परिणाम बलरामावर होत होता, अगदी तोच कृष्णाला अपेक्षित होता. बलरामाचे मन त्याने घेतलेल्या निर्णयाशी अधिकच ठाम होऊ लागले. त्याचे लक्षण म्हणजे बलरामाच्या बोलण्यातील सूर थोडासा उंचावला आणि तीव्रही झाला. कृष्णाविषयीची नाराजी प्रयत्नपूर्वक लपवून ठेवीत बलराम कृष्णाला म्हणाला.

“अरे कृष्णा, सुभद्रेची काळजी केवळ तुलाच आहे असे समजून चालू नकोस. मीही तिचा बंधूच आहे आणि तोही ज्येष्ठ बंधू आहे हे तू विसरू नकोस. पण माझ्या ठिकाणी तुझ्यासारखी सुभद्रेची निव्वळ काळजीच नाही तर जबाबदारीही आहे हेही तू लक्षात ठेव. तसे म्हटले तर आपल्याला सुभद्रेला रोजच त्या यती महाराजांच्या दर्शनास पाठवता येईल. पण तसे ते योग्य नाही. कारण सुभद्रेचे तसे जाणे हे बरे दिसणार नाही. शिवाय त्या ठिकाणी सुभद्रेला त्या यतीची काहीही सेवा करायची संधीही मिळणार नाही. अरे, अशा महापुरूषांच्या केवळ दर्शनापेक्षा त्या जोडीला जर त्यांची काही सेवाही घडली तरच त्यांची कृपा प्राप्त होऊ शकते आणि त्यामुळेच त्यांचे आशीर्वादही फलरूपाला येतात. म्हणूनच मला असे अगदी मनापासून वाटत आहे की सुभद्रेकडून त्या यतीची सेवा घडावयास हवी. त्यामुळेच तिच्या मनाला शांती व समाधान तर लाभेलच, पण तिच्या मनाचा हरवलेला उत्साहही तिला परत मिळेल. त्यासाठीच आपण स्वतः जाऊन त्या यती महाराजांना विनंतीपूर्वक व आग्रह करून या ठिकाणी राजवाड्यातच बोलावले पाहिजे. कारण सुभद्रेकडून असे काहीतरी पुण्यकर्म घडणे हे तिच्या हिताच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे अशी माझी पक्की धारणा आहे.

कृष्णा, परंतु तुझ्या मनात त्या यतीविषयी असलेली शंका पाहून मात्र मला वाईट तर वाटतेच, पण त्याहीपेक्षा जास्त तुझी कीवच येते. अरे, अशा सत्पुरुषांबद्दल मनात पुसटशीसुद्धा शंका घेणे म्हणजे माझ्या दृष्टीने तरी ते पापच आहे. त्यांचा अधिकार ओळखण्याची सुद्धा आपल्यासारख्या सामान्यांची जेथे

पात्रताही असत नाही, तेथे आपण त्यांची अवस्था कशी जाणणार बरे? तू जर त्यांच्याकडे नकारात्मक व संशयी दृष्टीने पाहशील तर तुला त्यांच्याठिकाणी दोषच दिसतील. पण हा दोष त्यांच्याठायी नसून तो दोष तुझ्या दृष्टीचा आहे हे लक्षात घे. तेच जर तू त्यांच्याकडे श्रद्धेने पाहशील तर तुला त्यांचे केवळ वय न दिसता त्यांच्याठायीचे ज्ञान, वैराग्य व तेज जाणवेल आणि त्यांची थोरवी जाणून तू त्यांच्यापुढे नतमस्तकच होऊन राहशील. तेव्हा हा ज्याच्या त्याच्या दृष्टीतील फरक आहे आणि कृष्णा, तुझ्याकडून अर्थातच सात्त्विक दृष्टीची अपेक्षा आहे. अरे, असे सत्पुरुष खरे तर अगदी निरिच्छ व निःस्वार्थी असतात. त्यांना बाह्य मानमरातब किंवा लौकिकाची मुळीच अपेक्षा नसते. कोणाची सेवाही स्वीकारणे त्यांच्यासाठी अनावश्यकच असते. पण केवळ सामान्य जनांचे कल्याण व्हावे असा दयार्द्र भाव त्यांच्या ठिकाणी असल्यामुळेच कृपावंत होऊन ते सर्वसामान्यांना सेवेची संधी देत असतात एवढेच! तेव्हा हे लक्षात घेऊनच आपण अशी संधी त्यांच्याकडे विनंतीपूर्वक मागून घ्यावयास हवी. त्यात सुभद्रेचेच कल्याण आहे आणि आपणा सर्वांनाही त्या यतीच्या सहवासाचा लाभ मिळणार आहे हे आपले भाग्य आहे. तेव्हा कृष्णा, आता उगीचच मनात नसत्या शंका घेत बसू नकोस. आपण त्वरित त्या यतीकडे जाऊ आणि त्याला सन्मानपूर्वक राजमहालात आणण्याचे करू.”

बलरामाचे बोलणे ऐकून कृष्ण खरे तर मनातून अत्यंत सुखावला होता. पण बाह्यांगाने तसे जराही न दर्शविता आणि उलट मुखावरती अधिकच गंभीरता आणून कृष्णाने बलरामाशी बोलण्यास सुरुवात केली.

“अहो दादा, सुभद्रेच्या सुखासाठी व स्वास्थ्यासाठी असलेला तुमचा कळवळा आणि चाललेले तुमचे प्रयत्न मला कळत का नाहीत? पण त्यासाठी तुम्ही करीत असलेल्या उपाययोजनेशी मात्र मी सहमत होऊ शकत नाही, याबद्दल मी तुमची क्षमा मागतो. परंतु माझी भूमिका वेळीच स्पष्ट करणे मला अत्यंत आवश्यक वाटते. यातून पुढे काही विचित्र परिस्थिती वा घोटाळा निर्माण होण्याची शक्यता मला तरी जाणवते. ती मोकळेपणाने व वेळीच सांगून तुम्हाला सावध करणे हे तर माझे कर्तव्यकर्म आहेच ना! त्यातूनही तुम्ही घेतलेला निर्णय मला मान्य आहेच आणि त्यासंबंधी माझ्याकडून तुम्हाला संपूर्ण सहकार्य मिळेल हेही नक्कीच! खरे तर, हे मला तुम्हाला वेगळेपणाने सांगण्याचीही आवश्यकता नाही. होय ना?”

कृष्णाच्या बोलण्यावर बलरामाने डोळे मिटून क्षणभर विचार केला. पण लगेचच त्याने कृष्णाच्या जवळ जाऊन त्याच्या खांद्यावर हलकेच थोपटले आणि किंचित हसून म्हणाला,

"कृष्णा, तुझ्या बोलण्यातील मुद्दामला कळला आणि तो मी निश्चितच लक्षात ठेवीन. परंतु आपण सर्वच जण सुभद्रेच्या बरोबर आहोतच. तेव्हा तशी काही काळजी करण्याचे कारण आहे असे मला तरी वाटत नाही. फक्त सुभद्रेने मनावर काहीही दडपण न ठेवता व संकोच न बाळगता यती महाराजांचा सहवास व सेवा करावी, यासाठी तिची मानसिकता तयार करणे अत्यंत आवश्यक आहे. ती जबाबदारी मी तुझ्यावर व रुक्मिणीवर सोपवीत आहे. तुम्ही सुभद्रेशी बोलून तिच्या मनातील गैरसमज दूर करा आणि तिला मिळणाऱ्या या संधीचे महत्त्व तिला पटवून द्या. त्या यती महाराजांना येथे सन्मानपूर्वक आणण्याच्या व्यवस्थेला मी लागतो. ईश्वराच्या कृपेने सर्व काही व्यवस्थित होईल आणि आपली लाडकी भगिनी सुभद्रा हिच्या जीवनात पुन्हा उत्साहाचे व आनंदाचे क्षण परत येतील याची मला पूर्ण खात्री आहे."

बलरामाच्या या बोलण्यावर कोणीच काही बोलले नाही. कारण कोणीही काहीही बोलणे शक्यच नव्हते. बलरामाने एखादी गोष्ट ठरवली म्हणजे ठरवली. कोणत्याही परिस्थितीत त्याने ठरवलेली गोष्ट तो करणारच हे सर्वांनाच मागील अनुभवाने माहित होते. त्यामुळेच कुणीही काहीही न बोलता स्वस्थच राहिले. एवढा वेळ मान खाली घालूनच उभी असलेल्या सुभद्रेचा हात आपल्या हातात घेऊन रुक्मिणी तिच्यासह बलरामाच्या महालाच्या बाहेर पडली. जाताना तिने एक अर्थपूर्ण कटाक्ष कृष्णाकडे टाकला. त्याचा अर्थ समजून कृष्णही त्यांच्या मागोमाग सावकाश पावले टाकीत निघाला."

नारदाचे बोलणे ऐकता ऐकता लक्ष्मीला हसू अनावरच होऊ लागले. मोकळेपणाने ती कितीतरी वेळ हसतच राहिली. त्यामुळे नारदालाही त्याचे बोलणे थांबवावे लागले. नेत्रात मिश्कीलतेचा भाव आणून मग नारदही लक्ष्मीकडे फक्त पाहत स्वस्थच बसून राहिला. थोड्यावेळाने लक्ष्मीने तिचे हसणे कसेबसे आवरून घेतले आणि नारदाला म्हणाली.

"अरे नारदा, या प्रसंगाच्या निमित्ताने कृष्णाचे एक असे वेगळे अंग तू प्रगट करीत आहेस की ज्याची मी कधीही कल्पनाच करू शकले नसते. हा प्रसंग गंभीर म्हणावा की विनोदी म्हणावा हेच मला कळेनासे झाले आहे. त्याहीपेक्षा कृष्ण त्याची भूमिका एवढी बेमालूमपणे वठवीत आहे की त्याच्या अभिनयालाही तोडच नाही. परंतु बलरामाला असे फसवताना कृष्णाच्यासुद्धा अगदी जीवावरच आले असणार याची मला अगदी खात्री आहे. पण कृष्णाचाही नाईलाजच झालेला होता. तो तरी बिचारा काय करणार? एकीकडे भगिनीप्रेम व मित्रप्रेम आणि दुसरीकडे बंधुप्रेम. अशा विचित्र परिस्थितीतच कृष्ण सापडलेला होता. परंतु एकीकडे माझ्या

मनाला मौज वाटत असताना दुसरीकडे माझ्या मनात आतमध्ये कुठेतरी मला ताणही जाणवत आहे. कारण कधीतरी या सर्व गोष्टी बलरामाला कळल्याच असणार. त्यावेळेस त्याची प्रतिक्रिया काय झाली असेल या केवळ कल्पनेनेच माझ्या अंगावर भीतीचे शहारे उठत आहेत. कृष्णाचे हे कारस्थान त्याने हर एक प्रकारे यशस्वी केलेच असणार याची मला पक्की खात्री आहे. परंतु ते सर्व कसे कसे झाले हे जाणून घेण्याची माझी आतुरता आता अगदी शिगेला पोहोचलेली आहे. कारण तो सर्व इतिहास रोमांचकारी असेलच पण त्याहीपेक्षा अत्यंत आनंददायी असणार आहे हेही मी पूर्णपणे जाणून आहे. तेव्हा नारदा, आता जराही विलंब न करता मला सर्व सर्व अगदी सविस्तरपणे सांग बघू."

***

लक्ष्मीची आतुरता पाहून नारदाला अधिकच उत्साह आला. कारण तोही त्या आनंदाचा अनुभव घेण्यासाठी तेवढाच अधीर झालेला होता. त्यामुळे नारदानेही त्वरित बोलावयास सुरुवात केलीच.

"हे लक्ष्मी, तो इतिहास आनंददायी असणार याबद्दल तुझ्याठायी जी खात्री आहे ती अगदी यथार्थ आहे. कारण आनंदाच्या अनुभवासाठी अत्यावश्यक असलेला या नारायणाच्या सगुण प्रेमाचा रस या कृष्णचरित्रातून भरभरून वाहत आहे. कृष्णाच्या प्रेमस्वरूप अंतःकरणातील प्रेम साकार होण्यासाठी कृष्णाच्या प्रेमाच्या व्यक्ती या निमित्तकारण होत आहेत आणि कृष्णप्रेम अनेकविध अंगाने प्रगट होत आहे. निमित्त झालेल्या व्यक्तींना त्यांच्या त्यांच्या भावाप्रमाणे होणारा लाभ हा मर्यादित व तात्कालिकच होता. परंतु त्या कृष्णाच्या भक्तांना मात्र त्यांच्या भक्तिभावामुळे होणारा आनंद हा अमर्यादित व चिरकालाचा असतो. म्हणूनच तसे पाहिले तर प्रत्यक्ष बाह्यांगाचे कृष्णचरित्र घडून गेले त्याला कितीतरी काळ लोटला. पण त्याच्या चरित्रगायनाचा आनंद आताही आपल्याला तसाच व तेवढाच होतो. कारण या नारायणाचे सगुण प्रेम आपल्याठायी नित्य वाहत असते आणि म्हणूनच ते अगदी ताजे ताजे असते. कृष्णचरित्राच्या निमित्ताने आपल्या अंतःकरणातील त्याच नारायणाच्या सगुण प्रेमाचा आपण अनुभव घेतो आणि म्हणूनच आनंदित होतो. कारण त्या प्रेमाचे सत्यत्व व माहात्म्य आपण पूर्णपणे जाणून आहोत आणि त्याचा अनुभव घेण्यासाठी आपण नित्य आर्तही असतो.

हे लक्ष्मी, कृष्णाकडून प्रगटणाऱ्या बाह्य अंगाचे व रंगाचे मूळ त्याच्या अंतरंगामध्ये होते. त्याचे बाह्य रंग अनेकवेळा कारणाकारणाने बदलत राहिले. ते सर्वांनाच कळले वा सर्वांनाच मानवले असेही नाही. पण कृष्णाचे अंतरंग जाणून असलेल्या त्याच्या प्रेमीभक्तांनाच कृष्णाचे प्रगटलेले सर्व बाह्यरंग सुखावतात आणि त्यांना कृष्णाचे कौतुकही वाटतेच. परंतु त्याचबरोबर कृष्णाच्या अंतरंगाचेही

माहात्म्य त्यांना अधिकच जाणवते आणि त्याचमुळे त्यांच्या ठिकाणचा भक्तिभावही अधिकाधिक वाढत राहतो.

हे लक्ष्मी, या दृष्टीने कृष्णचरित्रातील या प्रसंगाकडे आपण पाहिले, तर तो प्रसंग गंभीर होता की गमतीचा होता याचे उत्तर अगदी सहज मिळते. बाह्यांगाने तो प्रसंग खरेच अत्यंत मौजेचाही दिसत होता. परंतु कृष्ण मात्र नेहमीप्रमाणेच त्याच्या अंतरंगात गंभीरच होता. तीच तर कृष्णाची सहजस्थिती होती. त्यामुळे कृष्णाच्या ठिकाणी मुळात भगिनीप्रेम वा बंधूप्रेम किंवा मित्रप्रेम असा प्रश्न नव्हताच, तर योग्य-अयोग्य व धर्म-अधर्म याचाच विचार कृष्णाच्या अंतरात अत्यंत खोलवर होता. त्यासाठीच त्याच्या दृष्टीने सुभद्रा, अर्जुन व अगदी दुर्योधनही प्रातिनिधिक रूपेच होती. अर्जुनाच्या रूपाने सत्प्रवृत्ती प्रगट होत होती तर दुर्योधन म्हणजे साक्षात दुष्प्रवृत्तीचेच रूप होते. अशावेळी सत्प्रवृत्तीच्या बरोबर पूर्णपणे उभे राहून दुष्प्रवृत्तीचा निःपात करणे किंवा वेळप्रसंगी त्या दुष्प्रवृत्तीला कमीत कमी पराभूत तरी करून नामोहरम करणे, हाच कृष्णाचा स्वभाव होता आणि तेच तर त्याचे जीवनकार्य होते.

समजा, ‘यदाकदाचित सुभद्रेचे मन जर दुर्योधनावरच गेले असते आणि बलरामाने तिचा पती म्हणून अर्जुनाची निवड केली असती’ असा अगदी काल्पनिक म्हणूया, पण प्रसंग घडला असता तरी कृष्ण अर्जुनाच्याच बाजूने उभा राहिला असता. बलरामाला कृष्णाने पूर्ण पाठिंबा दिला असता आणि सुभद्रेचे मन हरप्रयत्नाने व युक्तीप्रयुक्तीने वळवून तिलाच अर्जुनाशी विवाह करायला राजी केले असते हे नक्की. तेव्हा कृष्णाच्या ठायी व्यक्तिप्रेमापेक्षा सद्भाव व सत्प्रवृत्ती यांचेच प्रेम व माहात्म्य होते. त्यामुळेच कृष्णाने त्याच्या प्रेमाच्या व्यक्तींना सद्भावाकडे वळवले आणि वेळप्रसंगी त्यांच्या सद्भावाच्या पाठीशी आपली सर्व शक्ती व युक्ती यांच्यासह कृष्ण खंबीरपणे उभा राहिला. एवढेच नव्हे, तर प्रत्यक्ष मदत करून कृष्णाने त्यांना यशही प्राप्त करून दिले. त्यामुळेच सुभद्रा जी त्याच्या अत्यंत प्रेमाची होती, तिचा विवाह सत्प्रवृत्तीच्या व पराक्रमी अशा अर्जुनाशीच करून देणे हे तर कृष्णाचे कर्तव्यकर्मच ठरत होते. त्याची पूर्ती कशी करायची हेच एक व्यवधान कृष्णाच्या ठायी होते आणि त्या ध्यासामुळे आवश्यकतेनुसार बाह्यांगाचे वागणे कृष्णाकडून अगदी सहजतेने घडत होते. त्या वागण्यात मुद्दामहून केलेला काही अभिनयही नव्हता किंवा कोणत्याही प्रकारचा अभिनिवेशही नव्हता.

हे लक्ष्मी, सुभद्रा व अर्जुन यांचा विवाह व्हावा म्हणून कृष्ण काही कारस्थान करीत होता असे म्हणणे केवळ चूकच आहे असे नाही, तर असा विचार करणेही कृष्णाच्या माहात्म्याला कमी लेखण्यासारखे आहे. अर्थात कोणी कमी लेखल्यामुळे कृष्णाचे माहात्म्य कधीच बाधित वा विचलित होऊ शकत नाही हा भाग वेगळा.

पण अबाधित व अचल राहतो तोच भक्तिभाव आणि तोच खरा भक्त. होय ना? पण जे केवळ भाविक किंवा बौद्धिक असतात त्यांच्या भावना बाधित होतात किंवा त्यांची बुद्धीही चालेनाशी होते आणि त्यामुळे त्यांचे शब्दज्ञान अपुरे पडू लागते. परंतु खरा भक्त हा प्रेमामुळे शुद्ध मनाचा आणि विवेकामुळे शुद्ध बुद्धीचा झालेला असतो. त्यामुळे त्याच्या ठिकाणी महात्म्यांच्या माहात्म्याची जागृती आधी व सदोदित असते आणि नंतर तो त्यांच्या सगुण चरित्राकडे पाहतो. त्यामुळे त्या भक्ताच्या ठायी त्या चरित्राची योग्य सांगड असते आणि तो त्या चरित्राचा पूर्ण व खरा आनंद अनुभवतो.

लक्ष्मी, एक गोष्ट लक्षात ठेव की कारस्थान हे शत्रूविरूद्ध केले जाते आणि येथे तर कृष्णाचे शत्रू असे कोणीच नव्हते. त्यामुळे कट वा कारस्थान असे शब्द येथे गैरलागूच नव्हे तर चुकीचेच ठरतात. बलराम हा तर कृष्णाचा ज्येष्ठ बंधूच होता आणि त्यांचे संबंधही अत्यंत प्रेमाचेच होते. मुख्य म्हणजे बलराम हाही मूळचा सद्भावाचा आणि सत्प्रवृत्तीचाच होता. फक्त थोडावेळ त्याच्या मनावर पटल आल्यासारखे झाले होते आणि त्याच्या ठायीचा विवेक झाकोळला गेला होता. त्यामुळे सद्-असद् मधील फरकच बलरामाला कळेनासा झाला होता. परिस्थितीकडे केवळ बाह्यांगानेच पाहणे घडू लागल्यामुळेच व्यक्तींची योग्य पारख करण्यामध्ये बलरामाकडून गल्लत व गफलत होत होती. मुख्य म्हणजे, बलरामाची ही अवस्था कृष्ण पूर्णपणे जाणून होता. बलरामाच्या मनात निर्माण झालेली ही भ्रांती प्रत्यक्ष अनुभवाने नक्की दूर होणार याची पूर्ण खात्री कृष्णाच्याठायी होती. परंतु त्यासाठी किती काळ जावा लागला असता याचे काही गणित नव्हते. पण कृष्णाकडे तेवढा वेळच नव्हता. म्हणून कृष्णाने ही युक्ती योजिली होती. त्यामध्ये बलरामाला फसवण्यापेक्षा थोडेसे चकवणे होते. पुढे प्रत्यक्ष गोष्टी घडल्यानंतर योग्यवेळी बलरामाची समजूत आपण घालू शकू, याचा पूर्ण आत्मविश्वास कृष्णाच्याठायी होता. हा आत्मविश्वास हेच तर कृष्णाचे बलस्थान होते ना!”


नारदाचे बोलणे लक्षपूर्वक ऐकत असताना लक्ष्मी अत्यंत गंभीरच झाली. थोडावेळ तिने आपले नेत्र मिटून घेतले आणि ती स्वस्थ बसून राहिली खरी, परंतु तिचे मन मात्र कावरे बावरे झाले. लक्ष्मीच्या नकळत का होईना पण तिच्याकडून कृष्णाच्या माहात्म्याला बोल लावल्यासारखे झाले होते. नारदाच्या बोलण्यामुळे ती गोष्ट तिच्या लक्षात आली मात्र, तिचे मन एकदम अस्वस्थच झाले आणि अपराध भावनेने ग्रासले गेले. लक्ष्मीचे नेत्रही अश्रूंनी डबडबले आणि तिच्या मुखावर उदासीनता पसरली. लक्ष्मीची ही अवस्था लक्षात येण्यासाठी नारदाला जराही वेळ लागला नाही. ‘अशावेळी काही बोलणे हे अप्रस्तुत व अशक्यच आहे’ हे नारद जाणून होता. त्यावर असलेला एकच उपाय नारदाला ठाऊक होता आणि तो म्हणजे

लक्ष्मीने बोलूनच तिचे मन मोकळे करणे. अर्थात लक्ष्मीलाही तो उपाय माहित होताच. त्यामुळे जरी ती थोडावेळ स्वस्थ होती तरी तसे स्वस्थ बसणे तिचे तिलाच अशक्य होऊ लागले आणि शेवटी लक्ष्मीला बोलणे भागच पडले. स्वतःच्या मनाच्या अवस्थेला लक्ष्मीने प्रयत्नपूर्वक सावरले आणि तिने नारदाशी हळूहळू बोलायला सुरुवात केली,

“हे नारदा, प्रथम मी तुझी अत्यंत मनःपूर्वक क्षमा मागते. नकळतपणे किंवा अनवधानाने का होईना, पण माझ्याकडून कृष्णाच्या माहात्म्याला बोल लावला गेला, ही माझी चूक तर अक्षम्यच आहे. त्याचे मी कोणतेही कारण देणे म्हणजे माझ्या चुकीचे एक प्रकारे समर्थनच करण्यासारखे होईल आणि तो अपराध जास्तच मोठा ठरेल. कृष्णाच्या सगुण रूपातील व्यक्तिमत्त्वाने मनाला आकर्षित करता करता मला एवढे भुलवले, की थोडावेळ त्याच्या स्वरूपाचे विस्मरण होऊन त्याचे ईश्वरी माहात्म्यही झाकोळल्यासारखे झाले. तेवढा वेळ कृष्णाचे असामान्यत्वही दुर्लक्षिले गेले. त्याच्याकडे एक सामान्य व्यक्ती म्हणून पाहिले गेले आणि मग साहजिकच त्याच्या वागण्या बोलण्यालाही सामान्यांचेच निकष लावले गेले. बरे, हे सर्व एवढ्या सहजतेने घडले की आपल्याकडून कृष्णाच्या माहात्म्याला अवलेखिले जात आहे हे लक्षात सुद्धा आले नाही.

परंतु नारदा, कृष्णाचे ईश्वरी स्वरूप जाणून त्याच्या रूपाचे व चरित्राचे वर्णन करणारा या नारायणाचा तुझ्यासारखा महान भक्तच माझ्यासारख्या सामान्यांना या भ्रांतीतून बाहेर काढू शकतो आणि भानावर आणतो. म्हणूनच आमच्यासाठी ईश्वरप्राप्तीचा असलेला सगुण प्रेमभक्तीचा एकमेव मार्ग पुन्हा पुन्हा मोकळा होतो. नाही तर आम्ही आमच्या मनाच्या कल्पनेमुळे सगुणप्रेमाला केव्हा पारखे झालो असतो आणि आमच्या बुद्धीच्या समजुतीमुळे ईश्वरी माहात्म्यालाही कधी विन्मुख झालो असतो हे आमचे आम्हालाही कळले नसते. आमचा भक्तिमार्गच खुंटला असता आणि आम्ही मार्गातच कुठेतरी अडून बसलो असतो. पण नारदा, तुला माझी दया आली आणि अत्यंत कृपावंत होऊन तू मला वेळीच सावध केलेस. तुझ्या कृपादृष्टीने तू माझ्या दृष्टीवर आलेली झापड दूर केलीस. आता माझ्या दृष्टीला कृष्णाचे ईश्वरी माहात्म्य अगदी स्पष्टपणे व स्वच्छ दिसू लागले आहे आणि त्याच्या अंतःकरणाची प्रेमस्वरूप अवस्थाही मला आता जाणवू लागली आहे. त्यामुळे कृष्णकथेचे प्रेमामृत सेवन करण्याची आर्तता माझ्याठायी पुन्हा अत्यंत प्रकर्षाने जागृत झालेली आहे.

तरी नारदा, तू कृपा कर आणि तुझ्या मधुर वाणीतून स्त्रवणारा सगुण प्रेमरस प्राशन करण्याची संधी मला पुन्हा एकदा दे. त्या संधीचा मी पुरेपूर व योग्य तो उपयोग करीन. प्रेमरससेवनाने केवळ धुंद न होता मी सावध राहीन आणि कृष्णाच्या ईश्वरी माहात्म्याचा निश्चय मनात कायम राखीन असे मी तुला अत्यंत



मनःपूर्वक आश्वासन देते. पण आता मला या श्रवणभक्तीच्या आनंदापासून वंचित ठेवू नकोस हीच प्रार्थना."

लक्ष्मीची व्याकुळता नारदाच्या मनाला जाणवली आणि त्याचेही मन कळवळलेच. मनात एकदा का अपराध भावना निर्माण झाली की ती मनाला कशी पूर्णपणे ग्रासून टाकते आणि सतत कुरतडत राहते हे नारद जाणून होता. परंतु लक्ष्मीने मनाच्या त्या अवस्थेतूनही तिच्या मनाला विवेकाने बाहेर काढले, याचा नारदाला आनंद अधिक झाला. आता जराही वेळ जाऊ न देता लक्ष्मीच्या मनावर लागलीच सगुण प्रेमामृताचा वर्षावच करायला हवा हे नारदाच्या लक्षात आले आणि त्याने त्वरित बोलावयास सुरूवात केली,

"हे लक्ष्मी, तुझ्याकडून अनवधानाने घडलेली चूक तुझ्या लक्षात आली आणि त्याहीपेक्षा तू तुझ्या मनाला ताबडतोब सावरलेस याचे मला वाटणारे कौतुक विशेष आहे. कारण भक्तिमार्गात असे येणारे क्षण हेच मोठे नाजूक असतात. आपल्या अत्यंत प्रेमाच्या अशा ईश्वराचे माहात्म्य आपण कधी विसरून जातो, तर केव्हा ज्याच्या माहात्म्याचा आपला निश्चय झालेला आहे अशा ईश्वरावरील आपले प्रेम वेळप्रसंगी कमी पडते. पण त्या दोन्हीची परिणती मात्र एकच, म्हणजे आपल्याच मनाच्या ठिकाणी दुरावा निर्माण होण्यात होते. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे निर्माण झालेला दुरावा आपल्याच लक्षात येतो आणि आपल्याला सहनही होईनासा होतो. ती ईश्वरापासूनची विभक्तता आपल्याला अधिकच आर्त करते. कारण त्या ईश्वराच्या सगुणरूपाची भक्ती आपल्याकडून कधीतरी काहीतरी घडलेली असते. त्या सगुणरूपाचे प्रेम व जवळीकता आपण अनुभवलेली असते आणि आपल्याला त्याचा आनंदही झालेला असतो. ही प्रेमाची आर्तताच आपल्या मनाला आच लावते आणि मग पश्चात्तापाने आपले मन शुद्ध होते. त्या मनामध्ये साठलेले प्रेम पुन्हा हळूहळू व झुळूझुळू वाहू लागते. त्या प्रेमाचे उगमस्थान असलेले जे ईश्वराचे अंतःकरण त्याचेच एकीएक माहात्म्य पुन्हा जाणवू लागते आणि मग ती प्रेमधारा त्या मुळाला लक्ष्य करून वेगाने धावूच लागते. वाहता वाहता भक्तिभाव एवढा उत्कटतेला पोहोचतो की आनंदाच्या अनुभवाला केव्हा सुरूवात होते हे कळतसुद्धा नाही. भक्तिभावाची अशी उत्कटता अनुभवण्यासाठी सगुणकथांचे गायन करून त्यातील प्रेमरसाचे सेवन करणे हेच आवश्यक आहे. या नारायणाच्या कृपेनेच आपल्याला ते आता शक्यही होत आहे. तेव्हा कृष्णप्रेम कथांचेच गायन आपण करूया आणि नारायणाच्या कृपेचा अनुभव घेऊया. तेच खरे आणि तेच बरे!

हे लक्ष्मी, कृष्णाच्या अपेक्षेनुसार त्याच्या योजनेतील प्रथम भाग तर अगदी सुरळीतपणे पार पडला होता आणि नंतरच्या गोष्टीही क्रमाक्रमाने व्यवस्थित घडत गेल्या. बलरामाने एकदा एखादी गोष्ट ठरवल्यावरती त्यामध्ये कोणतीही अडचण

निर्माण होण्याची शक्यताच नव्हती. त्याने स्वतः त्या यती महाराजांची भेट घेऊन त्यांना राजवाड्यात येण्याविषयी कळकळीची विनंती केली. यती वेषातील अर्जुनाने अर्थातच सुरूवातीला जाणूनबुजूनच आढेवेढे घेतले. यतीची ती निःस्पृहता व वैराग्य पाहून बलराम अधिकच प्रभावित झाला. बलरामाला त्याची बरीच मनधरणी करावी लागली तेव्हा कुठे तो यती फक्त तीन दिवसांपुरताच रहावयास येण्याच्या अटीवरती तयार झाला. बलरामाला तेच भाग्य वाटले आणि त्याने त्वरित अत्यंत सन्मानपूर्वक त्या यतीला आपल्या राजवाड्यात आणले. एवढेच नव्हे, तर अत्यंत प्रेमाने व श्रद्धेने राजवाड्याच्या अंतर्भागातील एका खास महालात त्याच्या वास्तव्याची व्यवस्था केली. कृष्णाने आधीच दिलेल्या सूचनेनुसार जेव्हा यतीने तेथील सर्व सुखसोयींचा स्वीकार न करता त्या महालातही अत्यंत वैराग्यानेच रहावयास सुरूवात केली, तेव्हा तर बलरामाच्या ठायीचा त्या यतीविषयीचा आदर व श्रद्धा द्विगुणितच झाली. त्याने लगेचच सुभद्रेला आपल्याबरोबर त्या यतीच्या दर्शनाला नेले. सुभद्रेला पाहिल्यावरती लगेचच अर्जुनाच्या मनातील तिचे प्रेम अनावर झाले. त्याच्या नेत्रात एक वेगळीच चमक दिसू लागली. पण त्याने प्रयत्नपूर्वक स्वतःला सावरले आणि त्याने नेत्र घट्ट मिटून घेतले. सुदैवाने अर्जुनाच्या मनातील ही चलबिचल बलरामाच्या मुळीच लक्षात आली नाही. त्याने यतीचे दर्शन घेऊन आपले दोन्ही हात जोडले आणि त्या यतीशी विनम्रभावाने बोलावयास सुरूवात केली,

“अहो यतीराज, मी प्रथम आपणाला नम्रतापूर्वक वंदन करतो. आपल्यासारख्या अधिकारी व थोर अशा महापुरूषाची चरणधूळ आमच्या निवासस्थानी लागली हे आमचे केवढे तरी भाग्यच आहे. त्या निमित्ताने आपण आम्हाला आपली सेवा करण्याची संधीच दिली आहे. त्याबद्दल आम्ही आपले कधीही उतराई होणे शक्यच नाही. आम्हाला जशी जमेल तशी सेवा आमच्याकडून जरी घडत असली, तरीही आमच्या नकळत जर आमच्याकडून काही कमी रहात असेल किंवा काही चुकत असेल तर आम्हाला क्षमा करावी आणि आमची सेवा मान्य करून घ्यावी अशी प्रार्थना आहे.

अहो योगिराज, मला आपल्या चरणी आणखीन एक विनंती करायची आहे. माझी कनिष्ठ भगिनी सुभद्रा हिची मानसिक स्थिती सध्या तेवढीशी ठीक नाही. काही कारणामुळे तिच्या मनाची दोलायमान अवस्था झालेली आहे. तिचे हित कशात आहे हे आम्ही तिला सांगूनही तिचे मन त्याचा स्वीकार करू शकत नाही. त्याचीच परिणती म्हणजे तिच्या मनावर एक प्रकारचा ताण आलेला आहे आणि ती नेहमी त्याच तणावाखाली असते. आम्ही कुटुंबियांनी तिची अनेक प्रकाराने समजूत घालण्याचा प्रयत्न केला. परंतु तिच्या मनाची समजूत काही पटत नाही. अशा मनःस्थितीमुळे आमची सुभद्रा ही नेहमीच गंभीर व उदासीन असते. ती कोणाशीच

मोकळेपणाने बोलत वा वागत नाही. तिचे हसणे तर ती पूर्णपणे विसरूनच गेली आहे असे मला वाटते. तेव्हा आपण तिच्याशी बोलून तिला चार समजुतीच्या गोष्टी सांगाव्यात आणि तिचे मन मोकळे करून तिला मनोबळ देण्याचे करावे. त्यासाठी सुभद्रेकडून आपला नित्य सहवास व आपली काही सेवा घडणे तिला आवश्यक आहे, असे आम्हाला अगदी मनापासून वाटत आहे. तरी आपण तशी परवानगी दिलीत तर आमच्यावर आपले केवढे तरी उपकारच होतील.”

बलरामाचे बोलणे ऐकून खरेतर अर्जुन मनातून अत्यंत सुखावलाच. परंतु त्याने अत्यंत प्रयत्नपूर्वक मुखावर गांभीर्याचा आविर्भाव आणला आणि आपले डोळे मिटून घेतले. थोडा वेळ विचार केल्यासारखे दाखवून अर्जुनाने आपले डोळे पुन्हा उघडले आणि गंभीर सूर लावून बोलावयास सुरूवात केली,


“हे राजन्, खरे तर आम्ही या राजवाड्यात रहावयास आलो तेही केवळ एक अपवाद म्हणूनच. नाहीतर आमच्यासारख्या यतींना हे ऐश्वर्यभोग व हे सुखविलास हे वर्ज्य व त्याज्यच आहेत. तुमची आमच्यावरील श्रध्दा व भाव पाहिला आणि असा अपवाद करावा अशी आम्हाला अंतःप्रेरणा झाली हाही एक दैवयोगच असावा. तरीही आमचे येथील वास्तव्य हे तीन दिवसांपेक्षा जास्त असणार नाही हे निश्चित आहे. आमचा तसा नियमच आहे. त्यात मात्र काहीही बदल होऊ शकणार नाही हे लक्षात ठेवा. आता तुमची भगिनी सुभद्रा हिची सेवा स्वीकारणे हे तर आम्हाला शक्यच होणार नाही. कारण स्त्रियांकडून सेवाच काय पण त्यांचा सहवासही करणे हा आमच्या व्रताचा भंगच होईल. परंतु सुभद्रा ही तुमची भगिनी आहे आणि तीही एका विचित्र मनःस्थितीत आहे म्हणूनच केवळ आम्ही तिचा अपवाद करावयास परवानगी देत आहोत. सुभद्रेने आमची भेट घेऊन जरूर सहवास करावा आणि तिचे मन मोकळे करावे. आम्हीही तिचे मन जाणून घेऊ आणि तिला तिच्या हिताच्या चार गोष्टी सांगून तिचे मनोबळ वाढवू. म्हणजे जीवनात योग्य ते निर्णय घेऊन त्याच्या परिणामाला सामोरे जाण्याचे धैर्यबळ तिला प्राप्त होईल. तुम्ही आता निश्चिंत रहा. सुभद्रेची सर्व जबाबदारी आता आम्ही स्वीकारली आहे. तुम्ही मुळीच काळजी करू नका. आमच्यावर श्रद्धा ठेवा. सर्व काही नीट व व्यवस्थित होईल याची खात्री बाळगा.”

खरे तर, अर्जुन बोलता बोलता जरा जास्तच बोलू लागला होता. त्याच्या भूमिकेशी अर्जुन एवढा एकरूप झाला होता की त्याला स्वतःचेच भान राहिले नाही. खरी गोष्ट अशी होती की सुभद्रेला पाहिल्यावरच अर्जुनाचे देहभान हरवले होते. त्याच्या अत्यंत प्रिय अशा सुभद्रेला अर्जुन बऱ्याच दिवसांनी पाहत होता. सुभद्रेच्या मनःस्थितीची अर्जुनाला पूर्ण कल्पना होतीच. पण त्याहीपेक्षा सुभद्रेच्या अगतिक परिस्थितीची जाणीव अर्जुनाला होती आणि त्याचेच त्याला अत्यंत वाईट वाटत

होते. त्यातून कृष्णाच्या मदतीने योग्य तो मार्ग निघेल आणि सुभद्रा व त्याचे मीलन निश्चितपणे होईल असा पूर्ण विश्वास अर्जुनाच्या ठायी होता. परंतु त्यामुळे अर्जुनाची नजर वारंवार सुभद्रेच्या मुखावर जाऊन खिळत होती आणि मोठ्या प्रयत्नाने त्याला ती बाजूला वळवावी लागत होती. त्या कसरतीमध्ये अर्जुनाची वारंवार तारांबळ व थोडीशी धांदलच उडत होती. पण ती गोष्ट अर्जुनाच्या लगेचच लक्षात आली. त्याने स्वतःला झटकन सावरले आणि तो पुन्हा मौन धारण करून व डोळे मिटून घेऊन स्वस्थ बसून राहिला.

यतीच्या रूपातील अर्जुनाच्या बोलण्याने बलराम अत्यंत प्रभावित झाला. त्याने सुभद्रेला तेथेच यतीपाशी थांबण्याची खूण हाताने केली आणि यती महाराजांना वंदन करून तो त्याच्या महालाकडे निघून गेला. सुभद्रा मात्र अत्यंत कावरी बावरी झाली होती. काहीही न बोलता मान खाली घालून सुभद्रा तेथेच कशीबशी उभी राहिली होती. खरे तर, सुभद्रेला तेथे क्षणभरसुद्धा थांबणे शक्य होत नव्हते. परंतु बलरामदादांच्या इच्छेपुढे तिचा नाइलाजच झाला होता. सुभद्रेने मधून मधून नजर वर करून त्या यतीकडे पाहण्याचा प्रयत्न केला खरा, परंतु तो यती ज्या मिश्किल नजरेने सुभद्रेकडे एकटक पाहत होता त्यामुळे त्या यतीच्या नजरेला नजर देणेसुद्धा सुभद्रेला शक्य होत नव्हते. यतीरूपातील अर्जुनाने सुभद्रेला खाली बसण्याची खूण करूनही सुभद्रेला तेथे बसण्याचे धाडस होत नव्हते. त्या यतीला जेमतेम नमस्कार केल्यासारखे करून सुभद्रेने तेथून जो पळ काढला, तो ती धावत पळत कशीबशी कृष्णाच्या महालात जाऊन पोहोचली. त्याठिकाणी रुक्मिणीला पाहिल्यावर मात्र सुभद्रेचा भावनावेग अनावर झाला आणि ती रुक्मिणीच्या कुशीत शिरून मुसमुसून मुसमुसून रडू लागली.

सुभद्रेच्या अशा अचानक धावत धावत येण्याने व रडण्याने आधी रुक्मिणीही जराशी गोंधळलीच व घाबरलीही. ‘असे एकदम काय घडले असावे की ज्यामुळे सुभद्रा एवढी भयभीत झालेली आहे’ या विचाराने रुक्मिणीही काळजीत पडली. तिने बराच वेळ प्रयत्न करून प्रथम सुभद्रेला शांत केले आणि मग तिच्याशी बोलून तिच्या दुःखाचे कारण जाणून घेण्याचा प्रयत्न रुक्मिणी करू लागली. सुरुवातीला सुभद्रेच्या मुखातून काही शब्दच फुटत नव्हता. पण हळूहळू तिने घडलेली सर्व हकिगत रुक्मिणीला सांगितली. सुभद्रेची अगतिकता पाहून रुक्मिणीलाही अत्यंत वाईट वाटले. परंतु काय करावे हे तिलाही सुचेना. एक गोष्ट तिला निश्चितपणे ठाऊक होती की ‘सुभद्रेला या परिस्थितीतून वाचवणारा केवळ एकच आहे आणि तो म्हणजे कृष्णच! पण तो तर अगदी शांतपणे व अलिप्तपणे सर्व गोष्टींकडे पाहताना दिसत आहे. कृष्णाने सुभद्रेविषयीचे सर्व व्यवधान जणू सोडूनच दिले आहे असेच



दृष्टीला दिसत होते.’ रुक्मिणी अशी विचारात खोलवर गढून गेलेली असतानाच त्याठिकाणी कृष्णाचे आगमन झाले. रुक्मिणी व सुभद्रा यांना अशा तऱ्हेने गंभीर अवस्थेत पाहून ‘काय घडले असावे’ याचा अंदाज कृष्णाला लगेचच आला. परंतु मुखावर तसे जराही न दर्शविता कृष्णाने रुक्मिणीकडे प्रश्नार्थक नजरेने पाहिले आणि तो रुक्मिणीला म्हणाला,

“अगं रुक्मिणी, काय झाले आहे तरी काय? तुम्ही दोघी अशा येथे एवढ्या गंभीरपणे बसून काय करीत आहात आणि आमच्या या भगिनीच्या डोळयातून या जलधारा का बरे बरसत आहेत? आता काय बरे बिनसले स्वारीचे! एवढ्या तेवढ्या कारणावरून उगाचच सुभद्रेचे मन नाराज होते आणि ती खट्टू होऊन बसते. बारीक सारीक गोष्टींचा बाऊ करण्याचा हा सुभद्रेचा स्वभाव मला लहानपणापासूनच माहित आहे. काहीतरी क्षुल्लक गोष्टींचा ताण स्वतः करून घ्यायचा आणि त्याचबरोबर तो दुसऱ्यालाही द्यायचा ही अत्यंत वाईट सवय या सुभद्रेला आहे.”

कृष्णाचे बोलणे मध्येच थांबवून रूक्मिणी कृष्णाला उद्देशून म्हणाली,

“अहो, उगाचच सुभद्रेची गंमत करण्याचा प्रयत्न करू नका. ती बिचारी किती दुःखी व कष्टी आहे हे तुमच्या लक्षात येत नाही का? मग तिला उगाचच चिडवून रडवता कशासाठी? सुभद्रेच्या दुखऱ्या मनावर फुंकर घालायची सोडून ते मन अधिकच का दुखवता? तिच्या मनःस्थितीचा विचार करा आणि त्यावर काहीतरी तोडगा शोधून काढा. आपणच तर आधी सुभद्रा व अर्जुन यांच्या प्रेमाला प्रोत्साहन दिले होते आणि आता तिला अशी एकाकी सोडणे मुळीच योग्य नाही. अर्जुनाशी विवाह न होता दुर्योधनाशी विवाह करावा लागणार या कल्पनेनेच सुभद्रेचे मन पार कोलमडून गेले होते. त्यातूनच दादांनी या यतीला खुद्द राजवाड्यातच आणून त्याचे प्रस्थ वाढवले आहे. एवढेच नव्हे, तर ‘सुभद्रेने त्या यतीची सेवा करावी’ असे एक नवीनच खूळ आता दादांच्या डोक्यात शिरले आहे. त्यामुळे तर सुभद्रेची मनःस्थिती पूर्णपणे ढासळली आहे. आता तिला आपल्या आधाराची जरूरी आहे आणि तो आपण तिला दिलाच पाहिजे. कारण त्यासाठी ती आपल्याकडे आशेने नाही पाहणार तर दुसऱ्या कोणाकडे बघणार? सुभद्रेने जो आपल्यावर जो भरवसा धरला आहे त्याला आपण जागायलाच पाहिजे. तेव्हा तुम्ही आता क्षणाचाही विलंब न करता लगेचच दादांची भेट घ्या आणि त्यांना त्यांच्या निर्णयापासून परावृत्त करा. कमीत कमी त्या यतीची सेवा करण्याच्या संकटातून तरी सुभद्रेची सुटका तुम्ही केलीच पाहिजे. हे आता मी तुम्हाला निर्वाणीचे सांगत आहे.”

रूक्मिणीचे बोलणे आवेगाने घडत असल्यामुळे त्यामध्ये थोडासा आवेशही आला होताच. परंतु तिचे बोलणे ऐकूनही कृष्ण स्तब्धच राहिला. रूक्मिणी कृष्णाकडे अत्यंत अपेक्षेने तर सुभद्रा त्याच्याकडे मोठ्या आशेने पाहत आहे हे कृष्णाच्या लक्षात आले. कृष्णाला त्या दोघींची दया आली आणि अत्यंत शांत सुरात तो बोलू लागला,

“अगं रूक्मिणी, सुभद्रेची मनःस्थिती मी पूर्णपणे जाणून आहे. माझ्या ठिकाणी तिच्याविषयी पूर्ण सहानुभूती आहे. परंतु दादांच्यापुढे माझाही कसा नाईलाज होत आहे हे तुम्हीही पाहताच आहात ना? आता मी तरी या परिस्थितीत आणखी काय प्रयत्न करणार हे तुम्हीच सांगा. कारण दादांशी या विषयावरती काही बोलणे म्हणजे भांडणच करण्यासारखे आहे आणि ते मात्र मी कदापिही करणार नाही. दादांच्या दृष्टीने सुभद्रेच्या विवाहाचा विषय संपलेलाच आहे. त्यामध्ये आता कोणत्याही चर्चेला वा सूचनेला त्यांनी वावच ठेवलेला नाही. तेव्हा त्या विवाहासाठी सुभद्रेने तिच्या मनाची तयारी करणे आवश्यक आहे. सध्याच्या परिस्थितीत तेवढेच करणे तिला शक्य आहे. त्यातून पुढे विवाहानंतर खरेच काही प्रत्यक्ष अडचण निर्माण झालीच तर आपण सर्वजण तिच्या पाठीशी निश्चितपणे असू असे मी तिला आश्वासन देतो. त्यावेळेस आपले दादासुद्धा सुभद्रेच्या मदतीला धावून जातील याची मला पूर्ण खात्री आहे.

रूक्मिणी, आता प्रश्न राहिला तो यती संबंधीचा. त्याविषयीची माझी भूमिका आधीपासूनच अगदी स्पष्ट आहे आणि त्यासंबंधी मी दादांशी बोललेलोही आहे. परंतु दादांची मते अत्यंत ठाम आहेत आणि त्यात काही बदल होण्याची जराही शक्यता नाही हे तुम्हालाही ठाऊकच आहे. तेव्हा दादांच्या मनाप्रमाणेच करणे आपणा सर्वांना भागच आहे. परंतु एक गोष्ट मात्र मी दादांना निक्षून सांगितली आहे की या सर्वांमध्ये माझा सहभाग असणार नाही. मलाही राज्यकारभाराच्या काही कामाच्या निमित्ताने बाहेर जावे लागणारच आहे. ते जाणे मी आत्ताच करीन. म्हणजे मग माझ्या अनुपस्थितीत जे काही होईल त्याची जबाबदारी माझ्यावर मुळीच असणार नाही.”

***

कृष्णाच्या अशा बोलण्याने आधीच नाराज असलेली सुभद्रा अधिकच रूष्ट तर झालीच, पण त्याहीपेक्षा अधिक केविलवाणी झाली. तिने आपल्या डोळयातील अश्रू बळेबळे पुसले. रूक्मिणीकडे असहाय्यपणे बघून, पण कृष्णाकडे जराही न बघता, सुभद्रा तेथून निघून गेली. जाणाऱ्या सुभद्रेकडे पाहून रूक्मिणीला अतिशय वाईट

वाचले. तिच्या मनात सुभद्रेविषयी अत्यंत दया निर्माण झाली. रूक्मिणी कृष्णाच्या सन्मुख येऊन उभी राहिली आणि कृष्णाला उद्देशून बोलू लागली,


“अहो नाथ, आता तरी तुमच्या ठिकाणी सुभद्रेविषयी दया येऊ द्या. तिचा जास्त अंत पाहू नका. मनाने ती आधीच एवढे खचली आहे. त्यात तिच्या मनावरती आणखीन भार टाकू नका. मला तर अशी नेहमी काळजी वाटते की सुभद्रा तिच्या जीवाचे काही बरेवाईट तर करून घेणार नाही ना? एकीकडे सर्वजण सुभद्रेच्या हिताविषयी तर पुष्कळ बोलत असतात पण तिच्या मनःस्थितीचा कोणीही विचारच करीत नाही. ती फक्त आपल्याकडेच आणि त्यातूनही तुमच्याकडे केवढ्यातरी आशेने पाहत आहे. तिला अशी निराश करू नका. तुमच्या मनामध्ये निश्चित काय आहे ते माझ्याशी तरी मोकळेपणाने बोलाल की नाही? मला तरी विश्वासात घेऊन सर्व सांगाल की नाही? तुम्हाला काय वाटते? तुमच्या या स्वस्थ बसण्याचा आणि सर्व गोष्टी अंगाबाहेर झटकून टाकण्याचा अर्थ मला कळत का नाही? अहो, तुमचं अंतःकरण मी पूर्णपणे ओळखून आहे. अर्थात् हे मी अहंकाराने बोलत नाही तर अत्यंत नम्रतेने म्हणत आहे. कारण तुमचे अंतःकरण जाणण्याची संधी तुम्हीच मला कृपावंत होऊन देत आलात म्हणूनच मला ते काही प्रमाणात जाणणे शक्य झाले हे सत्य आहे.

अहो, तुम्ही जी या सुभद्रेविषयीची भूमिका अगदी पहिल्यापासूनच घेतली आहे तीच तुमच्या अंतःकरणात अत्यंत खोलवर आहे हे मला माहित आहे. त्या तिच्याविषयीच्या प्रेमात किंवा तुमच्या ठायी असलेल्या अर्जुनाविषयीच्या आपलेपणात जराही बदल झालेला नाही आणि तसा कधी होणेही शक्य नाही, याची मला पक्की खात्री आहे. प्रेमाखातर वा मैत्रीखातर दिलेला शब्द तुम्ही पाळणारच आणि तो खराही करून दाखवणारच, हा तर तुमचा स्वभाव आहे. तेच तर तुमचे ब्रीद आहे हे मी पूर्णपणे जाणून आहे. अर्जुन व सुभद्रा यांचा विवाह व्हावा हा तुमचा संकल्प आहे आणि तो तुम्ही कोणत्याही परिस्थितीत पूर्ण करणार म्हणजे करणारच, हे मला ठाऊक आहे. त्यासंबंधीची तुमची योजनाही ठरलेली असणारच हे निश्चित. मला तुम्हाला फक्त एकच विनंती करायची आहे की आता जास्त वेळ लावू नका आणि सुभद्रेच्या सहनशीलतेवर आता जास्त ताण देऊ नका. बिचारी केव्हा कोलमडून पडेल हे सांगता येत नाही.

अहो नाथ, मला खात्री आहे की योग्य वेळ येताच तुम्ही तुमच्या मनातील योजना नक्की सांगाल. एवढेच नव्हे, तर माझ्यावरील प्रेमाच्या हक्काने तुम्ही तुमच्या योजनेत मला सहभागीही करून घ्याल हेही मला माहित आहे. ती वेळ आता आली आहे असे मला तरी निश्चितच वाटते. तेव्हा मला तुमची सर्व योजना नीट समजावून

सांगा बरे. सर्वात आधी त्या यतीच्या वेषातील अर्जुनाचे काय रहस्य आहे ते मला सांगा. त्या बिचाऱ्या अर्जुनाला असा यतीचा नाटकी वेष देऊन, थेट आपल्या राजवाड्यातील अंतर्महालात आणून बसवण्यामध्ये आपला काय हेतू आहे बरे? अहो, त्या अर्जुनाची कशी त्रेधातिरपीट उडते आहे हे पाहण्यासारखे आहे. मी मुद्दामच त्याला भेटायला गेले होते. कारण माझ्या मनात थोडीशी शंका येऊ लागलीच होती. मला पाहिल्याबरोबर अर्जुनाचा चेहरा एवढा गोरामोरा झाला आणि माझ्या नजरेला नजर न देता जेव्हा तो मान खाली घालून बसला, तेव्हाच तेथे काहीतरी पाणी मुरतंय याची माझी खात्रीच झाली. मीही मुद्दामहूनच पुढे होऊन व खाली वाकून त्याला नमस्कार करण्याचा प्रयत्न केला तेव्हा तर तो बिचारा ओशाळलाच. त्याने चटकन त्याचे पाय मागे घेतले आणि हाताच्या इशाऱ्यानेच 'नको, नको' अशी खूण केली. मी लगेचच त्याच्याकडे एकटक नजरेने निरखून पाहिले मात्र, एका क्षणातच 'तो अर्जुन आहे' हे मी ओळखले. आता बोला!

अहो नाथ, माझ्या हातात एक सूत्र सापडल्याबरोबर मला सर्व उलगडा आपसूकच होऊ लागला आणि तुमच्या मागील सर्व वागण्या बोलण्याची सांगड लगेचच लागली. हा यती अचानकपणे आपल्या नगराबाहेरील पर्वतावर कसा काय उपटला असेल, त्याचा एवढा गवगवा कसा झाला असेल, त्याची बातमी बलरामदादांच्या कानावर अगदी व्यवस्थितपणे कशी पोहोचली असेल हे सर्व माझ्या डोळ्यासमोर अगदी स्पष्टपणे दिसू लागले. त्या मागील सूत्रधार, जो सर्व काही करून नामानिराळा राहिला आहे तो कोण आहे हे तर अगदी उघड आहे. अर्थात मलाही हे सर्व पूर्णपणे कळण्यासाठी जरासा वेळ लागलाच. सुरूवातीला तुमचा हा खेळ माझ्याही लक्षात आला नाहीच. परंतु ज्या वेळेस दादा त्या यतीविषयी श्रद्धेने बोलत असताना, तुम्ही त्या यतीविरूद्ध भूमिका घेऊन जेव्हा जरा जास्तच बोलायला लागलात, तेव्हा मला पहिल्यांदा शंका आली आणि मी सतर्क झाले. त्यानंतर जसा जसा दादांचा त्या यतीविषयीचा आग्रह वाढत चालला तसा तसा तुमचा विरोधही अधिक वाढू लागला. तेव्हा मी मनात विचार करू लागले की 'दादांनी त्या यतीची भेट तरी घेतलेली आहे. त्यामुळे त्यांच्या श्रद्धेला काही तरी कारण आहे. पण तुम्ही तर त्या यतीला पाहिलेलेही नाही. तरी तुमचा त्या यतीला एवढा अकारण विरोध कशासाठी?' या विचाराने मग मला त्या यतीपेक्षा तुमचीच शंका जास्त येऊ लागली आणि मी तुमच्या हालचाली व वागण्या बोलण्याचे नीट निरीक्षण करू लागले. तुमच्या विरोधामुळे जेव्हा दादांचा त्या यतीला येथे आणण्याचा निश्चय अधिकाधिक दृढ होऊ लागला तेव्हा मात्र तुमचा डाव, जो यशस्वी झाला होता तो हळूहळू माझ्या लक्षात येऊ लागला. आता यतीवेषधारी अर्जुनाची भेट घेतल्यानंतर तर माझी पक्की खात्रीच झाली.



अहो नाथ, तुमचे हे केवळ बुद्धीचातुर्य नाही तर त्या मागे तुमचा प्रेमीजनांविषयी जो कळवळा आहे ना, तोच माझ्या दृष्टीने अत्यंत लक्षणीय व महत्त्वाचा आहे. त्यांच्या केवळ प्रेमापोटी व हितासाठी तुम्ही केवढीतरी जोखीम पत्करून वेळप्रसंगी खुद्द दादांचा रोषही ओढवून घ्यायला तयार झालात, हे तुमचे साहस म्हणजे तुमच्या प्रेमीजनांवरील तुमच्या असाधारण प्रेमाचेच द्योतक आहे. ही तुमची प्रेमस्वरूप अवस्था म्हणजे ‘जेथे तुम्हीही तुमच्या स्वाधीन नसता’ ती पाहून माझे अंतःकरण तुमच्यावरील प्रेमाने व माहात्म्याने भरून येते आणि मी तुमच्यापुढे अगदी नतमस्तक होते. आता तुमच्या चरणी एकच विनंती आहे की आपल्या या खेळात मलाही सामील करून घेऊन तुमची काही सेवा करण्याची संधी मला द्या आणि तुमच्या प्रेमभक्तीचा आनंद अनुभवण्याच्या माझ्या भावाची पूर्ती करा.”

रूक्मिणी बोलता बोतला एकदम एवढी भावपूर्ण झाली की तिच्या नकळतच तिचे हात जोडले गेले. तिची ती भावपूर्ण अवस्था पाहून कृष्णालाही भरून आले आणि तो लगबगीने रूक्मिणीच्या जवळ गेला. कृष्णाने रूक्मिणीचे दोन्ही हात आपल्या हातात घेतले आणि तो तिच्या अश्रूंनी दाटलेल्या नेत्रांकडे एकटक पाहत राहिला. रूक्मिणीविषयीचे पूर्ण कौतुक व आत्मीयता कृष्णाच्या नजरेतून अगदी ओसंडत होती. कृष्णाच्या दृष्टीतील प्रेमवर्षावात पूर्णपणे न्हाऊन निघालेल्या रूक्मिणीने पुढे होऊन कृष्णाच्या छातीवर आपले मस्तक ठेवले असता, कृष्णाने तिला आपल्या अधिक जवळ घेऊन दृढ प्रेमालिंगन दिले. परस्परांच्या मिठीत विसावलेले आणि परस्परांच्या प्रेमाने अत्यंत सुखावलेले असे कृष्ण व रूक्मिणी यांचे ते प्रेममीलन म्हणजे आनंदानुभवाची पराकोटीच होती. परंतु त्या अवस्थेतही स्वतःची पूर्ण जाणीव असलेल्या कृष्णाच्याठायीचे परिस्थितीचे अवधान व प्रसंगातील पुढील व्यवधान अगदी तेवढ्याच उत्स्फूर्तपणे जागृत झाले आणि त्याच्या कृतीतूनही अगदी तेवढ्याच सहजतेने प्रगट झाले. कृष्णाने अत्यंत अलगदपणे व हळुवारतेने रूक्मिणीला आपल्यापासून थोडेसे अलग केले आणि तिच्या खांद्यावरील आपला हात तसाच ठेवून कृष्ण रूक्मिणीसह मंचकावर येऊन बसला. कृष्णाने रूक्मिणीचे दोन्ही हात पुन्हा आपल्या हातात घेतले आणि तिच्याशी मृदु व मधुर स्वरात बोलण्यास सुरूवात केली,

“अगं रूक्मिणी, तुझ्याकडे मी नेहमीच माझी ‘आत्मसखी’ म्हणून पाहत असतो. माझ्याठिकाणी तुझ्याविषयी तोच भाव कायम असतो आणि तू मला तुझ्या माझ्यावरील भक्तिभावाने तसा अनुभवही आणून देतेस. त्यामुळे माझे अंतःकरण अत्यंत प्रसन्न होते. माझ्या अंतःकरणाची अवस्था तू पूर्णपणे जाणतेस. त्यामुळेच माझ्या सर्व करण्यामागील शुद्ध हेतूची तुझ्याठायी पूर्ण खात्री असते. माझे अंतःकरण प्रमाण मानूनच तू नेहमी माझ्या जीवनाकडे पाहत असतेस. त्यामुळेच माझे मनही

ओळखायला तुला मुळीच वेळ लागत नाही. माझ्या प्रेमीजनांसाठी माझा नेहमीच आधार, रक्षण व प्रत्यक्ष मदतही असते. सत्य व सद्भावाचे रक्षण आणि असत्य व अधर्माचे उच्चाटन हे माझे ब्रीदही तू जाणून आहेस. त्यामुळे माझ्या वागण्या-बोलण्यामागील भावार्थ तुला बरोबर आकलन होतो. एवढेच नव्हे, तर तुझ्याठायी असलेल्या सद्भावामुळे तुझ्याकडून मला पूर्ण व प्रत्यक्ष साथ मिळत असते आणि त्याची जाणीव व कौतुक माझ्या ठायी सदोदित असते. एखादे वेळेस माझ्याकडून ते व्यक्त होत नसेलही, परंतु माझ्याठायी असलेला तुझ्याविषयीचा भाव तू जाणतेस आणि अनुभवतेसही याची मला पूर्ण खात्री आहे. या खात्रीपोटीच तर माझ्या कुठल्याही कार्यात मी तुझा पूर्ण भरवसा धरलेला असतो आणि तुझे प्रत्यक्ष सहकार्य मला अगदी मनापासून मिळणार असा मला पूर्ण विश्वास असतो.

हे रूक्मिणी, सुभद्रा व अर्जुन यांचा विवाह व्हावा म्हणून आखलेली योजना तुझ्या लक्षात आली याबद्दल मला तर तुझे अत्यंत कौतुकच वाटत आहे. परंतु त्याहीपेक्षा यतीवेषधारी अर्जुनाला ज्या पद्धतीने तू ओळखलेस ना, ती मात्र तुझी अगदी कमालच झाली. त्याबद्दल तुला शत प्रतिशत गुण दिले तरी सुद्धा कमीच आहेत. खरे तर, हे सर्व मी तुला आता सांगणारच होतो. कारण या खेळात तुझा सहभाग होण्याची वेळ आलेलीच आहे. पण तुझ्या चतुराईने त्याआधीच तू माझ्यावर मात केलीस त्याची दाद द्यावयासच हवी. त्याबद्दल तुझे प्रथम अत्यंत मनःपूर्वक अभिनंदन! आता या खेळाचा हा अंतिम भाग आहे आणि त्याची सर्व सूत्रे मी तुझ्याच हाती सोपवणार आहे. मगाशी तुला सांगितल्याप्रमाणे मी काहीतरी कामाचे निमित्त काढून मथुरा नगरीच्या बाहेरच जाणार आहे. कारण अर्जुन जेव्हा सुभद्रेचे येथून प्रत्यक्ष हरण करील तेव्हा मी येथे हजर नसणे हेच बरे होईल, म्हणजे मग दादांना माझ्याविषयी शंका घेण्यास अजिबात वावच राहणार नाही. खरे की नाही?

हे रूक्मिणी, प्रथम तू अर्जुनाला विश्वासात घे. तू त्याला ओळखले आहेस हे त्याच्या लक्षात आणून दे. म्हणजे त्याच्या मनावरील बराचसा ताण कमी होईल. अर्जुनाचे दर्शन घेण्याचे निमित्त करून त्याच्या संपर्कात रहा. त्यामुळे पुढील गोष्टी ठरवणे तुला सहज शक्य होईल. परंतु एका गोष्टीची काळजी घे. सुभद्रेला मात्र या कशाची माहिती देऊ नकोस. कारण त्यामुळे तिच्या मनावरील ताण अधिकच वाढेल आणि दादांच्या मुळे येणाऱ्या मनावरील दडपणाखाली तिच्या मनाचे बांध केव्हा फुटतील हे सांगता येणार नाही. मग सर्वच खेळ संपेल. तेव्हा सुभद्रेची जरी आपल्याला दया येत असली तरी आपण सुभद्रेला सध्या विश्वासात घेणे हे योग्य ठरणार नाही. कारण ते धोक्याचेच ठरू शकेल. योग्य वेळ येताच तिला सर्व गोष्टी आपसूकच कळतील. परंतु सुभद्रेच्या ठिकाणी त्या यतीविषयी विश्वास निर्माण करणे

मात्र अत्यंत आवश्यक आहे आणि ही महत्त्वाची कामगिरी रूक्मिणी, तुलाच करावी लागणार आहे. कारण सुभद्रेचा केवळ तुझ्यावरच विश्वास आहे. सध्या तर तिच्या ठिकाणी माझ्याविषयीसुद्धा विश्वास राहिलेला नाही. तेव्हा सुभद्रेचे त्या यतीविषयी मन तयार करणे आणि तिच्याठायी यतीविषयी श्रद्धा निर्माण करणे ही जबाबदारी आता तुझ्यावरतीच आहे. तुझ्या बुद्धीचातुर्यामुळे व लाघवी स्वभावामुळे आणि त्याहीपेक्षा तुझ्या सुभद्रेवरील प्रेमापोटी ही जबाबदारी तू निश्चितच यशस्वीरित्या पार पाडशील याची मला पूर्ण खात्री आहे.


हे रुक्मिणी, आपल्यासाठी तसा थोडाच वेळ आहे. कारण अर्जुन यतीधर्माच्या नियमानुसार फक्त तीनच दिवस येथे राहणार आहे. तेवढ्या वेळातच सुभद्रेला त्या यतीवेषातील अर्जुनाच्या सहवासात आणून तिचे मन अर्जुनाशी जुळणे अत्यंत आवश्यक आहे. त्यानंतर योग्य वेळ येताच अर्जुनाने सुभद्रेला घेऊन केव्हा व कसे जायचे हे ठरवता येईल. खरे तर, ही सर्व माझी योजना तुला एवढ्या तपशीलवार सांगण्याची आवश्यकताच नाही. तू सर्व काही व्यवस्थित व ठीकठाक करशील याचा मला विश्वास आहे. नाही म्हटले तरी तुलाही अशा योजना आखून त्या यशस्वीरीत्या कार्यान्वित करण्याचा स्वानुभव आहेच. त्यासाठी काय युक्त्या प्रयुक्त्या कराव्या लागतात, शेवटपर्यंत कशी गुप्तता पाळावी लागते आणि सर्व करूनही नामानिराळे कसे रहायचे हे सर्व तू जाणून आहेसच. आता त्या सर्वांचा पुनःप्रत्यय घ्यायची संधी तुला मिळत आहे. त्यावेळेस प्रश्न तुझ्या लग्नाचा होता, आता प्रश्न आपल्या सुभद्रेच्या लग्नाचा आहे. स्वतःसाठी स्वतः करणे, दुसऱ्यासाठी स्वतः करणे आणि दुसऱ्याकडून त्याच्यासाठीच करवून घेणे यातील फरक व अंतर आता तुझ्या लक्षात येईल. आपल्याला अपेक्षित असे दुसऱ्याकडून करून घेणे, अगदी ते जरी त्याच्याच हिताचे असले तरी, हे अधिक कठीण असते. पण तू त्यामध्ये यशस्वी होशील असा माझा दृढ विश्वास आहे. आता फक्त तू ते कसे पूर्तीला नेतेस हेच मला पहायचे आहे."

असे म्हणून कृष्ण हसत हसत व मिश्किल नजरेने रुक्मिणीकडे पाहत राहिला. कृष्णाच्या बोलण्याने रुक्मिणी प्रमुदित झाली आणि तिच्या मुखावरही प्रसन्न हास्य पसरले. आपले दोन्ही हात जोडून रुक्मिणीने कृष्णाला वंदन केले आणि ती म्हणाली,

"हे नाथ, तुमचा माझ्यावरील असलेला हा विश्वासच माझा आत्मविश्वास जागृत करीत आहे. तुमचा माझ्यावरील भरवसा ही माझा भाव तुमच्यापर्यंत येऊन पावल्याची पावतीच आहे असे मी समजते. तुम्ही माझ्या बुद्धीचातुर्याचे जे कौतुक केलेत ते जरी जरा जास्तच असले तरी मी नम्रतेने त्याचा स्वीकार करते. परंतु मी हेही जाणून आहे की केवळ ही चतुरता मला यश प्राप्त करून देणार नाही. तुमच्या मनात सुभद्रा व अर्जुन यांच्याविषयी ज्या प्रकारचा प्रेमभाव आहे आणि ज्याच्यामुळे

तुम्ही सद्भावाला उचलून धरून त्याला आधार देत आहात, तोच प्रेमभाव जर माझ्या मनात त्यांच्याविषयी निर्माण झाला तरच मला खऱ्या अर्थाने यश मिळेल. त्याच यशाचा मलाही खरा आनंद मिळेल आणि तुम्हीही आनंदित व्हाल हे मी जाणून आहे. कारण आनंददायी यशस्विता ही केवळ ठराविक बाह्य कृतीत नसून त्यामागील भावाची पूर्ती होण्यामध्ये आहे. असा आनंद मी तुम्हाला निश्चितपणे देईन असे आश्वासन मी तुम्हाला देते. तुम्ही अगदी निश्चिंत रहा आणि तुमच्या कामगिरीवर मोकळेपणाने जा."

*****



# रूक्मिणीने केली पूर्ती

रुक्मिणीच्या बोलण्याने कृष्णाला झालेला परमसंतोष त्याच्या मुखावर पूर्णपणे प्रगटला आणि त्याचे मुखकमल त्यावरील प्रसन्न हास्याने अत्यंत शोभायमान झाले. कृष्णाने पुन्हा एकदा रुक्मिणीचे दोन्ही हात त्याच्या हातात घेऊन त्याचा आनंद व्यक्त केला आणि रुक्मिणीच्या डोक्यावर कौतुकाने हलकेच एक टपली मारून कृष्ण तेथून निघून गेला. रुक्मिणी थोडावेळ तेथेच विचार करीत बसली. मनात विचार करून तिने काहीतरी ठरवले आणि तेथून निघून ती 'यतीच्या' महालात जाऊन दाखल झाली. रुक्मिणीला पाहताच यतीने मान खाली घातली. सुदैवाने त्यावेळेस तेथे दुसरे कोणीही नव्हते. रुक्मिणीने आजूबाजूला पाहत कानोसा घेतला आणि हलक्या आवाजात पुटपुटली. "अरे अर्जुना, कसा आहेस तू?" ते शब्द कानावर पडताच अर्जुन तर आधी एकदम बावरलाच. पण लगेचच आसनावरून उठून अर्जुनाने रुक्मिणीलाच वाकून नमस्कार केला आणि आपले दोन्ही हात जोडून तो रुक्मिणीच्या समोर उभा राहिला. अर्जुनाच्या मुखावर वरमल्याचे भाव होते. अर्जुनाची ती केविलवाणी स्थिती पाहून रुक्मिणीला त्याची दया आली. मोकळेपणाने हसत ती अर्जुनाला म्हणाली,


"अरे अर्जुना, असा कावरा बावरा होऊ नकोस आणि घाबरू तर मुळीच नकोस. हे तुझे रहस्य माझ्याशिवाय दुसऱ्या कोणालाही माहित नाही आणि मला ते ठाऊक आहे हे कृष्णालाही कळलेले आहे. कृष्ण मुद्दामच काहीतरी कामाचे निमित्त काढून बाहेरगावी गेलेला आहे आणि पुढील सर्व योजना त्याने मला सांगितलेली असून त्याची कार्यवाही करण्याची जबाबदारी माझ्यावर सोपवलेली आहे. आता तू काहीही काळजी करू नकोस. फक्त मी जेव्हा जे करावयास सांगेन तेवढेच तू तेव्हा करायचे आहेस ही गोष्ट लक्षात ठेव. मुख्य म्हणजे निश्चिंत मनाने कोणताही ताण न ठेवता अत्यंत मोकळा रहा. सर्व वागणे व बोलणे अगदी सहजपणाचे ठेव. त्यामध्ये कोणतीही कृत्रिमता येऊ देऊ नकोस. अर्थात तुझी खरी कसोटी सुभद्रा येथे असतानाच लागणार आहे. सुभद्रेला तर मी येथे तुझ्या सेवेसाठी आणणारच आहे. ते करणे अत्यंत आवश्यकच आहे. कारण तिच्या मनात तुझ्याविषयी आदर व श्रद्धा निर्माण होणे अत्यंत आवश्यक आहे. परंतु तिच्या सहवासात असताना भावनेच्या भरात वाहून मात्र जाऊ नकोस. चुकून जरी तुझ्याकडून काहीतरी गैर वागणे वा बोलणे घडले आणि सुभद्रेचे मन बिथरले तर सर्वच खेळ तेथेच संपला म्हणून समज. तेव्हा काळजीपूर्वक तुझ्या मनाचा समतोल व संयम कायम राख. सुभद्रेचे मन व तिची व्यथा समजून घे. त्याविषयी तिच्याशी बोलून तिचे मन हलके कर आणि

दुर्बल झालेल्या सुभद्रेच्या मनाला सावर. तिची मनोकामना पूर्ण होईल असा विश्वास सुभद्रेच्या मनामध्ये निर्माण करून तिची उमेद वाढव. त्यामुळे तुझ्या सहवासाची जरुरी व आवड सुभद्रेच्या मनात निर्माण होईल.

अर्जुना, परंतु सर्वात महत्त्वाची आणखीन एक गोष्ट लक्षात ठेव. कोणत्याही परिस्थितीत तुझी खरी ओळख सुभद्रेच्या समोर उघड करू नकोस. कारण एकतर तिच्या मनाला एकदम धक्काच बसेल आणि दुसरे म्हणजे हे रहस्य ती तिच्या मनात राखूच शकणार नाही. बलरामदादांच्या भीतीचे आणि आपण त्यांची फसवणूक करीत आहोत या विचाराचे ओझे सुभद्रेच्या मनाला तर झेपणारच नाही. त्यामुळे मनावरील तो भार ती केव्हा झुगारून देईल आणि तिचे मन ती केव्हा मोकळे करील हे सांगता येणार नाही. याबाबतीत सुभद्रेचा काहीच भरवसा धरता येत नाही. कारण ती पटकन भावनाविवश होते आणि मग तिचा तिच्या मनावर मुळीच ताबा राहत नाही. तेव्हा या सर्व गोष्टी तुलाच लक्षात ठेवावयास हव्यात आणि सर्व काही अत्यंत काळजीपूर्वक परंतु त्याचबरोबर अत्यंत सहजतेने करावयास हवे. काळ थोडाच आहे. कारण ठरलेल्या योजनेप्रमाणे तुझे येथील वास्तव्य फक्त तीन दिवसांपुरतेच मर्यादित आहे. यतीधर्माच्या नियमानुसार ते योग्यच आहे आणि तुझी भूमिकाही तशीच असावयास हवी. तोपर्यंत गोष्टी कशा कशा आकार घेत आहेत ते आपण पाहू आणि त्यानंतर पुढे काय करायचे ते ठरवू. कळले?”

रुक्मिणीचे बोलणे अवाक् होऊन ऐकणाऱ्या अर्जुनाकडे पाहून रुक्मिणीने एक स्मितहास्य केले आणि रुक्मिणी तिकडून निघण्यासाठी झटकन वळलीसुद्धा! तेवढ्यात रुक्मिणीला कोणीतरी तेथे येत असल्याची चाहूल लागली. म्हणून ती पुन्हा मागे वळली आणि अर्जुनाच्या जवळ आली. तिने अर्जुनाला वाकून नमस्कार केला आणि मोठ्याने म्हणाली, ‘यती महाराजांचा जयजयकार असो.’

तेवढ्यात तिथे प्रवेश करणाऱ्या बलरामाने ते दृश्य पाहिले आणि त्याच्या मनाला समाधान वाटले. त्याने कौतुकाच्या नजरेने रुक्मिणीकडे पाहून मान डोलावली. अर्जुनानेही रुक्मिणीच्या हातावर त्याने नुकत्याच केलेल्या पूजेचे तीर्थ ठेवले. रुक्मिणीने डोळे मिटून ते तीर्थ प्राशन केले आणि अर्जुनाने दिलेले प्रसादाचे आम्रफळही आपल्या हातात घेतले. रुक्मिणी वळून पहाते तर खुद्द बलरामच तिच्यासमोर उभा होता. त्याच्या हास्याला रुक्मिणीने आदरपूर्वक प्रतिसाद दिला. बलरामानेही पुढे होऊन अर्जुनाचे दर्शन घेतले असता अर्जुनाने त्यालाही तीर्थप्रसाद दिला. बलरामाने श्रध्दापूर्वक त्याचा स्वीकार करून त्याचे सेवन केले. रुक्मिणीने अर्जुनाकडे गंमतीने पाहून हळूच डोळे मिचकावून खूण केली. अर्जुन प्रयत्नपूर्वक शांतच राहिला आणि त्याने आपले नेत्र मिटून घेतले. रुक्मिणी मनातल्या मनात हसली आणि पटकन् तेथून बाहेर गेली.



अर्जुनाच्या येथून रुक्मिणी जी निघाली ती थेट सुभद्रेच्या महालात जाऊन पोहोचली. अचानक आलेल्या रूक्मिणीला पाहून सुभद्रा थोडीशी बावरली. परंतु अजूनही मनःस्थिती ठीक नसल्यामुळे सुभद्रा काहीही न बोलताच स्वस्थ बसून राहिली. ती रूक्मिणीकडे पहावयास सुद्धा तयार नव्हती. रूक्मिणीच सुभद्रेच्या जवळ गेली आणि तिने सुभद्रेच्या खांद्यावर हात ठेवून तिच्याशी बोलावयास सुरूवात केली,

“अगं सुभद्रे, अशी किती वेळ नाराज होऊन बसणार आहेस? तुझे मुख किती म्लान झाले आहे बघ. उगाच काळजी करून प्रश्न काही सुटतील का? थोडे धीराने घे. सर्वकाही ठीक व व्यवस्थित होईल. कोणीच तुझ्या मदतीला नाही असा समज करून घेऊ नकोस. मी तुझ्याबरोबर आहे याची खात्री बाळग. नाउमेद होण्याचे काहीच कारण नाही. अजूनही वेळ गेलेली नाही. जोपर्यंत तुझा विवाह प्रत्यक्ष कोणाशीही होत नाही तोपर्यंत, म्हणजे अगदी शेवटच्या क्षणापर्यंत प्रयत्नाला वाव आहे हे लक्षात ठेव. परंतु तसा प्रयत्न करण्यासाठी मनाची तयारी तर हवी की नाही? त्यासाठी आधी मनःस्थिती तर ठीक पाहिजे ना? सध्या परिस्थिती बाह्यांगाने प्रतिकूल आहे हे नक्की. तेव्हा या परिस्थितीशी झगडून मनःस्थिती आणखीनच बिघडवून घेण्यापेक्षा थोडेसे नमते घेणेच योग्य ठरेल. निदान तसे बाह्यांगाने दाखवले तरी पाहिजे. त्यामुळेच बाह्य वातावरणही निवळण्यास मदत होईल आणि मग त्यातूनच अनुकूलतेचा काही तरी मार्ग आपल्याला शोधता येईल. तसा मार्ग मी नक्की शोधून काढीन याची मला खात्री आहे. तू फक्त माझ्यावर विश्वास ठेव.”

रूक्मिणीच्या समजुतीच्या बोलण्याचा थोडासा परिणाम सुभद्रेवर नक्कीच झालेला दिसत होता. तिचा चेहरा थोडासा शांत झाला आणि तिच्या डोळयात आशेचा किरण चमकू लागला. तिला रूक्मिणीचा भरवसा वाटू लागला. सुभद्रेने रूक्मिणीकडे मान वर करून पाहिले आणि ती एकदम रूक्मिणीच्या कुशीत शिरली. मुसमुसून रडणाऱ्या सुभद्रेच्या मस्तकावर हात फिरवून रूक्मिणीने तिचे सांत्वन केले. थोड्या वेळात शांत झालेल्या सुभद्रेचे मस्तक रूक्मिणीने आपल्या हाताने हलकेच वर उचलले आणि तिच्या डोळयातील अश्रू आपल्या पदराने हळुवार पुसले. सुभद्रेच्या नजरेत नजर मिळवून रूक्मिणी पुन्हा तिच्याशी बोलू लागली.

“सुभद्रे, मी आता तुला काय सांगते ते नीट लक्षपूर्वक ऐक. सध्या थोडा वेळ तरी आपण दादांच्या मनासारखे वागणे अत्यंत आवश्यक आहे. कारण तसे आपण नाही केले तर आपल्याला त्यांचा राग तर ओढवून घ्यावा लागेलच, पण त्याचबरोबर त्यांनी तुझ्यासंबंधी जो काही निर्णय घेतला आहे त्याविषयीचा त्यांचा

निश्चय अधिकच ठाम व पक्का होईल आणि मग पुढे आपल्यालाही काही करणे अशक्य होऊन बसेल. तेव्हा त्यांच्या इच्छेनुसार तू त्या यतीमहाराजांची सेवा करावीस असे मला अगदी मनापासून वाटते. त्यामुळे दादांच्या मनाचे समाधान होईल आणि त्यांचा तुझ्याकडे पाहण्याचा दृष्टीकोनही थोडासा होकारात्मक होईल. म्हणूनच दादांना खूश करण्यासाठी तरी हा धोरणात्मक निर्णय घेणे अत्यंत जरूरीचे आहे. त्यासाठी तू एकदा तुझ्या मनाची तयारी केलीस ना की मग हळूहळू सर्वकाही व्यवस्थित होत राहील. मुख्य म्हणजे दादांच्या मनोवृत्तीत बदल होईल आणि त्यामुळे आपल्याला त्यांच्याशी तुझ्या लग्नाच्या विषयावर काहीतरी बोलणे शक्य होईल. दादा आपले म्हणणे ऐकून घेण्याची शक्यता अधिक वाढेल. मी काय म्हणते आहे ते तुझ्या लक्षात येतंय ना?

सुभद्रे, तुला आणखीन एक महत्त्वाची गोष्ट सांगते. आत्ताच मी त्या यती महाराजांची प्रत्यक्ष भेट घेऊन आले. एवढे त्यांच्याविषयी बोलले जात आहे आणि आपण ऐकलेही आहे. तेव्हा मी असा विचार केला की ‘स्वतःच जाऊन त्यांना भेटावे आणि त्यांच्याशी बोलावे. म्हणजे मग खरे काय ते कळेल’ आणि सुभद्रे, तुला मी अगदी खरेच सांगते की ते यती महाराज अत्यंत सात्विक वृत्तीचे आहेत. एवढे तपश्चर्येचे तेज व ज्ञानाची अवस्था असूनही ते अत्यंत निगर्वी व निःस्पृह आहेत. एवढेच नव्हे, तर ते स्वभावाने अत्यंत प्रेमळ व मनमोकळेही आहेत. मला तर असे खात्रीपूर्वक वाटते की त्यांच्या सहवासात तुझेही मन मोकळे होईल आणि तुझे दुःखही हलके होईल. खरे तर, ते कोणाची सेवा स्वीकारीतच नाहीत. परंतु केवळ दादांच्या आग्रहाखातरच तशी संधी तुला देण्याचे त्यांनी मान्य केले आहे. तेव्हा ही संधी तू सोडू नकोस. त्या निमित्ताने तुझ्या मनातील व्यथा त्यांना सांग. ते तुला योग्य ते मार्गदर्शन निश्चितच करतील आणि तुझ्या मानसिक त्रासातून तुझी सुटका करतील याची मला अगदी खात्री आहे. मी काय सांगते आहे ते तुला कळतंय ना?”

रूक्मिणीच्या बोलण्यातील आपलेपणा जसा सुभद्रेच्या मनाला स्पर्श करीत होता, तसाच रूक्मिणीच्या सांगण्यामागील तिचा आत्मविशावसही सुभद्रेला जाणवत होता. त्यामुळेच सुभद्रेलाही रूक्मिणीविषयी अत्यंत विश्वास वाटू लागला. रूक्मिणीच्या हेतूची सुभद्रेला खात्री होतीच. परंतु त्याचबरोबर ‘रूक्मिणी आपल्याला प्रत्यक्ष मदतही करू शकेल’ असाही विश्वास सुभद्रेच्या मनात निर्माण झाला आणि तिच्या मनात पुन्हा आशेची पालवी फुलली. बलरामाच्या भूमिकेमुळे निष्प्रभ झालेली आणि कृष्णाने घेतलेल्या पवित्र्यामुळे निराश झालेली सुभद्रा रूक्मिणीच्या आपलेपणामुळे पुन्हा उल्हसित झाली. सुभद्रेच्या मनात निर्माण झालेली नकारात्मक वृत्ती पालटली आणि तिच्या ठायीची होकारात्मक वृत्ती पुन्हा

वर आली. सुभद्रेच्या मनावरील ताण कमी झाल्यासारखे तिचे तिलाच जाणवले. तिची म्लान मुद्रा आता शांत व सतेज दिसू लागली. एवढेच नव्हे, तर तिच्या मुखावर एक अस्पष्ट अशी स्मितरेषाही चमकली. सुभद्रा प्रेमाने रूक्मिणीच्या अधिक जवळ गेली आणि रूक्मिणीचे हात आपल्या हातात घेऊन सुभद्रेने आपली मान संमतीदर्शक अशी किंचितशी हलवली.

सुभद्रेची ती होकारात्मक अवस्था पाहून रूक्मिणीला अतिशय आनंद झाला आणि तिचा उत्साहही एकदम द्विगुणित झाला. कारण आता पुढील गोष्टींचा मार्ग खुला झाला होता. रूक्मिणीच्या नेत्रात एक वेगळीच चमक दिसू लागली होती. तिने क्षणभरच आपले नेत्र मिटून घेतले आणि आपल्या अंतःकरणातील कृष्णमूर्तीचे मनोभावे दर्शन घेतले. क्षणात रूक्मिणीचे नेत्र भरून आले. पण तिने लगेचच भावनावेग आवरला आणि स्वतःला सावरले. रूक्मिणीने सुभद्रेच्या खांद्यावर व मस्तकावर किंचितसे थोपटले आणि तिचा हात धरून तिला घेऊन रूक्मिणी तेथून जी निघाली ती थेट 'यतीच्या' महालातच आली. सुभद्रेला बरोबर घेऊन आलेल्या रूक्मिणीला पाहून अर्जुन आधी मनातून थोडासा बावरलाच. परंतु लगेचच निश्चयपूर्वक स्वस्थ राहिला. आता अर्जुनाच्या मनाच्या निश्चयाची खरी कसोटी होती आणि अर्जुन ते जाणून होता. त्यामुळे भावनेच्या आहारी अजिबात न जाता अर्जुन मनातून प्रयत्नपूर्वक निश्चल राहिला आणि मोकळेपणाने त्याने रूक्मिणीचे स्वागत केले. रूक्मिणीने आधी स्वतः अर्जुनाला वाकून नमस्कार केला आणि मग सुभद्रेला सांगून तिच्याकडूनही अर्जुनाला नमस्कार करवून घेतला. अर्जुनानेही आपले दोन्ही हात जोडून त्यांच्या नमस्काराचा स्वीकार केला आणि रूक्मिणीकडे प्रश्नार्थक नजरेने पाहत राहिला. अर्जुनाच्या नजरेतील हेतू जाणून रूक्मिणीने बोलावयास सुरूवात केली.

"अहो यती महाराज, ही बलराम व कृष्ण यांची धाकटी बहीण सुभद्रा आहे. काही कराणामुळे हिची मानसिक अवस्था फारच बिघडली आहे. तिच्या मनाविरूद्ध काही गोष्टी करण्याची वेळ तिच्यावर आलेली आहे आणि त्याचेच तिला अत्यंत मानसिक क्लेश होत आहेत. सुभद्रेचे मन तिला एक गोष्ट करावयास सांगत आहे, तर तिचे बंधू वेगळीच गोष्ट करण्याची अपेक्षा तिच्याकडून करीत आहेत. मनाच्या अशा द्विधा अवस्थेत बिचाऱ्या सुभद्रेच्या जीवाचा अगदी कोंडमारा झालेला आहे. म्हणून मी मुद्दामच तिला तुमच्या चरणापाशी घेऊन आलेली आहे. तुम्ही तिला समजुतीचे चार शब्द सांगावेत आणि तिच्या मनाची योग्य ती समजूत घालावीत अशी मी तुम्हाला विनंती करते. तुमच्याशी बोलण्यानेच सुभद्रेचे मन मोकळे होईल आणि योग्य त्या गोष्टींचा निर्णय घेण्याचे व त्या करण्याचे मनोबळ तिला प्राप्त होईल याचा मला विश्वास आहे. तुमच्यासारख्या ज्ञानी पुरूषांच्या स्वानुभवाचे बोलच

सुभद्रेच्या मनाला धीर देऊन पुन्हा उभारी देतील याची मला खात्री आहे. तरी तुम्ही सुभद्रेला या ठिकाणी तुमचा सहवास व सेवा करण्याची संधी द्यावी अशी मी अगदी मन:पूर्वक प्रार्थना करते.”

रूक्मिणीच्या बोलण्याने खरे तर अर्जुनाला मनातून अत्यंत हर्षच झाला होता. परंतु बाह्यांगाने तसे मुळीच न दर्शविता अर्जुनाने डोळे मिटले आणि शांतपणे थोडासा विचार केल्यासारखे दाखवले आणि थोड्या वेळाने म्हणाला,

“अहो रूक्मिणीदेवी, खरे तर आम्ही एकांतप्रिय आहोत. आम्हाला कशाचाही व कोणाचाही संपर्क हा नकोच असतो. म्हणून तर आम्ही सतत रानावनात किंवा गुहेमध्येच वास्तव्य करीत असतो. त्यामुळे आमची ध्यानधारणा, जपजाप्य व पूजाअर्चा इत्यादी नित्यक्रम बिनविरोध होत राहतो. राजवाड्यातील अशा राजभोगाचा तर आम्हाला विरागच आहे. परंतु बलरामराजांची विनंती स्वीकारून आणि तेही केवळ अपवाद म्हणूनच आम्ही येथे येणे केले. आमचे मन मात्र या ठिकाणी मुळीच रमत नाही ही गोष्ट सत्यच आहे. केव्हा येथून निघून पुन्हा आमच्या गुहेतील एकांत स्थळी जातो असेच आम्हाला झाले आहे. पण आम्ही दिलेला शब्द पाळू हे नक्की. तरीही तीन दिवस झाल्यानंतर एक क्षणभरही आम्ही येथे राहणार नाही हेही तेवढेच खरे आहे.

अहो देवी, त्याचबरोबर दुसऱ्या कोणाचीही व्यक्तिगत सेवा स्वीकारायची नाही हा तर आमचा नियमच आहे. त्यातूनही स्त्रियांकडून सेवा करून घेणे हे तर सर्वथा वर्ज्यच आहे. तसा प्रश्नच निर्माण होऊ शकत नाही. परंतु या राजकन्येची मात्र आम्हाला दया येत आहे. एवढ्या तरूण वयात जर तिला निराशेने ग्रस्त केले असेल आणि तिला जीवनात जगण्यासाठी काही उत्साहच राहिला नसेल, तर ही गोष्ट खरेच अत्यंत गंभीरच आहे. त्याचा विचारही गंभीरपणे करावयास हवा हेही खरेच आहे. त्या दृष्टीने आम्ही राजकन्येशी जरूर बोलणे करू आणि तिचे मन मोकळे करण्याचा प्रयत्न करू. तिला चार समजुतीच्या गोष्टी सांगून तिचे मनोबळही वाढवू. आमच्याकडून जेवढे होईल तेवढे आम्ही जास्तीत जास्त करू, एवढे आश्वासनही आम्ही तुम्हाला देतो. राजकन्येकडून योग्य वेळी योग्य निर्णय घेतला जाऊन, त्या निर्णयाप्रमाणे प्रत्यक्ष वागण्याचे धैर्यबळही तिला प्राप्त होईल याची खात्री आम्हाला पूर्णपणे आहे. आता तुम्ही काळजी न करता निश्चिंत रहा आणि सर्व काही आमच्यावर सोपवा. परमेश्वराच्या इच्छेनुसार सर्व काही व्यवस्थित व ठीक होणारच आहे हे तुम्ही जाणता आणि आम्हीही जाणून आहोत.”

असे म्हणून अर्जुनाने रुक्मिणीकडे बघून अर्थपूर्ण स्मितहास्य केले. त्याचा अर्थ रुक्मिणीलाही लगेच कळला आणि तिनेही मंदस्मित करून त्याला प्रतिसाद दिला.

रुक्मिणीने सुभद्रेकडे वळून पाहिले असता तिला सुभद्रेचा चेहरा बराचसा तणावमुक्त दिसला. एवढेच नव्हे, तर सुभद्रेच्या मनात त्या यतीविषयी श्रद्धा व विश्वास निर्माण झाला आहे असेही रुक्मिणीला जाणवले. रुक्मिणीने सुभद्रेचे हात आपल्या हातात घेतले आणि ती हळूच हसली. सुभद्रेकडूनही अल्पसा का होईना, पण होकारात्मक प्रतिसाद मिळाला आणि तिने आपली मान हलकेच डोलवली. मग मात्र तेथे क्षणभरही न थांबता रुक्मिणी तेथून लगेचच निघून गेली.

सुभद्रा तिथेच उभी राहिली होती. ‘काय करावे’ या विचाराने तिच्या मनात थोडासा गोंधळच निर्माण झाला होता. सुभद्रेला त्या गोंधळलेल्या स्थितीत पाहून अर्जुनाने तिला खाली बसण्याची खूण केली. ‘यती’ महाराजांची आज्ञा प्रमाण मानून सुभद्रा नम्रतेने तेथेच खाली मान घालून बसली. अर्जुनाने प्रथम तिच्याकडे अत्यंत प्रेमाने व डोळे भरून पाहून घेतले. बऱ्याच दिवसांनी तो तिला एकांतात पाहत होता. प्रतिकूल परिस्थितीतही सुभद्रेचे त्याच्यावरील प्रेम ठाम व कायम आहे हे पाहून अर्जुनाला तिचे कौतुक तर वाटलेच, पण त्याचेही मन भरून आले. परंतु स्वतःच्या भावनावेगाला अर्जुनाने लगेचच आवरले. सुभद्रेकडे पाहून अर्जुनाने स्मितहास्य केले आणि तो तिला उद्देशून तिच्याशी बोलू लागला.

“अगं राजकन्ये, तुझे कल्याण असो. तुझ्या सर्व मनोकामना पूर्ण होवोत. परमेश्वरावर श्रद्धा ठेव. त्याचाच भरवसा धर. सर्व काही व्यवस्थित होईलच. अजिबात काळजी करू नकोस. परंतु तोपर्यंत मनात धीर धरून रहावयास हवे आणि त्यासाठीच मनोबळाची आवश्यकता असते. असे मनोबळ प्राप्त होण्यासाठी आधी आपले मन मोकळे करावयास हवे. त्यामुळेच मनातील ताण कमी होऊन तो नाहीसाही होतो. असे मन मोकळे करण्यासाठी कोणीतरी आपली व्यक्ती असावी लागते, की जिच्यापाशी आपल्याला हक्काने आपले मन मोकळे करता येईल. पण त्याचबरोबर ती व्यक्ती सबळ असणेही तेवढेच अत्यावश्यक असते. कारण तरच ती व्यक्ती आपल्याला आपल्या मनःस्थितीतून तर बाहेर काढू शकेलच, पण प्रत्यक्ष मदत करून परिस्थितीतूनही बाहेर काढू शकेल. एखादेवेळेस तुला तशी व्यक्ती अजूनही मिळाली नसेल. काहीजणांच्या ठिकाणी तुझ्याविषयी आपलेपणा असेलही. परंतु ते जर तुला प्रत्यक्ष मदत करू शकत नसतील तर तुला त्यांचा काहीच उपयोग नाही. खरे की नाही?


हे राजकन्ये, आम्ही मात्र तुला पूर्ण आश्वासन देतो की आम्ही तुला केवळ समजुतीच्या गोष्टी सांगून तुझ्या मनाला खोटा दिलासा न देता, तुला तुझी मनःस्थिती व परिस्थिती यातून बाहेर येण्यासाठी प्रत्यक्ष मदत करू. तशी जरूरी वाटल्यास आम्ही प्रत्यक्ष बलराम राजांशीही बोलू आणि त्यांच्या मनाची योग्य ती

समजूतही घालू. तू आमच्यावर विश्वास ठेव आणि तुझ्या मनातील सर्व काही आम्हाला अगदी मोकळेपणाने सांग. आम्हाला तरी असे खात्रीपूर्वक वाटते, की तुझ्या मनातील अडचण ही तुझ्या विवाहासंबंधीची असावी. तुझ्या मनात एक वेगळेच असावे आणि दुसरेच काहीतरी करण्यासाठी तुझ्यावर कुटुंबियांकडून दडपण येत असावे. त्यामुळेच तुझ्या मनाची कुचंबणा हाऊन मनावरील ताण वाढत असावा. होय ना?”

अर्जुनाच्या बोलण्यातील आपलेपणा सुभद्रेला जाणवत होता. त्यातूनही अर्जुनाने जेव्हा सुभद्रेच्या मनातील नेमक्या व्यथेलाच स्पर्श केला, तेव्हा तिचे मन भरून आले आणि तिच्या नेत्रांत अश्रू दाटून आले. आपली मान हळूच हलवून सुभद्रेने अर्जुनाचे बोलणे खरे असल्याचे दर्शविले. सुभद्रेने काहीतरी बोलावे या अपेक्षेने अर्जुन तिच्याकडे पाहत राहिला होता. अर्जुनाची ही अपेक्षा सुभद्रेला कळत होतीच, परंतु काही बोलण्याचे धाडस मात्र तिला होत नव्हते. असा थोडा वेळ गेला, पण त्या उभयतांना तो काळ बराच जाणवला. शेवटी सुभद्रेचा धीर चेपला आणि मनाचा हिय्या करून तिने बोलावयास सुरुवात केली.

“अहो महाराज, आपण माझ्याशी एवढ्या आपलेपणाने बोलत आहात, की त्यामुळे माझे मन अधिकच भरून येत आहे आणि काही बोलणे मला शक्यच होत नाही. आपल्याठायी असलेल्या माझ्याविषयीच्या आपलेपणाला प्रतिसाद देणेही माझ्याकडून घडत नाही याचे तर मला अधिकच वाईट वाटते. परंतु आपल्याला मी एक गोष्ट निश्चितपणे सांगू इच्छिते, की आपल्या आश्वासक बोलण्यामुळे माझ्या मनाला केवढा तरी धीर प्राप्त झालेला आहे. मुख्य म्हणजे माझ्या मनातील नैराश्येचा काळोख बराचसा दूर झालेला आहे आणि मनामध्ये आशेचे किरण पुन्हा चमकू लागले आहेत. त्याचबरोबर आपल्यावरील श्रद्धेमुळे, माझ्या मनातील सर्वकाही आपल्याला सांगण्याची थोडी फार हिंमतही आता माझ्या मनात निर्माण झालेली आहे. एवढेच नव्हे, तर आपण मला योग्य ते मार्गदर्शन करून आणि प्रत्यक्ष मदतही करून माझ्यावरील संकटातून मला वाचवाल, याची मला पूर्ण खात्री वाटत आहे. म्हणूनच मी आपणाशी माझे मन मोकळे करण्याचा प्रयत्न करीत आहे.

अहो महाराज, आपण माझ्या अडचणीचे कारण अगदी बरोबर ओळखलेले आहे. माझ्या मानसिक दुःखाचे निदानही आपण अत्यंत अचूक केलेले आहे यावरूनच आपल्याठायीच्या सामर्थ्याची मला प्रचिती आली आणि माझी आपल्यावरील श्रद्धा अधिकच वाढली. आपण म्हणता ते अगदी खरेच आहे. माझा होऊ घातलेला विवाह हेच माझ्यावरील मोठे संकट ठरले आहे. खरे तर, विवाह हा जीवनातील अत्यंत मांगल्याचा व आनंदाचा प्रसंग. पण माझ्यासाठी मात्र तोच प्रसंग अत्यंत दुःखाचा व क्लेशाचा होत आहे. कारण माझा विवाह ठरवताना माझ्या मनाचा कोणीच विचार



करीत नसून, त्यांचा निर्णय माझ्यावर अक्षरशः लादला जात आहे. 'तू अजाण आहेस, तू अज्ञानी आहेस, तुला तुझे हित मुळीच कळत नाही' असे मला वारंवार सांगून माझ्या मनातील भावना दडपल्या जात आहेत. अशा परिस्थितीत माझ्या मनाविरूद्ध विवाह झाल्यास मी जन्मभर दुःखी होऊन राहीन. असे जीवन जगण्यापेक्षा मरण पत्करणे हेच मला सुखाचे वाटते. कारण त्यामुळे सर्व दुःखातून माझी कायमची सुटका होईल."

सुभद्रेचे बोलणे ऐकताना तिच्या दुःखाने अर्जुनाच्या मनालाही अत्यंत क्लेश होत होता. परंतु आपल्या मनाचे बांध फुटू न देता अर्जुनाने अत्यंत निर्धारपूर्वक त्याचे मन शांत राखले आणि त्याच शांत स्वरात तो सुभद्रेला म्हणाला.

"अगं राजकन्ये, तुझ्या बोलण्यावरून एक गोष्ट तर आम्हाला स्पष्टपणे जाणवत आहे, की तुझे मन एका पुरुषावर पूर्णपणे जडले आहे आणि तुझा विवाह तुझ्या वडीलधाऱ्यांनी कोणा दुसऱ्याच पुरुषाबरोबर जुळवला आहे. होय ना? अशा परिस्थितीत तुझ्या मनाची झालेली व्दिधा स्थिती अगदी साहजिकच आहे. एका बाजूला तुझे प्रेम आणि दुसऱ्या बाजूला तुझे कर्तव्यकर्म यांच्यातीलच हा संघर्ष आहे त्या दोन्हीमध्ये कशाला प्राधान्य द्यावे हाच पेच तुझ्या मनाला त्रास देत आहे हे नक्की. त्या पेचातून केवळ विवेकाच्या बळावरच सुटका होणे शक्य आहे आणि असा विवेकाने विचार केला असता खरे प्राधान्य आपल्या जीवनालाच द्यायला हवे. प्रेम व कर्तव्यकर्मे यांची योग्य सांगड हीच जीवन खऱ्या शांतीसमाधानाचे व आनंदाचे करते. परंतु हे प्रेम योग्य व्यक्तीविषयी असेल तरच योग्य ठरते आणि कर्तव्यकर्मही सदाचाराचे असेल तरच योग्य ठरते. केवळ एखादी व्यक्ती मनाला भावली आणि ती व्यक्ती दुराचारी व दुर्जन असेल, तर ती प्रेमाची भावना चुकीचीच व म्हणून त्याज्यही आहे. त्याचप्रमाणे कर्तव्य म्हणून करीत असताना जर दुष्कर्म करणे घडत असेल किंवा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे दुष्कर्माला साहाय्यभूत होणे घडत असेल तर ते कर्तव्य निंदनीय व म्हणूनच वर्ज्यही आहे.

तेव्हा हे राजकन्ये, प्रश्न केवळ तुझे प्रेम व तुझे कर्तव्यकर्म हा नसून, तुझे ते प्रेम कोणावरती आहे आणि कर्तव्य म्हणून तुला कोणाशी विवाह करावा लागत आहे हा प्रश्न मुख्य व अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण त्यावरूनच काय योग्य व काय अयोग्य याचा निवाडा होऊ शकेल."

अर्जुनाच्या सुस्पष्ट व विचारी बोलण्याने सुभद्रा तर प्रभावित झालीच, पण खुद्द अर्जुनालाही त्याच्या बोलण्याचे जरा नवलच वाटले. 'एवढे मुद्देसूद, अभ्यासपूर्ण व तात्विक बोलणे आपल्याकडून कसे काय घडले' या विचाराने अर्जुनही जरा

बुचकळयात पडल्यासारखा झाला. परंतु अर्जुनाच्या लगेचच लक्षात आले, की तो कृष्णाच्या सहवासाचा अर्जुनावर पडलेला प्रभाव आहे आणि कृष्णाच्या बोलण्याचा अर्जुनाच्या मनावर खोलवर झालेला तो परिणाम आहे. अर्जुनाला साहजिकच कृष्णाचे स्मरण तीव्रतेने झाले आणि कृष्णाच्या प्रेमाने त्याचे मन भरून आले. परंतु आपल्या मनातील भावनांना प्रयत्नपूर्वक आवरून धरून अर्जुन बाह्यांगाने अत्यंत शांतच राहिला आणि सुभद्रेकडे, ती काहीतरी बोलेल या अपेक्षेने पाहत राहिला.

अर्जुनाचे बोलणे ऐकून सुभद्रेच्या ठायीचा त्याच्यावरील विश्वास व श्रद्धा अधिकच वाढली आणि तिचे मनही बरेचसे मोकळे झाले. मनावरील ताण व दबाव दूर झाला. त्यामुळे अर्जुनाशी मोकळेपणाने बोलावे असे तिला अगदी मनापासून वाटू लागले. सुभद्रेच्या ठिकाणचा संकोचही नाहिसा झाला आणि तिला तो ‘यती’ ही आपली व्यक्ती आहे असे जाणवू लागले. त्यामुळेच मनात कुठलाही आडपडदा न ठेवता सुभद्रेने बोलण्यास सुरुवात केली.

“अहो यतीमहाराज, आपल्या बोलण्यातील शब्द न् शब्द खरा आहे. परंतु माझ्या मनाच्याठिकाणी मात्र माझे प्रेम व माझे कर्तव्य या संबंधी अजिबात गोंधळ नाही. कारण माझ्या प्रेमाची व्यक्ती ही कोणी साधीसुधी व्यक्ती नाहीच मुळी! ती व्यक्ती म्हणजे अत्यंत पराक्रमी, रूपसुंदर व सर्वात महत्त्वाचे म्हणजे सत्प्रवृत्तीसाठी प्रसिद्ध असलेल्या पांडवांपैकी मध्यम पांडव असलेला प्रत्यक्ष अर्जुनच आहे. त्याच्याठायीच प्रेमाने माझे मन पूर्णपणे जडलेले आहे आणि मनाने मी एकीएक त्यालाच वरलेले आहे. माझ्या मनात कोणत्याही परपुरुषाच्या विचारालासुद्धा जराही वावच नाही. मुख्य म्हणजे माझे हे प्रेम केवळ भावनात्मक नाही, तर अर्जुनाशी घडलेल्या प्रत्यक्ष सहवासातून व वागण्या-बोलण्यातून निर्माण झालेले आहे. अर्जुनाच्या मनातही माझ्याविषयी तेवढेच व तसेच प्रेम आहे याची मला पूर्ण खात्री आहे. अशी आमची मने एकमेकांशी पूर्णपणे जुळलेली असताना, दुसऱ्या कोणा परक्या व्यक्तीशी विवाह करण्याचा कठीण प्रसंग माझ्यावर यावा हे तर माझे केवळ दुर्भाग्यच म्हणावे लागेल.

अहो यतीमहाराज, बलरामदादांनी माझा विवाह कुरूकुळातील राजपुत्र दुर्योधन याच्याशी करण्याचे ठरवले आहे. माझ्या मनात काय आहे ते माझा दुसरा बंधू कृष्ण व त्याची पत्नी रूक्मिणी यांनी दादाला परोपरीने समजावून सांगितले. परंतु एक नाही की दोन नाही. दादा दुसऱ्या कोणाचेच ऐकून घ्यायला तयारच नाहीत. त्यांच्या दृष्टीने प्रेम वगैरे भावनांपेक्षा ऐश्वर्य, मान मरातब, धनदौलत या गोष्टींना जास्त महत्त्व आहे. माझ्या भावना तर त्यांना पोरकटच वाटतात. दादांना माझ्या भावनांची काहीच कदर वा किंमत नाही. कृष्ण व रूक्मिणी वहिनी यांचा मला सुरूवातीला पूर्ण पाठिंबा होता. परंतु दादांचा हट्ट पाहून कृष्णाने तर माघारच

घेतली. मला कृष्णाचा केवढातरी भरवसा वाटत होता. तो माझ्यासाठी काहीतरी निश्चितपणे करेल याचा माझ्याठायी केवढातरी विश्वास होता. परंतु कसले काय नि कसले काय? मी मात्र फसले. कृष्णाने एकदम भूमिका बदलली आणि सर्वकाही दादांवर सोपवले. मलाही कृष्णाचा हाच सल्ला आहे की मी दादांच्या म्हणण्यानुसारच वागावे आणि त्यांचा मान राखावा. ते म्हणे माझे कर्तव्यच आहे. या कर्तव्याच्या ओझ्याखाली माझ्या भावनांचा पार चुराडा होत आहे, हे कोणाच्याच लक्षात येत नाही किंवा आले तरी कोणीही काही करू शकत नाही. कारण तसे करण्याचे धाडसच कोणापाशी नाही.

अहो यतीमहाराज, फक्त एकाच व्यक्तीची सहानुभूती मला आहे आणि ती म्हणजे माझ्या रूक्मिणीवहिनीची. परंतु तिच्या केवळ सहानुभूतीने काय होणार? कारण ती मला प्रत्यक्ष अशी काहीच मदत करू शकणार नाही. तिने कृष्णाशी बोलून माझ्यासाठी शब्द टाकला. परंतु कृष्णाने तर अगदी निराशाच केली. त्याने तिच्या सांगण्याला काहीच दाद न देता पूर्ण दुर्लक्ष केले. आता रूक्मिणीवहिनी प्रत्यक्ष बलरामदादांशी बोलली तरी काहीच उपयोग होणार नाही याची मला पक्की खात्री आहे आणि कृष्णाची जी प्रतिक्रिया असेल त्याहून काही वेगळी अशी प्रतिक्रिया दादांची असेल, अशी तर अजिबात शक्यताच नाही. तेव्हा अशा पूर्णपणे निराधार झालेल्या मला आता कोणाचा आधार आहे हे आपणच सांगा. मला तर माझा जीवही नकोसा झाला आहे. अशा जगण्यात व प्रत्यक्ष मरण्यात माझ्या दृष्टीने तरी काहीच फरक नाही.

अहो, रूक्मिणीवहिनीच्या सांगण्यानुसार तिच्या शब्दावर विश्वास ठेवून मी आपल्याकडे आले आहे. आपल्या बोलण्यातून मला आपल्याठायी असलेला जिव्हाळा व आपलेपणा जाणवला आणि म्हणूनच मी एवढ्या मोकळेपणाने बोलले. खरे तर, मी एवढ्या मोकळेपणाने बऱ्याच दिवसांनी बोलले. कारण बोलून काही उपयोगच नव्हता. आता तरी बोलून काय उपयोग होणार आहे हे मला माहित नाही. परंतु माझे मन मात्र एकदम हलके झाले एवढे मात्र खरे आहे. आता आपणच काय ते मला मार्गदर्शन करा. आपण सर्वज्ञ आहात. माझे हित-अहित केवळ आपणच जाणता. माझ्यासाठी योग्य काय व अयोग्य काय ते आपणच मला सांगावे आणि योग्य ते करण्यासाठी लागणारे मनोबळही आपणच मला द्यावे, अशी मी आपल्याला मनःपूर्वक विनंती करते.


***

सुभद्रेच्या बोलण्यातून प्रगटलेले अर्जुनाविषयीचे आत्यंतिक प्रेम व निष्ठा जाणवून अर्जुनाचे सुभद्रेवरील प्रेम अधिकच दाटून आले. त्याच बरोबर सुभद्रेची हतबलता व तिची झालेली केविलवाणी स्थितीही अर्जुनाच्या लक्षात आली आणि

अर्जुनाला सुभद्रेची दयाच आली. कोणत्याही परिस्थितीत सुभद्रेशीच विवाह करण्याचा अर्जुनाचा निश्चय अधिकच दृढ झाला. कृष्णाची योजना व रूक्मिणीची प्रत्यक्ष मदत यामुळे हा विवाह होणारच याची खात्री अर्जुनाला होतीच. परंतु तशी खात्री सुभद्रेच्या मनात निर्माण करणे अत्यंत आवश्यक होते. त्यासाठी सुभद्रेचे सांत्वन करण्याच्या हेतूने अर्जुनाने तिच्याशी बोलण्यास सुरूवात केली.

“अगं राजकन्ये, शांत हो. मनाने अशी निराश तर बिलकुल होऊ नकोस. परमेश्वराच्या कृपेने सर्वकाही व्यवस्थित होईल. तुझे प्रेम खरे आहे आणि ते योग्य व्यक्तिवरती आहे. तेव्हा शेवटी त्या खऱ्या प्रेमाचाच विजय होईल याची खात्री बाळग. योग्य वेळ येताच सर्व गोष्टी सहजपणे घडतील. तोपर्यंत मनाला आवरून धर आणि योग्य वेळ येण्याची वाट पाहत रहा. मुख्य म्हणजे आता रूक्मिणीदेवींनी पुढाकार घेऊन सर्व सूत्रे हातात घेतली आहेत. त्यामुळे तुझ्या मनाप्रमाणे होण्याची शक्यता अधिकच वाढली आहे. तुझा कनिष्ठ बंधू कृष्ण याने जरी वरकरणी तटस्थ भूमिका घेतली असली तरी आम्हाला खात्री आहे, की रूक्मिणीच्या पाठीमागे तोच उभा असणार आणि योग्य वेळ येताच तो प्रत्यक्षपणेही तुझ्या पाठीशी उभा राहीलच. आम्हाला तर असे निश्चितपणे वाटते की एक दिवस बलराम महाराजांचे मतपरिवर्तन होईल. त्यांच्या ठिकाणचा विवेक पुन्हा जागृत होईल आणि सत् व असत् यातील फरक त्यांच्या लक्षात येईल. एवढेच नव्हे, तर सद्भावाचे समर्थन करून त्याला साहाय्यभूत होण्याचे मनोबळही त्यांना प्राप्त होईल. आमचे तुला पूर्ण आशीर्वाद तर आहेतच, पण आमच्या शुभेच्छाही नेहमीच तुझ्या पाठीशी आहेत. परंतु जोपर्यंत आम्ही येथे आहोत तोपर्यंत आमचा सहवास मात्र तू अवश्य करीत रहा आणि आमच्याशी बोलून तुझे मन मोकळे करीत रहा. म्हणजे मग तुझ्या मनाला कोणताही ताण येण्याची जराही भीती तर राहणार नाहीच, पण तुझे मनही सदैव ताजेतवाने व उल्हसित राहील.”

अर्जुनाच्या बोलण्याने सुभद्रेचे मन खरेच उल्हसित झाले आणि तिच्या मुखावर टवटवी दिसू लागली. तिने अर्जुनाकडे पाहून हलकेच प्रसन्न हास्य केले. ते पाहून अर्जुनाचे मनही आतून अगदी हरखून गेले. पण वरकरणी प्रयत्नपूर्वक गंभीर राहून अर्जुनाने नेत्र मिटून घेतले आणि हळुवार आवाजात ‘नारायण, नारायण’ असा उच्चार केला. सुभद्रेने पुढे येऊन अर्जुनाला वाकून नमस्कार केला आणि ती प्रसन्न मनाने तेथून निघाली ती थेट रूक्मिणीच्या महालात जवळ जवळ धावतच जाऊन पोहोचली. त्या ठिकाणी रूक्मिणी जणू तिची वाटच पाहत होती. सुभद्रेचा हसरा चेहरा पाहून रूक्मिणीलाही आनंद झाला आणि तिने तिच्याजवळ धावत येणाऱ्या सुभद्रेला आपल्या मिठीतच घेतले. थोड्या वेळाने सुभद्रा स्वतःहून रूक्मिणीपासून थोडीशी दूर झाली. प्रश्नार्थक नजरेने पाहणाऱ्या रूक्मिणीला उद्देशून ‘वहिनी, तू



किती छान आहेस गं!’ एवढेच सुभद्रा म्हणाली आणि पुन्हा रूक्मिणीच्या कुशीत शिरली. सुभद्रेला असे बऱ्याच दिवसांनी मोकळेपणाने हसता बोलताना पाहून रूक्मिणीचे मनही सुखावले. हा सर्व त्या ‘यतीमहाराजांच्या’ भेटीचा परिणाम आहे हे ओळखायला रूक्मिणीला जराही वेळ लागला नाही आणि तिच्या मनात अर्जुनाविषयी कौतुकाचा भाव निर्माण झाला. अर्जुन त्याची कामगिरी अगदी व्यवस्थितरित्या पार पाडत असल्याचेच ते द्योतक होते. सुभद्रेच्या मनःस्थितीत झालेल्या अनुकूल बदलाचा जास्तीत जास्त उपयोग करून घ्यावा या हेतूने रूक्मिणीने सुभद्रेशी बोलावयास सुरूवात केली,

“अगं सुभद्रे, तुला झाले आहे तरी काय? स्वारी एकदम एवढ्या खुशीत येण्याएवढे घडले आहे तरी काय? बऱ्याच दिवसांनी तुला अशी मोकळीसोकळी वागताना पाहून खरे तर मलाच केवढा तरी आनंद झाला आहे. ही त्या यती महाराजांचीच कृपा असावी याची मला खात्री आहे. तुझे व त्यांचे काही बोलणे वगैरे झाले का? त्यांनी तुला काही विशेष असे सांगितले का, की ज्यामुळे तू एवढी मोकळी झालीस? तसे झाले असेल तर ती चांगलीच गोष्ट म्हणावी लागेल. पण तुला तुझी वहिनी एवढी छान केव्हापासून दिसायला लागली?”

असे म्हणून रुक्मिणी सुभद्रेकडे पाहून मिश्किलतेने हसली. रुक्मिणीच्या गंमतीशीर बोलण्याला सुभद्रेनेही तेवढ्याच मिश्किलतेने हसून प्रतिसाद दिला आणि तिने अत्यंत उत्साहाने रुक्मिणीशी बोलावयास सुरुवात केली,

“अगं वहिनी, काय त्या यतीमहाराजांची थोरवी तुला सांगू? काय ते त्यांचे ज्ञान आणि काय ती त्यांची विद्वत्ता! काय ते त्यांच्या मुखावरील तेज! त्याहीपेक्षा त्यांच्या नजरेत जी प्रेमळता आहे ना त्याला तर तोडच नाही. माझ्याकडे किती प्रेमाने ते पाहत होते. जणू काही त्यांची नि माझी अगदी बऱ्याच काळापासूनची ओळख आहे. त्यांच्या ठिकाणी माझ्याविषयी आपलेपणाही किती आहे म्हणून सांगू? अगं वहिनी, माझ्याशी तर ते एवढ्या आपलेपणाने बोलले की मलाही त्यांनी बोलते केलेच. माझ्या मनातील अगदी सर्व सर्व मी त्यांना अत्यंत मोकळेपणाने सांगितले. त्यांनीही माझे सर्व म्हणणे ऐकून घेतले आणि मला धीर दिला. एवढेच नव्हे, तर माझ्या खऱ्या प्रेमाचाच शेवटी विजय होईल असे आशीर्वादही त्यांनी मला दिले आहेत. त्यांचे आशीर्वाद पूर्ण करण्याचे सामर्थ्य त्यांच्याठायी आहे याची मला खात्री आहे. तशी माझी दृढ श्रद्धा आहे. आता माझ्या मनावर कोणताही ताण नाही. माझे प्रेम सच्चे आहे आणि त्याची पूर्ती निश्चितपणे होणारच असा आत्मविश्वास


माझ्याठायी निर्माण झालेला आहे. अर्थात् याचे सर्व श्रेय केवळ त्या यतीमहाराजांच्याकडेच जाते. आता जोपर्यंत ते येथे आहेत तोपर्यंत मी त्यांचा जास्तीत जास्त सहवास करण्याचा आणि त्यांची सेवा करण्याचा ठाम निश्चय केला आहे. त्यामुळेच माझ्या मनाला शांती व समाधान लाभेल असे मला खात्रीपूर्वक वाटते. वहिनी, अशा महात्म्यांच्या चरणी तू मला घेऊन गेलीस याबद्दल मी तुझे अत्यंत मनःपूर्वक आणि पुन्हा पुन्हा आभार मानते. म्हणूनच तर मी तुला ‘माझी छान छान वहिनी’ असे म्हणते. कळलं?”

असे म्हणून सुभद्रा पुन्हा एकदा अत्यंत मोकळेपणाने हसली आणि तेथून अक्षरशः धावत धावतच निघून गेलीसुद्धा.

सुभद्रेच्या पाठमोऱ्या आकृतीकडे रूक्मिणी हसतमुखाने पाहत तेथेच उभी राहिली. पण पुढच्याच क्षणी अत्यंत गंभीर होऊन रूक्मिणी स्वतःच्या मनाशी विचार करू लागली.

‘योजल्याप्रमाणे सर्व गोष्टी आत्तापर्यंत अगदी व्यवस्थित घडत राहिलेल्या आहेत खऱ्या, परंतु खरा कसोटीचा काळ पुढेच येणार आहे. सुभद्रेचे मन पूर्णपणे निवळले आहे आणि तिची मनःस्थिती अधिक होकारात्मक झालेली आहे. पण तिच्या ठिकाणी तो यती कोण आहे, याविषयी गैरसमजूत कायमच आहे आणि ती तशीच राखणे हे आवश्यकही आहे. कारण खरे काय हे जर सुभद्रेला कळले, तर तिला जो सुखद धक्का बसेल तोही सहन करणे तिला शक्य होणार नाही आणि त्यामुळे एखादे वेळेस सर्वच योजना बारगळेल. तेव्हा सुभद्रेला सध्या तरी काहीही कळू न देणे हेच उचित आहे. अर्जुनाचे मन तर आता एकदम उत्साहित झालेले आहे. त्याच्या ठिकाणचा आत्मविश्वासही वाढलेला दिसत आहे. पण त्याचबरोबर त्याच्याठायीच्या अपेक्षाही अधिक उंचावल्या आहेत आणि त्यांची पूर्ती जर यदाकदाचित होऊ शकली नाही, तर मात्र मग अर्जुनाचे मन पूर्णपणे कोसळेलच आणि त्या मनाला पुन्हा उभारी घेणे अत्यंत कठीण होऊन बसेल.

पण खरा महत्त्वाचा प्रश्न बलराम दादांचाच आहे. त्यांच्या मनाविरूद्ध व त्यांच्या नकळत गोष्टी कराव्यात, तर त्यांचा राग ओढवून घेणे आले आणि त्यांना सांगून सवरून करावे, तर त्यांची समजूत पटणे कधीही शक्य नाही. बरे, कृष्णाच्या योजनेप्रमाणे अर्जुनाला सुभद्रेचे हरण करून येथून न्यावयास सांगावे, तर ते कळल्यावर बलराम दादांचा राग केवढातरी अनावर होणार आणि त्या रागाच्या भरात दादा काय करतील याचा भरवसा नाही. पण सर्वात वाईट गोष्ट म्हणजे त्यानंतर दादांची केवढी तरी नाचक्की होईल आणि यदुकुळाचीही पत कमी होईल. कोणत्याही परिस्थितीत दादांचा असा अवमान होणे वा त्यांचे असे हसे होणे हे



योग्यच नाही. आम्हा सर्वांनाच त्यामुळे मानसिक क्लेश होतील हे निश्चित. दादांचा झालेला कमीपणा हा मलाच काय पण कृष्णालाही सहन होणे शक्यच नाही. कारण कितीही झाले तरी दादा हे आमचे अत्यंत प्रेमाचे आहेत. त्यांना दुखवून आम्हाला केव्हाही आनंद होणे शक्य नाही. अशा परिस्थितीत आता काय व कसे करावे बरे? हा एक मोठाच पण त्याचबरोबर अत्यंत नाजूक असा प्रश्न आहे.’

अशा तऱ्हेने बराच वेळ विचार केला तरीसुद्धा काही केल्या निश्चित असा मार्ग रूक्मिणीला सुचेचना. तेव्हा तिने प्रथम एक गोष्ट केली की त्या प्रश्नाचा व अडचणीचा विचार करण्याचे प्रयत्नपूर्वक थांबवले आणि जाणीवपूर्वक कृष्णाचे स्मरण करण्यास सुरूवात केली. किंबहुना, रूक्मिणीला कृष्णाचे स्मरण करण्यासाठी विशेष असे काही करावेच लागले नाही. इतर सर्व विचारांना मनातून दूर केल्याबरोबरच अंतरात नित्य भरून राहिलेले कृष्णाचे अस्तित्व अगदी सहजतेने प्रगट झालेच आणि मग तिच्याठायीचे कृष्णाचे सर्व गुणधर्मही जागृत झाले. प्रथम म्हणजे रूक्मिणीचे मन एकदम मोकळे झाले आणि तिच्या मनातील सर्व ताण दूर झाला. तिला एकदम हलके वाटू लागले आणि तिचे मन एकदम शांत व स्थिर झाले. रूक्मिणीच्या ठिकाणी मग सर्व प्रसंग, त्यातील व्यक्तिरेखा आणि त्यांचे स्वभाव सहजपणे खेळू लागले. भिन्न व्यक्ती, भिन्न व्यक्तिमत्त्व व भिन्न स्वभाव यांची रूक्मिणीला मौज वाटू लागली आणि तिच्याकडून त्या सर्वांचा अगदी वेगळेपणाने अभ्यास होऊ लागला. परंतु त्या अभ्यासाचा कोणताही ताण न जाणवता रूक्मिणीला त्याची गंमतच वाटू लागली. त्याबरोबर रूक्मिणीला कृष्णाची आठवण अत्यंत प्रकर्षाने होऊ लागली. कृष्णाठायी त्याच्या प्रेमीजनांविषयी असलेला आत्यंतिक आपलेपणा, त्यांच्या हिताची असलेली कळकळ व ध्यास आणि त्याचबरोबर त्यांना साहाय्यभूत होण्यासाठी कृष्णाकडून घडणारे अथक प्रयत्न, या सर्वा सर्वांचे स्मरण रूक्मिणीला झाले. तिचे अंतःकरण कृष्णमाहात्म्याच्या जाणीवेने भरून आले आणि ती त्यामध्ये स्वतःला पूर्णपणे विसरली. रूक्मिणीठायीचे वेगळेपण पूर्णपणे लयाला गेले आणि ती अंतरात कृष्णाशी पूर्णपणे एकरूप होऊन राहिली.

काही काळ असाच गेला आणि रूक्मिणीच्या ठायी तिचे भान हळूहळू जागे होऊ लागले. पण आता एक वेगळीच रूक्मिणी तिची तिलाच जाणवू लागली होती. ही रूक्मिणी कृष्णाची होती. कृष्णाचा उत्साह, कृष्णाठायीचा कळवळा आणि कृष्णाठायीची विजिगीषु वृत्ती यांनी रूक्मिणी युक्त झाली आणि तिचे तिलाच एकदम ताजेतवाने वाटू लागले. तिच्या मनातील विचारांना दिशा मिळाली आणि एक अस्पष्टसा मार्गही तिच्या मनःचक्षुंना दिसू लागला. रूक्मिणीच्या मनातील विचारांना पुन्हा चालना मिळाली आणि ते विचार आकाराला येऊ लागले.

'आपल्याला बलराम दादांविषयी आपलेपणा व आदरही एकीकडे राखायचा आहे आणि दुसरीकडे त्यांच्याकडून अर्जुन व सुभद्रा यांच्या विवाहाला संमतीही मिळवायची आहे. बरे, दादांनी जर संमती दिली नाही तर त्यांच्या अपरोक्ष काही करून आपल्याला त्यांचा अवमानही करावयाचा नाही आणि दादा या विवाहाला संमती देतील अशी सुतराम शक्यता नाही. मला वाटते दादांशी त्यासंबंधी पुन्हा कोणीतरी एकदा बोलून त्यांचे मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करावयास हवा. पण दादांशी कोण बोलणार आणि ते कोणाचे ऐकणार? अशी कोण व्यक्ती आहे, की दादा जिचे बोलणे निदान ऐकून तरी घेतील? मीच त्यांच्याशी बोलण्याचा प्रयत्न करून बघावा का? मला वाटते ते एखादे वेळेस माझे म्हणणे ऐकून घेतीलही. परंतु ते त्यांचे मत व निर्णय बदलतील अशी जराही शक्यता नाही. तेव्हा अशीच एखादी व्यक्ती हवी, की जिच्याविषयी दादांच्या ठायी आदर व श्रद्धा आहे. पण अशी व्यक्ती कोण आहे बरे?'

असा विचार करीत असताना रूक्मिणीने तिचे मन थोडा वेळ स्थिर केले मात्र, तिच्या मनासमोर त्या यतीमहाराजांची मूर्ती आली आणि रूक्मिणी स्वतःशीच खुदकन हसली. तिला तिच्या प्रश्नाचे उत्तर अचानकपणे सापडले होते. रूक्मिणीच्या मनावरील ताण एकदम सैल झाला.

'दादा सध्या फक्त त्या यतीमहाराजांचेच ऐकून घेण्याच्या मनःस्थितीत आहेत. दादांची त्या यतीवरतीच केवढी तरी श्रध्दा बसलेली आहे. या गोष्टीचाच योग्य उपयोग करून घ्यावयास हवा. कारण दादांचे मन बदलण्याची तीच एकमेव शक्यता आहे. परंतु त्यासाठी दादांशी प्रत्यक्ष बोलून त्यांना त्या यतीशी बोलण्याविषयी पटवावे लागेल. अर्थात् त्याआधी मला अर्जुनाशी बोलून त्याने दादांशी काय व कसे बोलावे हे त्याला पढवावे लागणार आहे. अर्जुनाने सुभद्रेशी बोलून तिला प्रभवित केले असेल. परंतु दादांशी बोलणे ही साधी गोष्ट नाही. दादांच्या पुढे अर्जुनाच्या गप्पा टिकू शकणार नाहीत आणि चुकून जरी अर्जुन उघडा पडला की मग मात्र सर्वच खेळ संपेल.'

रूक्मिणी तिला सुचलेल्या कल्पनेची शक्याशक्यता पुन्हा पुन्हा आजमावून पाहत होती.

'या योजनेत जोखीम आहे खरी. परंतु जोखीम तर सुभद्रेला पळवून नेण्यामध्येही आहेच ना? दोन्ही योजनेत अंतिम जबाबदारी अर्जुनावरच आहे. एके ठिकाणी त्याला दादांशी बोलून समजावायचे आहे, तर दुसऱ्या ठिकाणी त्याला

दादांना फसवून त्यांच्या नकळत सुभद्रेला पळवून न्यायचे आहे. परंतु एक गोष्ट मात्र अगदी स्पष्ट आहे, की पहिली योजना अधिक सुरक्षित आहे तर दुसरी योजना अधिक धोकादायक आहे. कारण पहिल्या योजनेनुसार अर्जुनाचे सांगणे दादांना पटले वा मानवले नाही तरी काहीच काळजी नाही. फार तर काय परिस्थिती जशी आहे तशीच राहील. पण समजा दुसरी योजना अर्जुनाच्या चुकीमुळे यदाकदाचित फसली, तर मात्र केवढा तरी अनर्थच माजेल. दादांच्या क्रोधाला कोणीच आवर घालू शकणार नाही. अगदी कृष्णसुध्दा काहीही करू शकणार नाही आणि दादा रागाच्या भरात काय करतील याचा काहीच भरवसा नाही. तेव्हा पहिली योजनाच आधी प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न करून पहावा हेच अधिक योग्य आहे. यदाकदाचित त्या योजनेत जर यश नाहीच मिळाले, तर दुसऱ्या योजनेचा विचार करायला आपण मोकळे आहोतच की!’

अशा तऱ्हेने सर्व गोष्टींचा सर्व दृष्टीकोनातून साधक बाधक विचार करून रूक्मिणीचा निर्णय पक्का झाला आणि तिने ठरवलेल्या योजनेप्रमाणेच पुढे पाऊल टाकण्याचा तिच्या मनाचा निश्चय झाला. निर्णय झाल्यावरती मात्र जराही वेळ न दवडता रूक्मिणी तडक बलरामाच्या महालात जाऊन पोहोचली. रूक्मिणीने प्रथम बलरामाला नम्रतेने वाकून नमस्कार केला आणि त्याचे क्षेमकुशल विचारले. रूक्मिणीला असे अचानक आलेले पाहून बलरामाला आश्चर्यच वाटले आणि ते त्याच्या मुखावरती प्रगटही झाले. रूक्मिणीकडे पाहून किंचितसे हसून बलराम प्रश्नार्थक मुद्रेने पहात राहिला. रूक्मिणीनेही बलरामाच्या हसण्याला मोकळेपणाने प्रतिसाद दिला आणि तिने बोलावयास सुरुवात केली,


“अहो दादा, तुम्हाला एक आनंदाची बातमी सांगण्यासाठी म्हणून मी मुद्दामहून येथे आले आहे. तुम्ही सुभद्रेला त्या यतीमहाराजांचा सहवास व सेवा करण्यास सांगितले होते. पण त्यासाठी सुभद्रा तिची मनःस्थिती ठीक नसल्यामुळे मुळीच राजी नव्हती हे तुम्हीही जाणून होतात. सुभद्रेला तिच्या मनाविरूद्ध बळेबळे त्या यतीमहाराजांकडे पाठवणेही कठीण होत होते. म्हणून मग मी एक गोष्ट केली की आधी त्या यतीमहाराजांचीच मी प्रत्यक्ष भेट घेतली. त्यांच्याशी बोलल्यावर मला त्यांची थोरवी लगेच जाणवली आणि माझे मन पूर्णपणे निःशंक झाले. त्यानंतर मी लगेचच सुभद्रेला जाऊन भेटले आणि त्या यतीमहाराजांविषयीचा माझा अनुभव तिला सांगितला. सुभद्रेशी बराच वेळ बोलून मी तिची योग्य समजूत घातली आणि तिला त्या यतीमहाराजांची एकदातरी प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्याशी स्वतः बोलावयास सांगितले. मोठ्या मिनतवारीने ती तयार झाली आणि तिने खरेच त्या यतीमहाराजांची एकटीने भेट घेतली.

दादा, तुम्हाला आश्चर्याची काय गोष्ट सांगू? काही वेळाने त्या यतीमहाराजांना भेटून सुभद्रा जी माझ्याकडे आली तीच मुळी अगदी धावत धावत आणि मुख्य म्हणजे हसत हसत! त्या यतीमहाराजांचा एवढा प्रभाव सुभद्रेवर पडला होता, की कितीतरी वेळ ती मला त्यांचीच थोरवी सांगत होती आणि त्यांचे गोडवेही गात होती. मलाही अत्यंत नवलच वाटले आणि धक्काही बसला, पण तो अत्यंत सुखदही होता. सुभद्रेने अतिशय मोकळेपणाने यतीमहाराजांशी बोलणे केले होते आणि त्यांनीही तिला योग्य ते मार्गदर्शन केले. मुख्य म्हणजे, त्यांनी सुभद्रेला 'मोठ्यांचा आदर आणि त्यांच्या मतांचा मान' ठेवावयास सांगितले. त्यांच्याशी बोलून सुभद्रेची योग्य ती सर्व समजूत पटली आणि तिच्या मनावरील ताणही बराचसा हलका झाला. तिला एकदम मोकळे मोकळे वाटू लागले. सुभद्रेने स्वतःच हे सर्व मला सांगितले. एवढेच नव्हे, तर जोपर्यंत यतीमहाराज येथे आहेत तोपर्यंत त्यांचा सहवास करायचा आणि त्यांच्याशी संवाद करून त्यांचे मार्गदर्शन घ्यायचे असा निश्चयच सुभद्रेने केला आहे. सुभद्रेत झालेला हा बदल पाहून माझ्याही मनावरील दडपण कमी झाले आणि हे सर्व तुम्हाला सांगण्यासाठी मी ताबडतोब येथे तुमच्याकडे आले. दादा, आता मला तुम्हीच सांगा, आहे की नाही ही अत्यंत आनंदाची बातमी?"

रूक्मिणीचे बोलणे ऐकत असतानाच बलरामाला अत्यंत खुशी होत होती. रूक्मिणीने बोलणे संपवताना उत्स्फूर्तपणे विचारलेल्या सहेतुक प्रश्नाला बलरामाने तेवढ्याच मोकळेपणाने हसून प्रतिसाद दिला आणि अत्यंत उत्स्फूर्तपणे बलराम उद्गारला,

"शाब्बास! रूक्मिणी शाब्बास!! तू तर अगदी कमालच केलीस. तुझे जेवढे कौतुक करावे तेवढे ते कमीच आहे. माझ्या मनावरचा बोजा तू केवढा तरी हलका केला आहेस. सुभद्रेच्या मनाविरूध्द काही करीत असताना माझ्या मनालाही त्रास होतच असतो. पण तेव्हा माझाही नाइलाजच झालेला असतो. तो मात्र कोणाच्याच लक्षात येत नाही. त्या यतीमहाराजांची थोरवी माझ्या लक्षात आली आणि त्यांच्या सहवासाने व मार्गदर्शनाने तिचे मन निवळेल आणि तिला तिच्या हिताची जाणीव होईल अशी माझी श्रध्दा होती. केवळ तोच हेतू मनात बाळगून मी सुभद्रेला त्या यतीमहाराजांकडे जावयास सांगत होतो. परंतु त्यासाठीही सुभद्रा नाराजच होती. पण रूक्मिणी, तू स्वतः पुढाकार घेऊन सुभद्रेचे मन वळवलेस याचा मला विषेश आनंद होत आहे.

अगं रूक्मिणी, तुझी सरळ विचारसरणी व तुझे बुध्दीचातुर्य याचे मला नेहमीच अप्रूप वाटत आलेले आहे. हे तुझे गुण अगदी तुझ्या विवाहापासूनच प्रगट



झालेले मी पाहत आलेलो आहे. सर्वात मुख्य गोष्ट म्हणजे तू स्वतः त्या यतीमहाराजांची भेट घेऊन तुझ्या मनाची खात्री करून घेतलीस हे चांगले केलेस. त्याचे मला विशेष कौतुक जाणवते. हाच तुझ्या व कृष्णाच्या स्वभावातील फरक आहे. कृष्णाचे असे आहे की एकदा त्याचे एखाद्या गोष्टीविषयी काही मत झाले की झाले. मग त्यामध्ये बदल करावयास तो तयारच नसतो. काही वेळा बाह्यांगाने बदलल्यासारखे कृष्ण दाखवतो खरा, पण ते त्याच्या मनापासून नसते. तो त्याच्या एखाद्या खेळीचा भाग असतो. कृष्णाच्या मनात मात्र काहीतरी वेगळेच शिजत असते. अर्थात कृष्ण हा मुत्सद्दी असल्यामुळे तो बाह्यांगाने त्या गोष्टीचा कोणालाही थांगपत्ता लागू देत नाही. पण माझ्या ते लक्षात आल्याशिवाय रहात नाही. कारण त्याचे मुख्य लक्षण म्हणजे कृष्ण एकदम अलिप्तपणे वावरताना दिसतो. आत्ताचीच गोष्ट बघ ना! कृष्णाचा येथे पत्ता तरी आहे का? काहीतरी कामाचे निमित्त मुद्दामहून काढून तो जाणूनबुजून येथून दूर गेलेला आहे आणि त्याला वाटते की हे माझ्या लक्षातच आलेले नाही. एवढे मला कळत नाही की काय? मला सर्व काही कळते आणि माझ्या लक्षातही सर्वकाही येते. पण मी स्वस्थ बसून रहातो. मी तरी दुसरे काय करणार म्हणा? रूक्मिणी, म्हणूनच तुझ्या मनाचा हा मोकळेपणा व होकारात्मक विचार करण्याची तुझी ही पध्दत मला अतिशय आवडते. त्यासाठी तुझी जेवढी तारीफ करावी तेवढी ती कमीच आहे.”

बलरामाच्या कौतुकमिश्रित बोलण्याचा रूक्मिणीला अत्यंत आनंद झाला. कारण तिच्या वागण्या-बोलण्याचा तिला अपेक्षित असा परिणाम बलरामावर झालेला होता. योजनेतील पुढचे पाऊल टाकण्याची हीच सुयोग्य संधी आहे हे रूक्मिणीने आळखले आणि तिने बलरामाशी पुन्हा बोलण्यास सुरुवात केली,


“अहो दादा, तुम्ही केलेल्या माझ्या कौतुकाने माझा उत्साह दुणावलाच आहे आणि म्हणूनच तुमच्याशी अधिक बोलण्याचे मी स्वातंत्र्य घेत आहे. मला असे अगदी मनापासून वाटत आहे की सुभद्रेच्या मनाची आता जी थोडीशी अनुकूल अवस्था झालेली आहे तिचा आपण योग्य तो उपयोग करून घ्यावा. तिच्याठिकाणी यतीमहाराजांविषयी अत्यंत श्रध्दा व विश्वास निर्माण झालेला आहे. तेव्हा आपण त्यांच्याकडूनच सुभद्रेला सांगण्याचे करावे आणि तिला विवाहाला राजी करून घ्यावे. मला अगदी पूर्ण खात्री आहे की सुभद्रा यतीमहाराजांच्या शब्दाबाहेर मुळीच जाणार नाही आणि विवाहासाठी नक्कीच संमती देईल. सुभद्रेचा होकार मिळाल्यावरती आपल्या सर्वांच्याच मनावरील ताण नाहीसा होईल आणि परिस्थितीत जो एक तिढा निर्माण झालेला आहे तोही एकदम सुटून जाईल.

सर्वांच्या मनात पुन्हा उत्साहाचे वारे खेळू लागतील आणि आपला हरवलेला आनंद आपल्याला पुन्हा प्राप्त होईल."

रुक्मिणीचे बोलणे बलराम अत्यंत लक्षपूर्वक ऐकत होता. ऐकत असतानाच बलरामाच्या मुखावरती आश्चर्याचा भाव झळकू लागला होता आणि रुक्मिणीचे बोलणे संपताक्षणीच बलराम अगदी मोकळेपणाने हसला आणि म्हणाला,

"अगं रुक्मिणी, तू तर मला अगदी आश्चर्यचकितच केले आहेस. खरे म्हणजे, मला वाटते तूच एक आश्चर्य आहेस. तुझ्या ठिकाणचा एवढा समजूतदारपणा व सखोल विचार करण्याची तुझी वृत्ती पाहिली, की तुझे योग्य कौतुक करण्यासाठीही मला योग्य शब्द सापडतच नाहीत. त्याहीपेक्षा तुझ्याठिकाणी जो आपल्या सर्व कुटुंबीयांविषयीचा आपलेपणा आहे ना, तोच मला जास्त महत्त्वाचा वाटतो. आपल्या सर्व कुटुंबाच्या स्वास्थ्याचा व हिताचाच तू नेहमी विचात करत असतेस हेच तुझ्या बोलण्याने सिद्ध होत आहे. म्हणूनच आपल्यापुढे असलेल्या या नाजूक प्रश्नाचा तू अत्यंत सम्यकपणे विचार केलास आणि त्यावरील योग्य उपायही शोधून काढलास. खरेच तुझ्याठिकाणी आपलेपणा, प्रेम व बुद्धीचातुर्य यांचा एवढा सुरेख संगम झालेला आहे की त्याला दुसरी तोडच नाही. तू केलेली सूचना एवढी योग्य व यथार्थ आहे की त्याला दुसरा पर्यायच नाही. तोच आपल्या सर्वांच्या सुखाचा व हिताचा एकमेव मार्ग आहे याविषयी माझी तर पूर्ण खात्री आहे. आता तूच पुढील सर्व काही ते ठरव. तूच पुढाकार घेणे अधिक योग्य होईल. मला तरी वाटते की आता जराही वेळ फुकट घालवण्याचे कारण नाही. आपण सर्वांनीच त्या यतीमहाराजांची त्वरित भेट घेऊन त्यांचेच मार्गदर्शन घेऊया. एका अर्थी कृष्ण येथे नाही ते बरेच आहे. कारण त्याची प्रतिक्रिया नेहमीप्रमाणेच नकारात्मक किंवा काहीतरी विचित्र झाली असती. त्याचा काहीच भरवसा धरता येत नाही. परंतु मी ठरवलेल्या योजनेला एकदा का त्या यतीमहाराजांचे आशीर्वाद मिळाले, की मलाही मनोबळ मिळेल आणि मग मलाही जोर येईल. तेव्हा रुक्मिणी, तू ताबडतोब पुढील व्यवस्थेला लाग बघू."

बलरामाच्या बोलण्यामुळे झालेला मनातील हर्ष रुक्मिणीने महत्प्रयासाने लपवला आणि अगदी शांतपणे तेथून ती जी निघाली, ती लगबगीने यतीरूपी अर्जुनाच्या महालात जाऊन पोहोचली. कोणीतरी आल्याची चाहूल लागताक्षणीच अर्जुनाने आपले डोळे मिटून घेतले आणि तो आपण ध्यानमग्न असल्याचा आविर्भाव करून बसला. अर्जुनाचे ते 'ध्यान' पाहून रुक्मिणीला खुदकन हसू फुटले. मिश्कील भावाने रुक्मिणीने पुढे येऊन त्या 'यतीला' नमस्कार केला आणि मोठ्या आवाजात 'यतीमहाराजांचा जयजयकार असो' असा जयघोष केला. रूक्मिणीचा परिचित



आवाज ऐकताच अर्जुनाने चमकून आपले डोळे उघडले. समोर एकटीच उभी असलेली रूक्मिणी अर्जुनाकडे पाहून खट्याळपणे हसत होती. अर्जुनानेही अत्यंत मोकळेपणाने हसून रूक्मिणीला प्रतिसाद दिला आणि आपल्या आसनावरून उठून रूक्मिणीला नमस्कार करण्यासाठी तो पुढे वाकला. पण त्याआधीच रूक्मिणीने अर्जुनाला हाताच्या खुणेने व आपले डोळे किंचित मोठे करून दटावले आणि त्याला त्याच्या आसनावर त्वरित बसावयास सांगितले. रूक्मिणी अर्जुनाशी काही बोलणार त्याआधीच अर्जुनाने रूक्मिणीशी बोलावयास सुरूवात केली,

“अहो रूक्मिणीदेवी, आता माझा अजिबात अंत पाहू नका. हा खेळ त्वरित एकदाचा संपवा आणि माझी या संकटातून ताबडतोब सुटका करा. हे यतीचे सोंग कायम राखता राखता मी अगदी मेटाकुटीला आलेलो आहे. माझ्या मनावरील भार एवढा वाढलेला आहे की त्याचा ताण मला मुळीच सहन होऊ शकत नाही. ही यतीची भूमिका मी महत्प्रयासाने धरून ठेवली आहे खरी, परंतु ती केव्हाही कोलमडून पडेल याची मला सारखी भीती वाटत आहे. हे नाटक यापुढे चालू ठेवणे शक्य होईल असे मला तरी वाटत नाही. कारण माझ्या सहनशक्तीने आता खरेच अगदी कमाल मर्यादा गाठलेली आहे. ‘ते सर्वांना केवळ दाखवण्यासाठी म्हणून सारखे ध्यान धरून बसणे, सर्वांच्याकडून सतत पाया पडून घेणे, लोकांच्या इच्छा पुऱ्या व्हाव्यात म्हणून, पण माझा तसा काही अधिकार नसतानाही त्यांना आशीर्वाद देणे’ या सर्व गोष्टींचा मला अगदी उबग आलेला आहे. हे सर्व कधी एकदा संपते असे मला झालेले आहे. अर्थात या सर्वामध्ये जेव्हा सुभद्रेचे येथे येणे होते तेवढेच सुखाचे काही क्षण मला लाभतात. परंतु त्या वेळेसही मला माझी सुभद्रेवरील प्रेमभावना व्यक्त करता येतच नाही. मला अत्यंत प्रयत्नपूर्वक संयमाने वागावे लागते. तरीही माझा संयम सुटेल की काय अशी भीती मनातून सारखी वाटत असतेच. तेव्हा कृपा करून हे सर्व लवकरात लवकर थांबवा आणि मला यातून त्वरित मोकळे करा.”

अर्जुनाचे बोलणे ऐकत असताना रूक्मिणीला एकीकडे मोठी गंमत वाटत होती खरी, परंतु त्याचबरोबर अर्जुनाची अगतिकता पाहून तिला त्याची दयाच आली. त्यामुळे अर्जुनाची समजावणी करण्यासाठी म्हणून रूक्मिणीने त्याच्याशी बोलण्यास सुरूवात केली,


“अरे अर्जुना, असे निराश होऊन कसे चालेल? असे हात पाय गाळून बसलास तर कसे होईल? सुभद्रेवर जर तुझे खरेच प्रेम असेल तर ते आता निभावून दाखव. एकवेळ प्रेम करणे सोपे आहे परंतु आपले प्रेम प्राप्त करून घेणे हे अत्यंत कठीण व म्हणूनच पराक्रमाचे आहे. हे मी तुला माझ्या स्वानुभवाने सांगत आहे. खऱ्या

प्रेमामध्ये ते मिळवण्यासाठी लागणारे सर्व शारीरिक कष्ट व मानसिक क्लेश सहन करण्याची ताकद असते हे लक्षात ठेव. म्हणूनच आतापर्यंत जसे हे नाटक नेटाने चालू ठेवलेस तसेच आणखीन काही काळ ते चालू ठेव. त्यासाठी थोडी कळ तुला सोसावी लागेल खरी, पण अगदी थोडा काळच. कारण आता या नाटकाच्या अंतिम भागाला सुरुवात होणार आहे. तो यशस्वीरीत्या पार पडला की विजय तुझाच आहे. तेव्हा या शेवटच्या परीक्षेसाठी मानसिक तयारी करून सिद्ध हो.

अर्जुना, प्रथम तुला एक आनंदाची गोष्ट सांगते, ज्यामुळे तुझ्या मनातील नैराश्य नाहीसे होईल आणि त्या मनाला पुन्हा उमेद मिळेल. बलरामदादांना ही गोष्ट मी त्यांची मुद्दाम भेट घेऊन सांगितली की 'माझ्या सांगण्यावरून सुभद्रेने 'यतीमहाराजांची' भेट घेतली आणि तिची त्या यतीमहाराजांवर दृढ श्रद्धा बसली आहे. एवढेच नव्हे, तर सुभद्रेचे मनही एकदम मोकळे होऊन तिची वृत्तीही उल्हसित झाली आहे.' हे ऐकून बलरामदादा अत्यंत हर्षभरित झाले आणि त्यांचा 'यती' म्हणून तुझ्यावरील विश्वास अधिकच वाढला. तुझी थोरवीही त्यांना अधिक जाणवू लागली. त्यांच्या या अनुकूल मनःस्थितीचा मी लागलीच लाभ उठवला. 'यती महाराजांना सांगून आपण त्यांच्याकरवी सुभद्रेला ठरवलेल्या विवाहासाठी राजी करून घेऊया. ती त्यांचे सांगणे निश्चितच ऐकेल' असे दादांच्या मनावर बिंबवण्याची मला संधी मिळाली. ती संधी मी साधली आणि काय सांगू! त्यात मला यशही मिळाले. दादांनी तसा ताबडतोब निर्णयच घेतला आणि आम्ही आता सर्वजण ' आपल्या' दर्शनाला येऊन 'आपले' मार्गदर्शन घेणार आहोत. 'आपले' सांगणे आमच्यासाठी निर्णयात्मक असणार आहे.

तेव्हा अर्जुना, आता सर्व जबाबदारी तुझ्यावर आहे. तुझ्या खेळीवरच खेळाचे पारडे पूर्णपणे आपल्या बाजूला झुकणार आहे हे लक्षात ठेव. प्रेमाची महती दादांना पटवून देण्याची कामगिरी तुझ्यावरती आहे. आता बघू या, आमच्या दादांना कसा पटवतोस ते!" असे म्हणून रुक्मिणी अर्जुनाकडे बघून मिश्किलपणे हसत राहिली.

रूक्मिणीचे बोलणे संपता संपता अर्जुन अत्यंत कावरा बावरा झाला. थोडावेळ काय बोलावे हे त्याला सुचेचना. त्याच्या कसोटीच्या अंतिम टप्प्यात त्याचे मन अधिकच तणावपूर्ण झाले आणि तो ताण त्याच्या मनाला झेपेनासाच झाला. केविलवाण्या नजरेने तो रूक्मिणीकडे पाहत कितीतरी वेळ स्तब्धच राहिला होता. शेवटी बऱ्याच वेळाने व बऱ्याच प्रयत्नाने अर्जुनाच्या मुखातून अस्पष्टपणे शब्द फुटू लागले,



“अहो रूक्मिणीदेवी, ते कसे शक्य आहे? मला तर असे बोलणे मुळीच शक्य होणार नाही. दादांच्यासमोर असे बोलणे माझ्याकडून घडूच शकणार नाही. मला ते जमणारच नाही. आत्तापर्यंत इतर लोकांशी काही तरी थातुरमातुर बोलून मी वेळ मारून नेत असे. एवढेच काय, सुभद्रेशीही जरा इकडच्या तिकडच्या ऐकलेल्या काही गोष्टी बोलून मी तिला प्रभावित करू शकलो. पण दादांसमोर बोलणेच काय पण उभे राहतानाही माझी त्रेधातिरपीट उडेल आणि माझे सर्व सोंग उघडे पडेल याची मला पक्की खात्री आहे. दादा माझ्यापेक्षा वयाने व ज्ञानानेही कितीतरी मोठे. अहो, प्रत्यक्ष सांदिपनींच्या आश्रमात व त्यांच्या सहवासात त्यांनी अध्ययन केलेले आहे. तेव्हा माझ्यासारख्या यःकश्चित पामराचा त्यांच्यापुढे काय टिकाव लागणार? त्यांनी जर मला काही प्रश्न विचारले तर माझी तर पूर्ण बोबडीच वळेल हे निश्चित. तेव्हा असे कोणतेही साहस माझ्याकडून घडणार नाही. तेवढे धाडस माझ्यामध्ये अजिबात नाही. एकवेळ युद्धामध्ये रणभूमीवर मी पाहिजे तेवढा पराक्रम गाजवू शकेन. परंतु या निःशस्त्र युद्धात माझा पराभव मला आधीच दिसतो आहे. ज्ञान किंवा त्याची चर्चा हे विषय माझ्यासाठी नाहीतच. तेव्हा त्यांच्या वाटेला न गेलेलेच बरे. त्यापेक्षा माझे चंबूगबाळे घेऊन येथून पलायन करणे हेच मी पत्करेन. मुख्य म्हणजे दादांची समजूत काढण्याची जी गोष्ट रूक्मिणीदेवी, प्रत्यक्ष तुम्हाला किंवा साक्षात कृष्णालाही जमू शकली नाही ती मला जमणे कधीतरी शक्य आहे का? तेव्हा मला क्षमा करा. कृपा करून हा खेळ आपण येथेच राजीखुशीने थांबवूया आणि मला येथून सन्मानपूर्वक जाण्याची अनुज्ञा द्या, म्हणजे मीही सहीसलामत सुटलो आणि तुम्हीही सर्व काळजीतून मुक्त झालात.”

घाबरलेल्या अवस्थेतील अर्जुन असे बरेच काही बराच वेळ बोलतच राहिला. त्याला चांगलाच दरदरून घामही फुटला होता. बलरामाच्या समोर उभे राहून काही बोलण्याच्या केवळ कल्पनेनेच त्या बिचाऱ्याची एवढी घाबरगुंडी उडालेली होती. त्याची ती केविलवाणी अवस्था पाहून रूक्मिणीची मात्र हसता हसता अगदी मुरकुंडी वळली होती. परंतु तिला मनातून अर्जुनाची दयाही आली. म्हणून अत्यंत प्रयत्नपूर्वक रूक्मिणीने आपले हसू आवरले आणि समजावणीच्या सुरात ती अर्दुनाशी बोलू लागली. पुढील अत्यंत महत्त्वाच्या प्रसंगासाठी अर्जुनाच्या मनाची केवढी तरी तयारी करावी लागणार होती आणि त्यासाठी रूक्मिणीच्या मनाची पूर्ण तयारी झालेली होती.


“अरे अर्जुना, असे घाबरण्याचे काहीच कारण नाही. तू मनावर उगीचच ताण घेऊ नकोस. त्यामुळे परिस्थीतीतील गुंतागुंतही विनाकारण वाढत राहते आणि किरकोळ अडचणही मोठ्या डोंगरासारखी दिसू लागते. आधी तुझा तुझ्यावरील

विश्वास जागृत कर. मग सुभद्रेने जो तुझा विश्वास धरला आहे त्याची आठवण कर. सर्वात महत्त्वाचे म्हणजे कृष्णाने जो तुझ्यावर विश्वास टाकला आहे त्याचे स्मरण कर. त्यामुळे तुझ्याठायी पुन्हा आत्मविश्वास निर्माण होईल आणि मनाचा दुबळेपणा झटकून तुला तुझी जबाबदारी पार पाडण्याचे धैर्यबळ प्राप्त होईल. सर्व गोष्टी आपल्या योजनेनुसार जमून येत असताना तू ऐनवेळी अशी कच खाऊन मैदान सोडून जाण्याचा पळपुटेपणा करू नकोस. दैवाची अनुकूलता होत असताना तू प्रयत्नामध्ये कमी पडू नकोस. नाहीतर मग जन्मभर दुःख व पश्चात्ताप करण्याची पाळी तुझ्यावर येईल. त्यापेक्षा आत्ताच प्रयत्नांची पराकाष्ठा कर आणि अनुकूल परिस्थितीचा पूर्ण फायदा उठव.”

***

रूक्मिणी थोडेसे प्रखर बोलून अर्जुनाला चेतविण्याचा प्रयत्न करीत होती. त्याचा योग्य तो परिणाम अर्जुनावर होत आहे हे रूक्मिणीच्या लक्षात आले. आधी बावरलेला अर्जुन हळूहळू सावरला आणि त्याच्या मुखावर थोडीशी निश्चयात्मकता येत असलेली रूक्मिणीला जाणवली. अर्जुनाच्या या बदलत असलेल्या वृत्तीला अधिक पुष्टी देण्यासाठी रूक्मिणीने जराही वेळ फुकट जाऊ न देता लागलीच पुन्हा बोलायला सुरूवात केली,

“अर्जुना, शाब्बास! तुला पुन्हा तुझ्या मनाच्या मूळ अवस्थेकडे येताना पाहून मला बरे वाटत आहे. त्यामुळे माझ्या मनावर येत असलेला ताण नाहीसा झाला. मला तुझ्याविषयी आता खात्री वाटू लागली आहे. आपली योजना तू निश्चितच यशस्वीपणे शेवटाला नेशील याची मला निश्चिती वाटते. प्रथम तू एक गोष्ट कर. बलरामदादांचा वृथा ताण मनावर घेऊ नकोस. त्यांची भीती बाळगण्याचे काहीच कारण नाही. त्यांची तुझ्यावर एक यती म्हणून पूर्ण श्रद्धा बसलेली आहे आणि तुझे सांगणे हेच ते अंतिम व प्रमाण मानणार आहेत. त्यामुळे तुझे काम सोपे झालेले आहे. निम्मे यश तर आधीच आपल्या पदरात पडलेले आहे. आता तू फक्त दादांना खऱ्या प्रेमाची महती पटवून दिलीस की आपले उरलेले कामही पूर्णपणे फत्ते होणार आहे. अरे, एकदा का तू खऱ्या प्रेमाची महती स्वानुभवाने सांगायला लागलास ना की मग बघ, तुझ्याकडून आपसूकच सर्व बोलणे होऊ लागेल. हाच तर त्या प्रेमाचा गुणधर्म आहे. तू अजिबात काळजी करू नकोस. सर्व काही व्यवस्थित होईल. सुभद्रेच्या मनातील प्रेमभावनेलाच तुला उचलून धरायचे आहे आणि त्या भावनेलाच पाठिंबा द्यायचा आहे, हे तुझ्या लक्षात राहिले की मग सर्व अगदी सुरळीतपणे पार पडेल.



अर्जुना, पण मी तुला काही महत्त्वाच्या सूचना करते त्या मात्र नीट लक्षात ठेव. पहिली गोष्ट म्हणजे तू बोलताना दादांकडे पाहून बोलूच नकोस. म्हणजे त्यांच्या नजरेला नजर देण्याचा प्रश्नच येणार नाही. त्यामुळे तुझ्या मनातील भीती कमी होईल. दुसरे म्हणजे बोलताना तू सुभद्रेकडेही मुळीच पाहू नकोस. नाहीतर तिला पाहून तुझे मन केव्हा चळेल हे सांगता येणार नाही आणि मग तू बोलता बोलता केव्हा व कोठे वहात जाशील हे तुलाही कळणार नाही. तिसरी गोष्ट म्हणजे तू बोलत असताना माझ्याकडेही अजिबात लक्ष देऊ नकोस. माझ्या उपस्थितीमुळे तुझ्या मनावरील दबाव थोडासा वाढणारच आहे आणि तुझे बोलणे योग्य प्रकारे घडत आहे की नाही याचा अंदाज तू माझ्याकडे पाहून घेत रहाशील. त्यामुळे तुझ्या मनाचा गोंधळच होईल आणि तू तुझ्या बोलण्यातील सुसूत्रता हरवून बसशील.

अर्जुना, तू आता मला विचारशील की ‘मग मी बघू तरी कुठे व कोणाकडे?’ तर तू एकच गोष्ट कर आणि ती म्हणजे कोणाकडेही न बघता तू तुझे डोळे मिटूनच ठेव म्हणजे झाले. त्यामुळे दोन गोष्टी साधल्या जातील. एक म्हणजे तुला कोणीच दिसत नसल्यामुळे दुसऱ्या कोणाचाही दबाव तुझ्यावर येऊ शकणार नाही आणि दुसरे म्हणजे तू ध्यानमग्न अवस्थेतून बोलत आहेस असाच सर्वांचा समज होऊन राहील. तुझे बोलणे तुझ्याकडून आंतरिक प्रेरणेतून घडत आहे असाच सर्वांचा भाव होईल आणि त्यामुळे तुझ्या बोलण्याचा होणारा प्रभाव अधिकच वाढेल. तुझ्या सांगण्यावर दादांचीही लगेचच श्रद्धाही बसेल आणि तुझ्या वचनाचा मान ठेवण्यासाठी दादा त्यांचा निर्णयही बदलू शकतील हे तू लक्षात घे. तेव्हा आता जास्त विचार करीत बसू नकोस. विजयश्री अगदी आपल्या दृष्टीक्षेपात आलेली आहे. अशावेळी शेवटचा जोरदार प्रयत्न करून तिला प्राप्त करून घ्यायलाच हवे. अशी उत्कृष्ट संधी पुन्हा येणार नाही. तेव्हा शांत मनाने व दृढ निश्चयाने प्रसंगाला सामोरा जा. तुला यश मिळणारच मिळणार याची खात्री बाळग. फक्त एक गोष्ट लक्षात ठेव की त्या प्रसंगात, त्यावेळेस दुसरे कोणीही तुझ्या मदतीला येऊ शकणार नाही. अगदी मी सुद्धा, कळलं ना? खरे तर, तुला कोणाच्याही मदतीची आवश्यकताच लागणार नाही. सर्व काही योग्य प्रकारे तुझा तूच निभावून नेशील. माझा तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे.”

रुक्मिणीचे बोलणे एवढे निःसंदिग्ध व स्पष्ट होते की अर्जुनाला दुसरा काही विचार करायला वावच नव्हता आणि तशी त्याला जरुरीही जाणवली नाही. रुक्मिणीच्या बोलण्याने अर्जुनाच्या मनावरील मरगळ नाहीशी झाली आणि त्याच्या मनाला पुन्हा उत्साह आला. रुक्मिणीकडून अर्जुनाला प्रेरणाच मिळाली आणि ‘ आपण निश्चितपणे यशस्वी होणार’ असा आत्मविश्वास त्याच्याठिकाणी निर्माण झाला. अर्जुन झटकन आपल्या आसनावरून उठला आणि त्याने रुक्मिणीला

लवून नमस्कार केला. तेवढ्यात कोणीतरी आल्याची चाहूल लागली आणि अर्जुन लगबगीने पुन्हा आपल्या आसनावर बसून 'ध्यानस्थ' झाला. अर्जुनाची शंका खरीच ठरली. स्वतः बलरामाचेच रेवती व सुभद्रा यांच्यासह तेथे आगमन झालेले होते. रुक्मिणीही तेथेच हजर असलेली पाहून बलरामाला बरेच वाटले आणि तसे त्याने बोलूनही दाखवले.

"अगं रुक्मिणी, तूही येथेच आहेस हे बरे झाले. तुला येथे येण्याविषयीचा निरोप मी तुझ्या महालाकडे पाठवलाच होता. त्याचे काय आहे, तू मला केलेली सूचना मला एवढी आवडली व पसंत पडली की त्याची अंमलबजावणीही लगेचच करण्याचा मी निर्णयही घेतला आणि या सर्वांना घेऊन मी येथे यतीमहाराजांच्या दर्शनासाठी आलो. आता केवळ यतीमहाराजांच्या मार्गदर्शनानुसारच पुढील सर्व गोष्टी करायच्या असा माझा ठाम निश्चय झालेला आहे. तेव्हा आता यतीमहाराजांना आपण सुभद्रेविषयी सर्व काही सांगू आणि त्यांचे मार्गदर्शन घेऊ. त्यानुसार वागण्यातच सुभद्रेचे कल्याण आहे अशी माझी पूर्ण श्रद्धा आहे. पण महाराज तर ध्यानात मग्न दिसत आहेत. आपण त्यांच्या साधनेत व्यत्यय तर आणत नाही आहोत ना? मला वाटते नाहीतर आपण पुन्हा थोड्या वेळाने येण्याचे करावे."

अर्जुनाने जरी डोळे मिटले असले तरी त्याचे कान मात्र उघडे असल्यामुळे बलरामाचे सर्व बोलणे तो ऐकत होताच. त्यामुळे जेव्हा बलरामाचे शेवटचे वाक्य अर्जुनाच्या कानावर पडले तेव्हा तो एकदम सावध झाला. 'बलराम जर आता येथून निघून गेले तर ही हातची संधी फुकट जाईल. अशी संधी वाया घालवणे योग्य नाही. एकदा जो काही सोक्षमोक्ष लावायचा आहे तो आत्ताच लावून टाकलेला बरा' असा विचार अर्जुनाच्या मनात आला आणि त्याने सहजपणाचा आविर्भाव आणून स्वतःचे डोळे अर्धवट उघडले. तशाच अर्धोन्मीलित नजरेने बलरामाकडे पाहून अर्जुनाने मंदस्मित केले आणि आपला उजवा हात वर करून त्याला आशीर्वाद दिला. बलरामाने पुढे होऊन आपले दोन्ही हात जोडले आणि आपली मान किंचित लववून 'यती' ला नमस्कार केला. अर्जुन शांत मुद्रेने तसाच स्तब्ध राहिला असता बलरामाने नम्रतेने बोलण्यास सुरुवात केली.

"अहो यतीमहाराज, प्रथम मी आपली मनःपूर्वक क्षमा याचना करतो. आपल्याला काहीही आगाऊ सूचना न देता असे अचानक आमचे येणे झाले, हे खरे तर चूकच आहे. त्यासाठी आपली आधी परवानगी घेणे हे आवश्यकच होते. परंतु तसेच काही तातडीचे व खाजगी बोलावयाचे असल्यामुळे असे येण्याचे धाडस आमच्याकडून झाले. आमच्या कुटुंबात काही निमित्ताने भावनिक गुंतागुंत निर्माण

झालेली आहे. त्यामुळे आमच्या कुटुंबात थोडासा संघर्षही निर्माण झालेला आहे. तेव्हा त्यासंबंधी आपले मार्गदर्शन लाभावे अशी आम्हा सर्वांचीच मनापासून इच्छा आहे. परंतु आमच्या येण्यामुळे आपल्या ध्यानधारणेत जर व्यत्यय येत असेल तर आम्ही पुन्हा आपण सांगाल त्या वेळेस येण्याचे करू. आता आपण आम्हाला निघण्याची आज्ञा केलीत तरी ती आम्हाला शिरसावंद्य आहे.”

बलरामाच्या बोलण्यावरती अर्जुनाने जाणूनबुजून आपले डोळे पुन्हा मिटून घेतले आणि विचारमग्न झाल्यासारखे दाखवले. थोड्यावेळाने आपले डोळे तसेच मिटलेल्या अवस्थेत ठेवूनच अर्जुनाने गंभीर वाणीने बोलावयास सुरुवात केली.

“हे राजन्, आत्ताची आमची ही वेळ ध्यानधारणेची आहे, ही गोष्ट खरी आहे. परंतु तुमच्या येण्यामुळे आमच्या ध्यानावस्थेमध्ये कोणताही व्यत्यय आलेला नाही. कारण मुळात ही ध्यानावस्था अंतरातील असते आणि म्हणूनच अखंड असते. त्यामुळेच त्यामध्ये कोणत्याही बाह्य कारणामुळे बाधा येऊच शकत नाही. काही वेळा तर त्या ध्यानावस्थेमध्ये असतानाच आमच्या ठायी अचानक एखादे व्यवधानही निर्माण होते आणि त्याची बाह्यांगाने लगेच पूर्तीही होते. आजचेच पहा ना! आज सकाळपासूनच आमच्याठायी तुमचेच व्यवधान निर्माण झालेले होते. तुम्हाला काहीतरी मानसिक अडचण आलेली आहे. मनावरती काहीतरी ताणही आलेला आहे आणि तो ताणही सुभद्रेमुळेच आलेला आहे असे आमची मनोदेवता आम्हाला सांगत आहे. तुम्ही मार्गदर्शन घेण्यासाठी आमच्याकडे आज येणार याची आम्हाला खात्रीच होती. खरे तर, आम्ही तुमचीच वाट पाहत होतो आणि ईश्वरी संकेतानुसार तुमचे तसे येथे येणेही झाले. ही तर त्या ईश्वराचीच नियती आहे.


हे राजन्, तुमच्या मनात जी भावनांची गुंतागुंत झालेली आहे त्याचे कारण सुभद्रेचा विवाह आहे हेही आम्ही पूर्णपणे जाणून आहोत. त्यासंबंधीच तुम्हाला आमचे मार्गदर्शन हवे आहे हे पण आम्हाला ठाऊक आहे. खरे तर, आम्ही संन्यासी. त्यामुळे प्रपंचाला तर आम्ही असार व निरर्थकच मानतो आणि प्रापंचिकांशी कोणताही संबंध वा संपर्कही ठेवत नाही. मग जेथे त्यांच्या प्रापंचिक गोष्टींविषयी दखल घेणेही आम्हाला आवश्यक वाटत नाही, तेथे त्यांना त्यांच्या प्रापंचिक अडचणींविषयी काही मार्गदर्शन करणे तर दूरच राहिले. परंतु नियमाला अपवाद करून का होईना, आम्ही तुमच्याकडे गेले दोन दिवस राहिलो आहोत आणि आज आम्ही येथून प्रस्थानही करणार आहोत. परंतु निघण्यापूर्वी एक गोष्ट आम्हास करायची आहे. आमच्या येथील वास्तव्यात तुम्हा सर्वांकडून आणि विशेषतः या सुभद्रेकडून जी काही आमची सेवा घडली त्याचे फळ देण्यास आम्ही बांधलेले आहोत. म्हणूनच आम्ही तुम्हाला तुमच्या अडचणींतून सुटण्यासाठी निश्चितच

मार्गदर्शन करू. पण त्याआधी आमच्या मार्गदर्शनानुसार वागण्याचे वचन तुम्ही आम्हाला द्यावयास हवे. तरच आमच्या सांगण्याला काहीतरी अर्थ प्राप्त होईल. नाही तर, आम्ही येथून निघण्यासाठी मोकळे आहोत. आणि तसे तयारही झालेलो आहोत. आता तुम्ही काय तो निर्णय घ्या.”

अर्जुनाच्या बोलण्याने बलराम अत्यंत प्रभावित झाला आणि त्याच्याठायी असलेली त्या यतीविषयीची श्रद्धा अधिकच दृढ झाली. यतीच्या मार्गदर्शनानुसारच वागण्याचा बलरामाचा निश्चय झाला. त्याने दोन्ही कर जोडून विनम्र भावाने यतीला अभिवादन केले आणि बोलण्यास सुरूवात केली,

“अहो यतीमहाराज, आपण खरोखरच अंतर्ज्ञानी आहात यासंबंधी तर आता माझी खात्रीच पटली. आमच्या मनातील अडचणी व त्यांचे कारण तुम्ही अगदी बरोबर ओळखलेत. तुमच्या दृष्टीने ही अगदी सहज घडणारी गोष्ट आहे हे मी जाणून आहे. परंतु आमच्यासाठी मात्र तो खरोखरीच एक चमत्कार आहे. आपले विशुद्ध अंतःकरणच आमच्यासारख्या प्रापंचिकांच्या अडचणी समजून घेऊ शकते आणि त्यांचे निराकरणही करू शकते हे मला ठाऊक आहे. त्यामुळेच माझी आपल्यावरती अत्यंत दृढ श्रद्धा आहे आणि आपले मार्गदर्शन हे माझ्यासाठी अंतिमच आहे. एवढेच नव्हे, तर माझ्यासाठी ती आपली आज्ञाच आहे. आपला शब्द हाच मला प्रमाण आहे असे मी आपल्याला वचनच देतो.

अहो यतीमहाराज, आपण जे आमच्या दुःखाचे निदान केलेत तेही अत्यंत अचूकच आहे. आमची भगिनी ही वयात आल्यामुळे आम्ही तिच्या विवाहासंबंधी विचार सुरू केल्यानंतर कुरूकुळातील राजपुत्र दुर्योधन हा सुभद्रेसाठी योग्य आहे अशा निष्कर्षाप्रत आम्ही आलो. रूप, गुण, पराक्रम, प्रतिष्ठा, ऐश्वर्य या सर्वच अंगांनी दुर्योधन सुभद्रेला अनुरूप आहे असे आमचे सर्वांचेच मत आहे. पण तसा प्रस्ताव जेव्हा आम्ही सुभद्रेसमोर मांडला तेव्हा तिने अनुकूलता दर्शविली नाही. त्याचबरोबर तिच्या मनात अर्जुनाविषयी प्रेमाची भावना आहे आणि तिने मनाने अर्जुनालाच पती म्हणून वरले आहे असे सुभद्रेने आम्हाला स्पष्टपणे सांगितले. एवढेच नव्हे, तर अर्जुनाच्या मनातही सुभद्रेविषयी तशीच प्रेमभावना आहे आणि त्यानेही सुभद्रेशीच विवाह करण्याचा निश्चय केलेला आहे हेही आम्हाला कळले आहे. त्यामुळे सुभद्रेने तर दुर्योधनाशी विवाह करण्यास स्पष्टपणे नकारच दिला होता. साहजिकच माझीही प्रतिक्रिया थोडीशी नाराजीची आणि नंतर थोडेसे रागावण्यातही झाली हे खरे आहे. परंतु माझाही नाईलाजच होत होता. कारण सर्वच दृष्टीने दुर्योधन हा सरस आहे हे मला तर अगदी स्पष्टपणे दिसत होते आणि सुभद्रेच्या भवितव्याच्या सुखाचा विचार करून, तिच्या हिताचा निर्णय घेण्याची जबाबदारी केवळ माझ्यावरतीच होती.



अहो महाराज, माझा अर्जुनाविषयी कोणताही राग नाही. त्याचे गुण व पराक्रम मीही जाणून आहे. माझ्याही तो अत्यंत आवडीचा व कौतुकाचा आहेच. परंतु त्या पांडवांकडे राजसत्ता व राजवैभव नाही ही वस्तुस्थिती आहे. ती आपल्याला विसरता येत नाही. माझ्या प्रिय भगिनीला कोणतेही कष्टाचे व दुःखाचे जीवन जगावयास लागू नये हा माझा विचार योग्यच आहे ना? एकवेळ सुभद्रेचे मन भावनेच्या भरात वाहून जाऊ शकेल पण माझे तसे होणार नाही. मी भावनेपेक्षा बुद्धीला जास्त महत्त्व देतो आणि त्या बुद्धीनेच दिलेला निर्णय मी प्रमाण मानतो. म्हणूनच मी माझ्या निर्णयाशी आग्रही राहिलो आणि त्याच दृष्टीने सुभद्रेची समजूत घालण्याचा प्रयत्नही करीत राहिलो. त्याची परिणती म्हणजे तेव्हापासून सुभद्रा अत्यंत गंभीर व अंतर्मुख होऊन राहिलेली होती. तिच्या मनावर अत्यंत दडपण आल्याचेच हे लक्षण होते हे निश्चित. त्यामुळे ती कोणाशीच मोकळेपणाने बोलत व वागत नव्हती. तिची अशी स्थिती पाहून मलाही अत्यंत वाईटच वाटत होते. 'तिच्या हिताच्या नावावर आपण आपला निर्णय सुभद्रेवर लादत तर नाही ना?' अशी शंकाही माझ्या मनाला हल्ली सारखी सतावीत होती.


अहो यतीमहाराज, पण भाग्याने आपली भेट झाली आणि माझ्या मनाला आधार मिळाला. आपण कृपावंत होऊन आमच्या राजवाड्यात वास्तव्यासाठी आलात आणि आम्हाला सहवासाची व सेवेची मोठी संधीही दिलीत. त्याने तर एकदम चमत्कारच घडला. आमच्या राजवाड्यातील वातावरणातही आमूलाग्र बदल झाला. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपण सुभद्रेवर तर काहीतरी जादूच केल्यासारखे झाले आहे. आपल्या सहवासात व आपल्याशी बोलण्याने सुभद्रेचे मन एकदम मोकळे झाले आणि तिचा पूर्वीचा उत्साहही तिच्याठायी हळूहळू पुन्हा येऊ लागला आहे, हे शुभ वर्तमान मला रुक्मिणीकडून कळले मात्र, मी तर अगदी हरखूनच गेलो. सुभद्रेच्या मनाच्या या अनुकूल अवस्थेचा आपण आता वेळीच योग्य उपयोग करून घेणे आवश्यक आहे असे मला वाटते. तेव्हा आपणच आता सुभद्रेची समजूत घालावी आणि तिचे मन वळवून या विवाहाला राजी करावे अशी मी आपल्याला विनम्र विनंती करतो. आपली आज्ञा आम्हा सर्वांनाच शिरसावंद्य आहे"

असे बोलून बलरामाने इतर सर्वांकडे वळून पाहिले असता सर्वांच्याच मुखावरती संमतीदर्शक भाव दिसला. सुभद्रासुद्धा विशेष भावपूर्ण झाली होती आणि तिनेही आपले दोन्ही हात जोडून यतीला श्रद्धापूर्वक वंदन केले.

बलरामाचे बोलणे संपल्यावरती अर्जुनाने आपले डोळे अर्धवट उघडले आणि सर्वांकडे एकदा नजर फिरवून पुन्हा ते मिटून घेतले. बराच वेळ ध्यानमग्न अवस्थेत राहिल्यासारखे दाखवून अखेर अर्जुनाने तशाच स्थितीत शांत व धीरगंभीर सुरात बोलावयास सुरुवात केली.

"हे राजन्, तुझे बोलणे व त्यातील भावार्थही आमच्या पूर्ण लक्षात आला आहे. भावनिक गुंतागुंतीचे प्रश्न सोडवणे ही अत्यंत कठीण गोष्ट आहे. कारण भावना या नाजूक असतात आणि म्हणूनच त्या दुर्बलही असतात. गुंता सोडवणे तर आवश्यकच असते. पण भावनांना जपणेही तेवढेच आवश्यक असते. कितीही काळजीपूर्वक गुंता सोडवताना भावना या थोड्याफार दुखावल्या जातात हेही खरे आहे. पण त्यामध्ये सर्वात महत्त्वाची गोष्ट अशी आहे, की त्या भावना आपल्या दुखवायच्या की दुसऱ्याच्या दुखवायच्या हाच मोठा प्रश्न आहे. इथेच तर आपल्या दुसऱ्यावरच्या प्रेमाची कसोटी लागते आणि आपल्या भावना किती सबळ आहेत हेही सिद्ध होते. दुसऱ्याच्या भावना आपण त्याच्या हितासाठीच दुखवीत आहोत असे म्हणताना आपण अंतर्मुख होऊन हाही विचार केला पाहिजे, की केवळ आपल्या अहंकाराने तर दुसऱ्याच्या भावना दुखावल्या जात नाहीत ना? 'दुसऱ्याचे हित' असे म्हणताना आपण आपल्यालाच प्रामाणिकपणे विचारले पाहिजे, की हित म्हणजे काय हे आपल्याला तरी खरेच कळले आहे का? आणि दुसऱ्याचे हित करण्याआधी आपण आपले हित तरी खरेच साधले आहे का? खरे तर, बऱ्याच वेळा असेच होते की दुसऱ्याच्या भावनांचा विचारही न करता किंवा त्यांना महत्त्वही न देता, आपण आपल्या हिताच्या कल्पनांचे ओझे दुसऱ्यावरती लादतच असतो.

हे राजन्, हिताचा विचार करीत असताना प्राधान्य कशाला द्यावे, हाच सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे. अशा वेळेसच आपल्यावरील संस्कारांची खरी कसोटी लागत असते. या जगात मनुष्याला धनदौलत, ऐश्वर्य, सुखभोग, मान मरातब हे सर्व प्रारब्धानुसारच मिळत असते. कितीही खटाटोप केला तरी या मिळणाऱ्या गोष्टींमध्ये अधिक वाढ होणार नाही किंवा काही कमीही होऊ शकणार नाही. परंतु सदाचरण, परोपकारवृत्ती, नम्रता इत्यादी सद्‌गुण मात्र मनुष्याला भाग्यानेच मिळतात आणि ते गुण त्याला प्रयत्नपूर्वक वाढवावे लागतात. या सद्‌गुणांपेक्षाही खरे प्रेम मिळणे वा दुसऱ्याविषयी प्रेम निर्माण होणे ही तर परमभाग्याचीच गोष्ट आहे. प्रेम हे तर त्या परमेश्वराचे वरदानच आहे. त्या प्रेमासारखी दुसरी कोणतीही गोष्ट या जगामध्ये अस्तित्वातच नाही. प्रेम हेच सर्वश्रेष्ठ आहे. कारण त्यामध्ये ईश्वरी भावना सामावलेली आहे. तेव्हा एका बाजूला प्रेम आहे आणि दुसऱ्या बाजूला या जगातील सर्व ऐश्वर्य जरी उभे केले, तरी ते त्या प्रेमापुढे कःपदार्थ आहे. त्यांची तुलना व स्पर्धा होऊच शकत नाही. कारण बाकी सर्व प्रारब्धानुसार प्रयत्नपूर्वक प्राप्त होऊ शकेल. परंतु खरे प्रेम मिळणे हे अत्यंत दुर्मिळ आहे. असे असताना भाग्याने मिळालेले प्रेम नाकारण्याचा वा झिडकारण्याचा प्रयत्न करणे हे तर मूर्खपणाचेच आहे. त्यामुळे कोणाचे व कसले हित साधले जाणार आहे बरे?



हे राजन्, आमच्या अंतःकरणातून प्रगटणारे हे बोल निरपेक्ष आहेत. तेथे कोणताही व्यक्तीसापेक्ष विचार अजिबात नाही. परंतु सुभद्रेच्या साठी सापेक्षतेने सांगायचे तर जेथे तिचे मन गेले आहे तेथेच तिचा विवाह होणे योग्य आहे. त्यामध्येच सर्वांना सुख आहे आणि सर्वांचे हितही आहे. कारण मनाविरूद्ध स्वीकारलेल्या नात्यामध्ये कोणालाच स्वास्थ्य व मनःशांती लाभणार नाही. ना दुर्योधनाला, ना अर्जुनाला आणि सुभद्रेला तर केव्हाही नाहीच नाही. अर्थात सुभद्रेचे मन ज्याच्यावर गेले आहे त्या अर्जुनाच्या सुस्वभावाची व सत्चारित्र्याची खात्री तुम्हाला हवी. तशी ती असल्यास मग दुसरा काही प्रश्न व पर्याय शिल्लकच उरत नाही. पण आमचे अंतःकरण आम्हाला निश्चितपणे सांगते की या सुभद्रेचे मन कोणत्याही अयोग्य वा भलत्यासलत्या पुरूषावर जाणे शक्यच नाही. कारण तुम्ही लहानपणापासून तिच्यावर जे संस्कार केलेले आहेत, त्यामुळेच तिच्या मनाच्याठायी योग्यायोग्यतेची जाण अगदी सहजपणे आहे. सुभद्रेशी आमचे जे काही थोडेफार बोलणे झाले त्यावरून एक गोष्ट आम्हाला लागलीच व निश्चितपणे जाणवली, की सुभद्रा ही मनाने अत्यंत निर्मळ व कोमल आहे. तशीच ती अत्यंत हळवीही आहे. तिच्या भावनांना दुखावणे हे अयोग्यच आहे. तेव्हा सुभद्रेवर पूर्ण विश्वास ठेवा आणि तिच्या पाठीशी सदैव भक्कमपणे उभे रहा. सुभद्रेच्या आनंदाच्या भावी जीवनाची सुरूवात तुम्ही तुमच्या हस्तेच करून द्या आणि त्यातून मिळणाऱ्या पुण्यकर्माचे धनी व्हा. असो. सर्वांचे शुभ होवो. सर्वांचे कल्याण होवो. सर्वजण नित्य सुखी असोत. हेच आमचे सर्वांना शुभाशीर्वाद.

*****

# लेखक परिचय - श्रीपरमानंदस्वामी




श्रीपरमानंदस्वामी - श्री.अविनाश मोरेश्वर लिमये यांनी मुंबई विद्यापीठातून M.Sc. with Research ही पदवी घेतली. आय.आय.टी. पवई, मुंबई या सुप्रसिद्ध संस्थेत मेटॅलर्जिकल इंजिनिअरिंग या विभागात ते दीर्घकाळ सेवा करून निवृत्त झाले आहेत.

गृहस्थाश्रमात राहूनच भक्तिमार्ग कसा साधता येतो व सद्‌गुरु कृपेने ईश्वरप्राप्ती कशी करून घेता येते याचा आदर्श त्यांच्या जीवनाद्वारे प्रत्यक्ष साकार झालेला आहे.

त्यांनी प्रदीर्घ काळ, अखंडपणे व प्रेमभावाने त्यांचे पूज्य पिता व सद्‌गुरु श्रीअवधूतस्वामी यांची सेवा, भक्ती व त्यांचे कार्य करून तसेच स्वतःची साधना करून सर्वश्रेष्ठ असा आत्मानुभव घेतला.

श्रीअवधूतस्वामी यांच्या महानिर्याणानंतर श्रीपरमानंदस्वामी यांनी तरुण वयातच या दत्तपरंपरेच्या कार्याची धुरा अत्यंत समर्थपणे सांभाळली आणि सर्वसामान्यांना व भक्तांना अचूक मार्गदर्शन केले व आजही करीत आहेत.

श्रीपरमानंदस्वामी यांनी लिहिलेला प्रभूरामाच्या अंतःकरणाच्या अवस्थेचे दर्शन घडविणारा अनुभवसिद्ध ग्रंथ ‘हा राम माझा’ २००० साली व कृष्ण व राधा यांच्या भक्तिऐक्याचे स्वानुभूतीतून मनोहारी दर्शन घडविणारा ग्रंथ ‘कृष्ण सखा माझा’ २००४ साली प्रकाशित झाला. तसेच नारद व लक्ष्मी यांच्या संवादातून उलगडलेले कृष्णाच्या अंतरंगातील गूज प्रकटविणारा ग्रंथ ‘कृष्ण परमात्मा’ २००८ मध्ये प्रकाशित झाला. या ग्रंथास मराठी साहित्य परिषद, पुणे यांचा ‘मृत्युंजय’ पुरस्कार प्राप्त झाला आहे. तसेच दत्तात्रेयांच्या अवतार मालिकेतील चरित्रांचे रहस्य प्रकट करणारा ग्रंथ ‘दत्त हाचि अवधूत’ २०१० साली प्रकाशित झाला असून, श्रीपरमानंदस्वामी यांच्या भक्तिकाव्यांचा संग्रह ‘आनंदाचे डोही’ २०११ मध्ये प्रकाशित झाला आहे. ‘दत्तात्रेय वामन भिडे - एक शोध आनंदाचा’ ही आध्यात्मिक कादंबरी २०१४ साली प्रकाशित झाली, तर त्याच आध्यात्मिक कादंबरीचा पुढील भाग म्हणजे ‘दत्तात्रेय वामन भिडे - एक प्रवास आनंदाचा’ हा २०१५ मध्ये प्रकाशित झाला आहे. त्यापुढील भागाचे लेखन श्रीपरमानंदस्वामी यांचेकडून घडतच आहे.



# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी पुस्तक वाचायला कुठे जायची गरज नाहीतुमच्या मोबाईलवर . आता हजार मराठी ईपुस्तके आहेत.

मराठी ई पुस्तकं तुम्ही www. esahity. com वरून डाऊनलोड करा. किंवा esahity@gmail.com ला कळवून मेल ने मिळवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून या नंबर ला तुमचे नांव व गांव Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. किंवा ई साहित्यचे app.

https://play. google. com/store/apps/details? id=com. esahity. www. esahitybooks

या लिंकवर उपलब्ध आहे. ते download करा.

हे सर्व मोफ़त आहे. No terms. No Conditions.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईलमध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे... कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

आपले नम्र

टीम ई साहित्य